# वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

## इयत्ता अकरावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे

# वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

## इयत्ता अकरावी

२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

R8Z2B3

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : 2019
तिसरे पुनर्मुद्रण : 2022

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे - ४११ ००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**समिती**

| | |
|---|---|
| श्री. नारायण पाटील | (अध्यक्ष) |
| डॉ. मुकुंद तापकीर | (सदस्य) |
| डॉ. प्रशांत साठे | (सदस्य) |
| डॉ. ज्योती गायकवाड | (सदस्य) |
| श्री. मोहन साळवी | (सदस्य) |
| श्री. महेश आठवले | (सदस्य) |
| श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन | (सदस्य) |
| श्री. सुरेंद्र निरगुडे | (सदस्य) |
| श्रीमती लक्ष्मी पिलाई | (सदस्य) |
| श्रीमती मृणाल फडके | (सदस्य) |
| श्रीमती उज्ज्वला गोडबोले | (सदस्य-सचिव) |

**अभ्यासगट सदस्य**

| | |
|---|---|
| डॉ. मिनल भंडारी | श्री. ज्ञानदेव येवले |
| डॉ. चंदन बोरा | श्री. माणिक घुमई |
| डॉ. रुपसेन कांबळे | श्री. अविनाश ताकवले |
| सौ. मृणाल फडके | श्री. अरुण चव्हाण |
| सौ. माधुरी पवार | सौ. रुपाली देशपांडे |
| श्री. संजय पाटील-अर्जुनवाडकर | श्री. अमित गोखले |

**भाषांतरकार**

| | |
|---|---|
| डॉ. मिनल भंडारी | सौ. माधुरी पवार |
| डॉ. चंदन बोरा | श्री. अमित गोखले |
| डॉ. रुपसेन कांबळे | श्री. माणिक घुमई |
| श्री. संजय पाटील-अर्जुनवाडकर | श्री. ज्ञानदेव येवले |

**समीक्षक**

| | |
|---|---|
| डॉ. मिनल भंडारी | सौ. माधुरी पवार |
| श्री. अमित गोखले | डॉ. रुपसेन कांबळे |
| श्री. संजय पाटील-अर्जुनवाडकर | श्री. ज्ञानदेव येवले |
| श्री. नारायण पाटील | सौ. मृणाल फडके |

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई

**अक्षरजुळणी**

मे. स्मार्ट ग्राफिक्स, मुंबई

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सचिन मेहता**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्‌यार्थी मित्रांनो,

आपल्या हाती 'वाणिज्य संघटन व व्यवस्थापन' या विषयाचे हे क्रमिक पुस्तक सोपविताना खूप आनंद होत आहे. हे केवळ एक क्रमिक पुस्तकच नाही तर व्यवसाय मार्गदर्शक आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. सकाळपासून रात्रीपर्यंत आपण वेगवेगळी उत्पादने आणि सेवा वापरत असतो; आपणाला उत्पादने कशी मिळतात? सेवा कुठे उपलब्ध होतात? यांचा उगम कोठे असतो? आपणाला त्यांच्याबद्‌दल कसे समजते आणि आपल्यापर्यंत या गोष्टी कशा पोहोचतात? आपणाला त्यांची नावे कशी समजतात? कोण आपणापर्यंत हे सर्व पोहोचवते? या सर्व व्यवहारांचे व्यवस्थापन कोण करते? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजेच वाणिज्य, व्यापार, उद्‌योग आणि इतर गोष्टी; ज्या आपणाला रोजच्या जीवनात माहीत असतात. या सर्व गोष्टी सविस्तरपणे आपण 'वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन' या क्रमिक पुस्तकातून बघू.

या पुस्तकात पाठाशी संबंधित माहिती चांगली समजण्यासाठी कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. मनोरंजक माहितीही देण्यात आली आहे. प्रत्येक पाठाच्या शेवटी विविध प्रश्न देण्यात आले आहेत. ते सोडविताना विद्‌यार्थ्यांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतील. याशिवाय प्रत्येक विद्‌यार्थ्यास स्वमत व्यक्त करणे, विश्लेषण करणे इत्यादींची संधी मिळेल. प्रत्येक पाठाच्या शेवटी घटकांशी संबंधित क्यू.आर. कोड देण्यात आले आहेत. त्यांतील माहितीच्या आधारे घटकासंबंधीचे अधिक ज्ञान मिळण्यास मदत होईल. तसेच विद्‌यार्थ्यांच्या अध्ययन, आकलन, उपयोजन आणि कौशल्य यांच्या क्षमतांत वाढ होऊन अध्ययन – अध्यापन प्रक्रिया सुलभ होईल अशी आशा आहे.

हा पुनर्रचित अभ्यासक्रम विद्‌यार्थ्यांची आकलनशक्ती वाढविण्यासाठी सक्षम आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इयत्ता अकरावी (वाणिज्य) साठी या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होत आहे.

मंडळाला विश्वास आहे की, हे क्रमिक पुस्तक विद्‌यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात मार्गदर्शक ठरेल.

हे पुस्तक तयार करण्यासाठी दिलेल्या बहुमोल योगदानाबद्‌दल समिती सदस्य, अभ्यासगट सदस्य, समीक्षक आणि गुणवत्ता परीक्षक या सर्वांचे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या वतीने आभार.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**पुणे**
**दिनांक** : २० जून २०१९
**भारतीय सौर दिनांक** : ३० जेष्ठ १९४१

# वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

## इयत्ता ११ वी

## क्षमता विधाने

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १ | वाणिज्य व व्यवसायाची ओळख | • वाणिज्य व व्यवसायाची संकल्पना समजणे.<br>• विविध आर्थिक कृतींचा अभ्यास करणे.<br>• व्यवसाय संकल्पना समजावून घेता येणे.<br>• पेशाची संकल्पना समजून घेता येणे.<br>• व्यवसायातील नफ्याचे महत्त्व समजून घेता येणे.<br>• व्यवसायाचे वर्गीकरण समजून घेणे.<br>• विद्यार्थ्यांना उद्योग व व्यवसाय संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• व्यापाराच्या अनुषंगिक साधनांचा अभ्यास करता येणे. |
| २ | व्यापार | • विद्यार्थ्यांना व्यापाराची संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• विद्यार्थ्यांना अंतर्गत व बहिर्गत व्यापार संकल्पनामधील फरक स्पष्ट करता येणे.<br>• विद्यार्थ्यांना घाऊक व्यापाराची संकल्पना समजणे.<br>• विद्यार्थ्यांना किरकोळ व्यापाराचे विविध प्रकार समजतात.<br>• विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय व्यापार समजतो.<br>• विद्यार्थ्यांना आयात व्यापाराची कार्यपद्धती सांगता येते.<br>• विद्यार्थ्यांना निर्यात व्यापाराची कार्यपद्धती सांगता येते.<br>• विद्यार्थ्यांना पुनर्नियात व्यापाराची संकल्पना व अर्थ समजतो. |
| ३ | लघुउद्योग व व्यवसाय | • विद्यार्थ्यांना लघुउद्योगाचा अर्थ व व्याख्या समजते.<br>• उद्योगात लघुव्यवसायाचे महत्त्व समजते.<br>• लघु उद्योगाचे फायदे व आव्हाने स्पष्ट करता येतात.<br>• विद्यार्थ्यांना लघु उद्योग स्थापण्याची संकल्पना स्पष्ट करता येते. |
| ४ | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग – १ | • विद्यार्थ्यांना खाजगी व्यवसाय संघटन प्रकारांची माहिती समजते.<br>• विद्यार्थ्यांना खाजगी व्यवसायाचा अर्थ व व्याख्या समजणे.<br>• व्यक्तीगत व्यापार प्रकारातील गुण, दोष, समजून घेणे.<br>• भागीदारी संस्थेचे प्रकार, वैशिष्ट्ये, फायदे, तोटे समजून घेणे.<br>• भागीदाराचे प्रकार व भागीदारी संस्थेचे प्रकार समजून घेणे.<br>• एकत्र हिंदू कुटुंब व्यवसायाची माहिती समजावून देणे.<br>• संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये व गुण दोषांची माहिती समजावून देणे.<br>• विविध कंपन्यांची माहिती समजावून देणे.<br>• विद्यार्थ्यांना सहकारी संस्थांची वैशिष्ट्ये, फायदे व तोटे समजावून देणे. |

| | | |
|---|---|---|
| ५ | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग – २ | • व्यवसाय संघटनांचे अर्थ व व्याख्या सांगता येणे.<br>• विभागीय खाते प्रकाराची वैशिष्ट्ये अधोरेखीत करणे.<br>• वैधानीक महामंडळ ही संकल्पना समजून घेणे.<br>• सरकारी प्रमंडळ म्हणजे काय ते समजून घेणे.<br>• बहुराष्ट्रीय प्रमंडळ ही संकल्पना, त्याचा अर्थ, व्याख्या व महत्त्व समजून घेणे. |
| ६ | व्यवसाय पूरक संस्था | • विद्यार्थ्यांना व्यवसाय करणासाठी पूरक विविध संस्थेविषयी माहिती समजणे.<br>• विद्यार्थ्यांना लघुउद्योग विकास महामंडळाची वैशिष्ट्ये समजणे.<br>• विद्यार्थ्यांना नाबार्ड विषयी वैशिष्ट्ये समजणे.<br>• विद्यार्थ्यांना खादी व ग्रामोद्योग संस्थेची वैशिष्ट्ये समजणे.<br>• विद्यार्थ्यांना महिला बचत गटाचे कामकाज समजणे.<br>• विद्यार्थ्यांना जागतिक बँकेची माहिती समजणे. |
| ७ | व्यावसायिक पर्यावरण | • व्यावसायिक पर्यावरणाचा अर्थ सांगता येणे.<br>• व्यावसायिक पर्यावरणाची संकल्पना सांगता येणे.<br>• व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व सांगता येणे.<br>• व्यावसायिक पर्यावरणाचे विविध पैलू सांगता येणे.<br>• नवीन आर्थिक धोरणाचा व्यवसायावर झालेला परिणाम समजतो. |
| ८ | व्यवस्थापनाची ओळख | • व्यवस्थापन या संज्ञेची ओळख करून घेता येणे.<br>• व्यवस्थापन या संज्ञेचा अर्थ व व्याख्या स्पष्ट करणे.<br>• व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये समजून घेणे.<br>• व्यवस्थापनाचे विविध स्तर व भूमिका समजून घेणे.<br>• व्यवस्थापन एक कला, शास्त्र व पेशा म्हणून जाणून घेणे. |

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | वाणिज्य व व्यवसायाची ओळख .............. | १ |
| २. | व्यापार ...................................... | २४ |
| ३. | लघुउद्योग ................................... | ५४ |
| ४. | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग-१ ............ | ६८ |
| ५. | व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग-२ ... ..... | १०६ |
| ६. | व्यवसाय सहायक संस्था .................. | १३० |
| ७. | व्यावसायिक पर्यावरण ...................... | १५२ |
| ८. | व्यवस्थापनाची ओळख ..................... | १६९ |
| | उत्तर सूची ................................. | १८५ |

# १. वाणिज्य व व्यवसायाची ओळख

१.१ प्रस्तावना
१.२ आर्थिकेतर कृती
१.३ आर्थिक कृती
१.३.१ व्यवसाय
१.३.२ पेशा
१.३.३ नोकरी
१.४ व्यवसायाची उद्‌दिष्टे
१.५ व्यवसायातील नफ्याचे महत्त्व
१.६ व्यावसायिक कृतीचे वर्गीकरण
१.६.१ उद्योग
१.६.२ वाणिज्य
१.६.३ व्यावसायिक सेवा
- फरक
- सारांश
- स्वाध्याय

मयुरी, नेहा, राजेश, चार्मी आणि गौतम हे एकमेकांचे खूप चांगले मित्र-मैत्रिणी आहेत. सर्वजण एका वर्गखोलीत जमले आहेत. ते सर्वजण एकमेकांशी गप्पा मारत आपले अनुभव सांगत आहेत. सौ. देशमुख, ज्या पेशाने समुपदेशिका आहेत, त्या वर्गात येतात आणि मुलांशी गप्पा मारत, त्यांना काही प्रश्न विचारतात.

**सौ.देशमुख** – मुलांनो, तुम्हाला काही आठवतयं का, जेव्हा तुम्ही तुमची १०वी ची अंतिम परीक्षेची तयारी करत होतात त्यावेळी तुमच्या आईने तुम्हाला चहा किंवा कॉफी दिली होती?

**सर्वजण** – हो मॅडम, आम्हाला आठवतय सगळं.

**सौ. देशमुख** – याचाच अर्थ, काही क्रिया तुमच्या आईनी केल्या. मुलांनो, तुम्ही तुमच्या शालांत परीक्षेनंतर शाळेच्या उपहारगृहात जमलात का कधी, तुम्ही काही खाद्यपदार्थ मागवले होते का तिथे? तुम्ही त्याचे पैसे दिले होते का?

**सर्वजण** – होय मॅडम, आम्ही जमलो होतो आणि खाद्यपदार्थ खाल्यानंतर पैसेसुद्धा दिले होते.

**सौ. देशमुख** – मुलांनो, तुम्हाला आर्थिक आणि आर्थिकेतर प्रक्रियेमध्ये असलेला फरक माहीत आहे का?

**मयुर/गौतम** – हो मॅडम, जेव्हा आपण एखादे काम करतो आणि त्याबदल्यात जेव्हा आपल्याला अर्थप्राप्ती होते त्यास आर्थिक प्रक्रिया असे म्हणतात.

**नेहा** – याविरुध्द प्रक्रिया ही आर्थिकेतर असते. ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची अर्थप्राप्ती होत नाही.

**सौ.देशमुख** – काही उदाहरणे सांगू शकता का?

**राजेश** – होय मॅडम. जेव्हा आई स्वतःच्या मुलीसाठी ड्रेस शिवते किंवा शालांत परीक्षेच्या वेळेला जेव्हा आम्हाला आईने चहा/कॉफी दिलेली होती, या सर्व आर्थिकेतर प्रक्रिया होत. परंतु, शिंपी जेव्हा कपडे शिलाई करतो ती आर्थिक प्रक्रिया होते. कारण, त्याला त्याचे पैसे मिळतात.

**सौ. देशमुख** – अतिशय उत्तम. आईने ड्रेस शिवला आणि शिंप्याने देखील ड्रेस शिवला, दोन्ही क्रिया एकच आहेत. परंतु, आईने शिवलेला ड्रेस ही आर्थिकेतर क्रिया असते. कारण त्याचे पैसे तिला मिळत

नाहीत पण शिंप्याला पैसे मिळतात म्हणून ती आर्थिक प्रक्रिया आहे.

**चार्मी** – मग मॅडम, शिंप्याची कृती हा ‘व्यवसाय’ आहे की ‘पेशा’ आहे?

**सौ. देशमुख** – मुलांनो, बघूया.....आपणांस व्यवसाय, पेशा आणि नोकरी संदर्भात आपल्याला काय समजते ते. चला तर, या सर्व गोष्टी आपण या पहिल्या प्रकरणात शिकूया.

### १.१. प्रस्तावना :

प्रत्येक मानवाला आपल्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या वस्तू व सेवांची गरज असते. त्यामुळे ते स्वतःला आयुष्यभर काही तरी कामामध्ये गुंतून घेतात.

या कृतींचे वर्गीकरण आर्थिक कृती व आर्थिकेतर कृतीमध्ये करता येते.

**मानवी कार्य/कृती**
- आर्थिकेतर कृती
- आर्थिक कृती
  - व्यवसाय
  - पेशा
  - नोकरी

### १.२ आर्थिकेतर कृती :

आर्थिकेतर कृतींमध्ये पैशांची अपेक्षा न ठेवलेल्या कृतींचा समावेश होतो. ज्यात वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व भावनिक बाबींचा समावेश होतो.

उदा. पुस्तके वाचणे, जनतेची सेवा करणे, आईने स्वयंपाक बनवणे.

### १.३ आर्थिक कृती :

समाजातील सर्व स्तरातून वस्तू व सेवा यांचे उत्पादन, वितरण इत्यादिशी संबंधीत, पैसे मिळवण्याच्या हेतूने केलेल्या कृतींचा समावेश आर्थिक कृतींमध्ये होतो.

उदा. कामगारांनी कारखान्यात काम करणे.

आर्थिक कृतींमुळे रोजगार मिळवणे सुलभ होते.

#### १.३.१ व्यवसाय :

व्यवसाय हा एखाद्या व्यक्तीचा किंवा एखाद्या समूहाचे सुसंघटित प्रयत्न दर्शवितो. वस्तू व सेवांचे उत्पादन करून आणि बाजापेठेमध्ये त्यांची विक्री करून नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळविण्याचा पद्धतशीर प्रयत्न व्यावसायिकाकडून केला जातो. तसेच समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा भागविल्या जातात.

एखाद्या वस्तूचे उत्पादन करणे म्हणजे ती वस्तू तयार करणे होय. त्या कोणत्याही प्रकारच्या वस्तू असू शकतात. जसे कृषी उत्पादने किंवा कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तू. या मानवी श्रमाच्या मदतीने किंवा यंत्राच्या साहाय्याने तयार केलेल्या असतात.

उदा : जमिनीची मशागत करून अन्नधान्याचे उत्पादन करणे हे कृषी उत्पादनाचे उदाहरण आहे. तथापि, मानवी श्रम किंवा यंत्रांच्या साहाय्याने कारखान्यामधून तेल बियांचे रूपांतर खाद्य तेलात करणे हे औद्योगिक उत्पादनाचे उदाहरण आहे.

वितरणामध्ये वस्तू व सेवा यांचा समावेश असतो. यामध्ये वाहतूक, गोदाम, जाहिरात यांच्या साहाय्याने उत्पादकाकडून ग्राहकाकडे त्या वस्तू हस्तांतरीत केल्या जातात. या सर्वांचा समावेश व्यवसाय या संकल्पनेत होतो.

- **व्यवसायाची व्याख्या :**

**१) प्रा. हॅने. –**

'मालाचे उत्पादन करण्याच्या व संपत्ती मिळविण्याच्या दिशेने केलेली सर्व मानवी कार्ये म्हणजे व्यवसाय होय'.

**२) प्रा. प्राईड, हग्ज, कपूर –**

'समाजाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी वस्तू आणि सेवांचे नफा मिळविण्याच्या दृष्टीने, उत्पादन व विक्रीसाठी व्यक्तीनी केलेले सामूहिक प्रयत्न म्हणजे व्यवसाय'.

- **व्यवसायाची वैशिष्ट्ये :**

**व्यवसायाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील :**

**१. आर्थिक कृती–**

व्यवसाय ही एक आर्थिक कृती आहे. ती अर्थप्राप्तीसाठी व उपजीविकेसाठी केली जाते. ती प्रेमासाठी, आपुलकीसाठी किंवा करुणेसाठी केली जात नाही.

**२. दोन पक्ष–**

प्रत्येक व्यवसायाच्या घडामोडीमध्ये देवाणघेवाण केली जाते. देवाण घेवाणीसाठी कमीत कमी दोन पक्षांची गरज असते. ते दोन पक्ष म्हणजेच ग्राहक व विक्रेता होय. व्यवसायातील व्यवहार पूर्ण होणे म्हणजेच खरेदीदार व विक्रेता यांच्यातील लेखी किंवा तोंडी करार होय.

**३. नफा हेतू–**

कोणत्याही व्यवसायाचा मूळ उद्देश नफा मिळविणे असतो. व्यवसायात वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री करून किंवा वस्तूंची किंमत थोड्याफार प्रमाणात कमी करून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न व्यावसायिक करत असतो. नफा हा उद्योगाचा कणा असतो की ज्यामुळे व्यवसाय दीर्घकाळ चालू शकतो. नफा हा व्यवसायानुसार वेगवेगळा असतो.

**४. वस्तू व सेवांचे उत्पादन –**

कोणत्याही वस्तूंची किंवा सेवांची देवाणघेवाण करण्यापूर्वी व्यवसायांना त्या वस्तूंचे उत्पादन करावे लागते. वस्तू या एकतर कारखान्यात मोठ्या प्रमाणावर निर्माण केल्या जातात किंवा उत्पादकाकडून त्याचा पुरवठा होत असतो. या कृतीमध्ये नफा मिळवणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

**५. वस्तू व सेवांची देवाण घेवाण –**

व्यवसायामध्ये वस्तू व सेवांच्या देवाण घेवाणीचा समावेश असतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या पैशाच्या रूपात किंवा किंमतीत वस्तू व सेवांची देवाण घेवाण केली जाते.

उदा.– पैशाच्या साहाय्याने वही खरेदी करणे

याउलट वस्तू विनिमयामध्ये वस्तू व सेवांच्या बाबतीत इतर वस्तूंची देवाण घेवाण केली जाते.

उदा.– गव्हाच्या बदल्यात तांदूळ देणे.

जर वस्तूचे उत्पादन स्वतःच्या उपभोगासाठी केले जात असेल. **उदा.** पोशाख स्वतःच्या मुलीसाठी शिवणे त्याला उद्योगधंदा म्हणता येणार नाही पण पोशाख शिंप्याच्या दुकानात शिवला जात असेल व शिवण्याचे पैसे घेतले जात असतील तर त्याला उद्योगधंदा म्हणता येईल पण जर वस्तू दान केली, भेट दिली जात असेल तर त्याला व्यवसाय म्हणता येत नाही.

### ६. वस्तू व सेवांचा विनिमय –

प्रत्येक व्यवसाय प्रकारातील व्यवहार हे वस्तू किंवा सेवा यांच्याशी संबंधीत असतात. वस्तू किंवा सेवांच्या शिवाय व्यवसाय होऊ शकत नाही. या वस्तू एकतर उपभोग्य वस्तू किंवा भांडवली वस्तू असतात. व्यवसायासाठी निर्माण केलेल्या सेवा या अदृष्य स्वरूपाच्या असतात. परंतु व्यवसाय करण्यासाठी या सेवांची गरज असते. **उदा.** वाहतूक, बँक, विमा इ.

वस्तू

उपभोग्य वस्तू
(चहा, दूध, पेन्सिल इ.)

भांडवली वस्तू
(यंत्रसामग्री, फर्निचर इ.)

### ७. व्यवसाय सातत्य –

प्रत्येक व्यवसायात नियमितपणे व्यवहार होत असतात. केवळ एकच व्यवहार केला तर त्याला व्यवसाय म्हणता येत नाही.

**उदा.** एखाद्याने स्वतःची मोटार विक्री करून नफा मिळवला तर त्याला व्यवसाय कृती म्हणता येणार नाही. त्याचा व्यवसायात समावेश होत नाही. परंतु ती व्यक्ती नियमितपणे मोटारींची खरेदी-विक्री करत असेल तर त्याला व्यवसाय मानले जाते.

### ८. अनिश्चित परतावा –

व्यवसायात नफ्याचा अंदाज घेता येत नाही किंवा त्याची हमी देता येत नाही. व्यावसायिकांना कधी नफा मिळतो किंवा कांही वेळेस नुकसानही सहन करावे लागते.

### ९. जोखीम / धोका :

जोखीम किंवा धोका हा प्रत्येक व्यवसायातील महत्त्वाचा घटक आहे. नुकसानीला सामोरे जाण्याचा चिंतेचा विषय आहे. दुर्दैवाने अनपेक्षित किंवा परिस्थितीजन्य घटनांमुळे व्यवसायातील धोक्याची तीव्रता कमी करता येते. परंतु ती पूर्णपणे टाळता येत नाही त्यातील काही घटक टाळले जाऊ शकत नाहीत कारण त्यांच्यावर व्यावसायिकांचा ताबा नसतो.

**उदा.** फॅशन, उत्पादन पद्धतीतील बदल, चोरी, आग, नैसर्गिक आपत्ती, ग्राहकांच्या आवडी-निवडी, या सर्व घटकांपासून कोणताही व्यवसाय मुक्त नाही.

### १०. उपभोक्त्यांचे किंवा ग्राहकांचे समाधान :

सर्व आर्थिक उपक्रमांचे अंतिम ध्येय ग्राहकाचे समाधान हे असते आणि कोणताही व्यवसाय त्याला अपवाद नसतो. दर्जेदार वस्तू आणि सेवांचा पुरवठा माफक किंमतीमध्ये करून ग्राहकांचे समाधान करण्यावर आधुनिक व्यवसाय भर देतो. तसेच नवीन ग्राहक मिळवणे व प्रस्थापित ग्राहक टिकवणे हे प्रमुख उद्दिष्ट असते.

### १.३.२ पेशा :

पेशा हा आर्थिक कृतींचा असा भाग आहे की, ज्यामध्ये व्यक्ती त्याचे शैक्षणिक ज्ञान व विशेष कौशल्ये वापरून उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने सेवा पुरवित असते. **उदा.** डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल इ.

- **वैशिष्ट्ये :**

**पेशाची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

**१. उद्देश :**

प्रत्येक पेशा हा पैसा मिळविण्यासाठी केला जातो. पैसा मिळविण्याबरोबरच समाजाला सेवा देऊन त्यांचे प्रश्न सोडविले जातात.

**२. पात्रता :**

पेशा स्वीकारणाऱ्या व्यक्तीने विशिष्ट प्रकारची पात्रता धारण केल्याशिवाय पेशा स्वीकारता येत नाही. प्रत्येक पेशात विशिष्ट ज्ञानसमुच्चयाचा समावेश असतो. हे ज्ञान पद्धतशीर व औपचारिक प्रशिक्षणाद्वारेच घेतले पाहिजे. अन्यथा ज्ञानाशिवाय आपण पेशा चालवू शकत नाही. या करिता ज्ञान अधिग्रहण करणे गरजेचे असते.

**३. आर्थिक मोबदला :**

पेशामध्ये, पैशाच्या मोबदल्यात सेवा दिली जाते त्यास व्यावसायिक शुल्क (fees) असे म्हणतात. पेशामध्ये मिळालेले उत्पन्न निश्चित नसते. पेशा करणारी व्यक्ती व्यवसाय संघटनांमध्ये काम करणारी कर्मचारी किंवा स्वयंरोजगारीत असते.

सनदी लेखापाल (C.A.) नोकरी करत असेल तर त्याला पगार मिळतो परंतु स्वत:चे खाजगी हिशोब तपासणीचे काम करणे म्हणजे स्वयंरोजगार होय. त्यासाठी त्याला फी स्वरूपात उत्पन्न मिळते.

**४. भांडवल :**

पेशा स्वीकारलेली व्यक्ती स्वतंत्रपणे काम करते किंवा एखाद्यांच्या अंतर्गत काम करू शकते. स्वतंत्रपणे काम करणाऱ्या व्यक्तीला पेशामध्ये स्थिरस्थावर होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करावी लागते. प्रत्येक पेशाप्रमाणे यात बदल होतो.

**५. नोंदणी व सभासद :**

प्रत्येक पेशाची राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र संघटना असते. ती आपल्या पेशाशी संबधित व्यक्तींच्या पेशाबाबत नियम बनविते. त्या त्या व्यक्तींना आपल्या पेशाची नोंदणी संबधित संघटनेमध्ये करून व्यवसाय करण्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते.

उदा. वकील – बार काऊन्सिल ऑफ इंडिया

सनदी लेखापाल – इन्स्टिट्युट ऑफ चार्टड आकौंटंट ऑफ इंडिया (ICAI)

डॉक्टर – इंडियन मेडिकल असोशिएशन

पेशा म्हणून काम करणाऱ्यांना संबधित संघटनेने तयार केलेल्या नियमावलींचे पालन करावे लागते. प्रत्येक पेशा स्वीकारणाऱ्याला संबंधित संघटनेचे सभासदत्व घ्यावे लागते.

**६. अ–हस्तांतरणीय :**

कोणताही पेशा हा पेशा करणाऱ्याच्या इच्छेनुसार दुसऱ्याला हस्तांतरित करता येत नाही. उदा. वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉक्टर आपला दवाखाना वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या मुलाकडे हस्तांतरीत करू शकत नाहीत. (परंतु, जर

त्यांच्या मुलाने किंवा मुलीने वडीलांच्याच पेशाचे आवश्यक शिक्षण व प्रशिक्षण पूर्ण केलेले असेल तर मात्र त्यांचा पेशा पुढे चालविला जाऊ शकतो.)

### ७. कामाचे स्वरूप :

पेशामध्ये शुल्क किंवा फी आकारून विशेष सेवा दिल्या जातात. **उदा.** स्थापत्यशास्त्रात इमारतीच्या बांधकामाचा नकाशा शुल्क किंवा फी घेऊन तयार करून दिला जातो.

## १.३.३ नोकरी :

**अर्थ –** नोकरी करणे ही एक आर्थिक क्रिया आहे. यामध्ये कर्मचारी इतरांसाठी काम करतात. यामध्ये मालक व कामगार असे नाते असते. मालक म्हणजे अशी व्यक्ती की ती दुसऱ्याला कामाची संधी देते व कामाची संधी घेणारी व्यक्ती म्हणजे कर्मचारी (कामगार) होय. कामाचा मोबदला व कामाच्या अटी याबाबतीत दोघांमध्ये करार झालेला असतो.

- **वैशिष्ट्ये :**

### १) उद्देश :

स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी पैसा मिळविणे हा कर्मचाऱ्याचा मुख्य हेतू असतो.

### २) पात्रता :

प्रत्येक नोकरीत पात्रतेची गरज असते. नोकरीच्या स्वरूपानुसार कुशल किंवा अकुशल कामगारांची आवश्यकता ठरते. कौशल्याच्या कामासाठी विशिष्ट पात्रतेची गरज असते.

**उदा.** परिचारिका म्हणून काम करण्यासाठी विशिष्ट पात्रता व कौशल्याची गरज आहे. परंतु, कार्यालयीन सेवक (ऑफिस बॉय) म्हणून काम करण्यासाठी विशिष्ट अशा पात्रतेची गरज नसते कारण ते काम विशेष कौशल्याचे नाही.

### ३) आर्थिक मोबदला :

कामगाराने विशिष्ट वेळेत पूर्ण केलेल्या कामाचा मोबदला म्हणून पगार किंवा मजुरी दिली जाते. पगार महिन्याला दिला जातो. मजुरी नेमणूक करतानाच आठवडा किंवा दररोज देण्याचे ठरविले जाते. पगारदाराला बोनस, भत्ते, निवास व्यवस्था व इतर सेवा दिल्या जातात.

### ४) भांडवल :

नोकरी करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता नसते. कारण मालक नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला काम करण्यासाठी सर्व सोयी उपलब्ध करून देतो.

### ५) नोंदणी :

नोकरीसाठी नोंदणीची गरज नसते. परंतु प्रत्येक नोकरदाराने नोकरी करताना नोकरीच्या नियम व अटींचे पालन केले पाहिजे. या अटी दोघांमध्ये झालेल्या करारात नमूद केलेल्या असतात.

### ६) अ–हस्तांतरणीय :

कोणतीही नोकरी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येत नाही.

**उदा.**: शिक्षक सेवा निवृत्त झाल्यावर आपल्या जागेवर आपल्या मुलाची किंवा मुलीची नेमणूक करू शकत नाही.

### ७) कामाचे स्वरूप :

प्रत्येक कर्मचाऱ्यास नेमून दिलेले काम पूर्ण करणे अपेक्षित असते. नोकरीचे स्वरूप हे त्याच्या मालकाच्या कामाच्या स्वरूपावर अवलंबून असते.



- **कृती –**

एखादा व्यावसायिक, पेशा स्वीकारलेली एखादी व्यक्ती आणि एखादा कर्मचारी हे तिघे एकमेकांवर अजिबात अवलंबून न राहता आपापली कार्ये पार पाडू शकतात का? यावर वर्गात शिक्षकांबरोबर चर्चा करा.



- **कृती –**

'सूरज' याच्या मालकीची एक वाहतूक कंपनी आहे. या एजन्सीद्वारे तो लोकांची अनेक प्रकारची प्रवासी कामे करतो. उदा. विमानप्रवासाचे आरक्षण करणे, रेल्वे प्रवासाचे आरक्षण करणे, सहलींचे आयोजन करणे इत्यादी. या सेवांच्या बदल्यात तो शुल्क आकारतो. तुमच्यामते सूरज हा व्यावसायिक आहे की त्यांने पेशा स्वीकारलेला आहे?



- **कृती –**

आजच्या काळात यांत्रिकीकरणामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. लोकांनासद्धा हाताने तयार केलेल्या वस्तूंपेक्षा यंत्राने उत्पादित केलेल्या वस्तू जास्त आवडतात. तरीसुद्धा येवल्याची पैठणी व सोलापूरच्या हातमागावरील चादर यांना बाजारपेठेत खूपच मागणी आहे. याची कारणे शोधण्यासाठी आपल्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.

## १.४ व्यवसायाची उद्दिष्टे :

सर्व व्यावसायिक कृतींना व्यवसायाची उद्दिष्टे मार्गदर्शक ठरतात. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे.

१) आर्थिक उद्दिष्टे

२) सामाजिक उद्दिष्टे

### १) आर्थिक उद्दिष्ट्ये :

**अ) नफा मिळविणे :** नफा हा स्थिरता व वाढीसाठी आवश्यक असतो.

**ब) नवीन ग्राहक शोधणे :** व्यावसायिक संघटनांना नवीन ग्राहक मिळविण्यासाठी व प्रस्थपित ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी खूप प्रयत्न करण्याची गरज असते.

**क) नावीन्यपूर्ण उपक्रम :** नवकल्पना म्हणजे असा सकरात्मक बदल जो उत्पादनात किंवा उत्पादन प्रक्रियेमध्ये सुधारणा घडवून आणतो. त्यासाठी संशोधन व विकास, बाजार सर्वेक्षण, नवीन तंत्रज्ञानाचा वापर इ. साठी पैसे खर्च करावे लागतात.

**ड) उपलब्ध साधनांचा सुयोग्य वापर :** उपलब्ध साधने ही दुर्मीळ असून त्यांचा पर्यायी वापर असतो. सदर साधनांचा सुयोग्य वापर व कमीत कमी अपव्यय हा अधिक नफा मिळविण्यासाठी आवश्यक ठरतो.

### २) सामाजिक उद्दिष्ट्ये :

**अ) दर्जेदार उत्पादनाचा पुरवठा करणे :** प्रत्येक व्यवसायाने दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक असते. वस्तू उत्पादनाचा दर्जा म्हणजेच वस्तूची शुद्धता, सुरक्षितता, टिकाऊपणा, उपयोगिता इ.

**ब) व्यापारातील गैरव्यवहार टाळणे :** काळाबाजार, चुकीची वजनमापे, फसव्या जाहिराती इ. गोष्टी व्यापारातील गैरव्यवहारात येतात. व्यवसायात टिकून राहण्यासाठी व व्यवसाय वाढीसाठी व्यावसायिकांनी गैरव्यवहार टाळणे आवश्यक आहे.

**क) रोजगार निर्मिती :** समाजातील कुशल व अकुशल मनुष्यबळासाठी नोकरीच्या संधी निर्माण करणे हे व्यवसाय संस्थेचे सामाजिक उद्दिष्ट आहे. नोकरी देताना समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास व अपंग व्यक्तींना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**ड) कर्मचारी कल्याण :** कुशल व अकुशल कर्मचारी हा समाजाचा एक भाग आहे. या कामगारांची काळजी घेतली तर हे एक सामाजाचे कल्याण होईल. या कामगारांचे कल्याण साधण्यासाठी त्यांना योग्य व नियमित मोबदला, कामाच्या ठिकाणी सुविधा पुरविणे, निःपक्षपाती धोरण अवलंबणे व पगाराव्यतिरिक्त इतर मोबदले देणे आवश्यक आहे.

**इ) सामाजिक प्रश्न सोडविण्यास मदत करणे :** वाढत्या औद्योगिकरणामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत.


उदा. वाहतुकीची कोंडी, हवा व पाणी प्रदूषण, वाढती झोपडपट्टी इ. बाबतीत व्यावसायिकाने जागरूक राहून हे प्रश्न कमी करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**ई) सामाजिक कल्याणात सहभाग :** समाजाच्या सर्वसाधारण कल्याणासाठी व्यावसायिकांनी जागरूक असले पाहिजे. आवश्यक तेथे देणग्या देणे, उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे इ. मार्गांनी सामाजिक कल्याणात सहभागी होता येते.

## १.५ व्यवसायातील नफ्याची भूमिका :

प्रत्येक व्यवसाय करण्याचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो. खर्चापेक्षा महसुली उत्पन्न अधिक असणे म्हणजेच नफा होय.

**नफा = उत्पन्न – एकूण खर्च**



● **नफ्याची भूमिका :**

**अ) गुंतवणूकदारांना परतावा :**

व्यक्तीकडून व्यवसायात भांडवल गुंतवणूक करण्यामागची अपेक्षा म्हणजे गुंतवणुकीवरील अपेक्षित परतावा होय. त्यासाठी व्यवसायाला चांगला नफा होणे अपेक्षित असते.

**ब) संशोधन व विकास :**

व्यवसायाचा विकास व विस्तारासाठी पुरेशा नफ्याची गरज असते.त्यामुळे अधिक खर्च करून व्यवसाय सक्षम करता येतो. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कमी उत्पादन खर्चात नावीन्यपूर्ण उत्पादन केल्याने संपूर्ण राष्ट्राला लाभ होतो.

**क) वाढ व विस्तार :**

नफा मिळविणे हा अंतर्गत स्रोत आहे. या नाफ्याचा वापर व्यवसायाचा विस्तार व वाढ करण्यासाठी केला जाऊ शकतो. नफ्याचा काही भाग (हिस्सा) पुनर्गुंतवणुकीसाठी, विविधतेसाठी वापरता येतो.

**ड) कार्यक्षमतेत वाढ :**

नफ्यामुळे वेळेत कामगारांचे वेतन व नियमीत देणी देता येतात. त्यामुळे कामगारांना प्रेरणा मिळते. शेवटी यामुळे संपूर्ण संघटनेची कार्यक्षमता वाढते.

**इ) उदरनिर्वाहाचे साधन :**

जीवन जगण्यासाठी अर्थात उदरनिर्वाहासाठी मानव व्यवसायात नफा मिळवितो. पुरेसा नफा मिळवून तो आपल्या विविध गरजा पूर्ण करतो. त्यामुळे चांगले जीवनमान समाधानकारकपणे जगतो व जीवनमानाचा दर्जा उंचावू शकतो.

**फ) धोका पत्करण्याचे फळ :**

व्यवसायात व्यावसायिकाने स्वीकारलेल्या धोक्याबद्दलचे बक्षिस म्हणजे नफा होय. ज्या धोक्यांचा विमा उतरवता येत नाही त्यांचा मोबदला नफा होय.

उदा. मागणी कमी होणे, प्रतिकूल सरकारी धोरण इ.

**ग) व्यवसायात टिकून राहणे.**

नफा प्राप्तीमुळे व्यावसायिकाला बाजारपेठेत टिकून राहाण्यासाठी मदत होते. व्यवसायात पुरेसा नफा मिळत नसेल तर स्पर्धेच्या बाजारपेठेत टिकून राहता येत नाही.



कोणत्याही लहान दुकानाला किंवा मोठ्या व्यापारी संकुलाला (मॉलला) भेट देऊन नफा कोणत्या कारणासाठी महत्त्वाचा वाटतो ते समजून घ्या.

**१.६ व्यवसायाच्या कृतीचे वर्गीकरण :**

प्रामुख्याने व्यावसायिक कृतींचे वर्गीकरण पुढील दोन गटात करता येईल.

i) उद्योग

ii) वाणिज्य

उद्योग हा वस्तू व सेवांच्या उत्पादनाशी संबंधित असतो तर वाणिज्य हे त्यांच्या वितरणाशी संबंधित असते.

## व्यवसाय

- **उद्योग**
  - **प्राथमिक उद्योग**
    - १. शेती
    - २. उत्खनन
    - ३. जैविक
  - **दुय्यम उद्योग**
    - १. उत्पादन
    - २. बांधकाम
  - **सेवा उद्योग**
    - १. वाहतूक
    - २. बँक
    - ३. उपहारगृह
    - ४. पर्यटन
    - ५. मनोरंजन
- **वाणिज्य**
  - व्यापार
    - अंतर्गत
      - घाऊक व्यापार
      - किरकोळ व्यापार
    - आंतरराष्ट्रीय
      - आयात व्यापार
      - निर्यात व्यापार
      - पुनर्निर्यात व्यापार
  - **व्यापाराची अनुषंगिक साधने**
    - १. वाहतूक
    - २. गोदाम
    - ३. विमा
    - ४. बँक
    - ५. जाहिरात
    - ६. व्यापारी अभिकर्ते
    - ७. संदेशवहन

### १.६.१ उद्योग :

उद्योग म्हणजे कच्च्यामालावर प्रक्रिया करून वापरायोग्य वस्तूत रूपांतर करण्याची प्रक्रिया होय. यामध्ये वस्तूचे उत्पादन, प्रक्रिया, उत्खनन, प्रजनन, पशुपालन यांचा समावेश होतो. उत्पादित होणारा माल हा ग्राहकोपयोगी वस्तू असतो. ग्राहकोपयोगी वस्तू थेट ग्राहकाद्वारे वापरल्या जातात तर भांडवली वस्तूचा उपयोग उद्योगांच्या पुढील उत्पादनासाठी केला जातो.

उद्योग म्हणजे वस्तू उत्पादनाचा समूह होय. एकाच प्रकारच्या किंवा संबधित वस्तूंचे उत्पादन करणारा समूह होय. उदा. साखर उद्योगात ऊसापासून साखर बनविणे. तसेच इलेक्ट्रॉनिक उद्योगात इलेक्ट्रॉनिक वस्तू तयार करणाऱ्या सर्व कारखान्यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे बँकिंग, उपहारगृह, विमाकंपन्या इ. सेवांचासुद्धा सेवा उद्योगामध्ये समावेश होतो.

उद्योगामुळे रूप उपयोगिता निर्माण होते. उद्योगामध्ये कच्च्या मालाचे रूपांतर वापरायोग्य पक्क्या मालात केले जाते. यासाठी मानवी श्रम, यंत्रे व भांडवलाची आवश्यकता असते. सर्व औद्योगिक कार्ये ही कारखान्यातून चालतात. काही लहान स्वरुपाची कामे घरामधून सुध्दा पूर्ण करता येतात. थोडक्यात, हे सर्व उद्योगाच्या आकारमानावर अवलंबून आहे.

- **उद्योग हे प्रमुख तीन गटात विभागले आहेत.**

### अ) प्राथमिक उद्योग :

प्राथमिक उद्योग हे निसर्गावर अवलंबून असतात. हा निसर्गाभिमुख उद्योग आहे. प्राथमिक उद्योगातून निर्माण झालेल्या उत्पादनावरती दुय्यम उद्योग चालत असतात. प्राथमिक उद्योगाचे तीन प्रकार पडतात.

### १) कृषी उद्योग :

या उद्योगात शेती उद्योगाचा समावेश होतो. या उद्योगातील वस्तूचा दर्जा विविध घटकांवर अवलंबून असतो. उदा. जमिनीची उत्पादकता, पाऊस, हवामान इ.

### २) उत्खनन उद्योग :

या उद्योगामध्ये निसर्गामध्ये असलेली संपत्ती प्रयत्नपूर्वक बाहेर काढली जाते. उदा. खाणीमधून खनिजे बाहेर काढणे. जमिनीखालून तेल बाहेर काढणे इ. यातून मिळालेला माल काहीवेळा जसाच्या तसा वापरता येतो. मात्र काहीवेळा त्यावर प्रक्रिया करणे जरुरीचे असते.

### ३) जैविक उद्योग :

जैविक उद्योगामध्ये रोपे, पशुपालन इत्यादींचा समावेश होतो

उदा. पशुसंवर्धन, रोपवाटिका, वनशेती, रेशीम उद्योग इ.

### ब) दुय्यम उद्योग :

हे उद्योग प्राथमिक उद्योगावरती अवलंबून असतात. दुय्यम उद्योग कच्च्या मालाचे पक्क्यामालामध्ये रूपांतर करतात.

उदा. टोमॅटो उत्पादन प्राथमिक उद्योग असून त्यापासून सॉस(रस) तयार करणारा दुय्यम उद्योग होय.

- **या उद्योगाचे दोन प्रकार पडतात.**

### १) उत्पादन उद्योग :

कच्च्यामालाचे पक्क्या मालात मनुष्यबळाच्या व यंत्राच्या साहाय्याने रूपांतर करण्याच्या उद्योगाला उत्पादन उद्योग म्हणतात. अंतिम उत्पादनात भांडवली वस्तूंचा व गृहोपयोगी वस्तूंचा समावेश होतो. उदा. कापड, साखर, कागद उद्योग इ.

### २) बांधकाम उद्योग :

जे उद्योग इमारत, धरणे, पुल, रस्ते, बोगदे इ. तयार करण्यात गुंतलेले असतात त्यांना बांधकाम उद्योग म्हणतात. इतर उद्योगात वस्तूंचे उत्पादन एका ठिकाणी व विक्री इतरत्र केली जाते. पण या उद्योगात वस्तू उत्पादन व विक्री एकाच ठिकाणी केली जाते. या उद्योगात अचल संपत्ती निर्माण केली जाते.

### क) सेवा उद्योग :

सेवा उद्योग प्राथमिक व दुय्यम उद्योगांना सेवा पुरवितात. हे उद्योग विविध सेवा पुरवतात. यामध्ये वाहतूक, विमा, बँकिंग हे पारंपरिक व आधुनिक उद्योगात निवास उद्योग व उपहारगृहे, पर्यटन उद्योग, करमणूक (मनोरंजन) यांचा समावेश होतो.

## १.६.२. वाणिज्य :

- **अर्थ :** व्यावसायिक कृतीचा वाणिज्य हा असा घटक आहे की जो उद्योगांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो. यामध्ये वस्तूंचे वितरण सुलभपणे व अविरतपणे पुरविता येतात. उत्पादक व ग्राहक यांच्यामधील सेतू म्हणून वाणिज्य काम करते. पैसा किंवा पैशाचे मूल्य यांच्या मोबदल्यात वस्तू आणि सेवा यांची देवाण घेवाण करून हा हेतू साधला जातो.

- **वाणिज्याचे दोन प्रकार पडतात. १) व्यापार व २) व्यापाराची अनुषंगिक साधने :**
- **व्यापार :**

व्यापार म्हणजे वस्तू व सेवांची खरेदी व विक्रीचा व्यवहार होय. उत्पादक व ग्राहक यांच्यातील संबंध साधणारा व्यापारी हा दुवा आहे. व्यापारामध्ये वस्तू व सेवांचा विनिमय पैशाच्या मोबदल्यात किंवा वस्तुविनिमयात केला जातो. ग्राहकांना वस्तू वेगवेगळ्या बाजारपेठेत उपलब्ध करून दिल्या जातात. व्यापारामुळे वस्तू व सेवांचे मालकी हस्तांतरण केले जाते.

- **व्यापाराचे वर्गीकरण/प्रकार :**

### अ) अंतर्गत व्यापार :

अंतर्गत व्यापारात वस्तू व सेवांची खरेदी व विक्री देशांच्या भौगोलिक सीमांतर्गत केली जाते. या व्यापारासाठी देशी चलन वापरले जाते. अंतर्गत व्यापारात पुढील प्रकारांचा समावेश होतो.

i) **घाऊक व्यापार :**

घाऊक व्यापारात वस्तू व सेवा मोठ्या प्रमाणात खरेदी व विक्री केल्या जातात. घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी करून किरकोळ व्यापाऱ्यांना लहान प्रमाणात विक्री करतो. घाऊक व्यापारी हा उत्पादक व किरकोळ विक्रेता यांच्यातील दुवा आहे.

ii) **किरकोळ व्यापार :**

जो व्यापारी घाऊक व्यापाऱ्याकडून किंवा काही वेळा प्रत्यक्ष उत्पादकाकडून वस्तूंची खरेदी करतो. अंतिम ग्राहकास लहान प्रमाणावर विक्री करतो त्यास किरकोळ व्यापारी असे म्हणतात. किरकोळ व्यापारी उत्पादक व उपभोक्ता (ग्राहक) यांतील दुवा आहे.

### ब) आंतरराष्ट्रीय व्यापार :

दोन किंवा दोन पेक्षा अधिक देशांमध्ये चालणाऱ्या व्यापाराला आंतरराष्ट्रीय/विदेशी व्यापार म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापारात परकीय किंवा विदेशी व्यापाराचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

i) **आयात व्यापार :**

जेव्हा दुसऱ्या राष्ट्राकडून किंवा देशाकडून वस्तू व सेवांची खरेदी केली जाते त्यास आयात व्यापार म्हणतात.

ii) **निर्यात व्यापार :**

जेव्हा दुसऱ्या राष्ट्रास वस्तू विक्री केल्या जातात त्यास निर्यात व्यापार म्हणतात.

iii) **पुनर्निर्यात :**

आयात व निर्यात याचे एकत्रीकरण म्हणजे पुनर्निर्यात होय. यामध्ये एका देशातून आयात केलेला माल दुसऱ्या देशात पुनर्विक्रीसाठी पाठवला जातो. **उदा.** भारतीय विक्रेते (व्यापार) जपान कडून माल घेतात आणि आफ्रिकेला पुनर्निर्यात करतात.

### १.६.३. व्यावसायिक सेवा (अनुषंगिक सेवा) :

उत्पादनाच्या ठिकाणापासून विक्री ठिकाणापर्यंत वस्तूंचा सुरळीतपणे पुरवठा करण्यासाठी केलेल्या कृतीस व्यावसायिक सेवा म्हणतात. या सेवा व्यापारास मदत करण्याची भूमिका बजावतात. व्यावसायिक सेवा या वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरण यातील अडथळे कमी करतात.

- **खालील प्रमाणे विविध अनुषंगिक साधने आहेत.**

### i) वाहतूक व्यवस्था :

उत्पादनाच्या ठिकाणी सर्व वस्तूंची विक्री करणे शक्य नसते म्हणून ज्या ठिकाणी वस्तूंची मागणी असते अशा वेगवेगळ्या ठिकाणी उत्पादनाची विक्री करावी लागते. वस्तू व व्यक्तींना एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेवून जाण्यासाठी वाहतुकीचा वापर केला जातो.

### ii) गोदाम/साठवणूक :

उत्पादक व उपभोक्ता यांच्यामध्ये अंतर असते. काही वस्तूंचे उत्पादन वर्षभर केले जाते. परंतु वापर मात्र विशिष्ट कालावधीतच केला जातो. तर काही उत्पादने विशिष्ट काळात उत्पादित केली जातात मात्र वापर वर्षभर केला जातो म्हणून उत्पादनाची साठवणूक करावी लागते. याशिवाय उत्पादित वस्तूंना विविध कारणाने होणाऱ्या धोक्यांपासून संरक्षण मिळण्यासाठी व उत्पादनाच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी तसेच मागणी व पुरवठा यात नियमितता आणण्यासाठी साठवणूक / गोदामाची गरज आहे.

### iii) विमा :

व्यवसायात अनेक प्रकारचे धोके असतात. सामान्यपणे उत्पादनास आग,चोरी, अपघात इ. मुळे धोके निर्माण होतात. व्यावसायिकांना या धोक्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी विमा आवश्यक आहे. विमा कंपन्या या सर्व धोक्यापासून व्यवसायाचे संरक्षण करतात. व्यावसायिक यासाठी वस्तूचा विमा घेऊन विमा कंपनीने ठरविलेले विमा हप्ते नियमितपणे भरतो. व्यावसायिकाला धोके पूर्णतः टाळता येत नाहीत. परंतु विमा घेऊन त्याची तीव्रता कमी करता येते.

### iv) बँक :

व्यवसायाची स्थापना करून तो यशस्वीपणे चालविण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. बँक पैसा व आवश्यक निधीचा पुरवठा करते. बँकव्यवसायांना कर्जे, अधिविकर्ष सवलत, रोख उचल (cash credit) इ. सेवा देते. या शिवाय धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ए.टी.एम्, डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड इ. सेवा पुरविते. यामुळे व्यवसायाचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालविण्यास मदत होते.

### v) जाहिरात :

जाहिरात हे उत्पादित वस्तू व सेवांचे विक्रीचे प्रभावी साधन आहे. उत्पादक आपल्या उत्पादनाविषयी सर्व माहिती ग्राहकाला जाहिरातीमार्फत देऊन ग्राहकाच्या मनात वस्तू खरेदी करण्याविषयी इच्छा जागृत करतो. त्यासाठी विविध मार्ग वापरले जातात. यामध्ये घरातील प्रसार माध्यमांच्या मदतीने केली जाणारी जाहिरात **उदा.** वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इ. तसेच घराबाहेरील प्रसार माध्यमांद्वारे केली जाणारी जाहिरात **उदा.** पाट्या, फलक, कापडी फलक, विद्युत प्रकाशित साधनांनी केली जाणारी जाहिरात इ. चा समावेश होतो.

### vi) व्यापारी अभिकर्ते :

ग्राहक हे वेगवेगळ्या भागात विखुरलेले असतात. त्यामुळे विक्रेते प्रत्यक्ष ग्राहकांशी संपर्क साधू शकत नाहीत. यासाठी व्यापारी अभिकर्तेची नेमणूक केली जाते.

व्यापारी अभिकर्ते ग्राहक व विक्रेते यांमधील दरी कमी करतात.

**उदा.** दलाल, अडत्या, कमिशन एजंट इ.

### vii) संदेशवहन :

आज जगात माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट झाला आहे. माहितीचे संदेशवहन होणे आवश्यक आहे. व्यापारी, उत्पादक आणि ग्राहक यांना संदेशवहनामुळे अनेक सुविधा उपलब्ध होतात.

**उदा.** ई-मेल, टपाल खाते.



- **कृती –**

जागेचे व्यवहार करणाऱ्या एजंटला भेटून त्यांच्याकडून विक्रेत्यांना व ग्राहकांना कशा प्रकारची सेवा दिली जाते याची माहिती घ्या.



- **कृती –**

बाजारपेठांचा विस्तार व वाहतुकीच्या साधनांमुळे शेतीतील माल दूरवरच्या ठिकाणी सहज पाठविता येतो व त्याला भाव पण जास्त मिळतो. परंतु, त्यामुळे तो माल ज्या ठिकाणी विकतो तेथील लोकांनासुद्धा जास्त किंमत मोजावी लागते हे योग्य आहे का? तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.

- **फरक :**

### १) उद्योग व वाणिज्य

| अ.क्र. | मुद्दे | उद्योग | वाणिज्य |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | उद्योग वस्तू व सेवा निर्मितीत गुंतलेले असतात. | जो विभाग वस्तू व सेवा वितरण करतो त्यास वाणिज्य असे म्हणतात. |
| २ | स्थळ/ठिकाण | वस्तूचे उत्पादन कारखान्यात किंवा कार्यशाळेत केले जाते. | वाणिज्य हे बाजारामध्ये तसेच कार्यालयामध्ये केले जाते. |
| ३. | उपयोगिता | उद्योगांमुळे रूप उपयोगिता वस्तूंना प्रप्त होते. | वाणिज्यमुळे स्थळ, काळ (समय) उपयोगिता निर्माण होते. |
| ४. | स्रोत | उद्योगांत यंत्राचा व मानवी श्रमाचा वापर करतात. | वाणिज्यात जास्त मानवी श्रम व संदेशवहन वापरले जाते. |
| ५. | भांडवल | उद्योगांत प्रचंड भांडवलाची गुंतवणूक करावी लागते. | तुलनेने वाणिज्यात कमी भांडवल गुंतवणूक करावी लागते. |
| ६. | परस्परावलंबन | उद्योग उपक्रमाशिवाय वाणिज्य निरर्थक आहे. | वाणिज्य हे उद्योगाशिवाय सुरू करता येत नाही. |
| ७. | आयोजित | उद्योगामध्ये उत्पादन हे उत्पादकाकडून केले जाते. | वाणिज्यामध्ये व्यापारी व व्यापारी अभिकर्ते वस्तू व सेवा वितरण करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | स्थान | उद्योगांना प्रथम स्थान व्यवसायात आहे. | वाणिज्य व्यवसायात द्वितीय स्थानावर आहे. |
| ९. | वर्गीकरण | उद्योगाचे प्रकार –<br>अ) प्राथमिक उद्योग<br>ब) दुय्यम उद्योग<br>क) सेवा उद्योग | वाणिज्याचे वर्गीकरण–<br>अ) व्यापार<br>ब) व्यापाराची अनुषंगिक साधने. |
| १०. | बाजारपेठेतील शक्ती | उद्योग हा बाजारातील पुरवठ्याचे प्रतिनिधित्व करतो. | बाजारातील मागणी व पुरवठ्याचे प्रतिनिधित्व करतो. |

## २) व्यवसाय, पेशा व नोकरी

| अ.क्र. | मुद्दे | व्यवसाय | पेशा | नोकरी |
|---|---|---|---|---|
| १. | अर्थ | वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या आर्थिक कार्याला व्यवसाय म्हणतात. | इतरांना आर्थिक सेवा पुरविणाऱ्या कार्याला पेशा म्हणतात. | दुसऱ्याने नेमून दिलेले काम त्याच्या सुचनेनुसार करण्याच्या आर्थिक क्रियेला नोकरी म्हणतात. |
| २. | परतावा | व्यवसायात व्यावसायिकाला नफा मिळतो. | पेशामध्ये मिळणारे उत्पन्न फी च्या स्वरूपात असते. | कर्मचाऱ्यांना कामाचा मोबदला म्हणून पगार व मजुरी दिली जाते. |
| ३. | भांडवल/ गुंतवणूक | व्यवसायातील भांडवल त्या व्यवसायाचा विस्तार व व्याप्तीवर अवलंबून असते. | स्वतंत्रपणे काम करत असेल तरच मर्यादित भांडवल गुंतवावे लागते. | भांडवल गुंतवणूक करावी लागत नाही. |
| ४. | कामाचे स्वरूप | जनतेला वस्तू व सेवा पुरविणे. | वैयक्तिक तज्ञ सेवा पुरविणे. | नोकरीमध्ये सेवा कराराप्रमाणे काम केले जाते. |
| ५. | पात्रता | ठरावीक व कमीत कमी शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता असते. | चांगले ज्ञान व प्रशिक्षणाची गरज संबंधीत पेशात असावीच लागते. | त्याच्या कामाच्या स्वरूपावर शैक्षणिक पात्रता अवलंबून असते. |
| ६. | निर्णय प्रक्रिया | व्यावसायिक स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतात. | पेशा स्वीकारलेली व्यक्ती फक्त त्याच्या पेशाच्या संदर्भात निर्णय घेऊ शकते. | कर्मचाऱ्यांना कोणताही अंतिम निर्णय घेता येत नाही. अंमलबजावणी व कर्तव्यपूर्तता करावी लागते. |
| ७. | धोका | नफा हा मोठे धोके व अनिश्चितता स्वीकारण्याचा मोबदला होय. | पेशामध्ये मिळणारी फी ठरावीक व नियमित नसते. | नोकरी करणाऱ्या व्यक्तीला त्याचे वेतन कराराप्रमाणे ठरावीक व नियमित मिळते, म्हणून त्यामध्ये धोका नसतो. |
| ८. | उदाहरणे | बांधकाम व्यावसायिक, किराणा, सुपर मार्केट इ. | डॉक्टर, सी.ए., वकील इ. | क्लार्क, शिक्षक, अधिकारीवर्ग इ. |

## ३) व्यवसाय व वाणिज्य

| अ.क्र. | मुद्दे | व्यवसाय | वाणिज्य |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण केले जाते त्या आर्थिक क्रियेला व्यवसाय म्हणतात. | वस्तू व सेवांचे वितरण करणारा व्यवसायाचा विभाग म्हणजे वाणिज्य होय. |
| २. | संकल्पना | व्यवसाय ही विस्तृत व व्यापक संकल्पना असून त्यामध्ये वाणिज्य समाविष्ट आहे. | वाणिज्य ही लहान संकल्पना असून ती व्यवसायाचा एक भाग आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कौशल्य | व्यवसायात तांत्रिक व विपणन कौशल्याची गरज असते. | वाणिज्यात केवळ विपणन कौशल्याची गरज असते. |
| ४. | वर्गीकरण | व्यवसायाचे विभाजन हे उद्‌योग व वाणिज्यामध्ये होते. | वाणिज्याचे विभाजन हे व्यापार व व्यापाराची अनुषंगिक साधने यामध्ये होते. |

## सारांश

**१.१ प्रस्तावना** – प्रत्येक मनुष्य आपल्या गरजा भागविण्यासाठी स्वतःला कामामध्ये गुंतवून घेऊन वस्तू व सेवा मिळवितो.

**१.२ आर्थिकेतर कृती** – पैशाची अपेक्षा न ठेवता केल्या गेलेल्या कृतींना आर्थिकेतर कृती असे म्हणतात.

**१.३ आर्थिक कृती** – पैशाच्या किंवा मोबदल्याच्या हेतूने जी कृती केली जाते ती आर्थिक कृती होय.

**१.३.१ व्यवसाय** – व्यवसायामध्ये मालाचे व सेवांचे उत्पादन करून बाजारात ग्राहकांना वितरण करणे अंतर्भूत असते.

- **व्यवसायाची वैशिष्ट्ये :**

१. आर्थिक कृती
२. दोन पक्ष
३. नफा हेतू
४. वस्तू व सेवांचे उत्पादन.
५. वस्तू व सेवांची देवाण घेवाण
६. वस्तू व सेवांचा विनिमय
७. व्यवसाय सातत्य
८. अनिश्चित परतावा
९. जोखीम/धोका
१०.उपभोक्त्यांचे समाधान

**१.३.२ पेशा** – स्वतःचे ज्ञान व कौशल्य वापरून व शुल्क आकारून इतरांना सेवा देणे म्हणजेच पेशा होय.
**उदा.** डॉक्टर, वकील इ.

- **वैशिष्ट्ये :**

१. उद्‌देश
२. पात्रता
३. आर्थिक मोबदला
४. भांडवल
५. सभासद व नोंदणी
६. अ-हस्तांतरणीय
७. कामाचे स्वरूप

**१.३.३. नोकरी** – कराराप्रमाणे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला नेमून दिलेले काम पूर्ण करणे याला नोकरी असे म्हणतात.

- **वैशिष्ट्ये :**

१. उद्‌देश
२. पात्रता
३. आर्थिक मोबदला
४. भांडवल
५. नोंदणी
६. अ-हस्तांतरणीय
७. कामाचे स्वरुप.

### १.४ व्यवसायाची उद्दिष्ट्ये :

१. नफा मिळविणे.
२. ग्राहकांची संख्या वाढविणे
३. नवीन उपक्रम राबविणे
४. दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे
५. गैरव्यवहार टाळणे.
६. रोजगार निर्माण करणे
७. कामगार कल्याण योजना
८. सामाजिक प्रश्न सोडविणे.
९. साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर
१०. समाज कल्याण

### १.५ व्यवसायातील नफ्याची भूमिका/महत्त्व :

१. गुंतवणूकदारांना परतावा
२. संशोधन व विकास
३. वाढ व विस्तार
४. कार्यक्षमतेत वाढ
५. उदरनिर्वाहाचे साधन
६. प्रतिष्ठा
७. धोकापत्करण्याचे फळ
८. व्यवसायात टिकून राहणे.

### १.६ व्यवसायाच्या कृतीचे वर्गीकरण :

**अ) उद्योग –** व्यवसायाच्या वस्तू व सेवांचे उत्पादन करणाऱ्या विभागाला उद्योग असे म्हणतात.

- **उद्योगांचे प्रकार :**

**१) प्राथमिक उद्योग –** निसर्गावर अवलंबून असणाऱ्या उद्योगांना प्राथमिक उद्योग म्हणतात.

i) शेती उद्योग
ii) उत्खनन उद्योग
iii) जैविक उद्योग

**२) दुय्यम उद्योग –** प्राथमिक उद्योगामध्ये निर्माण झालेल्या मालाचा वापर करून पक्का माल बनविणाऱ्या उद्योगाला दुय्यम उद्योग म्हणतात.

i) उत्पादन उद्योग
ii) बांधकाम उद्योग

**३. सेवा उद्योग –** प्राथमिक व दुय्यम उद्योगांना सेवांची निर्मिती करून त्यांचा पुरवठा करणे.

**ब) वाणिज्य –** उद्योगांनी निर्माण केलेला तयार माल व सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचं काम व्यवसायाचा जो विभाग पार पाडतो त्याला वाणिज्य असे म्हणतात.

- **वाणिज्याचे दोन प्रकार पडतात.**

१. **व्यापार –** वस्तू व सेवांची खरेदी-विक्री म्हणजेच व्यापार होय.

- **व्यापाराचे दोन प्रकार पडतात :**

i) **अंतर्गत व्यापार –** देशातल्या देशात केल्या जाणाऱ्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारांना अंतर्गत किंवा देशी व्यापार म्हणतात. देशी व्यापाराचे दोन प्रकार-

१) घाऊक व्यापार

२) किरकोळ व्यापार

ii) **विदेशी / आंतरराष्ट्रीय व्यापार –** दोन वेगवेगळ्या देशातील व्यक्तींमध्ये होणाऱ्या व्यापाराला विदेशी व्यापार म्हणतात याचे तीन प्रकार पुढीलप्रमाणे.

१. आयात व्यापार

२. निर्यात व्यापार

३. पुनर्निर्यात व्यापार

- **व्यापाराची अनुषंगिक साधने –** खरेदी विक्रीच्या व्यवहारामधील अडथळे / अडचणी दूर करणाऱ्या साधनांना व्यापाराची अनुषंगिक साधने असे म्हणतात.

१. वाहतूक व्यवस्था

२. गोदाम

३. विमा

४. बँक

५. जाहिरात

६. व्यापार अभिकर्ते

७. संदेशवहन.

## करिअर संधी

१) कुरिअर एजंट

२) दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन

३) प्रवासी वाहतूक सेवा आणि सहल आयोजन

४) सहल व पर्यटन मार्गदर्शक.

५) विमा प्रतिनीधी व स्थावर मालमत्ता खरेदी, विक्री मध्यस्थ

६) बँक, वाहतूक, उपहारगृह, मनोरंजन केंद्र या क्षेत्रातील नोकरी.

**संदर्भ पुस्तके :**

१) एन.सी.ई.आर.टी. इ.१२वी व्यवसाय अभ्यास

२) व्यवसाय संघटन - डॉ. निरू वशिष्ट

३) व्यवसाय संघटन व व्यवस्थापन - श्री. एम.सी.शुक्ला

४) व्यवसाय संघटन व व्यवस्थापन - तुलसीयन

५) व्यवसाय संघटन व व्यवस्थापन - जे. पीय महाजन.



## स्वाध्याय

**प्र.१ ला (अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. वकील हा ------ असतो.
   अ) पेशा स्वीकारणारा  ब) व्यावसायिक  क) कर्मचारी

२. कच्च्या मालाचे तयार मालात रूपांतर करण्याचे काम ------- उद्योग करतो.
   अ) जैविक उद्योग  ब) उत्खनन उद्योग  क) उत्पादक उद्योग

३. वस्तूंची प्रत्यक्ष खरेदी विक्री म्हणजेच ------- होय.
   अ) पेशा  ब) व्यापार  क) उद्योग

४. राष्ट्रीय स्तरावरील आचारसंहिता ----- साठी बनविलेली असते.
   अ) पेशा स्वीकारणाऱ्या व्यक्ती  ब) व्यावसायिक  क) कर्मचारी

५. धरण बांधण्यासाठीचे काम -------उद्योगा अंतर्गत केले जाते.
   अ) प्राथमिक  ब) दुय्यम  क) सेवा

६. अंतराची समस्या ------- मुळे सोडवली जाते.
   अ) बँक  ब) वाहतूक  क) गोदाम

७. वाणिज्य ही ------ शाखा आहे.
   अ) व्यवसायाची  ब) उद्योगाची  क) व्यापाराची

८. व्यवसायातील परताव्याला ------- म्हणतात.
   अ) फी  ब) पगार  क) नफा

९. व्यवसायातील उत्पादन विक्रीसाठी ------ अवलंबून असतात.
   अ) उद्योगावर  ब) समाजावर  क) कर्मचाऱ्यांवर

१०. गोदामामुळे वस्तूमध्ये ------ उपयोगिता निर्माण होते.
   अ) ठिकाण  ब) समय  क) रूप

**ब. योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) दिव्यांग व्यक्तींना मदत | १. सामाजिक उद्दिष्टे |
| ब) जैविक उद्योग | २. विदेशी व्यापार |
| क) स्थानिक चलन | ३. रेशीम उद्योग |
| ड) सामाजिक प्रश्नांची सोडवणूक | ४. आर्थिकेतर उपक्रम |
| | ५. देशी व्यापार |
| | ६. खाणकाम |
| | ७. नफा |
| | ८. आर्थिक कृती |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१. नफा मिळविण्याच्या उद्देशाने वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण संबंधित नियमितपणे केली जाणारी कृती.

२. जी कृती मानवाकडून पैसा मिळविण्यासाठी केली जाते.
३. पैसा किंवा पैशाचे मूल्य असलेल्या मोबदल्यात केलेली वस्तूंची खरेदी विक्री.
४. अशी कृती जी व्यापारातील अडचणी दूर करते.
५. स्थिर प्रकारची संपत्ती निर्माण करणारे उद्योग.
६. वस्तू व सेवेच्या उत्पादनाशी संबंधीत असणाऱ्या व्यावसायीक कृतीचे नाव.
७. वस्तू व सेवेच्या वितरणाशी संबंधीत असलेले व्यवसाय कृतीचे नाव.
८. व्यक्ती व साधनसंपत्तीची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणाऱ्या हालचाली संबधीची कृती.
९. समय उपयोगिता निर्माण करणारे व्यापारी अनुषंगिक साधन.
१०. व्यवसायाची अशी कृती ज्यामध्ये एखादी व्यक्ती फी घेऊन उत्तम तज्ज्ञ सेवा देण्याचे मान्य करतो.

### ड) चूक की बरोबर ते लिहा.

१. व्यवसाय ही एक आर्थिक कृती आहे.
२. प्रत्येक पेशा हा पैसा मिळविण्यासाठी केला जातो.
३. प्राथमिक व्यवसाय ही निसर्गाशी संबंधीत असतात.
४. व्यापारामध्ये वाणिज्याचा समावेश होतो.
५. गोदामामुळे वेळेची समस्या दूर होते.
६. व्यापारामध्ये वस्तू व सेवांच्या खरेदी व विक्रींचा समावेश होतो.
७. नफ्यामुळे व्यवसायांची एकूणच कार्यक्षमता वाढते.
८. रोपवाटिका ही उत्खनन उद्‌योगात येतात.
९. उद्‌योगामुळे रुप उपयोगिता निर्माण होते.
१०. किरकोळ व्यापारी हा उत्पादक व घाऊक व्यापारी यांच्यातील दुवा आहे.

### इ) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) कृषी उद्‌योग, उत्खनन उद्‌योग, जैविक उद्‌योग, उत्पादन उद्‌योग.
२) आयात व्यापार, निर्यात व्यापार, घाऊक व्यापार, पुनर्निर्यात व्यापार.
३) बँक, विमा, वाहतूक, उत्पादन.
४) चहा, दूध, कॉफी, यंत्रसामग्री.

### फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) आर्थिक कृती अशी कृती की जी ................मिळविण्यासाठी केली जाते.
२) वस्तू व सेवांचे वितरण म्हणजे.............होय.
३) व्यवसाय ही..........कृती आहे.
४) नफा मिळविणे हा ...............चा मुख्य हेतू असतो.
५) तज्ज्ञ सेवेच्या मोबदल्यात व्यावसायिक ........... आकारतात.
६) ............... ही व्यक्ती कर्मचाऱ्यांना काम देते.
७) व्यवसायातील अनेक धोके स्वीकारल्याबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यास.........म्हणतात.
८) उद्‌योगामुळे .............. निर्माण होते.

९) ..............व्यापारामध्ये वस्तूंची खरेदी व विक्री मोठ्या प्रमाणावर चालते.

१०) ..............हा घाऊक व्यापारी व ग्राहकामधील दुवा आहे.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) विभिन्न देशामध्ये चालणारा व्यापार | |
| २) दुसऱ्या देशाकडून वस्तू व सेवांची खरेदी | |
| ३) | वस्तू व सेवांची विदेशी ग्राहकाला केलेली विक्री |
| ४) | उत्पादक व किरकोळ व्यापारी यांच्यामधील दुवा |

( १) निर्यात व्यापार  २) विदेशी व्यापार  ३) घाऊक व्यापारी  ४) आयात व्यापार )

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आर्थिक कृती म्हणजे काय?

२) आर्थिकेतर कृती म्हणजे काय?

३) घाऊक व्यापारी म्हणजे काय?

४) किरकोळ व्यापाऱ्याचा अर्थ सांगा.

५) आयात व्यापाराचा अर्थ काय?

६) निर्यात व्यापाराचा अर्थ काय?

७) पुनर्निर्यात व्यापार म्हणजे काय?

८) व्यापाराची अनुषंगिक साधने म्हणजे काय?

९) व्यापार म्हणजे काय?

१०) वाणिज्य म्हणजे काय?

११) प्राथमिक उद्योग म्हणजे काय?

१२) दुय्यम उद्योग म्हणजे काय?

१३) जैविक उद्योगांचा अर्थ काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) व्यवसाय ही **आर्थिकेतर** कृती आहे.

२) वस्तू विनिमयासाठी **पैशाचा** उपयोग केला जातो.

३) पेशा हा दुसऱ्या व्यक्तीला **हस्तांतर** करता येतो.

४) **नोकरीसाठी** भांडवलाची गरज असते.

५) **उद्योगामुळे** स्थल उपयोगिता निर्माण होते.

६) बाजारातील पुरवठ्याची बाजू **वाणिज्य** सांभाळते.

७) व्यवसायाचा मुख्य उद्देश **सेवाप्रदान** करणे होय.

**प्र.२ रा संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.**

१. व्यवसाय
२. पेशा
३. नोकरी
४. देशी व्यापार
५. विदेशी व्यापार
६. आर्थिक कृती
७. आर्थिकेतर कृती.

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) जयसुख तेल कारखाने शुध्द तेल तयार करतात. ते सर्व उत्पादन रुपेश तेल वितरक विकत घेतो. तो वेगवेगळ्या किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री करतो. श्रीमती प्राची यांनी बालाजी किराणा दुकानातून दोन (२) किलो तेल विकत घेतले.

**नावे शोधा –**

१) उत्पादक –
२) घाऊक व्यापारी –
३) किरकोळ व्यापारी –
४) ग्राहक –

२) श्री. प्रणव हे तांत्रिक वस्तू तयार करण्याचे काम करतात. इंग्लंड येथील श्री. जॅक हे नॉर्थ अमेरिकेतील मे. फ्रँक कॉर्पोरेशनला आपल्या वस्तू विकतात. तसेच यू.एस.ए. येथील श्री. विल्यम्स् हे ब्राझिल येथून काही वस्तू खरेदी करतात.

वरील घटनेमध्ये – १) आयातदाराचे नाव ओळखा.
२) उत्पादकाचे नाव काय?
३) निर्यातदाराचे नाव ओळखा.

**प्र.४ था फरक स्पष्ट करा.**

१. उद्योग व वाणिज्य
२. व्यवसाय व वाणिज्य
३. व्यवसाय व पेशा
४. नोकरी व पेशा

**प्र.५ वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) पेशाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.
२) उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा.
३) विदेशी व्यापाराचे दोन प्रकार सांगा.
४) कोणतीही चार अनुषंगिक साधने स्पष्ट करा.
५) रोजगाराची चार वैशिष्ट्ये लिहा.
६) व्यवसायाची कोणतीही चार उद्दिष्टे लिहा.
७) व्यवसायाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.
८) प्राथमिक उद्योगाचे कोणतेही दोन प्रकार सांगा.

**प्र.६ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. किरकोळ व्यापारी अंतिम ग्राहकांशी थेट संपर्क प्रस्थापित करतो.
२. वाणिज्य ही संज्ञा व्यापारापेक्षा व्यापक आहे.
३. व्यावसायिक कृतीत जोखीम अपरिहार्य असते.
४. आयात आणि निर्यात यांचे एकत्रीकरण म्हणजे पुनर्निर्यात व्यापार होय.
५. वाहतुकीमुळे स्थान उपयोगिता निर्माण होते.
६. वाणिज्याची कृती सुरू होण्यापूर्वी उद्योग कार्याला सुरूवात होते.

७. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य तो वापर करणे आवश्यक असते.
८. घाऊक व्यापारी उत्पादक व किरकोळ व्यापाऱ्यातील दुवा होय.
९. व्यवसाय हा आर्थिक कृतीचा भाग आहे.

**प्र.७ वा खालील प्रश्न सोडवा.**

१. वाणिज्य म्हणजे काय?
२. निर्यात व्यापार म्हणजे काय?
३. व्यापाराच्या अनुषंगिक साधनांची व्यापारामधील भुमिका थोडक्यात स्पष्ट करा.
४. दुय्यम उद्योगाचे प्रकार कोणते ?
५. व्यावसायीक कृतीचे प्रकार सांगा.
६. अंतर्गत व्यापाराची व्याप्ती स्पष्ट करा.
७. व्यापारासाठी बँक व विमा कशाप्रकारे उपयोगी असतात?

**प्र.८ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. व्यवसाय, पेशा व नोकरी यांचा तुलनात्मक अभ्यास करा.
२. व्यवसाय संज्ञेची व्याख्या द्या व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
३. व्यवसायाची वेगवेगळी उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.
४. व्यवसायातील नफ्याची भूमिका स्पष्ट करा.

# २. व्यापार


२.१ प्रस्तावना व अर्थ

२.२ व्यापाराचे प्रकार

**२.२.१ अंतर्गत व्यापार**

अ) घाऊक व्यापार

ब) किरकोळ व्यापार : किरकोळ व्यापाराचे प्रकार

**२.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापार**

**अ) आयात व्यापार –**

अर्थ

आयात प्रक्रिया

**ब) निर्यात व्यापार –**

अर्थ

निर्यात प्रक्रिया

**क) पुनर्निर्यात व्यापार**

- **फरक**
- **सारांश**
- **स्वाध्याय**


रत्नागिरी जिल्ह्यातील एका लहान गावात मोहन भात शेतीकरीत होता. त्याला शेतीतून जे काही मिळायचे ते, तो त्याच्याच गावात किरकोळ किंमतीला विकत असे. त्याला विपणन व्यवस्थेचे ज्ञान नव्हते. एके दिवशी पुण्यातून त्याचा मित्र त्याला भेटायला आला. जेव्हा ते आर्थिक स्थितीवर चर्चा करीत होते, तेव्हा मोहन प्रतिसाद देत नव्हता. त्याचा मित्र राजीव जो विपणन क्षेत्रात होता त्याने त्याला त्याच्या शेतीतून आंबा, काजू आणि फणसाचे उत्पादन घेण्याचे सुचविले. त्याने सांगितले की तू तुझा व्यवसाय अंतर्गत आणि परदेशी व्यापारातूनदेखील विकसीत करु शकतोस. मोहन आश्चर्यचकित झाला आणि त्याने त्याच्या कार्यपद्धतीविषयी विचारले.

राजीवने मोहनच्या शेतीत आधीच असलेली आंबा, काजू आणि फणस यांची उत्पादने मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांना पाठविण्याचे सुचविले. रत्नागिरीच्या आंब्यांना भौगोलिक संपदा आणि प्रसिद्धी असल्याने या शहरात त्याचा माल सहजपणे विकला जाईल. अशाप्रकारचा अंतर्गत व्यापार त्याला मोठा फायदा मिळवून देऊ शकतो. या फायदयातून तो व्यवसायाला लागणारी साधने आयात करून त्याचा उपयोग शेती विकसित करण्यासाठी करू शकतो. आंबा, काजू आणि फणस यापासून विविध प्रकारची उत्पादने व्यावसायिक तत्त्वावर घेण्याचे त्याने सुचविले. तो त्याचा माल विदेशात निर्यात करू शकतो.

मोहनने राजीवचा सल्ला स्वीकारला आणि व्यवसायास सुरुवात केली. वस्तूंचा व्यापार करून एक शेतकरी चांगला व्यापारी झाला. मोहनचे उदाहरण असे सुचविते की भारतीय शेतकरी शेती बरोबरच चांगला व्यापारीसुद्धा बनू शकतो.

## २.१ प्रस्तावना :

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये व्यापार महत्त्वाची भूमिका बजावितो. योग्यप्रकारे चालविलेल्या व्यापाराचे अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास हे फलित असते.

पैशाच्या स्वरूपात अथवा पैसासदृश्य स्वरूपात वस्तू आणि सेवांची केली जाणारी खरेदी आणि विक्री हे व्यापाराचे मूलभूत वैशिष्ट्य आहे आणि वस्तू आणि सेवांचा मालकी हक्क एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतर करणे हे

दुसरे वैशिष्ट्य आहे.

वस्तुविनिमय हा व्यापाराचा मूळ प्रकार आहे ज्यामध्ये वस्तू व सेवांचा विनिमय प्रत्यक्ष दुसऱ्या वस्तू व सेवांशी केला जातो. प्रचलित चलनाच्या शोधानंतर (उदा. पैसा) व्यापार अत्यंत सुलभ झाला.

**अर्थ**

'व्यापार' म्हणजे वस्तू व सेवांची देवाणघेवाणीची प्रक्रिया होय. नफा मिळविण्याच्या दृष्टीने वस्तू व सेवांची खरेदी आणि विक्री केली जाते. उत्पादक व उपभोक्ता यांमधील व्यापार हा महत्त्वाचा दुवा आहे. व्यापार हा खरेदीदार व विक्रेत्याकडून केला जातो.

## २.२ व्यापाराचे प्रकार :

विविध घटकांच्या आधारे व्यापाराचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

**व्यापार**

- **अंतर्गत व्यापार**
  - घाऊक व्यापार
  - किरकोळ व्यापार
    - **फिरते व्यापारी**
      1. फेरीवाले
      2. टोपलीवाले
      3. रस्त्यावरील दुकाने
      4. स्वस्त वस्तूंचा दुकानदार
      5. बाजारातील व्यापारी
    - **स्थायिक दुकाने**
      - **लहान प्रमाणावर व्यापार करणारी दुकाने**
        1. सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने
        2. जुन्या वस्तूंची विक्री करणारी दुकाने
        3. अधिकृत विक्रेते
        4. विशिष्ट प्रकारचा माल विकणारी दुकाने
      - **मोठ्या प्रमाणावर व्यापार करणारी दुकाने**
        1. एकछती दुकाने
        2. सुपर बाजार
        3. साखळी पद्धतीची दुकाने
        4. एक किंमत दुकाने
        5. मॉल
- **बहिर्गत व्यापार**
  - आयात
  - निर्यात
  - पुनर्निर्यात

### २.२.१ 'अंतर्गत व्यापार' :

जेव्हा वस्तू आणि सेवांची खरेदी किंवा विक्री देशाच्या सीमेअंतर्गत केली जाते तेंव्हा त्यास अंतर्गत व्यापार असे म्हणतात. उदा. दारावर येणाऱ्या विक्रेत्याकडून वस्तूंची खरेदी करणे, स्थानिक दुकाने, प्रदर्शने, विभागीय बाजार, विभागीय दुकाने किंवा मॉल इ. अंतर्गत व्यापाराची उदाहरणे आहेत.

जेव्हा खरेदीदार आणि विक्रेता देशांतर्गत आहेत त्यास अंतर्गतव्यापार असे म्हणतात. दोन राज्यातील किंवा शहरातील व्यापारसुध्दा अंतर्गत व्यापार असतो.

उत्पादन व उपभोग यांच्यामध्ये मोठी दरी आहे. या दरीला भरून काढण्याचे काम वितरण साखळी करते. वितरण साखळी ही अंतर्गत व्यापारामध्ये अत्यंत महत्त्वाची आहे. उत्पादक हा एकाच ठिकाणी स्थायिक असतो परंतु ग्राहक हे अनेक ठिकाणी विखुरलेले असतात. उत्पादक आणि उपभोक्ता यांच्यातील ही मोठी दरी आहे. ही दरी वितरण साखळी मुळे कमी केली जाते. वितरण साखळीमुळे वस्तू योग्य वेळेत योग्य ठिकाणी व योग्य त्या प्रमाणात मिळण्यास मदत होते.

- **उत्पादन वितरण साखळी :**

उत्पादक ⟶ घाऊक व्यापारी ⟶ किरकोळ व्यापारी ⟶ ग्राहक

- **अंतर्गत व्यापाराचे प्रकार :**

❑ **अंतर्गत व्यापाराचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते :**

**अ) घाऊक व्यापार (Wholesale Trade)**

**ब) किरकोळ व्यापार (Retail Trade)**

**अ) घाऊक व्यापार :**

जेव्हा वस्तूची खरेदी उत्पादकाकडून किंवा निर्मात्याकडून मोठ्या प्रमाणावर पुनर्विक्रीच्या उद्देशाने केली जाते त्यास 'घाऊक व्यापार' असे म्हणतात. घाऊक व्यापारात खरेदी विक्री करण्यात जी व्यक्ती व्यस्त असते त्या व्यक्तीला 'घाऊक व्यापारी' असे म्हणतात. घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापाऱ्यांना विक्री करण्यासाठी उत्पादकांकडून मालाची खरेदी करतात म्हणून घाऊक व्यापारी हे खरेदीदार आणि विक्रेते असतात.

घाऊक व्यापारी वस्तू व सेवांच्या वितरणामध्ये विविध भूमिका पार पाडतो तसेच उत्पादकाला ग्राहकापर्यंत पोहोचण्यास घाऊक व्यापारी मदत करतो.

**व्याख्या :**

१) **फिलिप कोटलर यांच्यामते,** 'जी व्यक्ती व्यवसायात मालाची पुनर्विक्री करण्याच्या उद्देशाने मालाची खरेदी करत असते आणि यासाठी विविध प्रक्रियांचा समावेश करीत असते त्यास घाऊक व्यापारी असे म्हणतात.'

२) **इलेवन थॉमस यांच्या मतानुसार,** 'जी व्यक्ती खऱ्या अर्थाने उत्पादक नसते व किरकोळ व्यापारीही नसते परंतु या दोघांमध्ये जोडणारा दुवा म्हणून कार्य करीत असते त्यास घाऊक व्यापारी असे म्हणतात.'

- **घाऊक व्यापाऱ्याची वैशिष्ट्ये :**

१) घाऊक व्यापारी मोठ्या प्रमाणात उत्पादकाकडून वस्तूंची खरेदी करीत असतो.

२) वाटपाच्या प्रक्रियेमध्ये घाऊक व्यापारी सर्वात जास्त धोका पत्करतो.

३) घाऊक व्यापारी एका प्रकारच्या किंवा काही विशिष्ट प्रकारच्या वस्तूंची खरेदी विक्री करत असतो.

४) या व्यवसायात मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते.

५) घाऊक व्यापारी मागणी, पुरवठा यातील समतोलाद्वारे किंमतीवर नियंत्रण ठेवतो.

६) उत्पादकाला बाजारपेठांची माहिती घाऊक व्यापाऱ्यांकडून मिळत असते.

७) घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्यांना आवश्यकतेनुसार वस्तूंची विक्री करीत असतो.

८) घाऊक व्यापारी बाजारातील वेगवेगळी कार्ये करतो. जसे वस्तू जमा करणे, गोदामात माल साठविणे, वाहतूक करणे, प्रमाणिकरण, बांधणी, जाहिरात व आर्थिक मदत इ.

- **घाऊक व्यापाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या सेवा :**

अ) उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सेवा

ब) किरकोळ व्यापाऱ्याना दिल्या जाणाऱ्या सेवा

**अ) उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सेवा :**

१) **मोठ्या प्रमाणात खरेदी :** घाऊक व्यापारी उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणात वस्तूंची खरेदी करतो आणि किरकोळ व्यापाऱ्यांना मागणीप्रमाणे विक्री करतो.

२) **साठवण :** घाऊक व्यापाऱ्याकडे माल साठवणुकीची सोय असते. त्यामुळे उत्पादनापासून ते वितरणापर्यंत लागणारा वेळ घाऊक व्यापारी भरून काढतो.

३) **वाहतूक :** घाऊक व्यापारी उत्पादनाच्या ठिकाणापासून मागणीच्या ठिकाणापर्यंत मालाचा पुरवठा करीत असतो.

४) **आर्थिक सहाय्य :** घाऊक व्यापारी उत्पादकांना उत्पादनासाठी आगाऊ रक्कम देतो ज्यामुळे कमी वेळेत वस्तूंचे उत्पादन करणे उत्पादकांना शक्य होते.

५) **बाजारपेठेविषयी माहिती पुरवणे:** घाऊक व्यापारी उत्पादकांस बाजारपेठेतील अद्ययावत माहिती पुरवितो जसे बाजाराची स्थिती, वस्तूंची मागणी, ग्राहकांची आवड इ.

६) **धोका स्वीकारणे :** घाऊक व्यापारी उत्पादकाला आगाऊ रक्कम देतो आणि किरकोळ व्यापाऱ्याला उधारीची सवलत देतो या दरम्यान घाऊक व्यापारी धोका स्वीकारतो आणि वस्तूला ग्राहकांकडून मागणी येईपर्यत वस्तूंचा साठा करून ठेवतो. त्यामुळे या दरम्यान त्याला धोका संभवतो.

७) **विपणन :** घाऊक व्यापारी बाजारपेठेतील वेगवेगळी विपणन कार्ये करतो. जसे वस्तू गोदामात साठविणे, जाहिरात, विक्रीवाढीसाठी प्रयत्न इ.कामे उत्पादकाच्या वतीने तो करतो.

**ब) किरकोळ व्यापाऱ्याला दिल्या जाणाऱ्या सेवा :**

१) **वस्तूंचा साठा :** घाऊक व्यापारी मोठ्या प्रमाणात वस्तूंचा साठा करतो त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांना वस्तू सहज उपलब्ध होतात त्यामुळे उपभोक्त्यांच्या मागणीप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करणे शक्य होते.

२) **नियमित पुरवठा :** घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्यांसाठी नियमितपणे व खात्रीशीर पुरवठा करतो म्हणून किरकोळ व्यापारी वस्तूंचा साठा करण्यापासून मुक्त असतात. किरकोळ व्यापारी उपभोक्त्यांना त्यांच्या मागणी प्रमाणे वस्तूंचा पुरवठा करतो.

३) **धोका स्वीकारणे :** घाऊक व्यापारी वस्तूंच्या किमतीत होणारे बदल आणि बाजारपेठेविषयक कार्य,वस्तूंच्या मोठ्या प्रमाणावरील साठा इ. विषयी धोका स्वीकारतो. त्यामुळे किरकोळ व्यापारी हा धोक्यापासून मुक्त होतो.

४) **आर्थिक मदत :** घाऊक व्यापारी उधारीची सवलत तसेच सूट देऊन किरकोळ व्यापाऱ्यांना आर्थिक मदत करतात त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांच्या खेळत्या भांडवलात वाढ होते.

५) **बाजारपेठ विषयी माहिती :** विविध वस्तूंची बाजारपेठेविषयीची माहिती घाऊक व्यापारी देत असतो. ही माहिती नवीन उत्पादन, उत्पादनाचे नवनवीन प्रकार, नवीन योजना, अस्तित्वात असलेल्या वस्तू इ. या संदर्भात असते. त्यामुळे घाऊक व्यापारी किरकोळ व्यापाऱ्याला वस्तू खरेदी केव्हा आणि कधी करावयाची याबद्दल मार्गदर्शन करतो.

६) **विक्रयवृध्दी :** घाऊक व्यापारी उत्पादित मालाची जाहिरात करीत असतो आणि त्यामुळे वस्तूंच्या विक्रीत वाढ होते परिणामी किरकोळ व्यापाऱ्याची विक्री वाढते.

### ब) किरकोळ व्यापार :

ज्या व्यापारात ग्राहकांना लहान प्रमाणावर मालाची विक्री केली जाते त्यास किरकोळ व्यापार असे म्हणतात. किरकोळ व्यापार हा वस्तूंच्या मोठ्या साठ्यांचे छोटे भाग करून केला जातो. किरकोळ व्यापारी निरनिराळ्या वस्तू छोट्या प्रमाणात अंतिम ग्राहकापर्यंत पोहोचवतो. किरकोळ व्यापारी स्थानिक बाजारपेठेत व्यवसाय करतो. तो माल उपभोक्त्यापर्यंत योग्य किमतीत पाठविण्याची जबाबदारी स्वीकारत असतो.

**व्याख्या :**

**१) ऑक्सफर्ड शब्दकोशा नुसार :**

''किरकोळ व्यापार म्हणजे पुनर्विक्री ऐवजी, वापर आणि उपयोगासाठी, समाजाला कमी प्रमाणात वस्तूंची विक्री करणे होय.''

**२) विल्यम जे स्टॅटन यांच्या मते :**

अंतिम ग्राहकाला प्रत्यक्षपणे खाजगी व अव्यावसायिक मालाची विक्री व सेवा करणे यासाठी ज्या विविध प्रक्रियांचा समावेश केला जातो त्यास किरकोळ व्यापार असे म्हणतात.

**किरकोळ व्यापाऱ्याची वैशिष्ट्ये :**

किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी आणि ग्राहक यांच्यामधील दुवा असतो. स्थानिक बाजारपेठेत त्याचे वर्चस्व असते. किरकोळ व्यापारी वैयक्तिकपणे लक्ष घालून नवीन वस्तूंकडे ग्राहकांचे लक्ष केंद्रित करत असतो. ग्राहकांशी त्याचे चांगले संबध प्रस्थापित करतो. घाऊक व्यापाऱ्यापेक्षा कमी धोका स्वीकारतो. तो ग्राहकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.

१. किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी आणि ग्राहक यांच्यातील दुवा आहे.

२. किरकोळ व्यापारी स्थानिक बाजाराच्या जवळ असणाऱ्या वस्तीमध्ये व्यापार चालवितो.

३. किरकोळ व्यापारी विविध प्रकारच्या वस्तू कमी प्रमाणात विक्रीस ठेवत असतो.

४. किरकोळ व्यापारी उद्योगात कमी प्रमाणात भांडवल गुंतवितो.

५. घाऊक व्यापाऱ्याच्या तुलनेमध्ये किरकोळ व्यापारामध्ये कमी जोखीम व कमी नफा असतो.

- **किरकोळ व्यापाऱ्यांकडून दिल्या जाणाऱ्या सेवा :**

अ) घाऊक व्यापाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा

ब) ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवा

**अ) घाऊक व्यापाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा :**

१) **जोडणारा दुवा :** किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी आणि ग्राहक यांच्यामधील दुवा असतो.

२) **मालाचे सहजपणे वितरण :** किरकोळ व्यापारी मालाचे जलदपणे वितरण करीत असतो. नाशवंत मालाचे त्वरित वितरण करणे हे अतिशय महत्त्वाचे असते. कारण या वस्तू कमी काळ टिकतात. **उदा.** दुग्धजन्य पदार्थ, फळे, पालेभाज्या इ.

३) **विपणन कार्य :** जर विपणनाचे कार्य घाऊक व्यापाऱ्याने केले नाही तर ती कार्ये किरकोळ व्यापारी करीत असतो. उदा. वाहतूक करणे, गोदामात माल साठविणे, जाहिरात करणे इ.

४) **माहिती पुरविणे :** किरकोळ व्यापारी हा वस्तूंची बदलणारी मागणी, ग्राहकांच्या आवडी निवडी, बाजारचे स्वरूप इ. माहिती घाऊक व्यापाऱ्यास देत असतो.

५) **ग्राहकांना आकर्षित :** किरकोळ व्यापारी बाजारपेठेतील ग्राहकांना जाहिरातीद्वारे आकर्षित करण्याचे काम करत

असतो त्यामुळे घाऊक व्यापाऱ्यास त्याच्या मालाची विक्री करण्यास मदत होते.

६) **मागणी वाढविणे :** किरकोळ व्यापारी वैयक्तिकपणे लक्ष घालून नवीन वस्तूंकडे ग्राहकांचे लक्ष केंद्रित करतो. तो नवीन वस्तूंच्या मागणीसाठी दर्शकांसाठी खिडकीय प्रदर्शन (Window display) लावतो.

**ब) ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवा :**

१) **मालाचा नियमित पुरवठा :** किरकोळ व्यापारी ग्राहकांच्या गरजेनुसार आवश्यक तेवढ्या मालाचा साठा करून ठेवतो. ग्राहक आपल्या गरजेनुसार किरकोळ व्यापाऱ्याकडून माल खरेदी करू शकतो.

२) **स्थानिक सुविधा :** किरकोळ व्यापारी हे साधारणपणे स्थानिक वस्तीच्या जवळच वास्तव्य करीत असतो. ग्राहकांना त्यांच्या वेळेनुसार, गरजेनुसार मालाची खरेदी केव्हाही करता येते.

३) **मालाची घरपोच सेवा :** किरकोळ व्यापारी ग्राहकांना मालाची घरपोच सेवा मोफत किंवा अल्पदराने उपलब्ध करून देतो. त्यामुळे तो ग्राहकांशी कायमस्वरूपी संबंध निर्माण करू शकतो.

४) **निरनिराळ्या वस्तू :** किरकोळ व्यापारी विविध प्रकारच्या वस्तू विकत असतो. विविध प्रकारच्या वस्तू विक्रीस ठेवल्यामुळे ग्राहकांना आपल्या पसंतीच्या मालाची निवड करता येते.

५) **उधारीची सवलत :** किरकोळ व्यापारी आपल्या नियमित ग्राहकांना उधारीची सवलत देत असतो. ज्या ग्राहकांकडे पैशाची कमतरता असते त्यांना ही सवलत उपयोगी पडते. आर्थिक चणचण असणाऱ्या पुष्कळ ग्राहकांना या सवलतीचा लाभ घेता येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ग्राहकांचा पाया तयार होतो जो व्यापार वृद्धीसाठी उपयुक्त ठरतो.

६) **विक्रयोत्तर सेवा :** किरकोळ व्यापारी आपल्या ग्राहकांना टिकाऊ वस्तू विकल्या नंतरही सेवा देत असतो उदा. शीतकपाट, दूरचित्रवाणी संच, संगणक, भ्रमणध्वनी इ.ची दुरुस्ती, प्रात्यक्षिक/डेमो, गॅरंटी त्यामुळे ग्राहकांच्या मनात त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण होतो.

७) **माहिती :** किरकोळ व्यापारी हे बाजारपेठेतील नवीन वस्तूंविषयी बहुमुल्य माहिती आणि सल्ला देत असतो यामुळे ग्राहकांना वस्तूचा दर्जा, किंमत, टिकाऊपणा इ. विषयी निर्णय घेण्यास मदत होते.

**किरकोळ व्यापाराचे प्रकार**

**अ) फिरते व्यापारी**

१. फेरीवाले
२. टोपलीवाले
३. रस्त्यावरील दुकानदार
४. स्वस्तवस्तू दुकानदार
५. बाजारातील व्यापारी

**ब) स्थायिक दुकाने**

**I) लहान प्रमाणावरील व्यापार करणारी दुकाने**

१. सामान्य दुकाने
२. जुन्या वस्तूंचा व्यापार करणारी दुकाने
३. अधिकृत विक्रेते
४. विशिष्ट प्रकारचा माल विकणारी दुकाने

**II) मोठ्या प्रमाणावरील व्यापार करणारी दुकाने**

१. एकछती दुकाने
२. सुपरबाजार
३. साखळीपद्धतीची दुकाने
४. एकच किंमत असलेली दुकाने
५. मॉल

### अ) फिरते व्यापारी :

ज्या व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवसायासाठी निश्चित जागा किंवा निश्चित दुकान नसते त्यांना फिरते व्यापारी असे म्हणतात.

### ❑ फिरत्या किरकोळ व्यापाऱ्यांचे प्रकार :

#### १. फेरीवाले :

फेरीवाले हा किरकोळ व्यापाऱ्याचा सर्वात जुना प्रकार आहे. फेरीवाले व्यापारी आपल्या मालाची विक्री सुलभपणे करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी हातगाडीचा वापर करतात आणि शहरातील रस्त्यांवर जाऊन मालाची विक्री करतात. ते ग्राहकांना घरपोच सेवा उपलब्ध करून देतात. त्यांना कमी भांडवलाची आवश्यकता असते. हे व्यापारी मालाची विक्री करण्यासाठी वस्तूंची नावे घेऊन किंवा किंमत सांगून जोरजोरात ओरडत असतात. ते नाशवंत वस्तूंची, ऋतुमानानुसार हलक्या आणि कमी किमतीच्या वस्तू जसे भाजीपाला, फळे, बांगड्या, खेळणी, घरगुती वस्तू इ. ची फिरून विक्री करतात.

#### २. टोपलीवाले :

टोपलीवाले हा किरकोळ व्यापाऱ्यांपैकी सर्वात जुना प्रकार आहे. जे आपल्या मालाची विक्री करण्यासाठी एखाद्या टोपलीत किंवा खोक्यामध्ये माल घेऊन जात असतात. ते दररोज वापरात असणाऱ्या कमी दर्जाच्या तसेच कमी किमतीच्या वस्तू रोखीने विकतात. सर्वसाधारणपणे असे व्यापारी फळे, भाजीपाला, मासे, भांडी, साबण इ. ची विक्री करतात.

#### ३. रस्त्यांवरील दुकानदार :

हे व्यापारी आपला व्यापार नगर आणि महानगरातील गर्दीच्या रस्त्यांवर करतात. ते आपला माल साधारणपणे गर्दीच्या ठिकाणी उदा. सिनेमागृह, बसथांबा, रेल्वेस्टेशन, शाळा, कॉलेजेस इ. ठिकाणी विक्री करत असतात. ते रस्त्याच्या कडेला तात्पुरती छोटी दुकाने लावतात. ते हँडबॅग, तयार कपडे प्लॅस्टिकच्या वस्तू, विजेवर चालणाऱ्या वस्तूंची विक्री करीत असतात. वस्तूंच्या किमतीही योग्य असतात, तसेच ते आपली जागा वारंवार बदलत नाहीत.

#### ४. स्वस्त वस्तू दुकानदार :

हे व्यापारी तात्पुरत्या काळासाठी भाडे तत्त्वावर एखादे लहान दुकान घेतात. जर त्यांना वस्तू विक्रीस चांगला प्रतिसाद मिळाला नाही तर ते व्यापारी आपले ठिकाणही बदलतात. फेरीवाले, टोपलीवाले आणि स्वस्त मालाची विक्री करणारे व्यापारी यामधील फरक एवढाच की फेरीवाले एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात परंतु या व्यापाऱ्यांचे तात्पुरत्या काळातील एकच दुकान असते. हे व्यापारी निरनिराळ्या वस्तूंची विक्री करतात, जसे कटलरी, कपबश्या, मोजे, शॅम्पू इ. सर्वसाधारण वस्तूंचा दर्जा कमी प्रतीचा असतो.

#### ५. बाजारातील व्यापारी :

हे व्यापारी आपले दुकान बाजाराच्या दिवशी लावतात. वेगवेगळ्या ठिकाणी परंतु ठरावीक दिवशी साधारणपणे बहुतेक गावांमध्ये आणि शहरांमध्ये आठवड्यातील एखादा दिवस हा बाजार दिवस म्हणून ओळखला जातो. त्या दिवशी वेगवेगळे किरकोळ व्यापारी गावात किंवा शहरात येऊन आपले दुकान मांडतात. ते निरनिराळ्या वस्तूंची विक्री करतात. जसे भाजीपाला, फळे, खेळणी, मसाले, तयार कपडे, भांडीकुंडी इ. या व्यापाराला आठवडी बाजार असेही म्हणतात.

**ब) स्थायिक किरकोळ व्यापाऱ्यांचे प्रकार :** स्थायिक किरकोळ व्यापारी हे ठिकाण बदलत नाहीत. बहुतेक वेळा त्यांची जागा निश्चित ठरलेली असते. यांचे पुढे लहानप्रमाणावरील किरकोळ व्यापारी आणि मोठ्याप्रमाणावरील किरकोळ व्यापारी असे वर्गीकरण होते.

### I) लहानप्रमाणावर किरकोळ व्यापार करणारे व्यापारी :

जे व्यापारी लहानप्रमाणावर व्यापार करतात आणि वेगवेगळ्या वस्तूंची विक्री करतात त्यांना लहानप्रमाणावर किरकोळ व्यापार करणारे व्यापारी म्हणतात. अशी दुकाने रहिवाशी परिसरात असल्यामुळे ग्राहकांना खरेदी करणे सोईचे असते. उदा. सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने, औषधाची दुकाने, लाँड्री इ.

### ❑ लहान प्रमाणावर किरकोळ व्यापार करणाऱ्यांचे प्रकार :

#### १) सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने :

सर्वसाधारण मालाची विक्री करणारी व्यक्ती लोकांच्या दैनंदिन जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तूंची विक्री करीत असते. जसे अन्नधान्य, टूथपेस्ट, स्टेशनरी, औषधे, खाद्यतेल, बिस्किटे, प्लॅस्टिकच्या वस्तू, चपला, छत्र्या, पेन इ.

सर्वसाधारणपणे अशी दुकाने गावात किंवा शहराच्या रहिवासी परिसरात स्थायिक असतात. असे दुकानदार आपल्या नियमित ग्राहकांना मालाची घरपोच सेवा देतात. त्यांच्या जवळ विविध प्रकारच्या वस्तू विक्रीस असतात. हे दुकानदार घाऊक व्यापारी किंवा प्रत्यक्षपणे उत्पादकांकडून मालाची खरेदी करीत असतात.

#### २) जुन्या वस्तूंची किरकोळ विक्री करणारे दुकानदार :

हे व्यापारी लोकांकडून, ग्राहकांकडून जुन्या वस्तूंची खरेदी करून विक्री करतात. **उदा.** पुस्तके, फर्निचर, दूरचित्रवाणी संच, मोटारगाड्या, कपडे इ. विकत घेतलेल्या मालाची दुरुस्ती करून आणि त्या वस्तू वापरण्याच्या स्थितीत आणून त्या वस्तू परत ग्राहकांना विकल्या जातात. समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व्यक्ती अशा प्रकारच्या वस्तू या दुकानदारांकडून विकत घेत असतात. अशा वस्तूंची काही हमी नसते, दर्जा नसतो व त्या कमी किमतीत विकल्या जातात.

#### ३) अधिकृत किरकोळ विक्रेते :

हे व्यापारी एखाद्या विशिष्ट उत्पादकांच्या मालाची विक्री करण्यासाठी अधिकृतपणे नेमलेले असतात. ते दूरचित्रवाणी संच, कपडे धुण्याचे मशीन, म्युझिक सिस्टिम, दुचाकी, चारचाकी गाड्या इ.चा व्यापार करतात. ज्या उत्पादकांनी त्यांना अधिकृत विक्रेते म्हणून प्राधान्य दिले असते अशा उत्पादकांच्या मालास प्राधान्य देऊन ते विक्री करीत असतात. त्याचा मोबदला म्हणून त्यांना चांगले कमिशन मिळेते. ते खिडकी प्रदर्शन, जाहिरात आणि आकर्षक योजना ठेवून लोकांना प्रोत्साहित करतात.

#### ४) विशिष्ट प्रकारचा माल विकणारी किरकोळ दुकाने :

हे दुकानदार काही विशिष्ट प्रकारच्या मालाची विक्री करतात. ते एकाच उत्पादनाचे/वस्तूंचे विविध प्रकार ठेवतात. उदा.एका खेळण्याच्या दुकानात फक्त वेगवेगळ्या प्रकारची खेळणी ठेवतात. आणखी उदाहरण म्हणजे क्रीडा सामान, तयार कपडे, चामड्याच्या वस्तू, प्लॅस्टिकच्या वस्तू, घड्याळे, पुस्तके, इ. त्यांच्या वस्तूंच्या किमती विविध असतात. निवड करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. दुकानदार ग्राहकांना योग्य सल्ला व माहिती आपल्या विशिष्ट ज्ञानाच्या आधारे देत असतो.

### II) मोठ्या प्रमाणावर किरकोळ व्यापार करणारे व्यापारी :

जे व्यापारी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक करून ग्राहकांना विविध प्रकारच्या मालाची विक्री करतात आणि आपला उद्योगधंदा व्यवस्थितपणे सांभाळतात, त्यांना मोठ्या प्रमाणावर किरकोळ व्यापार करणारे व्यापारी म्हणतात. शहरीकरणामुळे हे व्यापारी उदयास आले. शहराच्या वेगवेगळ्या परिसरात अशी स्थिर दुकाने असतात.

## ❑ मोठ्या प्रमाणावर किरकोळ व्यापार करणारे व्यापाऱ्यांचे प्रकार :

### अ) एकछती दुकान : (Departmental Stores)

एकाच इमारतीत विविध विभागातून विविध प्रकारच्या मालाची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जाते त्यास एकछती दुकान असे म्हणतात. या दुकानातील प्रत्येक खाते किंवा विभागातून विशिष्ट प्रकारच्या मालाची विक्री केली जाते. दुकानातील प्रत्येक खाते, विभाग यांचे नियोजन व व्यवस्थापन एकच व्यवस्थापक करतो. ते मोठ्या प्रमाणात निरनिराळ्या वस्तूंची विक्री करतात. उदा. खेळणी, तयार कपडे, खाद्य पदार्थ इ.

**व्याख्या :**

**जेम्स स्टिफनसन्स यांच्या मते :**

'एकाच छताखाली विविध वस्तू असलेले किरकोळ व्यापार करणारे एक मोठे दुकान म्हणजे एकछती दुकान होय.'

**जी.बी. गिल्स् यांच्या मते :**

'एकच मालकी हक्क असणारे एकाच छताखाली अनेक दुकाने संघटित एकत्र करणारे दुकान म्हणजे एकछती दुकान होय. प्रत्येक दुकानाची आणि विभागाची वेगवेगळ्या विशेष वस्तूंची विक्री करण्यात विशेषता असते'.

**एकछती दुकानाची वैशिष्ट्ये :**

**१) खरेदीबाबत सुविधा :**

एकछती दुकानात एकाच छताखाली मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचा माल, विविध दर्जाचा माल व सेवा ग्राहकांना दिल्या जातात. ग्राहकांना एकाच छताखाली विविध मालाची खरेदी वेगवेगळ्या किमतीमध्ये करता येऊ शकते.

**२) मध्यवर्ती व्यवस्थापन :**

एकछती दुकानात सर्व विभाग स्वतंत्रपणे असतात पण सर्व विभागांचे व्यवस्थापन, नियंत्रण व मालकी मध्यवर्ती ठिकाणी केंद्रित झालेली असते. उदा. जाहिरात विभाग, हिशोब विभाग, कर्मचारी भरती करणे विभाग इ. सर्व विभाग एका छताखाली केंद्रिय व्यवस्थापनाने नियंत्रित होतात.

**३) विविध प्रकारचा माल निवडीस प्राधान्य :**

एकछती दुकानात विविध मानांकनाच्या, नक्षींच्या आणि रंगाच्या अनेक प्रकारच्या वस्तू ग्राहकांना पुरविल्या जातात.

**४) विशेषिकरण :**

एकछती दुकानात प्रत्येक विभागातून स्वतंत्रपणे विशिष्ट मालाची विक्री केली जाते. उदा. विजेच्या वस्तूंच्या विभाग, भाजीपाला, फळे विभाग, स्वयंपाक घरातील वस्तूंचा विभाग इ.

**५) मध्यवर्ती ठिकाणी :**

एकछती दुकान हे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी स्थापन झालेले असते. ग्राहक सहजपणे येऊ शकतात व त्यांच्या गरजेनुसार वस्तूंची खरेदी करू शकतात अशा मध्यवर्ती ठिकाणी या दुकानाची स्थापना झालेली असते.

**६) प्रचंड भांडवल :**

एकछती दुकानासाठी मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते. इमारत, कर्मचाऱ्यांचे पगार, विविध प्रकारच्या मालाचा साठा, जाहिरात, वीज इ. साठी भांडवलाची आवश्यकता असते.

### ७) उधारीची सुविधा नाही :

एकछती दुकानात रोखीनेच मालाची विक्री केली जाते किंवा ते क्रेडिट कार्ड स्वीकारतात परंतु उधारीची सुविधा देत नाहीत.

## ब) सुपरबाजार : (Super Market)

सुपरबाजार म्हणजे मोठ्या प्रमाणावर किरकोळ व्यापार करणारी संस्था होय. या दुकानात विविधप्रकारच्या मालाची विक्री जसे अन्नधान्याच्या वस्तू आणि जीवनावश्यक किराणा जिन्नस स्वयंसेवा या तत्त्वावर विकले जातात.

सुपर बाजारात वस्तू खुल्या मांडणीवर ठेवलेल्या असतात. ग्राहक आपल्या आवडीनुसार वस्तू घेतात. त्या वस्तूंना एखादया ट्रॉलीत ठेवून त्या दाराजवळ घेऊन येतात. जेथे एका काऊंटरला एक क्लार्क निवडलेल्या वस्तूंचे बिल बनवितो. ग्राहक बिल भरून वस्तू ताब्यात घेतो.

### व्याख्या :

'ग्राहकांना लागणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या विशिष्ट वस्तू, अन्न आणि घरगुती लागणाऱ्या लहान लहान वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री करणारे दुकान.'

उदा. बिग बझार, डि मार्ट, रिलायन्स् फ्रेश इ.

### सुपर बाजाराची वैशिष्ट्ये :

**१) ठिकाण :** सर्व साधारणपणे सुपरबाजारची स्थापना व सुरुवात शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जेथे लोकांचे लक्ष केंद्रीत होईल अशा ठिकाणी केली जाते.

**२) मालाचा प्रकार :** सुपर बाजारात ग्राहकांच्या आवश्यक अशा वस्तूंची विक्री केली जाते. उदा.अन्नधान्य, बंद डब्यातील अन्न, बेकरी उत्पादन, किराणा माल, स्टेशनरी इ. कधीकधी ज्या वस्तू किरकोळ व्यापाऱ्याकडे उपलब्ध नसतात त्या सुपर बाजारात मिळतात.

**३) स्वयंसेवा :** सुपर बाजार हे स्वयंसेवा पद्धतीने चालविले जातात. दुकानात विक्रेत्यांची नेमणूक नसते. ग्राहक वस्तूंवर छापलेल्या माहितीनुसार वस्तूंची निवड करतात.

**४) वाजवी किंमत :** सुपर बाजारात मोठ्या प्रमाणावर सवलतीच्या दरात मालाची खरेदी केली जाते आणि ग्राहकांना वाजवी दरात मालाची विक्री केली जाते.

**५) भांडवल :** सुपर बाजारात मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता भासते. म्हणून अशी दुकाने सहकारी संस्था, भागीदारी संस्था किंवा खाजगी कंपनीद्वारे स्थापन केली जातात. उदा.रिलायन्स, टाटा समूह, ग्राहक पेठ इ.

**६) रोखीने विक्री :** सुपर बाजारात मालाची रोख स्वरूपातच विक्री केली जाते. ग्राहकांना उधारीची सवलत दिली जात नाही म्हणून उधारी बुडण्याचा धोका निर्माण होत नाही. कॅशबॅक/ परतावा योजना, लॉयल्टी योजनेमुळे रोख विक्री मध्ये वाढ होते.

**७) बांधणी :** सुपर बाजारात मालाची विक्री करताना वस्तूंच्या बांधणीला महत्त्वाचे स्थान असते. बांधणीवर मालाचा तपशील, दर्जा, वजन, किंमत आणि साहित्य इ. चा उल्लेख असतो.

**८) प्रेरणादायक खरेदी :** आकर्षक बांधणी आणि योजना ग्राहकांचे मन वळवितात आणि न लागणाऱ्या वस्तूदेखील ते विकत घेतात. ग्राहक प्रेरित खरेदीदार होतो.



**कृती :** आपल्या शहरातील मोठ्या प्रमाणात व्यापार करणाऱ्या दुकानाला भेट द्या आणि लहान प्रमाणात व्यापार करणाऱ्या दुकानातील वस्तूंच्या किंमतीचा तुलनात्मक अभ्यास करा.

**क) साखळी पद्धतीचे दुकान : (Chain Stores)** साखळी पद्धतीची दुकाने ही एखाद्या संघटनेच्या मालकीची असतात. शहराच्या आणि देशाच्या विविध भागात अनेक शाखांचे पसरलेले जाळे म्हणजे साखळी पद्धतीचे दुकान. ते सारख्याच प्रकारच्या मालाची विक्री मालकी हक्काद्वारे करतात. मुख्य कार्यालयातून त्यांच्यावर मालकी हक्क, व्यवस्थापन आणि नियंत्रण ठेवले जाते. ही दुकाने अंतर्गत सजावट व बाहेरून एकसारखीच दिसतात. उदा. फर्निचर, नावाची पाटी, कामगांराचा गणवेष एकाच रंगाचा असतो.

**व्याख्या : जेम्स स्टिफनसन्स यांचा मते :**

'जी दुकाने एका व्यावसायिक संस्थेच्या मालकीची असून ती सारख्याच प्रकारची असतात त्यांना साखळी पद्धती दुकाने असे म्हणतात.'

**क्लार्क आणि क्लार्क यांच्या मते :**

साखळी दुकान पद्धती म्हणजे असा किरकोळ व्यापार की जो एकसारखी उत्पादने तसेच एकच व्यवस्थापन आणि केंद्रिय मालकी याद्वारे चालतो.

भारतात बाटा, पार्क अॅव्हेन्यू, रेमंडस्, विजय सेल्स, क्रोमा इ. साखळी पद्धतीच्या दुकानांची उदाहरणे आहेत.

### ❑ साखळी पद्धतीच्या दुकानांची वैशिष्ट्ये :

**१) कमी व निश्चित किंमत :** कमी व्यापार खर्च व कमी उत्पादित खर्च यामुळे एकंदरीत वस्तूंची किंमत कमी होते. साखळीपद्धतीतील सर्व दुकानांमध्ये एकाच किमतीला मालाची विक्री केली जाते.

**२) एकसारखेपणा :** प्रत्येक साखळी पद्धतीची दुकाने बाहेरुन एकसारखी दिसून येतात. त्यातील अंतर्गत सजावट, वस्तूंची मांडणी, रंगसंगती ही सारखीच असते. यामुळे ग्राहकांना अशी दुकाने सहजपणे ओळखू येऊ शकतात.

**३) वस्तूंचे मर्यादित प्रकार :** साखळी पद्धतीतील दुकानात विशिष्ट उत्पादकाच्या उत्पादित मालाचीच विक्री करण्यात येते. उत्पादक स्वत: अशा प्रकारची दुकाने सुरू करतात. वितरक देखील साखळी पद्धतीचे दुकान चालवितात उदा. बाटा कंपनीची दुकाने ही फक्त त्यांनी उत्पादित केलेल्या पादत्राणांची विक्री करतात.

**४) मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक :** साखळी पद्धतीतील दुकानांसाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची गुंतवणूक करावी लागते. या दुकानासाठी कर्मचाऱ्यांचा पगार, जाहिरात, मालाच्या मांडणीसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता असते.

**५) शाखांद्वारे मालाचे वितरण :** साखळी पद्धतीतील दुकानात उत्पादकांकडून मुख्य कार्यालयाद्वारे मालाची खरेदी केली जाते आणि विविध शाखांद्वारे त्यांची विक्री केली जाते.

**६) रोखीने विक्री :** साखळी पद्धतीतील दुकानात रोखीनेच मालाची विक्री केली जाते. ग्राहकांना उधारीची सवलत दिली जात नाही. त्यामुळे पैसे बुडण्याची भिती नसते.

**७) मालाची गुणवत्ता :** साखळी पद्धतीच्या दुकानात उच्च प्रतीच्या व दर्जेदार मालाच्या उत्पादनांची विक्री करण्यात येते. साखळी पद्धतीतील दुकानात ग्राहकांना त्यांच्या मालाच्या दर्जाबाबात खात्री दिली जाते.

## ड) एकच किंमत असणारी दुकाने (One Price Shop) :

ज्या दुकानात मालाच्या वस्तूंची किंमत एकसारखीच असते त्यास एक किंमत असलेली दुकाने असे म्हणतात. या दुकानांद्वारे कमी किंमतीत दैनंदिन उपयोगात येणाऱ्या विविध प्रकारच्या मालाची विक्री करण्यात येते. मालाचा आकार व गुणवत्ता यानुसार उत्पादित मालाची एकाच किमतीमध्ये विक्री करण्यात येते. या दुकानात मालाच्या किंमती अगोदरच निश्चित ठरविलेल्या असतात म्हणून ग्राहकांना वस्तूंच्या किमतीबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करता येत नसते. उदा. भेटवस्तू, घडयाळे, शांपू, केश उत्पादने, घरगुती सामान, काचेच्या वस्तू इ. साधारणपणे कोठेही या दुकानांमध्ये वस्तूंची किंमत रुपये ४९/-, रु.९९/-,व रु. १९९/- अशी असते.



**कृती :** आपल्या घराच्या जवळ असणाऱ्या एकच किंमत असलेल्या दुकानांना भेट द्या.

### ❑ एकच किंमत असलेल्या दुकानांची वैशिष्ट्ये :

१) **एकसारखी किंमत :** एकच किंमत असणाऱ्या दुकानात सर्व प्रकारच्या मालाच्या मोठ्या किंवा छोट्या वस्तूंची किंमत एकाच स्वरूपाची असते. तिथे घासाघीस करण्याला वाव नसतो.

२) **कमी किंमत :** एकच किंमत असणाऱ्या दुकानात वस्तूंची किंमत रास्त व कमी असते.

३) **विविध प्रकारचा माल :** एकच किंमत असणाऱ्या दुकानात मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या मालाची विक्री करण्यात येते. या दुकानात माल निवडीचे स्वातंत्र्य पूर्णपणे दिले जाते. उदा.खेळणी, स्टेशनरी, प्लॅस्टिकच्या वस्तू, सौंदर्यप्रसाधने इ.

४) **ठिकाण :** एकच किंमत असणारी दुकाने सर्वसाधारणपणे शहराच्या व्यापारी केंद्र, रेल्वेस्थानकाजवळ, बसस्थानकाजवळ व इतर गर्दीच्या ठिकाणी स्थापन झालेली असतात. काही वेळा अशी दुकाने तात्पुरत्या काळासाठी यात्रा व प्रदर्शन या ठिकाणी स्थापन करण्यात येतात.

५) **रोखीने विक्री :** एकच किंमत असणाऱ्या दुकानात मालाची विक्री रोखीने करण्यात येते. ग्राहकांना कोणत्याही प्रकारे उधारीची सवलत दिली जात नाही. त्यामुळे बुडीत रकमेचा धोका निर्माण होत नाही.

६) **कमी भांडवल :** या दुकानांमध्ये कमी प्रमाणात व लहान-लहान वस्तू असल्याने कमी भांडवल लागते.

## इ) मॉल :

मॉल हे एक मोठे बंदिस्त खरेदीचे ठिकाण असते ज्यात विविध प्रकारची दुकाने, व्यापार व उपहारगृहे असतात. आधुनिक खरेदीचे मॉल ही एक अमेरिकन संज्ञा आहे ज्यामध्ये एक किंवा अनेक इमारती मिळून एक समूह निर्माण होतो. ज्यामधून ग्राहकाला विविध वस्तूंची खरेदी एका विभागातून वा अनेक विभागातून करता येते.

२० व्या शतकात मॉलमधील खरेदी हे मनोरंजनाचे केंद्र झाले आहे. ज्यात सिनेमा, उपहारगृह, प्रेक्षागृह समाविष्ट आहेत. विविध प्रकारच्या वस्तूंच्या उपलब्धतेमुळे मॉल हे आत्ताच्या काळात विशेष लोकप्रिय झालेले आहेत.

उदा. अभिरुची मॉल, सिटी प्राईड, फिनिक्स मार्केट सिटी.

विविध किरकोळ दुकाने जसे की, एकछती दुकाने, साखळी पद्धतीची दुकाने आणि मॉल यांच्यामध्ये अतिशय सूक्ष्म फरक आहे.

**किरकोळ व्यापारातील नवे प्रवाह :**

भारतीय परिस्थितीमध्ये आजच्या काळात ऑन लाईन खरेदी विक्री करणे खूप लोकप्रिय झाले आहे.

कमी गुंतवणूक, साठवणुकीची आणि गोदामांची आवश्यकता नाही, ग्राहकांशी समोरासमोर संवादाची आवश्यकता नसते इ.कारणाने विक्रेत्यांसाठी हे एक सोपे व्यासपीठ आहे. त्यांचे लक्ष त्वरित सेवा आणि दर्जा यावर केंद्रित असते.

**ऑनलाईन किरकोळ व्यवहारासाठी लोकप्रिय उदाहरणे पुढीलप्रमाणे :**

फ्लिप कार्ट, ॲमेझॉन, शॉपक्ल्यूज, मिंत्रा इ.

### २.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापार :

प्राचीन भारतामध्ये, आंतरराष्ट्रीय व्यापार विविध प्रकारच्या योग्य उत्पादनांसाठी जसे की रेशीम, हातमाग, दागदागिने, हत्यारे इत्यादीसाठी केला जात होता.

जेव्हा दोन किंवा त्यापेक्षा जास्त देशांमध्ये जो व्यापार केला जातो त्यास '**आंतरराष्ट्रीय व्यापार**' असे समजले जाते. दोन देशांमधील राजकीय संबंधदेखील व्यापारावर प्रभाव पाडतात. आंतरराष्ट्रीय व्यापार प्रक्रिया नेहमी गुंतागुंतीची, कठीण आणि लांबलचक असते. सरकारी धोरणे, अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय बाजार, आंतरराष्ट्रीय कायदे, चलन इ. व्यापार क्रियेवर प्रभाव पाडतात. जगभरात बहुतेक अर्थशास्त्रज्ञ सहमत आहेत की, आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या संपत्तीला चालना देण्यास मदत करतो.

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ग्राहकांना विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा मिळतात.

**निर्यात व्यापार :**

विदेशात वस्तू व सेवांची विक्री करणे म्हणजे निर्यात व्यापार होय. निर्यात व्यापाराची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे.

**निर्यात कार्यपद्धती**

| अ) प्राथमिक अवस्था | ब) नौ-भरण पूर्व अवस्था | क) नौ-भरण अवस्था | ड) नौ-भरण पश्चात अवस्था |
|---|---|---|---|
| १) नोंदणी | १) आदेशाची पावती | १) कागदपत्रांची पूर्तता | १) जहाजावर माल चढविण्याचा आदेश |
| २) मध्यस्थाची नेमणूक | २) पतपत्र | २) मालाचे परीक्षण | २) कागदपत्रे सादरीकरण |
| | ३) नौ-भरण पूर्व अर्थपुरवठा | ३) माल जहाजावर चढविणे | ३) लाभांची पूर्तता |
| | ४) वस्तूंचे उत्पादन | | ४) पाठपुरावा करणे |
| | ५) संवेष्टन | | |
| | ६) निर्यात पत हमी महामंडळाची मदत Export Credit & Guarantee Corporation (ECGC) | | |
| | ७) वस्तू आणि सेवा कर प्रक्रिया | | |
| | ८) सागरी विमा | | |
| | ९) निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता Clearing & Forwarding Agent (C & F Agent) | | |

### अ) प्राथमिक अवस्था :

#### १) नोंदणी :

निर्यातदाराने स्वत: नोंदणी पुढील विविध अधिकाऱ्यांकडे करावी

१) परराष्ट्र व्यापार निदेशालय **(DGFT),** प्रादेशिक आयात-निर्यात परवाना अधिकाऱ्याकडून **(Regional Import Export Licensing Authority) –** आयातनिर्यात क्रमांक प्राप्त करण्याची गरज असते.

२) आयकर अधिकाऱ्यांकडून कायमस्वरूपी खाते क्रमांक मिळविणे. (PAN)

३) इतर अधिकारी जसे निर्यात वृद्धीमंडळ, वस्तू व सेवाकर अधिकारी.

#### २) मध्यस्थांची नेमणूक :

नोंदणी झाल्यानंतर विदेशातील आदेश मिळविण्यासाठी निर्यातदार मध्यस्थांची किंवा विक्री प्रतिनिधीची नेमणूक करतो. निर्यातदार विदेशात सुद्धा विक्री कार्यालय सुरू करू शकतो.

### ब) नौ-भरण पूर्व अवस्था :

#### १) आदेशाची पावती :

आदेश मिळाल्यानंतर, निर्यातदार आदेशाची पडताळणी आणि खात्री करतो निर्यातदार आयातदाराच्या देशातील आयातीवरील निर्बंध तपासतो.

#### २) पतपत्र :

निर्यातदार आयातदारास त्याच्या नावाचे पतपत्र देण्यासंबंधी विनंती करतो. आयातदाराच्या बँकेने दिलेल्या पतपत्रामुळे समस्या भेडसावत नाही. निर्यातदार, आयातदारास त्याच्या नावाचे पतपत्र देण्यासंबंधी विनंती करतो. आयातदाराच्या बँकेने दिलेल्या पतपत्रामुळे विदेशी व्यापारात चलन आणि निर्बंध इत्यादी समस्या भेडसावत नाही.

#### ३) नौ-भरण पूर्व अर्थपुरवठा :

जहाजावर माल चढविण्यापूर्वी निर्यातदार त्याच्या बँकेकडून अर्थसाहाय्य घेतो. त्यामुळे त्याची खेळत्या भांडवलाची गरज भागते.

#### ४) वस्तूंचे उत्पादन :

खरेदीदाराच्या गरजेनुसार निर्यातदार वस्तूंचे उत्पादन करतात. जर निर्यातदार उत्पादक नसेल तर तो स्थानिक पुरवठादाराकडून वस्तू प्राप्त करून घेतो.

#### ५) संवेष्टन :

वस्तूंचे अतिशय व्यवस्थितपणे संवेष्टन करणे महत्त्वाचे आहे. कारण संवेष्टन तीन प्रकारे महत्त्वाची भूमिका बजाविते.

i) वाहतुकीमध्ये वस्तूंचे संरक्षण करणे.

ii) वस्तूंच्या दर्जाची काळजी घेणे.

iii) वस्तूंची जाहिरात करणे.

### ६) निर्यात पतहमी महामंडळाची (ECGC) मदत :

निर्यातदार निर्यात पतहमी महामंडळाकडून सुरक्षा घेतो. निर्यातदाराला उधारीच्या धोक्यापासून हे सुरक्षित ठेवते. उदा.जर आयातदार पैसे देण्यास असमर्थ ठरला तर निर्यात दाराला ९०% पर्यंतच्या तोट्याची सुरक्षा निर्यात पतहमी महामंडळाकडून दिली जाते.

### ७) वस्तू आणि सेवा कायद्यातील तरतुदी :

निर्यात व्यापारसंबंधी निर्यातदाराने वस्तू आणि सेवा कायद्यातील तरतुदींचे पालन करणे गरजेचे आहे.

### ८) सागरी विमा :

निर्यातदार किंमत, विमा आणि मालवाहतुकीच्या करारानुसार सागरी विमा पत्र मिळवितो. निर्यातदार आवश्यक विमा हप्ता भरतो आणि विमा पत्र प्राप्त करतो.

### ९) निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता :

निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता निर्यातदाराचे मध्यस्थ म्हणून ओळखले जातात. निर्यातीबाबत पुढील कार्यपद्धती साठी देखील यांना जबाबदारी घ्यावी लागते.

## क) नौ–भरण अवस्था :

### १) कागदपत्रांची पूर्तता :

निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता जहाज बिल तयार करतात आणि कागदपत्रे निर्यातदाराकडे सुपूर्त करतात.

### २) मालाचे परिक्षण :

सर्व कागदपत्रे जमा झाल्यावर संबंधित बंदराचा (Port) व्यवस्थापक Carting Order देतो. यामध्ये जहाजावर चढविणाऱ्या मालास गोदीत प्रवेश देण्याबाबत सूचना असते.

### ३) जहाजावर माल चढविण्याचा आदेश :

मालाचे परीक्षण झाल्यानंतर सीमाशुल्क निरिक्षक निर्यात करण्याचा आदेश देतो. निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता, सीमाशुल्क सुरक्षा अधिकाऱ्यांकडून माल चढविण्याचा आदेश (Let Ship Order) मिळवितो.

माल जहाजावर चढविल्यानंतर, जहाजाचा कप्तान व्यवस्थापकास दुय्यम रसीद देतो. निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता जहाज कंपनीकडून माल जहाजावर चढविण्याचे बिल घेतो.

## ड) नौ–भरणा पश्चात अवस्था :

### १) जहाजावर माल चढविणे :

निर्यातदार आयातदारास माल पाठविल्याबद्दल जहाजावर माल चढविण्याचा आदेश पाठवितो. या कागदपत्राबरोबर निर्यातदार आदेश पत्र, संवेष्टन केलेल्या वस्तूंची यादी, व्यापारी बिजक आणि रोख रक्कमेत रूपांतर न होणाऱ्या हुंडीची प्रत पाठवितो.

### २) कागदपत्रे सादर करणे :

निर्यातदार सर्व आवश्यक ती कागदपत्रे बँकेला पाठवितो आणि निर्यात कार्यपद्धतीच्या वाटाघाटींची पूर्तता करतो.

### ३) लाभाची पूर्तता :

संबंधित बँक अधिकाऱ्यांकडून निर्यात लाभ मिळविण्यासाठी निर्यातदार सर्व व्यवस्था करतो. या लाभामध्ये राहिलेला कर, परतावा, जकात कर यांचा समावेश होतो.

### ४) पाठपुरावा करणे :

खरेदीदाराच्या वस्तूंबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी निर्यातदार निर्यातीनंतर निर्यातीबाबत पाठपुरावा करतो.



**कृती** – आपल्या परिसरातील आयातदार-निर्यातदार शोधा.

## ब) आयात व्यापार :

आयात व्यापार म्हणजे एखादया विदेशातून वस्तू खरेदी करणे असा होय. आयात करण्याची प्रक्रिया आयात धोरण, आयात व्यापाराची कार्यपद्धती देशानुरूप भिन्न असते. सदरची कार्यपद्धती ही आयात धोरण, कायदेशीर बाबी आणि सीमाशुल्क धोरण यांवर अवलंबून असते. भिन्न देशांच्या आवश्यकता आणि रीतीरिवाज धोरणांवर अवलंबून असतो. जगातील जवळजवळ सर्व देशांमध्ये आयात व्यापार त्या देशाचे सरकार नियंत्रित करते. या नियंत्रणाचे उद्दिष्ट विदेशी विनिमय निर्बंधांचे बंधन, स्वदेशी उद्योगांचे संरक्षण इत्यादींचा उचित वापर होण्याकरिता आहे.

**आयात कार्यपद्धती**

| अ) प्राथमिक अवस्था | ब) आयातीपूर्वीची अवस्था | क) आयात अवस्था | ड) आयातीनंतरची अवस्था |
|---|---|---|---|
| १) नोंदणी | १) ठरावीक हिस्सा प्रमाणपत्र | १) कागदपत्रांची पोचपावती | १) बंदर गोदी देयक |
| २) वाटाघाटी | २) विदेशी व्यापार मंजुरी | २) प्रवेश हुंडी | २) सीमाशुल्क |
| | ३) आदेश योग्य व्यक्तीस देणे. | ३) माल पाठविण्याचा आदेश (ताबा आदेश) | ३) विमा हप्ता |
| | ४) पतपत्र | ४) सीमा शुल्क पूर्तता | ४) माल वाहतूक खर्च |
| | ५) निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता | | ५) निर्यातदाराचे देणे |
| | ६) जहाजावर माल चढविण्याचा आदेश | | ६) पाठपुरावा करणे. |

### अ) प्राथमिक अवस्था :

### १) नोंदणी :

आयातदार स्वत:ची नोंदणी पुढील अधिकाऱ्यांकडे करतो.

i) परराष्ट्र व्यापार निदेशालय किंवा प्रादेशिक आयात निर्यात परवाना अधिकाऱ्यांकडून आयात निर्यात क्रमांक प्राप्त करतो.

ii) आयकर अधिकाऱ्यांकडून कायम स्वरुपी खाते क्रमांक (पॅन) मिळवतो.

iii) वस्तू आणि सेवा कायद्यासंबधी प्रक्रिया पूर्ण करणे.

२) **वाटाघाटी :**

आयातदार निर्यात दाराशी पुढील गोष्टींबाबत वाटाघाटी करतो.

i) वस्तूंची किंमत

ii) मालाचा ताबा वेळापत्रक

iii) उधारीची मुदत

iv) विक्री, देणी आणि वस्तू पोहोच यासंबंधी अटी आणि शर्ती

### ब) आयातपूर्वीची अवस्था :

१) **ठरावीक हिस्सा प्रमाणपत्र :**

आयातदाराने सरकारी अधिकाऱ्यांकडून आयातीबाबत ठरावीक हिस्सा (Quota) प्रमाणपत्र मिळविणे आवश्यक असते. कारण काही वस्तूंच्या आयातीवर बंधने असतात.

२) **विदेशी व्यापार चलन मंजुरी :**

भारतीय मध्यवर्ती बँकेकडून आयातदाराने विदेशी व्यापार चलनाची मंजुरी मिळविणे आवश्यक असते. यासाठी आयातदाराने आपल्या बँकेमार्फत अर्ज दाखल करणे महत्त्वाचे आहे.

३) **आदेश पाठविणे/मागणीपत्र :**

भारतीय मध्यवर्ती बँकेकडून विदेशी व्यापार चलनाची मंजूरी मिळविल्यानंतर आयातदार जहाजाने माल पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्याकडे आदेश पाठवितो. या आदेशाला मागणीपत्र असे म्हणतात. आयातदार अटी आणि शर्तीबाबत, आयात कराराबाबत वाटाघाटी करतो आणि नंतर आदेश पाठवितो.

४) **पतपत्र :**

निर्यातदार पतपत्राची मागणी करतात. पतपत्राद्वारे निर्यातदाराला त्याचे पैसे देण्याची हमी आयातदाराच्या बँकेकडून दिली जाते म्हणून आयातदार आपल्या बँकेकडून निर्यातदारासाठी पतपत्र मिळवितो.

५) **निष्कासन व अग्रेसित अभिकर्ता :**

आयात वस्तूसाठी आयातदार विविध प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी निष्कासन व अग्रेसित अभिकर्त्याची नेमणूक करतात.

६) **जहाजावर माल चढविण्याचा आदेश :**

सीमाशुल्क पूर्तता करण्यासाठी, वस्तूंचा ताबा मिळविण्यासाठी व इतर सर्व व्यवस्था करण्यासाठी निर्यातदाराकडील जहाजावर माल चढविण्याचा आदेश उपयोगी ठरतो म्हणून तो आदेश निर्यातदाराकडून प्राप्त करतो.

### क) आयात अवस्था:

१) **कागदपत्रांची पोचपावती :**

निर्यातदाराने पाठविलेली कागदपत्रे आयातदार त्याच्या बँकेमार्फत प्राप्त करतो. कागदपत्रांमध्ये पुढील कागदपत्राचा समावेश होतो.

i) माल चढविल्याचे बिल

ii) संवेष्टन यादी

iii) व्यापारी बिजक

iv) उत्पत्तीचा दाखला

v) निरिक्षण प्रमाणपत्र इ.

**२) बिल – प्रवेश हुंडी :**

सीमाशुल्क पूर्ततेसाठी आवश्यक असलेली प्रवेश हुंडी निष्कासन व अग्रेसित अभिकर्ते तयार करतात. यामध्ये संवेष्टन केलेल्या वस्तंची यादी, वस्तूंची किंमत इ.चा समावेश असतो.

**३) ताबा आदेश :**

जहाज कंपनीकडून निष्कासन आणि अग्रेसित अभिकर्ता ताबा आदेश मिळवितो. माल वाहतुकीचे पैसे दिल्यानंतर जहाज कंपनी मालाचा ताबा आदेश देते. यामुळे जहाजातून मालाचा ताबा घेणे सुलभ होते.

**४) सीमाशुल्क पूर्तता :**

सीमाशुल्क अधिकाऱ्यांकडून कागदपत्रे प्रमाणित केली जातात. यामध्ये पुढील कागदपत्रांचा समावेश होतो. माल जहाजावर चढविल्याचे बिल, प्रवेशाबाबत बिल, संवेष्टित मालाची यादी इत्यादी.

## ड) आयातीनंतरची अवस्था :

**१) गोदी देयक :**

निष्कासन आणि अग्रेसित अभिकर्ता गोदीचा वापर करण्याबद्दल देयके देतात.

**२) सीमा शुल्क :**

सीमाशुल्क अधिकाऱ्यांना निष्कासन आणि अग्रेसित अभिकर्ता आयात केलेल्या वस्तूंसाठी सीमाशुल्क देतात.

**३) विमा हप्ता :**

फ्री ऑन बोर्ड करारानुसार आयातदार विमा हप्ता देतो.

**४) मालवाहतूक भाडे देणे :**

जहाजावर माल चढविण्याच्या करारानुसार आयातदार माल वाहतुकीचे भाडे देतो

**५) निर्यातदाराचे देणे :**

करारातील अटीनुसार आयातदार निर्यातदाराचे देणे देतो. निर्यातदार या देण्यासाठी हुंडी तयार करतो.

**६) पाठपुरावा करणे :**

आयातदार आयात वस्तूंसाठी पाठपुरावा करतो. जर वस्तूंमध्ये विसंगती असेल तर निर्यातदाराला कळविले जाते.

## इ) पुनर्निर्यात व्यापार :

बाहेरील देशातून आयात केलेला माल बंदराजवळील गोदामांमध्ये साठवून ठेवला जातो आणि त्यावर प्रक्रिया करून किंवा प्रक्रिया न करता तोच आयात केलेला माल पुन्हा दुसऱ्या देशास निर्यात केला जातो अशा व्यापारास पुनर्निर्यात व्यापार असे म्हणतात. आयात केलेल्या मालावर कोणतीही अतिरिक्त प्रक्रिया होत नसल्यास कोणतेही सीमाशुल्क लागू केले जात नाही.

**उदाहरण :**

**भारत** ← आयात - (कच्चामाल आयात करणे) **दक्षिण आफ्रिका**

↓ निर्यात (प्रक्रिया केलेला माल)

**जपान**

- **फरक**

**फिरते किरकोळ व्यापारी आणि स्थायिक दुकानांचे किरकोळ व्यापारी**

| अ.क्र. | मुद्दा | फिरते किरकोळ व्यापारी | स्थायिक दुकानांचे किरकोळ व्यापारी |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | ज्यांना आपला व्यवसाय करण्यासाठी निश्चित जागा/ठिकाण नसते त्यांना फिरते किरकोळ व्यापारी असे म्हणतात. | ज्यांना आपला व्यवसाय करण्यासाठी निश्चित स्वरुपाचे ठिकाण असते त्यांना स्थायिक दुकानांचे किरकोळ व्यापारी असे म्हणतात. |
| २. | भांडवल | मर्यादित स्वरूपाच्या भांडवलाच्या गुंतवणुकीची गरज असते. | जास्त प्रमाणावर भांडवलाच्या गुंतवणुकीची गरज असते. |
| ३. | मालाचा साठा | मर्यादित स्वरूपाचा मालाचा साठा असतो | मोठ्या प्रमाणावर मालाचा साठा करावा लागतो. |
| ४. | मालाचा प्रकार | दैनंदिन उपयोगासाठी आणि लवकर नाश पावणाऱ्या मालाची खरेदी विक्री करतात. | दैनंदिन गरज भागविण्यासाठी सर्व प्रकारच्या मालाची खरेदी विक्री करीत असतात. उत्तम दर्जाच्या प्रकारच्या मालाची विक्री करीत असतात. |
| ५. | मालाचे विविध प्रकार | ग्राहकांना विविध प्रकारच्या मालाची विक्री करू शकत नाही | ग्राहकांना विविध प्रकारच्या मालाची विक्री करीत असतात. |
| ६. | किंमत | मालाच्या निश्चित किंमती अभावी कमी किमतीचा माल असतो | यांच्याकडील मालाची किंमत जास्त असते. |
| ७. | उधारीची सवलत | ग्राहकांना उधारीची सवलत दिली जात नाही. | फक्त नियमित ग्राहकांना उधारीची सवलत दिली जाते |
| ८. | मालाची निवड | ग्राहकांना मालाची निवड करणेबाबत मर्यादित वाव असतो | ग्राहकांना मालाची निवड करण्यासाठी जास्तीत जास्त वाव दिला जातो. |
| ९. | घरपोच सेवा | ग्राहकांना मालाची घरपोच सेवा उपलब्ध करून दिली जाते. | ग्राहकांना मालाची घरपोच सेवा उपलब्ध करुन दिली जात नाही |
| १०. | विक्रयोत्तर सेवा | ग्राहकांना मालाच्या विक्रीनंतरची सेवा देत नसतात. | ग्राहकांना मालाच्या विक्रीनंतरची सेवा देण्यात येत असते. |

## सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने आणि विशिष्ट मालाची विक्री करणारी दुकाने

| अ.क्र. | मुद्दा | सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने | विशिष्ट मालाची विक्री करणारी दुकाने |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | या दुकानांमध्ये विविध प्रकारच्या मालाची विक्री करण्यात येते. | या दुकानांमध्ये विशिष्ट प्रकारच्या मालाची विक्री करण्यात येते. |
| २. | ठिकाण | शहरातील रहिवासी परिसरात या दुकानांची स्थापना करण्यात येते. | शहरातील व्यस्त बाजारपेठेत/दुकानांजवळ या दुकानांची स्थापना करण्यात येते. |
| ३. | किंमत | सर्वसाधारणपणे या दुकानात मालाच्या किमती कमी असतात. | सर्वसाधारणपणे या दुकानात मालाच्या किमती जास्त असतात. |
| ४. | मालाची विक्री | मालाची विक्री रोख स्वरूपात तसेच उधारीच्या तत्त्वांवर केली जाते. | मालाची विक्री फक्त रोख केली जाते. |
| ५. | मालाचे प्रकार | ग्राहकांना दैनंदिन गरजेच्या मालाची विक्री केली जाते. | ग्राहकांना विशिष्ट प्रकारच्या मालाची विक्री केली जाते. |
| ६. | जाहिरात खर्च | जाहिरातीवर जास्त प्रमाणात खर्च केला जात नसतो | विशेषिकरणामुळे जाहिरातीवर जास्त प्रमाणात खर्च केला जातो. |

## एकछती दुकाने आणि साखळी पद्धती दुकाने

| अ.क्र. | मुद्दा | एकछती दुकाने | साखळी पद्धती दुकाने |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | येथे एकाच इमारतीत विविध खाते व विभाग विविध प्रकारच्या मालाची मोठ्या प्रमाणावर विक्री करण्यात येते त्यास एकछती दुकाने असे म्हणतात. | जे दुकान एखाद्या संघटनेच्या मालकीचे असून त्यांच्याद्वारे नियंत्रित केले जाते त्यास साखळी पद्धती दुकान असे म्हणतात. |
| २. | मालाचे विविध प्रकार | या दुकानात विविध प्रकारचा माल मोठ्या प्रमाणावर विकला जातो. | या दुकानात विशिष्ट उत्पादकांच्याच मालाची विक्री केली जाते. |
| ३. | स्थापना | शहरात मध्यवर्ती ठिकाणी स्थापना केली जाते. | शहरातील व देशाच्या विविध भागात स्थापना केली जाते. |
| ४. | भांडवल | मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. | एकछती दुकानापेक्षा कमी प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. |
| ५. | किंमत | वस्तूंच्या किमती जास्त असतात. | एकछती दुकानापेक्षा वस्तूंची किंमत कमी असते. |
| ६. | व्यापार करताना लागणारा खर्च | व्यापार करताना लागणारा खर्च जास्त असतो. | व्यापार करताना लागणारा खर्च कमी असतो. |

## घाऊक व्यापारी आणि किरकोळ व्यापारी

| अ.क्र. | मुद्दा | घाऊक व्यापारी | किरकोळ व्यापारी |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | जी व्यक्ती मोठ्या प्रमाणावर घाऊक व्यापार व्यवसाय करते त्यास घाऊक व्यापारी असे म्हणतात. | जी व्यक्ती लहान प्रमाणावर व्यवसाय करते त्यास किरकोळ व्यापारी असे म्हणतात. |
| २. | भांडवल | मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. | लहान प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. |
| ३. | दुवा | उत्पादक व किरकोळ व्यापारी यांतील दुवा समजला जातो. | घाऊक व्यापारी आणि ग्राहक यांतील दुवा समजला जातो. |
| ४. | ठिकाण | शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत घाऊक व्यापारी कार्यरत असतो. | शहरातील विविध भागात व्यवसाय करीत असतो. |
| ५. | नफा | किरकोळ व्यापाऱ्यापेक्षा कमी नफा असतो. | घाऊक व्यापाऱ्यापेक्षा जास्त नफा मिळवत असतो. |
| ६. | गोदाम (साठवण) | मोठ्या प्रमाणावरील मालासाठी साठवणूक सोयीसाठी गोदामाची आवश्यकता असते. | लहान प्रमाणावरील मालाच्या खरेदीमुळे स्वतंत्रपणे माल साठवण्यासाठी गोदामाची आवश्यकता नसते. |
| ७. | उधारीची सवलत | किरकोळ व्यापाऱ्यांना उधारीची सवलत देत असतो. | आपल्या नियमित ग्राहकांना उधारीची सवलत देत असतो. |
| ८. | किंमत | किरकोळ व्यापाऱ्यास छापीलपेक्षा कमी किमतीत मालाची विक्री करीत असतो. | ग्राहकांना छापील किमतीत मालाची विक्री करीत असतो. |
| ९. | विशिष्टीकरण | ठराविक प्रकारच्या वस्तू विकण्यात विशेषता | अनेक प्रकारच्या वस्तू विकण्यात विशेषता |
| १०. | पैशाची व्यवस्था | मोठ्या प्रमाणावर पैशाची व्यवस्था करावी लागते. | कमी प्रमाणावर पैशाची व्यवस्था करावी लागते. |

## राष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

| अ.क्र. | मुद्दा | राष्ट्रीय व्यापार | आंतरराष्ट्रीय व्यापार |
|---|---|---|---|
| १. | भौगोलिक व्याप्ती | स्वदेशी अथवा राष्ट्राच्या सरहद्दीच्या आत व्यापार होय. | दोन देशांतील सरहद्दीपासून ते पूर्ण जागतिक पातळीवर बदलत असते. |
| २. | कामाची पद्धत | उत्पादन, विपणन आणि गुंतवणूक ही स्वदेश राष्ट्रांपर्यंतच मर्यादित | जागतिक पातळीवर कार्य करतात. |
| ३. | स्थानिक कर | वेगवेगळ्या देशांचे स्थानिक कर राष्ट्रीय व्यापारावर परिणाम करीत नाहीत | वेगवेगळ्या देशांचे स्थानिक कर आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | विदेशी चलनदार | विदेशी चलनदर व त्यातील चढउतार राष्ट्रीय व्यापारावर थेट परिणाम करीत नाहीत | विदेशी चलनदर व त्यातील चढउतार आंतरराष्ट्रीय व्यापारावर थेट परिणाम करतात. |
| ५. | वाटा/ठरावीक हिस्सा (Quota) | वेगवेगळ्या देशांनी आयात व निर्यात व्यापारावर लादलेला ठरावीक हिस्सा राष्ट्रीय व्यापारावर थेट परिणाम करीत नाहीत. | वेगवेगळ्या देशांनी आयात व निर्यात व्यापारावर लादलेला ठरावीक हिश्याच्या कक्षेतच आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो. |
| ६. | संस्कृती | देशाची संस्कृतीदेखील राष्ट्रीय व्यापारावर परिणाम करते. त्यामध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या कलाकृतीचादेखील समावेश होतो. | वेगवेगळ्या देशांची वेगवेगळी संस्कृती व उत्पादित होणाऱ्या वस्तूंचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर थेट परिणाम होतो. |
| ७. | बाजारपेठ आणि ग्राहक | राष्ट्रीय कंपन्या देशाची बाजारपेठ आणि ग्राहकांच्या गरजा व मागण्या पूर्ण करतात. | आंतरराष्ट्रीय कंपन्यांना वेगवेगळ्या देशांच्या बाजारपेठा व ग्राहकांच्या गरजा व मागण्या विचारात घ्याव्या लागतात. |

## सारांश

**✻ अंतर्गत व्यापार :**

जेंव्हा वस्तू आणि सेवांची खरेदी किंवा विक्री देशाच्या सीमेअंतर्गत केली जाते तेंव्हा त्यास अंतर्गत व्यापार असे म्हणतात.

**अंतर्गत व्यापाराचे प्रकार**

**१) घाऊक व्यापार**

''जेव्हा उत्पादकांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून पुनर्विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर माल खरेदी केला जातो तेव्हा त्यास घाऊक व्यापार असे म्हणतात.''

**२) किरकोळ व्यापार**

''जेव्हा खरेदी केलेला माल तुलनेने कमी किंवा छोट्या प्रमाणात अंतिम उपभोक्त्यास विकला जातो त्यास किरकोळ व्यापार असे म्हणतात.''

## घाऊक व्यापारी

| वैशिष्ट्ये | उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सेवा | किरकोळ व्यापाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा |
|---|---|---|
| १) विक्रीसाठी वस्तूंचे मर्यादित प्रकार | १) मोठ्या प्रमाणावरील खरेदी | १)वस्तूंचा साठा |
| २) मोठ्या प्रमाणात भांडवल | २) साठवण | २)नियमित पुरवठा |
| ३) उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणात खरेदी | ३) वाहतूक | ३)धोका स्वीकारणे |
| ४) किरकोळ व्यापाऱ्यांना आवश्यकतेनुसार विक्री | ४) आर्थिक सहाय्य | ४) आर्थिक मदत |
| ५) बाजारपेठेविषयी माहिती | ५) बाजारपेठेविषयी माहिती | ५)बाजारपेठेविषयी माहिती |
| ६) जास्त जोखीम | ६) किमतीत स्थिरता | ६)विक्रय वृद्धी |
| ७) विपणन कार्ये | ७) धोका स्वीकारणे | |
| ८) किंमत स्थिरता | ८) विपणन कार्ये | |

## किरकोळ व्यापारी

| वैशिष्ट्ये | घाऊक व्यापाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवा | ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवा |
|---|---|---|
| १)घाऊक व्यापारी आणि उपभोक्ता यामधील दुवा | १)जोडणारा दुवा | १)मालाचा नियमित पुरवठा |
| २)स्थनिक बाजार | २)वितरणात मदत | २)स्थानिक सुविधा |
| ३)वस्तूंचे विविध प्रकार | ३)विपणन | ३)घरपोच सेवा |
| ४)कमी गुंतवणूक | ४)माहिती पुरविणे | ४)विविध वस्तू |
| ५)कमी धोका व कमी नफा | ५)ग्राहकांना आकर्षित करणे | ५)उधारीची सवलत |
| | ६)मागणी निर्माण करणे | ६)विक्रयोत्तर सेवा |
| | | ७)माहिती |

## किरकोळ व्यापाऱ्यांचे प्रकार

### अ) फिरते किरकोळ व्यापारी

१) फेरीवाले
२) टोपलीवाले
३) रस्त्यावरील दुकानदार
४) स्वस्त वस्तू दुकानदार
५) बाजारातील व्यापारी

### ब) स्थायिक किरकोळ व्यापारी

**लहान प्रमाणावर व्यापार करणारी दुकाने**

१. सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने
२. जुन्या वस्तूंचा व्यापार करणारी दुकाने
३. अधिकृत विक्रेते
४. विशिष्ट प्रकारचा माल विकणारी दुकाने

**मोठ्या प्रमाणावर व्यापार करणारी दुकाने**

१. एकछती दुकाने
२. सुपरबाजार
३. साखळी पद्धतीची दुकाने
४. एकच किंमत असलेली दुकाने
५. मॉल्स

## वैशिष्ट्ये

| एकछती दुकान | सुपर बाजार | साखळी पद्धतीची दुकाने | एकच किंमत असणारी दुकाने |
|---|---|---|---|
| १)मध्यवर्ती ठिकाण | १)ठिकाण | १)कमी आणि निश्चित किंमत | १)रोखीने विक्री |
| २)विविध वस्तू | २)मालाचा प्रकार | २)एकसारखेपणा | २)एकसारखी किंमत |
| ३)खरेदीबाबत सुविधा | ३)स्वयंसेवा | ३)वस्तूंचे मर्यादित प्रकार | ३)कमी किंमत |
| ४)विशेषिकरण | ४)वाजवी किंमत | ४)मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक | ४)ठिकाण |
| ५)मध्यवर्ती व्यवस्थापना | ५)भांडवल | ५)शाखांद्वारे मालाचे वितरण | ५)कमी भांडवल |
| ६)प्रचंड भांडवल | ६)रोखीने विक्री | ६)रोखीने विक्री | ६)विविध प्रकारचा माल |
| ७)रोखीने विक्री | ७) आकर्षक बांधणी | ७)मालाची गुणवत्ता | |
| | ८)प्रेरणादायक खरेदी | | |

## आंतरराष्ट्रीय व्यापार :

### व्याख्या :

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे दोन किंवा अधिक प्रांतामधील, देशांमधील किंवा राष्ट्रांमधील, त्यांच्या राजकीय हद्दीच्या बाहेर घडणारी सर्व व्यापारिक देवाणघेवाण. आंतरराष्ट्रीय व्यापाराची पध्दत किचकट, गुंतागुंतीची व वेळखाऊ असते.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रकार**

- अ) आयात व्यापार
- ब) निर्यात व्यापार
- क) पुनर्निर्यात व्यापार

## संदर्भसूची


१) वाणिज्य संघटन - शेर्लेकर आणि शेजवळकर

२) वाणिज्य संघटन - मोहन सराफ, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३) वाणिज्य संघटन आणि व्यवस्थापन - महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ, पुणे. इ.११ वी


## रोजगाराच्या संधी

१) व्यवस्थापन तज्ज्ञ -

२) मार्केटिंग एजंट

३) जाहिरातदार

४) बांधणी तज्ज्ञ (Packers & Movers)

५) इंटेरिअर्स

६) व्यवसाय सल्लागार इ.

७) मोबाईल विक्रेते

८) G.S.T. सल्लागार

९) अकाऊंट लिहून देणारे

१०) आयात-निर्यात प्रक्रिया तज्ज्ञ /(आंतरराष्ट्रीय व्यापार)



## स्वाध्याय

**प्र.१ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१ ....................हा उत्पादक आणि किरकोळ व्यापारी यांच्यातील दुवा आहे.

अ) उपभोक्ता ब) घाऊक व्यापारी क) उत्पादक

२. साधारणत: किरकोळ व्यापाऱ्यांनी लावलेली किंमत ................ असते.

अ) जास्त ब) कमी क) स्थिर

३. घाऊक व्यापारी आपल्या व्यवसायात ...............प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक करीत असतो.

अ) लहान ब) मोठ्या क) कमी

४) किरकोळ व्यापारी हा वाटप साखळीतील.............दुवा आहे.

अ) पहिला ब) शेवटचा क) दुसरा

५) किरकोळ व्यापारी बाजारपेठेतील माहिती घाऊक व्यापाऱ्याद्वारे ........... ला पुरवितात.

अ) उत्पादक ब) सरकार क) उपभोक्ता

६) .............होणाऱ्या वस्तूंत रसायने, क्रूड ऑईल, पेट्रोलियम उत्पादने, खाद्य तेल, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, सोने आणि चांदी, मोती आणि मौल्यवान खडे इ.

अ) भारतातून निर्यात ब) भारतातून निर्यात नाही क) भारतातून आयात.

७) जकात मुक्तीसाठी निर्यातदार ............... तयार करतो

अ) माल वाहतूक आदेश ब) पतपत्र क) जहाज हुंडी

८) .........व्यापारी मालाची विक्री करण्यासाठी एखाद्या टोपलीत माल घेऊन जात असतात.

अ) फेरीवाला ब) टोपलीवाले क) स्वस्त वस्तूंची विक्री करणारे व्यापारी

९) .........हे व्यापारी आपले दुकान बाजाराच्या दिवशीच लावतात.

अ) रस्त्यांवरील व्यापारी ब) बाजारातील व्यापारी क) टोपलीवाले

१०) .............हे किरकोळ व्यापारी विशिष्ट प्रकारच्या मालाची विक्री करतात.

अ) सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने

ब) विशिष्ट प्रकारचा माल विकणारे किरकोळ दुकाने

क) जुन्या वस्तूंची किरकोळ विक्री करणारे दुकानदार

११) ................हे स्वयंसेवा पद्धतीचे दुकान म्हणून ओळखले जाते.

अ) एकछती दुकान ब) सुपर बाजार क) मल्टिपल स्टोअर्स

**ब) १) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) एकछती दुकान | १) डोक्यावरून मालाची ने आण करतात. |
| ब) बाजारातील व्यापारी | २) एकसमान किंमत |
| क) सर्वसाधारण मालाची विक्री करणारे दुकान | ३) बाजाराच्या दिवशी मालाची विक्री |
| ड) एकच किंमत असलेले दुकान | ४) सर्वसाधारण दुकाने |
| इ) टोपलीवाले व्यापारी | ५) अधिक भांडवल |
| | ६) शाखांद्वारे वितरण |
| | ७) हातगाडीवरुन माल वाहून नेणे |
| | ८) जुन्या वस्तूंची विक्री |
| | ९) विशिष्ट वस्तू |
| | १०) अधिकृत विक्रेते |

२)

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) आयात व्यापार | १) आयातीतील पहिली पायरी |
| ब) नोंदणी | २) आपल्या देशातील वस्तू नाही |
| क) पुनर्निर्यात व्यापार | ३) दुसऱ्या देशातून वस्तूंची खरेदी करणे |
| ड) पतपत्र | ४) बंधने नाहीत |
| | ५) दुसऱ्या देशांना वस्तूंची विक्री करणे |
| | ६) उधारीस पात्र आयातदार |
| | ७) थकबाकीची वसुली |
| | ८) आयातीतील शेवटची पायरी |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी दररोज जाऊन मालाची विक्री करणारी व्यक्ती.
२) घाऊक व्यापारी आणि उपभोक्ता यांच्यातील मध्यस्थ.
३) विविध शाखांद्वारे विक्री करणारे किरकोळ दुकान.
४) ज्या दुकानात एकच निश्चित किमतीत मालाची विक्री केली जाते ते दुकान.
५) रस्त्यावर मालाची मांडणी करुन मालाची विक्री करणारा किरकोळ व्यापारी.
६) आयातदाराने माल पाठविण्यासंबधी दिलेला आदेश.

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१) घाऊक व्यापारी मोठ्या प्रमाणात मालाचा साठा करतो.
२) घाऊक व्यापारी कमी प्रमाणात वस्तूंची विक्री करतो
३) किरकोळ व्यापाऱ्याचा उपभोक्त्याशी प्रत्यक्ष संबंध नसतो.
४) सुपर बाजार दुकानांकडून ग्राहकाला घरपोच माल पोहोचविण्याची सुविधा दिली जाते.
५) एकछती दुकाने शहराबाहेर स्थापन केलेली असतात.
६) एकच किंमत असलेल्या दुकानात किमतीबाबत तडजोड केली जात नाही
७) निर्यात परवान्यासाठी पतपत्र आवश्यक असते.
८) दुसऱ्या देशातून वस्तूची खरेदी करणे याला निर्यात व्यापार असे म्हणतात.
९) निर्यात व्यापारात टिकून राहण्यासाठी उच्च गुणवत्ता राखणे महत्त्वाचे असते.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१. सामान्य दुकाने, फेरीवाले, स्वस्त वस्तू दुकान, रस्त्यावरील दुकानदार.
२. एकछती दुकाने, साखळीपद्धतीची दुकाने, बाजारातील दुकाने, एकच किंमत असलेली दुकाने
३. विशिष्ट प्रकारचा माल विकणारी दुकाने, जुन्या वस्तूंचा व्यापारी, मॉल, अधिकृत विक्रेते.

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१. ..............हे व्यापाराचे मूळ स्वरूप होते.
२. व्यापार उत्पादक आणि..............यांत साखळी निर्माण करते.
३. घाऊक व्यापारी हा उत्पादक आणि ............यांना सेवा उपलब्ध करून देतो.

४. घाऊक व्यापारी ......... कडून मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी करतो.

५. घाऊक व्यापारी................ आणि बाजारातील चढ-उतार संबधीचे धोके सहन करतो.

६. घाऊक व्यापारी किरकोळ विक्रेत्यांना.......... द्वारे आर्थिक मदत करतो.

७. किरकोळ व्यापारी हा घाऊक व्यापारी आणि ................ यांना जोडणारा दुवा आहे.

८. ............ ही मोठ्या प्रमाणात किरकोळ विक्री करणारी संस्था आहे जी विविध प्रकारचे अन्नधान्य व जीवनावश्यक किराणा वस्तूंची स्वंयसेवा तत्त्वावर विक्री करते.

९. ........... दुकाने ही एखादया संघटनेच्या मालकीची असतात.

१०. दुकानातील सर्व उत्पादने व वस्तूच्या किमती एकसारख्याच असणारी दुकाने.......... म्हणून ओळखली जातात.

११. आधुनिक मॉल ही .......... ची संकल्पना आहे.

१२. .......... व्यापारात पतपत्रादूवारे पैसे देणे सुरक्षित असते.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

१. घाऊक व्यापारी **(लहान/मोठ्या)** प्रमाणात व्यवहार करतो.

२. एकछती दुकाने ही शहराच्या **(आत/बाहेर)** स्थापन केली जातात.

३. ग्राहक **(सर्वसाधारण मालाची विक्री करणाऱ्या दुकानात/एकच किंमत दुकानात)** घासाघीस करू शकत नाही.

४. किरकोळ व्यापारी **(जागतिक/स्थानिक)** बाजारपेठेत कार्ये करतात.

५. एकछती दुकाने **(मोठ्या/लहान)** प्रमाणात विक्री करणारे दुकाने आहेत.

६. सुपर बाजार दुकानासाठी **(कमी/ अधिक)** प्रमाणात भांडवल लागते.

७. साखळी पद्धतीच्या दुकानाची मालकी **(एकच/ अधिक)** संस्थाची असते.

८. दुकानातील सर्व उत्पादने व वस्तूंच्या किमती **(एकच/वेगवेगळया)** असणारी दुकाने एकच किंमत दुकाने म्हणून ओळखली जातात.

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अंतर्गत व्यापार म्हणजे काय?

२. फेरीवाले म्हणजे काय?

३. टोपलीवाले म्हणजे काय?

४. स्थायिक दुकाने म्हणजे काय?

५. लहान प्रमाणावरील स्थायिक किरकोळ व्यापारी म्हणजे काय?

६. मोठ्या प्रमाणावरील स्थायिक किरकोळ व्यापारी म्हणजे काय?

७. एकछती दुकान म्हणजे काय?

८. साखळी पद्धतीची दुकाने म्हणजे काय?

९. सूपरबाजार दुकाने म्हाणजे काय?

१०. एकच किंमत दुकाने म्हणजे काय?

११. मॉल म्हणजे काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१. दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रात चालविलेल्या व्यापारास **अंतर्गत व्यापार** असे म्हणतात.

२. दुसऱ्या राष्ट्राकडून वस्तू व सेवा खरेदी करणे म्हणजे **निर्यात** व्यापार होय.

३. एकछती दुकानात तुलनेने **कमी** किंमत आकारली जाते.

४. **घाऊक व्यापाऱ्यास** कमी भांडवलाची गरज असते.

५. विविध राष्ट्राचे जकात कर **अंतर्गत व्यापारावर** परिणाम करतात.

**ज) योग्य क्रम लावा.**

१. किरकोळ व्यापारी, ग्राहक, उत्पादक, घाऊक व्यापारी

२. आंतरराष्ट्रीय बाजार, स्थानिक बाजार, राष्ट्रीय बाजार, राज्यस्तरीय बाजार.

३. आयात अवस्था, आयातपूर्वीची अवस्था, आयातीनंतरची अवस्था, प्राथमिक अवस्था

**प्र.२ रा संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.**

१. घाऊक व्यापार
२. किरकोळ व्यापार
३. विदेश व्यापार
४. पतपत्र
५. एकच किंमत दुकान
६. एकछती दुकान
७. सर्वसाधारण दुकान
८. मॉल

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) सोनूपंत दर महिन्याचा किराणा त्यांच्या घराशेजारील नंदलाला किराणा दुकानातून खरेदी करतात. तर ते संपूर्ण वर्षाचा गहू, तांदूळ, कडधान्ये मार्केटयार्डमधील गोऱ्हे आणि सन्समधून खरेदी करतात.

वरील उदहरणात –

१) घाऊक व्यापारी कोण आहे?
२) किरकोळ व्यापारी कोण आहे?
३) किरकोळ व घाऊक व्यापाऱ्यात कोणताही एक फरक सांगा.

२) अनुराग जपानला वस्तूंची विक्री करतो. कविता यु.एस.ए मधून वस्तूंची खरेदी करते तर गणेश कच्चा माल दक्षिण आफ्रिकेतून खरेदी करतो आणि त्यावर प्रक्रिया करून वापरायोग्य वस्तू मलेशियाला विक्री करतो.

वरील उदहरणात –

१) निर्यातदार कोण आहे?
२) आयातदार कोण आहे?
३) पुनर्निर्यात व्यापार म्हणजे काय?

**प्र.४ था फरक स्प्ष्ट करा.**

१) घाऊक व्यापारी आणि किरकोळ व्यापारी
२) फिरते किरकोळ व्यापारी आणि स्थायिक दुकानांचे व्यापारी
३) सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने आणि विशिष्ट मालाची विक्री करणारी दुकाने
४) एकछती दुकान आणि साखळी पद्धतीचे दुकान
५) आयात व्यापार आणि निर्यात व्यापार

**प्र.५ वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) एकच किंमत असलेल्या दुकानांची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
२) घाऊक व्यापाऱ्याकडून उत्पादकाला दिल्या जाणाऱ्या कोणत्याही चार सेवा स्पष्ट करा.

३) किरकोळ व्यापाऱ्याकडून ग्राहकांस दिल्या जाणाऱ्या कोणत्याही चार सेवा स्पष्ट करा.

४) लहान प्रमाणावर व्यापार करणारे स्थायिक किरकोळ व्यापाऱ्याचे कोणतेही दोन प्रकार सांगा.

५) आयात व्यापार पद्धतीतील प्राथमिक अवस्था स्पष्ट करा.

६) निर्यात व्यापार पद्धतीतील जहाजावर माल चढविल्यानंतरची अवस्था स्पष्ट करा.

**प्र.६ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) घाऊक व्यापार मोठ्या प्रमाणावर मालाची विक्री करतात.

२) घाऊक व्यापाऱ्यांमुळे किंमत स्थिर ठेवण्यास मदत होते.

३) किरकोळ व्यापारी ग्राहकांस मालाची घरपोच सेवा सुविधा पुरवतात.

४) घाऊक व्यापारी बाजारपेठे विषयक अनेक कार्ये पार पाडतो.

५) अधिकृत विक्रेत्यांकडे इतर उत्पादकांच्या इतर विविध वस्तू नसतात.

६) सर्वसाधारण मालाची विक्री करणारी दुकाने रहिवाशी परिसरात असतात.

७) एकछती दुकानात मध्यवर्ती व्यवस्थापन असते.

८) सुपरबाजारात मालाची विक्री करताना वस्तूंच्या बांधणीला महत्त्वाचे स्थान असते.

९) साखळी पद्धती दुकानात विक्रीसाठी वस्तूंचे मर्यादित प्रकार असतात.

१०) एकाच किंमत असणाऱ्या दुकानात किमतीबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड करता येत नाही

**प्र.७ वा खालील प्रश्न सोडवा.**

१) घाऊक व्यापाऱ्यांची वैशिष्ट्ये कोणती?

२) किरकोळ व्यापाऱ्याकडून घाऊक व्यापाऱ्याला दिल्या जाणाऱ्या सेवा स्पष्ट करा.

३) लहान प्रमाणावर व्यापार करणारे स्थायिक किरकोळ व्यापार स्पष्ट करा.

४) घाऊक व्यापाऱ्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवा स्पष्ट करा.

५) किरकोळ व्यापाऱ्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवा स्पष्ट करा.

६) आयात व्यापाराची व्याख्या सांगून आयात व्यापाराची कार्यपद्धती सविस्तर विशद करा.

७) निर्यात व्यापाराची व्याख्या सांगून निर्यात व्यापारातील टप्पे सविस्तर विशद करा.

# ३ लघुउद्योग व व्यवसाय


| | |
|---|---|
| ३.१ प्रस्तावना | ३.४ लघुउद्योगासमोरील आव्हाने. |
| ३.१.१ अर्थ | ३.५ लघुउद्योगाच्या उभारणीचे टप्पे |
| ३.१.२ व्याख्या | • स्वाध्याय |
| ३.२ लघुउद्योगाचे महत्त्व | • सारांश |
| ३.३ लघुउद्योगाचे फायदे | |


अरुण आणि अनिल हे चांगले मित्र आहेत. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर उद्योजकता विषयाचा किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. नोकरी मिळविणे कठीण आहे हे लक्षात आल्यानंतर, आपण पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमामधील कौशल्याचा वापर करून स्वतःचा एक लहानसा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना त्यांच्या मनात आली. अर्थातच, व्यवसायाविषयी त्यांना अल्पच माहिती होती. कोणता व्यवसाय सुरू करायचा? व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीची गरज कशी पूर्ण करावयाची? भांडवल कसे उभे करावयाचे? व बाजारपेठ कशी निर्माण करावयाची याविषयी ते चिंताग्रस्त होते.

जिल्हा उद्योग केंद्राकडून दिलेले एक जाहीर प्रकटन त्यांच्या पाहण्यात आले. हे प्रकटन पुणे जिल्हा उद्योग केंद्र, औद्योगिक वसाहत, पुणे यांच्याकडून देण्यात आले. यामध्ये तरुण उद्योजकांच्यासाठी सरकारकडून देण्यात येणाऱ्या साहाय्या विषयी परिसंवाद आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही बातमी ऐकून उत्साहित झालेल्या या दोन मित्रांनी त्या परिसंवादास उपस्थित राहण्याचे ठरविले.

ग्रामीण रोजगार निर्माण कार्यक्रमाअंतर्गत सुशिक्षित तरुणांना आर्थिक व इतर मदत केंद्र व राज्य सरकार पुरविणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. आमरस व कोकम ज्यूस याला भरपूर मागणी असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांचे उत्पादन करण्याचे त्यांनी ठरविले. खादी व ग्रामीण उद्योग संघाकडून आर्थिक मदत घेऊन त्यांनी आपल्या खेडेगावामध्ये लघुउद्योग सुरू केला.

सध्या ते मँगो ज्यूस व कोकम ज्यूसचे यशस्वी उत्पादक असून नजिकच्या भविष्यामध्ये त्यांची निर्यात करण्याचा प्रकल्प उभा करण्याचा मानस आहे.

## ३.१ प्रस्तावना :

वाढती लोकसंख्या ही मनुष्यबळ विकासाची संधी मानली जाते. बेकारीची समस्या हा ज्वलंत प्रश्न आहे. भारताने स्वातंत्र्योतर काळामध्ये लघुउद्योगाच्या विकासावर विशेष लक्ष दिले आहे. तरीही, नवीन औद्योगिक धोरणाने सुध्दा बेकारीच्या समस्येवर मात करता आलेली नाही. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी उद्योग, लघुउद्योग व कुटीर उद्योगांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता, लघुउद्योगाच्या विकासासाठी भांडवल व इतर संसाधनात वाढ केली पाहीजे. ही वस्तुस्थिती आहे की, भारतामध्ये अकुशल व मध्यम कुशल कारागीर, लघुउद्योगासाठी सहज उपलब्ध आहेत. लघुउद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येतो.

ग्रामीण भागातसुद्धा या उद्योगामार्फत मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. देशाच्या विकासासाठी लघुउद्योग महत्त्वाची भूमिका पार पाडतात. ज्याठिकाणी अल्प भांडवल व कमी मनुष्यबळ लागते त्याठिकाणी हा व्यवसाय प्रकार उपयुक्त असतो.

### ३.१.१ अर्थ :

भारतामध्ये जे उद्योग अल्प प्रमाणावर वस्तूचे उत्पादन करतात, यंत्रसामग्रीची मदत घेतात, कामगारांची नेमणूक करतात व विजेचाही वापर करतात, अशा उद्योगांना लघुउद्योग असे संबोधले जाते.

सध्या लघुउद्योगाच्या व्याख्येत बदल झाला आहे. याबाबतची व्याख्या दोन गट प्रकारात सांगता येईल.

अ) विजेचा वापर परंतु, ५० पेक्षा कमी कर्मचारी

ब) विजेचा वापर न करता ५० पेक्षा जास्त परंतु १०० पेक्षा कमी कर्मचारी.

अर्थातच, यंत्रसामग्री, इमारत इ. मधील भांडवली गुंतवणूक हा लघु, मध्यम व मोठ्या उद्योगातील प्राथमिक स्वरूपातील फरक दर्शवितो.

अद्यावत व्याख्येनुसार सरकारने भांडवल गुंतवणुकीची जी सीमा निश्चित केली आहे त्यानुसारच लघुउद्योगाचे वर्गीकरण केले जाते.

### ३.१.२ व्याख्या :

- खालील अटींची पूर्तता करणाऱ्या औद्योगिक घटकाला लघुउद्योग असे म्हणतात.

यंत्रे आणि उपकरणे यासारख्या स्थिर मालमत्तेमधील स्वतः मालकाने केलेली, भाडेपट्टीने घेतलेली किंवा भाडे कराराने केलेली गुंतवणूक रुपये एक कोटी पेक्षा जास्त असू नये. अर्थातच, हा उद्योग व्यवसाय दुसऱ्या कोणत्याही उद्योग घटकांकडून नियंत्रित केला जाऊ नये किंवा त्यावर त्यांचा मालकी हक्क असू नये.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ नुसार (MSMED ACT - 2006 - Micro, Small & Medium Enterprises Development Act - 2006)

व्यवसाय दोन प्रकारात विभागले जातात.

१) उत्पादक क्षेत्र २) सेवा क्षेत्र.

MSMED कायद्यानुसार गुंतवणुकीचे निकष

| व्यवसाय | उत्पादन क्षेत्र | सेवा क्षेत्र |
|---|---|---|
| सूक्ष्म | ₹. २५ लाखांपेक्षा जास्त नाही | ₹. १० लाखांपेक्षा जास्त नाही |
| लघु | ₹.२५ लाखांपेक्षा जास्त पण ₹.५ कोटीपेक्षा जास्त नाही | ₹.१० लाखांपेक्षा जास्त पण ₹.२ कोटीपेक्षा जास्त नाही |
| मध्यम | ₹.५ कोटीपेक्षा जास्त पण ₹.१० कोटीपेक्षा जास्त नाही | ₹.२ कोटीपेक्षा जास्त पण ₹.५ कोटीपेक्षा जास्त नाही |

**लघु उद्योग क्षेत्र**

| **अ) पारंपारिक लघुउद्योग** | **ब) आधुनिक लघुउद्योग** |
|---|---|
| १) हातमाग | १) सायकलचे भाग |
| २) हस्तकौशल्य | २) शिलाई यंत्र |
| ३) काथ्यापासून वस्तू बनविणारे उद्योग | ३) ब्लेडस्, रेझर्स |
| ४) रेशीम उद्योग | ४) इलेक्ट्रीक वस्तू |
| ५) खादी व ग्रामीण उद्योग | ५) सुटे भाग |

**३.२ लघुउद्योगाचे महत्त्व :** अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये लघुउद्योगाची भूमिका महत्वाची असते. कृषी आणि कृषी-पूरक उद्योगांना ते संजीवनी देतात.

**१) रोजगाराची संधी –**

रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबाबत लघुउद्योग हा द्वितीय स्थानावर आहे. कारण हा व्यवसाय अल्प भांडवलावर चालतो. लघुउद्योग हा मुलभूत व उपयुक्त कौशल्यावर चालतो. त्यामुळे भारतासारख्या श्रमप्रधान देशाला ते एक वरदान आहे.

**२) प्रादेशिक समतोल –**

भारतामध्ये सर्वच विभागांमध्ये समान विकास झालेला नाही. औद्योगिकरणांमुळे कांही विभाग खूपच विकसित झाले असून कांही विभाग मात्र उद्योग धंद्यांअभावी अविकसित राहिले आहेत. अल्प भांडवलावर लघुउद्योगांची उभारणी केली जाते. लघुउद्योग हे सामान्य तंत्रज्ञान, स्थानिक उपलब्ध संसाधने आणि श्रम यांचा वापर करून वस्तूंची निर्मिती करतात. त्यामुळे देशाच्या समतोल विकासामध्ये ते महत्त्वाचे योगदान देतात.

**३) स्पर्धाशक्ती वाढते :**

कमी उत्पादन खर्चाचे अनेक फायदे लघुउद्योगांना मिळतात. हे उद्योग कमी खर्चिक अशा स्थानिक उपलब्ध संसाधनाचा वापर करतात. लघुउद्योगांची स्थापना करण्याचा व चालविण्याचा खर्च तुलनेने फार कमी असतो. कमी उत्पादन खर्च, इतर कमी खर्च यामुळे वस्तूंची किंमत कमी राहते. उलाढालीत वाढ होऊन स्पर्धाशक्तीत वाढ होते.

**४) नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर :**

लघुउद्योग हे श्रम-प्रधान असतात. स्थानिक भागातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा व कच्च्या मालाचा ते वापर करतात. या नैसर्गिक संसाधनाच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी होतो. त्यांचाच परिणाम म्हणजे स्थानिक उत्पादनाची किंमत वाजवी राहते.

**५) स्थलांतरात घट :**

लघुउद्योग हे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध करतात. लघुउद्योग हा स्वरोजगाराचा आदर्श नमुना आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे होणारे लोकांचे स्थलांतरात घट होते किंवा ते कमी होते.

**६) मोठ्या उद्योगासाठी पूरक :**

जास्तीत जास्त मोठे उद्योग हे लघुउद्योगावर अवलंबून असतात. अनेक लघुउद्योग, मोठ्या उद्योगांना कच्चा माल, अर्ध पक्का मालांचा पुरवठा करतात. उदा. यंत्राचे सुटे भाग.

### ७) नव उद्योजकांचा विकास –

नवीन, तरुण आणि होतकरू उद्योजकांना आकर्षित करण्याची क्षमता लघुउद्योगांकडे असते. तांत्रिक आणि अतांत्रिक कौशल्य क्षमता असणारे उद्योजक या व्यवसायाकडे आकर्षित होतात. तसेच, लहान-लहान प्रमाणावरील व्यवसाय करणे मोठ्या उद्योजकांना शक्य नसते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे सरकारने लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासावर भर दिला पाहिजे. असे झाले तर देशात समप्रमाणात आर्थिक विकास होण्यास मदत होईल.



- **कृती**

तुमच्या भागात उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालावर आधारित असणाऱ्या लघुउद्योगांची माहिती घ्या, अशा लघुउद्योगांवर अवलंबून इतर कोणते उद्योग व व्यवसाय सुरू केले आहेत?

## ३.३ लघुउद्योगाचे फायदे :

देशाच्या आर्थिक विकासामध्ये लघुउद्योगांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. लघुउद्योगाचे फायदे पुढील प्रमाणे –

### १. मोठ्या प्रमाणावर रोजगार :

भारतामध्ये श्रमिकांची विपुलता आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगारांच्या संधी निर्माण करण्याची क्षमता लघुउद्योगांमध्ये आहे. इतर उत्पादनाच्या घटकापेक्षा 'श्रम' या घटकाचा ते अधिक वापर करतात. लघुउद्योगांचा स्थापना कालावधी कमी असतो आणि लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.

### २. अल्प भांडवलावर व्यवसाय :

मोठ्या उद्योगांच्या तुलनेत लघुउद्योगांसाठी फारच कमी भांडवल लागते. उद्योजक मर्यादित भांडवलाच्या साहाय्याने लघुउद्योग सुरू करतात.

### ३. स्थानिक संसाधनाचा विनियोग :

स्थानिक ठिकाणी जी संसाधने उपलब्ध आहेत त्याचा उपयोग उत्पादनासाठी लघुउद्योग करतात. तसेच अल्प प्रमाणावरील बचती ज्या निव्वळ पडून आहेत, त्या सुद्धा वापरात आणता येतात. त्यामुळे भांडवलात वाढ होऊन अर्थव्यवस्थेच्या गुंतवणुकीत वाढ होते.

### ४. औद्योगिक उत्पादनात वाढ :

लघुउद्योग गृहपयोगी वस्तूंबरोबरच औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक घटकांचे उत्पादन करतात. वस्तूंच्या किंमती या कमी असून गरीब वर्गातील लोकांच्या गरजा भागविणाऱ्या असतात. देशाच्या औद्योगिक उत्पादनातील महत्त्वाचा हिस्सा लघु उद्योग उत्पादित करतात.

### ५. निर्यातीमधील योगदान :

औद्योगिक निर्यातीमधील जवळजवळ ४०% वाटा हा लघुउद्योगाच्या उत्पादनाचा आहे. उदा. पायमोजे, लहान मुलांचे कपडे, रत्ने आणि दागदागिने, हस्तकौशल्याच्या वस्तू, काथ्या पासून बनविलेल्या वस्तू, लोकरीचे तयार कपडे, प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ, रासायनिक व रसायने अशासारखे उद्योग, मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक माल यांचा भारतीय निर्यातीमध्ये मोठा वाटा असतो. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या व निर्यात करणाऱ्या उद्योगांनासुद्धा लघुउद्योगांतील माल पूरक ठरतो. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निर्यातीमध्ये त्यांचा वाटा महत्त्वपूर्ण असून बहुमूल्य असे परकीय चलन प्राप्त करतात.

### ६. न्याय्य वाटप :

मोठ्या उद्योगांमुळे उत्पन्नाचे असमतोल वाटप व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते. परंतु, लघु उद्योग संसाधनाचे व संपत्तीचे जास्तीत जास्त न्याय्य वाटप करतात. हे उद्योग श्रमप्रधान असल्यामुळे जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांच्यामध्ये उत्पन्नाची विभागणी केली जाते. यातून आर्थिक व सामाजिक कल्याण साधले जाते.

### ७. विदेशी चलनाची मिळकत :

जगातील विविध देशामध्ये वस्तूंची निर्यात करून बहुमूल्य असे परकीय चलन लघुउद्योगामुळे मिळते. त्याचवेळी त्यांची आयात कमी केल्याने देशातील चलन कमी प्रमाणात बाहेर जाते. लघुउद्योगाच्या स्थापनेसाठी यंत्रा व तंत्रामधील गुंतवणुक मोठ्या उद्योगाच्या तुलनेने कमी असते. त्यामुळेच लघुउद्योजक मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन देशात मिळवून देतात. उदा. तिरुपुर (Tirupur) मधील लघुउद्योग आपल्या देशाच्या कापड निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात व देशाला महत्त्वपूर्ण असे परकिय चलन मिळवून देतात.

### ८. उद्योजकतेतील संधी :

अल्प भांडवलावर लघुउद्योग सुरू करण्याची संधी उद्योजकांना मिळते. मोठ्या उद्योगांशी तुलना करता लघु उद्योगाच्या स्थापनेसाठी भांडवल आणि यंत्रातील आणि तंत्रज्ञानातील गुंतवणूक कमी लागते. त्यामुळे लघुउद्योजक लघु व्यवसाय अगदी सहज सुरू करू शकतात व यशस्वी होऊ शकतात. असंख्य लघुउद्योगाच्या देशाच्या विकासातील योगदानामुळे दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेल्या जपानने एक आर्थिक महासत्ता म्हणून गौरव प्राप्त केला आहे.

### ९. खर्चात बचत :

लघुउद्योग सूक्ष्म उत्पादन पद्धतींचा वापर करतात. त्यामुळे चांगल्या दर्जाच्या व विविध प्रकारच्या वस्तू कमी खर्चामध्ये उत्पादीत करता येतात. कमी उत्पादन खर्चामुळे लघुउद्योग मोठ्या उद्योगाच्या तुलनेत खर्चात बचत करणारे असतात.

### १०. स्थलांतर घट :

ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना जेंव्हा रोजगार मिळत नाही आणि रोजगाराच्या शोधात जेव्हा ते शहराकडे येतात तेंव्हा त्याला स्थलांतर असे म्हणतात. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या स्थलांतरमुळे शहरातील जमीन, पाणी आणि इतर संसाधनावर भार पडतो. परिणामी राहणीमानाचा दर्जा घसरतो. परंतु, लघुउद्योगामुळे शिल्पकार, कारागिर इ. च्या कौशल्याचा व ज्ञानाचा उपयोग केला जातो. लघुउद्योगामुळे वंशपरंपरेने कौशल्य प्राप्त असणाऱ्यांना फायदेशीर रोजगार उपलब्ध करून दिला जातो की ज्यामुळे आर्थिक विकास होण्यास मदत होते. अशाप्रकारे लघुउद्योग स्थलांतर कमी करण्यास मदत करतात.

### ११. कामातील लवचिकता :

हे जास्त लवचीक असतात. बाजारपेठेतील बदलत्या गरजेनुसार (बदलानुसार) हे उद्योग स्वतःला चटकन सावरून घेतात. नवीन संधीचा फायदा घेण्यासाठी सज्ज असतात.



- **कृती**

तुमच्या भागातील लघुउद्योगांना भेट द्या. मालकांशी व कामगारांशी संवाद साधा व चर्चा करा. तुमच्या निरिक्षणावर आधारित सविस्तर अहवाल तयार करा. त्यामध्ये पुढील मुद्दयांचा समावेश असावा. जडणघडण व स्वरूप, विशेष उत्पादन, व्यवसायाचे वार्षिक व भांडवली खर्च, विक्री पद्धत, त्या विशिष्ट उद्योगाच्या समस्या.



- **कृती**

जवळच्या २ ते ३ उद्योगांना भेटी द्या आणि तिथल्या पायाभूत सुविधांच्या स्थितीचे निरीक्षण करा. त्या उद्योगांच्या पायाभूत सुविधांची तुलना करा आणि उत्पादकता व उद्योजकांच्या सुविधा यामध्ये काही संबंध आहे का ते शोधून काढा.

### ३.४ लघु उद्योगासमोरील आव्हाने :

भारतामध्ये लघुउद्योगांना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या कार्यावर होतो. लघुउद्योगासमोर खालील समस्या आहेत.

#### १) उत्पादनाच्या जुन्या पद्धती :

सर्वसाधारणपणे लघुउद्योग उत्पादनासाठी कालबाह्य तंत्रे व जुनाट उत्पादन पद्धतींचा वापर करतात. कमी दर्जाचे तांत्रिक ज्ञान व कौशल्यांच्या वापरामुळे अनेक उद्योगांची उत्पादकता कमी होते.

#### २) भांडवलाची कमतरता :

पुरेसे भांडवल उपलब्ध न होणे ही लघु उद्योगाची महत्त्वाची समस्या मानली जाते. साधारणतः लघु उद्योग हे अल्प भांडवलावर सुरू केले जातात. लघु क्षेत्रातील अनेक उद्योग भांडवल बाजारमधून निधी उभा करतात. या उद्योगांना वारंवार खेळत्या भांडवलाची कमतरता भासते.

#### ३) कच्च्या मालाची समस्या :

कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा ही लघुउद्योगासमोरील आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. यामुळेच लघुउद्योगांना कच्च्या मालाच्या दर्जाबाबत तडजोड करावी लागते किंवा दर्जेदार मालासाठी अधिक किंमत मोजावी लागते.

#### ४) कामगार समस्या :

बहुतांशी बऱ्याच लघुउद्योगांकडून अल्प मजुरीवर अकुशल व मध्यम कुशल कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. त्यामुळे कामगारांची कमी कार्यक्षमता, गैरहजेरीचे प्रमाण अधिक, कामाची संतुष्टता कमी या सारख्या समस्या निर्माण होतात. व्यवसायाच्या आर्थिक मर्यादेमुळे मजुरीचे प्रमाण कमी राहते. परिणामी कर्मचारी असंतुष्ट होऊन गैरहजर राहतात किंवा काम सोडून जातात. थोडक्यात, कामाच्या ठिकाणी परीस्थिती, अल्प मजुरी, योग्य नियम व कायद्याची कमतरता, मालकांची लहरी निर्णय प्रक्रिया, अयोग्य वेळा, नोकरीच्या शाश्वतीची हमी नसणे इ. कारणांमुळे तज्ज्ञ, हुशार कामगार या लघुउद्योगांकडे आकर्षित होत नाहीत.

#### ५) विपणन विषयक समस्या :

उत्पन्न मिळविण्याचे साधन असल्याने विपणन हे महत्त्वाचे मानले जाते. वस्तुंच्या प्रभावी विपणनासाठी ग्राहकांच्या गरजा व आवश्यकतांची पुरेपूर माहिती असली पाहिजे. बहुतांशी लघुउद्योग हे विपणनाबाबत कमकुवत असतात. म्हणून बरेच लघु उद्योग व्यवसायिक मध्यस्थांवर अवलंबून असतात. ज्यांच्याकडून कमी किंमत, उशिरा पैसे देऊन पिळवणूक केली जाते. पायाभूत सुविधांच्या अभावामुळे लघुव्यावसायिकांना प्रत्यक्ष विपणन अशक्यप्राय असते.

#### ६) वाहतुक समस्या :

लघुउद्योगांना वाहतुकीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांना वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. उदा. कारखान्यापर्यंत कच्च्या मालाची वाहतुक करणे, कारखान्यापासून बाजारापर्यंत पक्का माल वाहून नेणे,

वाहतुकीच्या साधनांच्या कमतरतेमुळे कच्चा माल बाजारातून कारखान्यापर्यंत पोहचविणे आणि उत्पादित माल बाजारापर्यंत पोहचविणे कष्टप्रद ठरते.

### ७) आजारी उद्योग :

लघुउद्योगांचे आजारपण ही धोरणकर्ते व उद्योजक या दोघांच्याही दृष्टीने चिंतेची बाब आहे. अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही कारणांचा या उद्योगाच्या आजारपणात समावेश होतो. अंतर्गत समस्येमध्ये अकुशल कामगार, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, व्यवस्थापकीय व विपणन कौशल्यांचा अभाव यांचा समावेश होतो. बाह्य समस्येमध्ये उशिरा होणारी वसुली, खेळत्या भांडवलाची कमतरता, अपुरा कर्जपुरवठा आणि उत्पादनास योग्य मागणीचा अभाव यांचा समावेश होतो.

### ८) इंधनाची कमतरता व अपुरा पुरवठा :

जादा दराने होणारा वीज पुरवठा, वीज कपात, वारंवार होणारा खंडित विद्युत पुरवठा, अनियमित वीज पुरवठा, कमी-अधिक दाबाने वीज पुरवठा, वाढते वीजेचे दर यामुळे उत्पादकतेवर विपरित परिणाम होतो. परिणामी, लघु व्यवसायांच्या कार्यपध्दतीवर व नियमित उत्पादनावर परिणाम होतो.

### ९) वैश्विक स्पर्धा :

लघुउद्योगांच्या वर नमुद केलेल्या समस्येबरोबरच, विविध देशांनी अंगिकारलेल्या (स्वीकारलेल्या) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यातून निर्माण झालेल्या समस्यांना सामोरे जावे लागते. वरील धोरण जगातील अनेक देशांनी स्वीकारले आहे.

## ३.५ लघुउद्योगांच्या उभारणीचे टप्पे :

मोठ्या उद्योगांच्या तुलनेने लघुउद्योग अधिकाधिक स्वातंत्र्य देतात आणि ज्यांना उद्योजक बनायचे आहे, त्यांचे स्वप्न पूर्ण करतात (मोठ्या व्यवसायासाठी/उद्योगासाठी विस्तृत नियोजनाची गरज असते). खाली दिलेल्या सामान्य टप्प्यांच्या आधारे कोणीही सहज लघुउद्योग सुरू करू शकतो.

### १) उद्योग किंवा व्यवसायाची निवड :

जो लघुउद्योग सुरू करावयाचा आहे प्रथम त्याचा आराखडा तयार करावा लागतो. त्यासाठी तुम्हाला प्रमंडळ, व्यक्तीगत व्यवसाय किंवा भागीदारीपैकी कोणता व्यवसाय सुरू करावयाचा आहे त्याचा निर्णय घ्यावा लागतो. संभाव्य उद्योजक, उद्योजकीय कारकीर्द सुरू करण्याअगोदर आपली बलस्थाने, कमजोरी (दुर्बलता) यांचे विश्लेषण करतो. या विश्लेषणाचा उपयोग व्यवसायाचा आकार व प्रकार निश्चित करण्यासाठी होतो.

### २) व्यावसायिक पर्यावरणाची पाहणी :

उद्योग सुरू करण्याअगोदर व्यावसायिक पर्यावरणाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. व्यावसायिक पर्यावरणामध्ये औद्योगिक धोरण, आर्थिक धोरण, परवाना धोरण, कायदेशीर पर्यावरण व तांत्रिक पर्यावरण यांचा अभ्यास आवश्यक आहे. उद्योगाच्या स्थापनेवर पर्यावरणाचा फार मोठा प्रभाव पडतो.

### ३) उत्पादनाची निवड :

उद्योजकाला कोणत्या वस्तूचे उत्पादन करावयाचे आहे किंवा कोणती सेवा प्रदान करावयाची आहे हे प्रथम निश्चित करावे लागते. तयार करण्यात येणारे उत्पादन किंवा पुरविण्यात येणारी सेवा देण्यापूर्वी बाजारपेठेचे संशोधन करून स्पर्धकांविषयी माहिती घेणे आवश्यक आहे.

### ४) जागेची निवड :

लघुउद्योग सुरू करण्यापूर्वी उद्योगाच्या/व्यवसायाच्या जागेची निवड केली पाहिजे. अशा जागेची निवड करताना बाजारपेठेची उपलब्धता, कच्च्या मालाची उपलब्धता, वाहतुकीच्या सुविधा, आधुनिक पायाभूत सोईसुविधा आणि संबधित इतर घटकांचा विचार केला पाहिजे. व्यवसायाचे यश किंवा अपयश हे व्यवसायाच्या स्थान निश्चितीवरच अवलंबून असते.

### ५) तंत्रज्ञानाची निवड :

उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यासाठी उद्योजकाने उपलब्ध तंत्राची माहीती घेऊन सर्वोत्कृष्ट तंत्राची निवड केली पाहिजे.

### ६) प्रकल्प तयार करणे :

प्रकल्पाची किंमत ठरविणे म्हणजेच प्रकल्पाचे मुल्यमापन करणे होय. प्रकल्प तयार करणे हे एक कौशल्य आहे. प्रकल्प तयार केल्यानंतर व्यवसायाची उभारणी करणे सोपे जाते. उद्योजकाला आर्थिक, तांत्रिक, बाजारपेठ, सामाजिक आणि व्यवस्थापकीय दृष्ट्या प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे.

### ७) अर्थपुरवठा :

व्यवसायाची रक्तवाहिनी म्हणजेच अर्थपुरवठा होय. त्यामुळे भांडवलाची व्यवस्था करणे सर्वात महत्त्वाची पायरी आहे. शून्य भांडवलावर कोणताही व्यवसाय उभा राहू शकत नाही. आपल्याकडे पुरेशी आर्थिक तरतूद नसेल तर उसनवार पैसे घेणे किंवा कर्ज उभारणे हाच सर्वोत्तम पर्याय आहे.

### ८) नोंदणी :

सरकारकडे उद्योगाची नोंदणी वेळेत करणे नेहमीच फायद्याचे असते. उद्योजकाने अधिकृत नमुन्यातील अर्ज जिल्हा उद्योग केंद्राकडे किंवा उद्योगीय संचालकाकडून प्राप्त केला पाहिजे. व्यवस्थितपणे भरलेला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह जिल्हा उद्योग केंद्राकडे किंवा उद्योगीय संचालकाकडे जमा करणे आवश्यक आहे.

### ९) संसाधने व्यवस्था :

लघुउद्योगाची नोंदणी झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्पादन ही पुढील पायरी आहे.

#### अ) भौतिक संसाधने :

भौतिक संसाधनांमध्ये जागा वाटप आणि उत्पादक पद्धतीचा समावेश होतो. विविध विभागांसाठी आवश्यक यंत्रसाम्रगी खरेदी आणि कामगारांची भरती देखील आवश्यक बाब आहे.

#### ब) वीज आणि पाणीपुरवठा व्यवस्था :

ज्या जागेवर व्यवसायाची उभारणी केली जाते तेथे विजेची योग्य ती व्यवस्था करावी. उद्योजकाने आवश्यक त्या एकूण वीजेचा अंदाज करावा. जवळच्या वीजेच्या खांबावरून वीज पुरवठा होईल अशी व्यवस्था करावी. जेणेकरून वीज जोडणी खर्च कमी राहील.

#### क) कर्मचारी भरती :

यंत्रे बसविल्यानंतर ती चालविण्यासाठी मनुष्यबळाची गरज निर्माण होते. त्यानंतर कोणत्या कामासाठी कोणत्या प्रकारच्या कर्मचाऱ्याची गरज आहे हे ठरवावे. कर्मचाऱ्याची उपलब्धता असण्याचे मार्गही महत्त्वाचे आहेत. त्यानंतर भरती, प्रशिक्षण व निवड पद्धतीचा वापर करावा.

### १०) उत्पादन आणि विपणन :

उद्योजकीय विकासाचा विचार केल्यास विपणन हे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. विपणन व जाहिरात या लघुउद्योगाच्या उभारणीतील फार महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. जाहिरातीसाठी आधुनिक, तांत्रिक प्रणाली व पारंपारिक मार्गाचा उपयोग करावा. जाहिरातीमुळे उत्पादनाला बाजारपेठ मिळते.

### ११) पाठपुरावा :

व्यवसाय नितीप्रमाणे उत्पादन, दर्जा, नफा प्रदानता इ. संदर्भात नियमित नियंत्रण आणि मूल्यमापन फायदेशीर ठरते. याबरोबरच व्यवसायाच्या भविष्यकालीन विकासाची दिशा ठरविणे सोपे जाते.

सारांश रूपाने, लघुउद्योगाची स्थापना करणे कठीण नसून मोठ्या उद्योगांच्या तुलनेने सुलभ आहे. लघुउद्योग राष्ट्राच्या आर्थिक विकासात मदत करतात.

- **कृती**



जिथे कृषी आधारित उत्पादन विकले जाते त्या स्थानिक बाजारात जा. कांही उत्पादनांची यादी तयार करा आणि पुढील मुद्दयाच्या आधारे विक्रेत्याला काही प्रश्न विचारा व चर्चा करा.

अ) त्यांनी या वस्तू कोठून खरेदी केल्या? (घरी तयार करण्यात आले किंवा नाही)

ब) कच्चा माल व वाहतुकीची समस्या कोणत्या आहेत?

क) सध्याच्या नफ्याच्या प्रमाणाबद्दल ते समाधानी आहेत का?

ड) सरकारकडून व स्थानिक बाजारपेठेकडून कोणत्या अपेक्षा आहेत?

- **कृती**



तुमच्या गावातील व्यवसायाच्या सभोवतालच्या परिस्थितीची माहिती द्या व चर्चा करा.

तेथे कोणता उद्योग सुरू करणे चांगले ठरू शकते? या प्रकरणात अभ्यास केलेल्या मुद्दयानुसार, तपशीलवार सर्वेक्षण करा आणि तुमच्या मताला दुजोरा द्या.

## सारांश :

### प्रस्तावना :

- **अर्थ व व्याख्या :**

भारतातील ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यामध्ये लघुउद्योग महत्त्वाची भूमिका पार पाडतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये उद्भवणारी बेकारीची समस्या बहुतांशी प्रमाणात लघुउद्योग सोडवितात.

थोडक्यात, लघुउद्योग हे श्रमप्रधान असतात. त्याना अल्प भांडवल लागते. ते मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्माण करतात आणि देशाच्या निर्यातीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलतात.

- **लघुउद्योगाचे महत्त्व :**

१. नोकरीची संधी

२. प्रादेशिक समतोल

३. स्पर्धा शक्तीत वाढ

४. नैसर्गिक संसाधनांचा जास्तीत जास्त वापर

५. स्थलांतरात घट

६. मोठ्या उद्योगासाठी पूरक

७. नव उद्योजकांचा विकास

- **लघुउद्योगाचे फायदे :**

१. मोठ्या प्रमाणावर रोजगार

२. अल्प भांडवलावर व्यवसाय

३. स्थानिक संसाधनांचा विनियोग

४. औद्योगिक उत्पादनात वाढ

५. निर्यातीमधील योगदान

६. न्याय्य वाटप

७. विदेशी चलनाची मिळकत

८. उद्योजकतेतील संधी

९. खर्चात बचत

१०. स्थलांतर घट

११. कामातील लवचीकता

- **लघुउद्योगासमोरील आव्हाने :**

१. उत्पादनाच्या जुन्या पद्धती

२. भांडवलाची कमतरता

३. कच्च्या मालाची समस्या

४. कामगार समस्या

५. विपणन विषयक समस्या

६. वाहतूक समस्या

७. आजारी उद्योग

८. इंधनाची कमतरता व अपुरा पुरवठा

९. वैश्विक स्पर्धा

- **लघुउद्योगाच्या उभारणीतील टप्पे :**

१. उद्योग किंवा व्यवसायाची निवड

२. व्यावसायिक पर्यावरणाची पाहणी

३. उत्पादनाची निवड

४. जागेची निवड

५. तंत्रज्ञानाची निवड

६. प्रकल्प तयार करणे

७. अर्थपुरवठा

८. नोंदणी करणे

९. संसाधने व्यवस्था

  अ) भौतिक संसाधने

  ब) वीज व पाणीपुरवठा व्यवस्था

  क) कर्मचारी भरती

१०. उत्पादन आणि विपणन

११. पाठपुरावा

## सूची

**सूची :**


१) NCERT ११वी कॉमर्स व्यावसायिक अभ्यास

२) व्यावसायिक उद्योजकता - डॉ.जयंत जोशी, पिंपळपुरे अॅन्ड कंपनी, पब्लिशर्स्

३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ - पुणे (११ वी कॉमर्स)

४) www.sadanet/adls/microfinance

५) Business Map of India.com

६) www.mced.nic.in

७) udyojakanagazine@gmail.com

८) https//hing inleaders inprocedure-starting


**रोजगार संधी :**

१) लघुउद्योजक

२) कृषी उद्योजक

३) दुग्धव्यवसाय उद्योजक

४) छोटा अभियांत्रिकी उद्योग

५) चर्मोद्योग

६) लघुकापड व्यावसायिक

७) औषध निर्मिती उद्योग



## स्वाध्याय

**प्र.१ ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. भारतामध्ये .......... समस्या हा ज्वलंत प्रश्न आहे.

अ) रोजगार  ब) बेकारी  क) प्रदूषण

२. भारत हा...........प्रधान देश आहे.

अ) मनुष्यबळ  ब) अर्थ  क) सामग्री

३ ...........दराने होणारा वीज पुरवठा, वीज कपात, खंडित वीज पुरवठा यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो.

अ) जादा  ब) कमी  क) सरासरी

४. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी, ............. पर्यावरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अ) व्यावसायिक ब) नैसर्गिक क) राजकीय

५. लघुउद्योग हे .......... प्रधान असतात.

अ) अर्थ ब) शक्ती क) मनुष्यबळ

६. व्यवसाय सुरू करण्याची कल्पना उदयोजकाच्या मनात येणे ही व्यवसाय सुरू करण्याची.......... पायरी आहे.

अ) प्रथम ब) द्वितीय क) तृतीय

७. देशाच्या औदयोगिक निर्यातीमध्ये लघुउद्योगाचा वाटा ............ असतो.

अ) ४०% ब) ६०% क) २०%

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) सूक्ष्म उत्पादन क्षेत्र | १) हातमाग |
| ब) पारंपारिक लघुउद्योग | २) अकुशल किंवा कुशल |
| क) नोंदणी | ३) रु.२५लाख पेक्षा जास्त नाही |
| ड) मनुष्यबळ | ४) ४०% निर्यात |
| इ) सायकल | ५) रु.१ लाख पेक्षा जास्त नाही |
| | ६) जिल्हा उद्योग केंद्र |
| | ७) विपणन समस्या |
| | ८) आधुनिक लघुउद्योग |
| | ९) प्रकल्प मूल्यांकन |
| | १०) खर्च कार्यक्षमता. |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असणारे क्षेत्र

२. विजेचा वापर परंतु ५० पेक्षा कमी कर्मचारी असणारा उद्योग

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१. देशाच्या अर्थव्यवस्थेचा आर्थिक समतोल राखण्यासाठी लघुउद्योगांचा विकास झाला पाहिजे.

२. बहुतांशी लघुउद्योग हे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करतात.

३. लघुउद्योगांना अल्प व्याज दराने सहजपणे कर्ज उपलब्ध होते.

४. स्पर्धेमध्ये लघुउद्योग टिकू शकत नाही.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) काथ्या, सुटे भाग, हातमाग, उद्योग हस्तकला

२) सायकलचे सुटे भाग, रेशीमउद्योग, विद्युत उपकरणे, शिलाई यंत्र

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ................ उद्योग हे देशाच्या विकासाला हातभार लावतात.

२) लघु उद्योग ................ क्रमांकाची सगळयात मोठी रोजगार निर्मिती करणारी संस्था आहे.

३) लघु-उद्योगांना वस्तूंच्या...........उत्पादन किमतींचा फायदा होतो.

४) लघु-उद्योग हे ............... प्रधान असतात.

५) लघु-उद्योगांना, मोठ्या उद्योगांपेक्षा ............. भांडवल लागते.

६) लघुउद्योग घरगुती उत्पादने तसेच .............. उत्पादने बनवितात.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) ₹.२५लाखापेक्षा जास्त पण ₹.५कोटींपेक्षा जास्त नाही | |
| २) | ₹.२५लाखांपेक्षा जास्त नाही. |
| ३) ₹.५ कोटींपेक्षा जास्त पण ₹.१० कोटींपेक्षा जास्त नाही | |
| ४) | ₹.१० लाखांपेक्षा जास्त नाही |
| ५) ₹.१०लाखांपेक्षा जास्त पण ₹.२ कोटींपेक्षा जास्त नाही. | |

(लघु उत्पादन क्षेत्र, सूक्ष्म उत्पादन क्षेत्र, सूक्ष्म सेवा क्षेत्र, मध्यम उत्पादन क्षेत्र, लघु सेवा क्षेत्र,)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योग म्हणजे काय?

२. पारंपारिक लघुउद्योगाची उदाहरणे द्या.

३. आधुनिक लघुउद्योगाची उदाहरणे द्या.

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१. भारतात **रोजगाराची** समस्या अधिक गंभीर बनली आहे.

२. भारत हा **साधन** प्रधान देश आहे.

३. लघुउद्योग **आधुनिक** तंत्रज्ञान वापरतात.

४. लघुउद्योग **अधिक** भांडवलाने सुरू केले जातात.

५. **व्यवसाय प्रकल्प** ही लघुउद्योग स्थापन करण्याची पहिली पायरी आहे.

**ज) योग्य क्रम लावा.**

अ. जागेची निवड

ब. उत्पादनाची निवड

क. व्यवसाय प्रकल्प

ड. तंत्रज्ञानाची निवड.

**प्र.२ रा संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१. लघुउद्योग २. सेवा क्षेत्र ३. अतिलघु / सूक्ष्म व्यवसाय

४. पारंपारिक लघुउद्योग क्षेत्र ५. आधुनिक लघुउद्योग क्षेत्र

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

**१. श्री. राम यांना सायकलींसाठीचे भाग बनविण्याचा लघुउद्योग सुरू करावयाचा आहे.**

१. लघुउद्योग स्थापनेतली पहिली पायरी कोणती आहे?

२. श्री.राम ज्या क्षेत्रात व्यवसाय करू इच्छित आहेत ते क्षेत्र ओळखा.

३. लघुउद्योगाचा कोणताही एक फायदा सांगा.

**प्र.४ था खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योगांचे कोणतेही चार महत्त्व स्पष्ट करा.

२. लघुउद्योगांचे कोणतेही चार फायदे स्पष्ट करा.

३. लघुउद्योगांसमोरील कोणतीही चार आव्हाने स्पष्ट करा.

**प्र.५ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सर्वसाधारणपणे लघुउद्योग हे आजारी असतात.

२. लघुउद्योगासाठी अल्प भांडवल लागते.

३. लघुउद्योगांना समस्यांना सामोरे जावे लागते.

**प्र.६ वा खालील प्रश्न सोडवा.**

१. लघुउद्योगाचा अर्थ स्पष्ट करा.

२. लघुउद्योगाचे महत्त्व विषद करा.

३. भांडवलाच्या कमतरतेचा लघुउद्योगावर होणारा परिणाम थोडक्यात स्पष्ट करा.

४. लघुउद्योगांना भेडसावणाऱ्या कोणत्याही पाच समस्या सांगा.

५. रोजगार निर्मितीमध्ये लघुउद्योगाची भूमिका स्पष्ट करा.

**प्र.७ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. लघुउद्योगांसमोरील आव्हाने स्पष्ट करा.

२. लघुउद्योगांचे फायदे स्पष्ट करा.

३. लघुउद्योगांच्या स्थापनेची प्रक्रिया स्पष्ट करा.

४. लघुउद्योगांचे महत्त्व स्पष्ट करा.

५. भांडवलाचा व कच्च्या मालाचा अभाव हे लघुउद्योगांच्या अल्प आजाराचे कारण आहे हे स्पष्ट करा.

# ४ व्यवसाय संघटनांचे प्रकार – भाग १

**४.१ खाजगी क्षेत्र**
- ४.१.१ प्रस्तावना
- ४.१.२ अर्थ

**४.२ एकल व्यापारी संघटना**
- ४.२.१ प्रस्तावना
- ४.२.२ अर्थ
- ४.२.३ व्याख्या
- ४.२.४ वैशिष्ट्ये
- ४.२.५ गुण
- ४.२.६ दोष

**४.३ भागीदारी संस्था**
- ४.३.१ प्रस्तावना
- ४.३.२ अर्थ
- ४.३.३ व्याख्या
- ४.३.४ वैशिष्ट्ये
- ४.३.५ गुण
- ४.३.६ दोष
- ४.३.७ भागीदारांचे प्रकार
- ४.३.८ भागीदारीचे प्रकार

**४.४ एकत्र हिंदू–कुटुंब पद्धती व्यवसाय**
- ४.४.१ प्रस्तावना
- ४.४.२ अर्थ
- ४.४.३ व्याख्या
- ४.४.४ वैशिष्ट्ये
- ४.४.५ गुण
- ४.४.६ दोष

**४.५ सहकारी संस्था**
- ४.५.१ प्रस्तावना
- ४.५.२ अर्थ
- ४.५.३ व्याख्या
- ४.५.४ वैशिष्ट्ये
- ४.५.५ गुण
- ४.५.६ दोष
- ४.५.७ सहकारी संस्थांचे प्रकार

**४.६ संयुक्त भांडवली संस्था**
- ४.६.१ प्रस्तावना
- ४.६.२ अर्थ
- ४.६.३ व्याख्या
- ४.६.४ वैशिष्ट्ये
- ४.६.५ गुण
- ४.६.६ दोष
- ४.६.७ संयुक्त भांडवली संस्थेचे प्रकार

- **फरक**
- **सारांश**
- **स्वाध्याय**

तन्वी, गायत्री, यश आणि ओंकार ही चुलत भावंड आहेत. यंदा दिवाळीच्या सुट्टीत ते पुण्याला आपल्या काकांच्या घरी रहायला आले. एके दिवशी ते काका–काकू बरोबर प्रसिद्ध बाजारपेठेत फेरफटका मारायला गेले.

**तन्वी** : आपण इथल्या दुकानांच्या पाट्या वाचूया का?

**यश** : अरे वा ! छान कल्पना आहे. मी पहिल्यांदा वाचणार " **विजय खेळणी दुकान**" प्रोप्रा–देशपांडे काका, प्रोप्रा म्हणजे काय?

**काका** : प्रोप्रा म्हणजेच प्रोप्रायटर. त्याचाच अर्थ **मालक**

**गायत्री** : **सचिन आणि नितीन फर्मस्.**

काका, या दुकानाच्या पाटीवर प्रोप्रा असे का लिहिलेले नाही?

**काका** : प्रोप्रा असे लिहिले नाही, कारण ही भागीदारी संस्था आहे.

**यश** : काका अशा व्यवसायात काय फरक आहे?

**काका** : भांडवल, मालकीहक्क आणि इतर घटकांवर हा फरक अवलंबून आहे.

चला तर व्यवसाय संघटनांचे विविध प्रकार अभ्यासूया.

### ४.१ खाजगी क्षेत्र :

#### ४.१.१ प्रस्तावना :

खाजगी क्षेत्रामध्ये सर्व प्रकारच्या वैयक्तिक किंवा कंपनी व्यवसायाचा समावेश होतो. खाजगी क्षेत्रातील व्यवसाय हे खाजगी व्यक्तींच्या मालकीचे असून त्यांच्याकडूनच चालविले जातात. खाजगी क्षेत्रातील व्यवसायांची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे खाजगी पुढाकार, नफा प्रेरित व्यवसाय आणि व्यवस्थापन व मालकी हक्क हे खाजगी व्यक्तींच्या हाती असते. खाजगी क्षेत्रातील कंपन्यांची मालकी ही सभासदांकडे असते तर व्यवस्थापन हे व्यावसायिक व्यवस्थापकांकडे असते. व्यावसायिक व्यवस्थापक हे फक्त नफ्याने प्रेरित होऊन काम न करता व्यवसायाचा विस्तार, दृढीकरण, सामाजिक जागृती, सामाजिक जबाबदारी व सामाजिक कल्याण इ. घटकांवर सुद्धा लक्ष केंद्रित करतात.

**४.१.२ अर्थ –** खाजगी क्षेत्र म्हणजे अर्थव्यवस्थेतील असे एक क्षेत्र की, जे नफा मिळविण्यासाठी व्यक्तीकडून किंवा व्यक्तींच्या समूहाकडून चालविले जाते.

खाजगी क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा एक भाग असून नागरिकांचे क्षेत्र असे संबोधले जाते. सर्वसाधारणपणे खाजगी क्षेत्राचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

**खाजगी क्षेत्र**

- (१) एकल व्यापारी
- (२) भागीदारी संस्था
- (३) एकत्र हिंदू कुटुंब व्यवसाय
- (४) सहकारी संस्था
- (५) कंपनी

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे भारतातील माहिती तंत्रज्ञान कंपन्या, खाजगी बँका, आर्थिक सेवा देणाऱ्या कंपन्यांच्या विकासावरून दिसून येते.

भारतीय उत्पादक उद्योग खाजगी कंपन्यांमुळे बहरात आला आणि त्यांचाच दबदबा निर्माण झाला आहे. उत्पादक कंपन्यांनी वाहन निर्मिती, रासायनिक उद्योग, कापड व्यवसाय, कृषी-खाद्य पदार्थ निर्मिती, कॉम्प्युटर हार्डवेअर, दूरसंचार, दळणवळणासाठीची उपकरणे, खनिज तेल उत्पादने इ. क्षेत्रे काबीज केली आहेत व विकासाचे हेच महत्त्वाचे घटक आहेत.



● **कृती** **खालील कंपन्या कोणत्या क्षेत्रात काम करतात?**

- आदित्य बिर्ला ग्रुप.
- रिलायन्स उद्योग समूह
- टाटा उद्योग समूह



● **कृती**

- दूरदर्शनवरील तुमच्या आवडीच्या जाहिरातींची यादी तयार करा.
- वरील यादीमधील उत्पादकांची नावे किंवा व्यवसायांची नावे लिहा.
- व्यवसायांचे स्रोत ओळखा.

## ४.२ एकल व्यापारी संघटना :

**४.२.१ प्रस्तावना –** वाणिज्याच्या इतिहासात व विकासामध्ये व्यवसाय संघटनांचे अनेक प्रकार आहेत. त्याची सुरुवात एकल व्यापारी व्यवसायापासून होते. हा व्यवसाय संघटनेतील सर्वात जुना व साधा प्रकार आहे.

शब्दश: मालकत्व म्हणजे मालक आणि 'एकल' म्हणजे एकटा होय. या व्यवसायाच्या नावावरूनच, व्यवसायाचा मालक एकच असल्याचे अभिप्रेत होते. एकल व्यापारी हा व्यवसायाचा स्वतंत्र मालक असतो. व्यवसायाबाबतचे सर्वच अधिकार त्याच्याकडे असून सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या त्यालाच पार पाडाव्या लागतात. नफा आणि तोटा त्यालाच मिळतो. उदा. किराणा मालाचे दुकान, सौंदर्य प्रसाधनगृह (ब्युटी पार्लर), भेट वस्तूंचे दुकान इ.

**४.२.२ अर्थ –** या व्यवसाय प्रकारामध्ये व्यक्ती स्वत:चे भांडवल गुंतविते, स्वत:चे कौशल्य वापरते व व्यवसायासंबधीची सर्व कार्ये पार पाडते. नफ्याचा आनंद घेतो व होणारा तोटा सुद्धा सहन करतो. हा व्यवसाय संघटन प्रकार दुकानदारी, एकल व्यापारी, व्यक्तिगत उद्योजकता किंवा दुकानदारी संस्था म्हणून ओळखला जातो. एकल व्यापारी हा स्वयंरोजगारीचा उत्कृष्ट नमुना आहे.

**४.२.३. व्याख्या :**

१. प्रा. जे. एल. हॅन्सन यांच्या मते, 'जेव्हा एखादी व्यक्ती व्यवसायाकरिता आवश्यक असणारे भांडवल स्वत: उभारते आणि तो व्यवसाय स्वत:च्या जबाबदारीवर स्वत: चालविते, व्यवसायातील नफ्या-तोट्याला स्वत:च जबाबदार राहते, तेंव्हा त्यास व्यक्तिगत व्यापारी किंवा 'एकल व्यापारी' असे म्हणतात.'

२. प्रा. जेम्स् लुंडी यांच्या मते. 'एखाद्या व्यापाऱ्याने स्थापन केलेला एखादा अनौपचारिक व्यवसाय म्हणजे व्यक्तिगत व्यापार होय.'

**४.२.४. वैशिष्ट्ये :**

१. **व्यक्तिगत मालकी –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेवर एकाच व्यक्तीची मालकी असते. व्यवसायासाठी आवश्यक असणारे भांडवल तो स्वत: गुंतवितो. व्यवसायातील सर्व मालमत्तेवर त्याची मालकी असते. व्यवसायातील सर्व देणी देण्यासाठी त्यालाच जबाबदार धरले जाते.

२. **नफ्यात किंवा धोक्याच्या जबाबदारीत वाटेकरी नाही. –** एकल व्यापारी हा व्यवसायाचा एकटाच मालक असतो. व्यवसायातील नफ्यात किंवा तोट्यात दुसरा कोणी भागीदार नसतो. व्यवसायातील सर्व नफा

त्याला एकट्यालाच मिळतो व धोका एकट्यालाच सहन करावा लागतो.

३. **स्वयंरोजगार –** एकल व्यापारी व्यवसाय हा स्वयंरोजगाराचा आदर्श नमुना आहे. सामाजिक दृष्टीने त्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कोणीही बेरोजगार व्यक्ती अल्प भांडवलावर व्यवसाय सुरू करून स्वत:चा उदरनिर्वाह करू शकते. स्वत:चा व्यवसाय सुरू करून उत्पन्नाचा मार्ग शोधू शकते.

४. **स्थानिक बाजारपेठ कार्य –** मोठ्या उद्योगासाठी प्रचंड प्रमाणावर भांडवल व आधुनिक व्यवस्थापकीय कौशल्याची गरज असते. एकल व्यापाऱ्याकडे मर्यादित भांडवल व मर्यादित व्यवस्थापकीय कौशल्य असते. म्हणूनच तो स्थानिक बाजारपेठेत कार्य करतो.

५. **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वाचा अभाव –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नसते. कायदेशीरदृष्ट्या एकल व्यापारी आणि त्याचा व्यवसाय एक मानला जातो.

६. **कमीत कमी सरकारी नियमन –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेच्या कार्याचे नियमन करण्यासाठी कोणताही स्वतंत्र कायदा व नियम नाही. व्यवसायाच्या स्थापनेसाठी काटेकोर व कठोर अशी कायदेशीर प्रक्रिया नसते. फक्त करकायदा व कामगारकायदा याचे पालन करावे लागते.

७. **अमर्यादित जबाबदारी –** एकल व्यापाऱ्याची व्यवसायातील जबाबदारी ही अमर्यादित स्वरूपाची आहे. अमर्यादित जबाबदारी म्हणजे त्याची खाजगी मालमत्ता व व्यवसायाची मालमत्ता यात कोणतीही फारकत केली जात नाही. म्हणजेच व्यवसायाची देणी भागविण्यासाठी व्यवसायाची मालमत्ता कमी पडल्यास त्याच्या खाजगी मालमत्तेचा वापर केला जातो.

● **कृती – १**



- तुमच्या घराजवळ असणाऱ्या दुकानाला भेट द्या.
- तुमच्या भागात एकल व्यापारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींची नावे शोधा.
- पाठ्यपुस्तकाच्या आधारे एकल व्यापारी व्यवसायाच्या वैशिष्ट्यांची माहिती जाणून घ्या.

### ४.२.५ फायदे :

१. **सुलभ स्थापना –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेची स्थापना करणे सहज व सुलभ असते. व्यवसाय स्थापनेसाठी कमीत कमी कायदेशीर बाबींची पूर्तता करावी लागते.

२. **त्वरित निर्णय –** एकल व्यापारी व्यावसायिक निर्णय त्वरित घेतो. तो निर्णय घेताना एखाद्याशी सल्ला-मसलत करतो किंवा करतही नाही. एकल व्यापाऱ्याला कोणाला उत्तर किंवा स्पष्टीकरण द्यावे लागत नाही. बरेचवेळा त्वरित घेतलेले निर्णय व्यवसायासाठी फायदेशीर सिद्ध होतात. एकल व्यापारी त्वरित निर्णय घेऊन प्रचंड प्रमाणावर फायदे मिळवू शकतो.

३. **जास्तीत जास्त गुप्तता –** एकल व्यापारी हा त्याच्या व्यवसायाचा मालक व व्यवस्थापक (सर्वेसर्वा) असतो. त्यामुळे आपल्या व्यवसायाची गुपिते व योजना त्रयस्थासमोर उघड करावी लागत नाहीत. तसेच एकल व्यापारी व्यवसाय संघटनेला आपली हिशेबपत्रके प्रकाशित करावी लागत नाहीत. त्यामुळे जास्तीत जास्त गुप्तता पाळली जाते.

४. **प्रत्यक्ष प्रेरणा –** एकल व्यापारी हा त्याच्या व्यवसायाचा मालक व व्यवस्थापक असतो. व्यवसायाला होणारा सर्व नफा त्याला एकट्यालाच मिळतो. जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी त्याला आपोआपच

प्रत्यक्ष प्रेरणा मिळते. त्यामुळे कठोर परिश्रमाला तो सदैव तयार असतो.

५. **लवचीकता –** व्यवसायाचा निर्णयकर्ता या नात्याने एकल व्यापारी प्राप्त परिस्थितीनुसार पटकन व्यवसायात बदल करू शकतो. तो आपल्या-व्यवसायाचा विस्तार करू शकतो. कोणत्याही क्षणी तो आपल्या व्यवसायाची दिशा व स्वरूप बदलू शकतो. तसेच तो व्यवसायाची धोरणे सुद्धा बदलू शकतो.

६. **कमी खर्च –** एकल व्यापारी हा त्याच्या व्यवसायाचा एकटाच मालक असतो. व्यवसायाच्या सर्व कार्यावर त्याचे नियंत्रण असते. तो नेहमीच वेळ, पैसा, श्रम व साधनसंपत्ती यांचा अपव्यय कमी करण्याचा प्रयत्न करतो. परिणामी एकूण खर्चात बचत होते.

७. **कार्यक्षमता –** एकल व्यापाऱ्याला व्यवसायातील सर्व नफा मिळतो. होणाऱ्या तोट्यालासुद्धा तोच जबाबदार असतो. व्यवसायातील पैशाचा अपव्यय कमी करून नफा वाढविण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. वेळ, पैसा, श्रम व साधनसंपत्ती इ. बाबत होणारा अपव्यय तो कमी करतो.

### ४.२.६ दोष :

१. **मर्यादित भांडवल –** एकल व्यापारी हा व्यवसायाचा एकटाच मालक असतो. त्याची भांडवल उभारण्याची क्षमता मर्यादित असते. आपले मित्र, नातेवाईक आणि बँक इ. मार्फत तो भांडवलाची उभारणी करतो. या मार्गांनी सुद्धा भांडवल उभारणीवर मर्यादा पडतात. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादेपलिकडे या व्यवसायाचा विस्तार व विकास होऊ शकत नाही.

२. **मर्यादित व्यवस्थापकीय कौशल्य –** व्यवसायाचे व्यवस्थापन व नियंत्रण हे स्वत: एकल व्यापाऱ्यालाच करावे लागते. त्याच्याकडे पात्रता, कामाचा अनुभव, व्यवस्थापकीय कौशल्य आणि संघटकीय क्षमता असेलच असे नाही. मर्यादित भांडवलामुळे तो व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक सुद्धा करू शकत नाही.

३. **अमर्यादित जबाबदारी –** एकल व्यापाऱ्याची व्यवसायातील जबाबदारी ही अमर्यादित स्वरूपाची असते. व्यवसायाची मालमत्ता व त्याची खाजगी मालमत्ता यामध्ये फरक केला जात नाही. गरज पडल्यास व्यवसायाची देणी फेडण्यासाठी त्याची खाजगी मालमत्ता विक्रीस काढली जाते.

४. **स्थैर्याचा अभाव –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेचे अस्तित्व पूर्णत: एकल व्यापाऱ्याच्या अस्तित्वावर अवलंबून असते. एकल व्यापाऱ्याचा मृत्यू, वेडेपणा किंवा दिवाळखोरीचा त्याच्या व्यवसायाच्या अस्तित्वावर परिणाम होतो.

५. **विशेषिकरणाचा अभाव –** श्रम विभागणीमुळे विशेषीकरण होते. परंतु एकल व्यापाऱ्यालाच व्यवसायातील सर्व कामे पार पाडावी लागतात. उदा. खरेदी, विक्री, लेखाकर्म इ. त्याला विभिन्न प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात.

६. **मोठ्या प्रकारच्या उद्योगांना उपयुक्त नाही –** एकल व्यापारी आपला व्यवसाय लहान प्रमाणात करतो. सर्वसाधारणपणे तो स्थानिक बाजारपेठेत कार्यरत असतो. एकल व्यापारी हा 'एकपात्री' प्रयोगासारखा असतो. एका विशिष्ट मर्यादेच्या बाहेर व्यवसायाचा विस्तार करता येत नाही. म्हणून हा व्यवसाय प्रकार मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या व्यवसायांना उपयुक्त नाही.

## ४.३ भागीदारी संस्था :

**४.३.१. प्रस्तावना –** भागीदारी संस्था ही खाजगी क्षेत्रातील महत्त्वाचा संघटन प्रकार आहे. व्यक्तिगत व्यापारी व्यवसायामधील मर्यादित भांडवल आणि मर्यादित व्यवस्थापकीय कौशल्य यामुळे भागीदारी संस्था विकसित झाली. व्यक्तिगत व्यापाराचा विस्तार करण्यासाठी व्यवसायात अधिक व्यक्तींचा समावेश करण्याची गरज निर्माण झाली. त्यादृष्टिने नवीन व्यक्तीला व्यवसायात प्रवेश देऊन किंवा सामावून घेऊन भागीदारी संस्था उदयास आली.

**४.३.२ अर्थ –** दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींची मालकी आणि व्यवस्थापन असलेली व्यवसाय संस्था, जेथे सर्व भागीदार व्यवसायातील नफा आणि तोटा तसेच जबाबदारीची वाटणी करतात तेव्हा त्यास भागीदारी संस्था असे म्हणतात.

### ४.३.३ व्याख्या :

**१) भारतीय भागीदारी कायदा १९३२ कलम ४ नुसार –** ''सर्वांतर्फे एकाने किंवा काहींनी चालविलेल्या व्यवसायातील नफ्याची वाटणी आपापसात करण्याचे ज्या व्यक्तींनी ठरविले आहे त्या सर्व व्यक्तींच्या परस्परातील संबंधांना भागीदारी असे म्हणतात''

**२) प्रा. एल. एच. हॅने यांच्या मते –**

''करार करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींनी नफा मिळविण्याच्या उद्देशाने कायदेशीर व्यवसाय सामूहिकपणे करण्याचे ज्या व्यक्तींना मान्य असते अशा व्यक्तींमधील परस्पर संबंधांना भागीदारी म्हणतात.''

- **महत्त्वाच्या संज्ञा :**

१) **भागीदार –** ज्या लोकांनी एकमेकांशी भागीदारीचा करार केला आहे त्यांना व्यक्तिगतरित्या 'भागीदार' असे म्हणतात.

२) **भागीदारी संस्था –** ज्या लोकांनी एकमेकांशी भागीदारीचा करार केला आहे त्या सर्वांच्या मिळून होणाऱ्या संघटनेस 'भागीदारी संस्था' असे म्हणतात.

३) **भागीदारीचे नाव –** ज्या नावाने भागीदारी व्यवसाय चालविला जातो त्यास **'भागीदारीचे नाव'** असे म्हणतात.

४) **भागीदारीचा करार –** लेखी स्वरूपातील भागीदारी व्यवसायाच्या अटी आणि नियमांना **'भागीदारीचा करार'** असे म्हटले जाते.

### ४.३.४ भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये :

१) **करार –** दोन किंवा अधिक व्यक्तींमधील कराराने भागीदारीची निर्मिती होते. या व्यक्ती नफा मिळविण्यासाठी भागीदारी व्यवसाय करतात. भागीदारांमधील करार लेखी किंवा तोंडी असू शकतो. परंतु करार लेखी असणे अधिक सोयीचे असते.

२) **संयुक्त मालकी –** भागीदारीमध्ये सर्व भागीदार संयुक्त मालक असतात. भागीदार केवळ व्यावसायिक हेतूसाठी व्यवसायाची मालमत्ता वापरतात, स्वत:च्या खाजगी उपयोगाकरिता नाही.

३) **संयुक्त व्यवस्थापन –** प्रत्येक भागीदाराला भागीदारी व्यवसायाच्या व्यवस्थापनामध्ये सक्रीय सहभाग घेण्याचा अधिकार आहे. तथापि एक किंवा अधिक भागीदार संस्थेच्या इतर भागीदारांच्या वतीने व्यवसायाचे व्यवस्थापन करतात.

४) **कायदेशीर व्यवसाय –** प्रत्येक भागीदारी संस्थेने फक्त वैध व्यवसाय करणे आवश्यक आहे. कायद्याने प्रतिबंध असलेला व्यवसाय भागीदारीने करू नये. भागीदारी बेकायदेशीर व्यवसाय करू शकत नाही आणि अशा व्यवसायाची नोंदणी करू शकत नाही. उदा. तस्करी, बेकायदेशीर वस्तूंची विक्री.

५) **उत्तरदायित्व/जबाबदारी –** प्रत्येक भागीदारांचे उत्तरदायित्व अमर्यादित, संयुक्त आणि व्यक्तीगत असते. जेव्हा व्यवसायाची कर्जे फेडण्यासाठी संस्थेची मालमत्ता पुरेशी नसते तेव्हा भागीदारांची खाजगी मालमत्ता वापरली जाते. संयुक्त उत्तरदायित्वामध्ये प्रत्येक भागीदार संस्थेच्या कर्जासाठी स्वत: आणि इतर भागीदारांसह संयुक्तपणे उत्तरदायी असतो. थोडक्यात प्रत्येक भागीदाराचे उत्तरदायित्व हे वैयक्तिक, संयुक्त आणि अमर्यादित स्वरूपाचे असते.

६) **भागीदारांची संख्या –** भागीदारी संस्थेमध्ये किमान २ व्यक्ती संस्था चालू असेपर्यंत असणे आवश्यक आहे आणि जास्तीत जास्त ५० भागीदार असू शकतात.

७) **प्रधान अभिकर्ता संबंध –** प्रत्येक भागीदार हा व्यवसायाचा संयुक्त मालक असतो. भागीदारी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये भागीदार भाग घेतात. प्रत्येक भागीदारीमध्ये भागीदारांची भूमिका दुहेरी असते. जेव्हा एखादा भागीदार भागीदारी संस्थेच्या वतीने त्रयस्थ व्यक्तीबरोबर व्यवहार करतो तेव्हा त्याची भूमिका मध्यस्थासारखी असते. परंतु त्याच वेळेस इतर भागीदारांच्या दृष्टीकोनातून तो **(अभिकर्ता किंवा दलाल)** म्हणून भूमिका बजावित असतो. सर्व भागीदार त्या संस्थेचे मालक असतात आणि त्याचबरोबर अभिकर्ताही असतात.

८) **लाभ हस्तांतरणावर बंधन –** भागीदारी संस्थेचा कोणताही भागीदार, भागीदारी संस्थेमध्ये इतर सर्व भागीदारांच्या पूर्व संमतीशिवाय त्यांचे लाभ हस्तांतरीत किंवा विक्री करू शकत नाही किंवा वाटणी करू शकत नाही.

९) **नोंदणी –** भारतीय भागीदारी कायदा १९३२ च्या तरतुदीनुसार भागीदारीची नोंदणी सक्तीची नाही. परंतु महाराष्ट्रात (एप्रिल १९८५ पासून) आणि इतर कांही राज्यांमध्ये भागीदारीची नोंदणी त्यांच्या संबंधित राज्याच्या तरतुदीनुसार सक्तीची आहे. जर भागीदारांची इच्छा असेल तर ते नोंदणी करू शकतात.

१०) **नफा आणि तोट्याची विभागणी –** नफा आणि तोट्याची विभागणी विशिष्ट प्रमाणात करण्याचे भागीदार मान्य करतात. नफा व तोट्याची वाटणी ही भांडवलाचे स्वरूप, सेवा सुविधा आणि भागीदारांच्या नावलौकिकावर अवलंबून असते. जर भागीदारी करारामध्ये नफा – तोटा वाटणीचे प्रमाण नमूद केलेले नसेल तर नफा-तोट्याची विभागणी समप्रमाणात होते.

११) **भागीदाराची समाप्ती –** इतर भागीदारांना लेखी स्वरूपात सूचना देऊन भागीदार स्वत: राजीनामा देऊ शकतो. फसवणुकीच्या कारणासाठीदेखील भागीदारी संस्थेतून भागीदाराला बाहेर काढले जाऊ शकते.

१२) **विसर्जन –** सर्व भागीदार विसर्जन करण्यास सहमत असतील तर भागीदारी संस्था कोणत्याही वेळी विसर्जित केली जाऊ शकते. भागीदारी संस्था ही भागीदाराच्या मृत्यू, दिवाळखोरी किंवा वेडसरपणामुळे विसर्जित होऊ शकते. जर भागीदारी करारनाम्यात निरंतरतेचा उल्लेख असेल तरच संस्था कार्यरत राहू शकते. अन्यथा उपरोक्त घटनांमुळे भागीदारी संस्था संपुष्टात येऊ शकते. जर कुठल्याही क्षणी भागीदारांची संख्या एका भागीदारापर्यंत घसरली तरीही भागीदारी संपुष्टात येते.

### ४.३.५ गुण :

#### १) सुलभ स्थापना –

भागीदारी व्यवसायाची स्थापना करणे खूप सोपे आहे. भागीदारी संस्था स्थापन करण्यासाठी केवळ २ व्यक्ती आवश्यक असतात. भागीदार करारावर सह्या करून भागीदारी संस्थेची नोंदणी करू शकतात. नोंदणीची प्रक्रिया अगदी सोपी आणि जलद असते.

#### २) भांडवल –

व्यक्तिगत व्यापाऱ्याच्या तुलनेत भागीदारी व्यवसायात अधिक भांडवल असते. भागीदारी व्यवसायात एकापेक्षा जास्त भागीदार असल्यामुळे ते अधिक भांडवल गोळा करू शकतात. सर्व भागीदारांचे भांडवलाचे प्रमाण करारात नमूद केलेले असते.

#### ३) व्यावसायिक गुप्तता –

भागीदारी संस्थेने वार्षिक हिशोबपुस्तके आणि माहितीपत्रके प्रसिद्ध केली पाहिजे असे कोणतेही बंधन नाही. यामुळे भागीदारी संस्थेची गुपिते आणि गोपनीय माहिती प्रतिस्पर्ध्यांना सहजपणे कळू शकत नाही.

#### ४) सातत्यपूर्ण अस्तित्व –

भागीदारी संस्थेत सातत्यपूर्ण अस्तित्व असते. भागीदाराचा मृत्यू झाल्यानंतरही, दिवाळखोरपणानंतर, वेडसरपणानंतरदेखील भागीदारी विद्यमान भागीदारांद्वारे चालविली जाऊ शकते. भागीदारीच्या करारनाम्यात पण तशी तरतूद (निरंतरतेची) असावी लागते. नाहीतर नवीन करार करावा लागतो.

#### ५) कार्यातील लवचीकपणा –

भागीदारी व्यवसाय खूप लवचीक आहे. भागीदार आवश्यकतेनुसार व्यवसायात बदल करू शकतात. बदलणाऱ्या परिस्थितीनुसार भागीदार करारातदेखील बदल करू शकतात. तसेच व्यवसाय बंदसुद्धा करू शकतात.

#### ६) निर्णयक्षमता –

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत काही भागीदार सहभागी होतात. म्हणून भागीदारीमध्ये त्वरित निर्णय घेण्यात येतात, सविस्तर चर्चा करून भागीदार निर्णय घेतात. त्यामुळे एकल व्यापारापेक्षा उत्तम निर्णय घेतला जातो.

#### ७) श्रम व मोबदला सहसंबंध –

भागीदारी व्यवसायात श्रम व मोबदला यांच्यात प्रत्यक्ष संबंध आहे. प्रत्येक भागीदार उत्तम श्रम करतात आणि मोबदला मिळवतात. भागीदारी संस्थेत विशेष तरतुदीद्वारे सक्रिय भागीदारांना जास्त मोबदला दिला जाऊ शकतो.

#### ८) नावलौकिक –

नावलौकिक म्हणजे भागीदारी व्यवसायाचे आर्थिक मूल्यमापन होय. बाजारातील चांगल्या सेवा, ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या उत्तम सेवा, गुणवत्तापूर्ण सेवा इ. मुळे तसेच प्रत्येक भागीदारामुळे संस्थेचा नावलौकिक वाढवला जातो. सामान्यपणे नवीन भागीदाराच्या प्रवेशावेळी भागीदाराने नावलौकिक म्हणून काही रक्कम आणावी लागते.

### ९) तज्ज्ञांचा सहभाग –

भागीदारी व्यवसायात काही भागीदार वित्त, तंत्रज्ञान, विपणन या सारख्या विविध कौशल्यामध्ये तज्ज्ञ असतात. त्यामुळे भागीदारी संस्थेला अधिक चांगला नफा होऊ शकतो. आणि भागीदारी संस्थेची कार्यक्षमता वाढीस लागते.

## ४.३.६ भागीदारी संस्थेचे दोष –

### १) सातत्यातील समस्या –

भागीदाराचा मृत्यू, दिवाळखोरपणा, वेडसरपणा इ. मुळे व्यवसायाच्या सुरुवातीलाच सातत्यासंबधी अनेक समस्या येऊ शकतात. करारात या सर्व गाष्टींचा समावेश नसल्यास भागीदारी विसर्जित केली जाते.

### २) कायदेशीर अस्तित्वाचा अभाव–

कायद्याच्या दृष्टीने भागीदारी संस्था आणि भागीदार यांचे अस्तित्व वेगळे नाही, तर ते दोन्ही समान आहेत म्हणून भागीदारी संस्थेला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नसल्याने भागीदाराचा मृत्यू, दिवाळखोरपणा, वेडसरपणा इ. मुळे भागीदारी संस्था सक्तीने विसर्जित करावी लागते.

### ३) विवाद –

एकापेक्षा जास्त व्यक्ती भागीदारी व्यवसायात विविध कार्यांमध्ये सहभागी असल्याने अनेकदा वादविवाद होतात. काही भागीदारांचे काही मुद्द्यांवर सहमत होते आणि जे सहमत नसतात त्यांच्यात विवाद निर्माण होऊ शकतात. विवादांमुळे भागीदारी संस्था संपुष्टात येऊ शकतात.

### ४) लाभ अहस्तांतरणीय –

व्यवसायात कोणताही भागीदार, भागीदारी संस्थेतील सर्व भागीदारांच्या संमतीशिवाय व्यवसायातील त्यांचे हक्क त्रयस्थांना हस्तांतरीत करू शकत नाही. सर्वसाधारणपणे हक्क हे अहस्तांतरणीय असतात.

### ५) मर्यादित भागीदार –

भागीदारी कायदयातील तरतुदीप्रमाणे भागीदारांच्या संख्येवर नियंत्रण येते. कुठलीही भागीदारी संस्था ५० पेक्षा जास्त भागीदार घेऊ शकत नाही. सदर तरतुदीमुळे भांडवल उभारणी आणि व्यवस्थापनावर विपरित परिणाम होतो.

### ६) भागीदारांच्या प्रवेशामध्ये अडचण –

नवीन भागीदाराच्या प्रवेशाने अनेकदा अडचणी येतात, जसे भागीदारांचे नफ्याचे प्रमाण बदलते. अस्तित्वात असलेल्या भागीदारांचा नवीन भागीदारांवर विश्वास नसल्यामुळे नवीन भागीदाराच्या प्रवेशास अडचणी येतात.

### ७) अमर्यादित जबाबदारी –

व्यवसायाची कर्जे फेडण्यासाठी भागीदारी संस्थेची मालमत्ता पुरेशी नसल्यास कर्ज फेडण्यासाठी भागीदारांची खाजगी मालमत्ता वापरली जाते.

### ८) विहित अधिकारांचा धोका –

भागीदारी व्यवसायात विहित अधिकारांचा धोका असतो. काही भागीदार इतर भागीदारांच्या वतीने व्यवस्थापनाचा गैरफायदा घेतात आणि लाभ मिळवतात. त्यामुळे विहित अधिकारांचा धोका उद्‌भवू शकतो.

**उदा.** एखादा भागीदार आपल्या क्षमतांच्या आधारे करारावर सह्या करतो तेंव्हा ते इतर भागीदारासाठी फायद्याचे नसते. तसेच कर्ज घेताना इतरांची संमत्ती घेतली जात नाही.

### ९) मर्यादित भांडवल –


भागीदारी संस्थेचे भांडवल कंपनीच्या तुलनेत कमी असते. कारण या संस्थेत भागीदाराच्या संख्येवर मर्यादा असल्याने भागीदारी संस्थेत आधुनिक व्यवसायास लागणारे भांडवल उभारणे शक्य नसते.

### १०) गोपनीयतेची समस्या –

व्यवसायाशी संबधीत खात्यांची आणि आर्थिक हिशोबांची पुस्तके प्रसिद्ध करणे आवश्यक नसल्याने भागीदारी संस्थेमध्ये गोपनीयता असते परंतु काही भागीदार व्यवसायाची महत्त्वाची गोपनीय माहिती वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी तसेच प्रतिस्पर्ध्यांना सांगण्याचा धोका असतो.

## ४.३.७. भागीदारांचे प्रकार –

भागीदारी व्यवसायात कामाच्या स्वरूपावरून किंवा भागीदारांच्या भूमिकेवरून पुढील प्रकार पडतात.




### १) सक्रिय भागीदार –

जो भागीदार व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजात सक्रिय सहभाग घेतो त्यास सक्रिय भागीदार असे म्हणतात. हा भागीदार व्यवस्थापक, संयोजक, नियंत्रक या सारख्या भिन्न स्वरूपाच्या भूमिका भागीदारी संस्थेमध्ये पार पाडतो. सक्रिय भागीदार भांडवल, नफा तोट्याची विभागणी, संयुक्त जबाबदाऱ्या पार पाडतो म्हणून त्यास कार्यकारी भागीदार म्हणूनदेखील ओळखले जाते. त्यांनी दिलेल्या सेवेबद्दल नफ्याव्यतिरिक्त इतरही सेवांचा तो लाभ घेत असतो.

### २) निष्क्रिय भागीदार –

निष्क्रिय भागीदार म्हणजे जो भागीदार व्यवसायात आपले भांडवल आणतो आणि व्यवसायाच्या नफ्या तोट्यात सहभागी होतो परंतु व्यवसायाच्या दैनंदिन कार्यात भाग घेत नाही त्यास निष्क्रिय भागीदार असे म्हणतात.

एखाद्या व्यक्तीकडे गुंतवणुकीसाठी पैसे असू शकतात. परंतु व्यवसायासाठी ते वेळ देण्यास तयार नसतात म्हणून अशा भागीदारास निद्रिस्त किंवा सुप्त भागीदार म्हणून ओळखले जाते. तसेच हे भागीदार इतर भागीदारांसारखे व्यवसायाच्या जबाबदारीसाठी बांधील असतात. त्यांच्या कृतीसाठी ते त्रयस्थांना जबाबदार धरू शकत नाहीत.

### ३) नाममात्र भागीदार –

जो भागीदार भागीदारी संस्थेला आपले नाव देतो त्यास नाममात्र भागीदार असे म्हणतात. तो भांडवलात योगदान देत नाही आणि व्यवसायाच्या नफ्यात वाटेकरी नसतो. व्यवसायात केवळ त्यांच्या उपस्थितीमुळे बाजारपेठेत अधिक नफा मिळू शकतो किंवा त्यांची विक्री वाढू शकते. भागीदारी संस्थेमध्ये नाममात्र भागीदाराला गृहीत धरले जाते आणि सर्व श्रेय भागीदारी संस्थेला दिले जाते. त्रयस्थ व्यक्तींना नाममात्र भागीदार जबाबदार असतात. भागीदारी संस्थेच्या फायद्यासाठी नाममात्र भागीदारांना प्रवेश दिला जातो.

### ४) गुप्त भागीदार –

ज्या भागीदाराचे इतर भागीदारांबरोबरचे संबंध बाहेरील व्यक्तींना माहीत नसतात, त्यांना गुप्त भागीदार असे म्हणतात. गुप्त भागीदाराची सदस्यता गुप्त असते. तो व्यवसायाला भांडवल पुरवितो, नफा मिळवून देतो, याची जबाबदारी अमर्यादित असते, तोट्यात वाटेकरी असतो. फक्त व्यवसायाच्या कामात तो गुप्तपणे भाग घेतो.

### ५) अज्ञान भागीदार –

एक अल्पवयीन व्यक्ती,ज्याचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त नाही, अशी व्यक्ती म्हणजे अज्ञानी भागीदार होय. **भारतीय करार कायदा १८७२ च्या तरतुदीनुसार** १८ वर्ष वय पूर्ण नसलेली व्यक्ती अज्ञान समजली जाते. भारतीय करार कायद्यानुसार एक अज्ञान व्यक्ती भागीदाराचा करार करू शकत नाही कारण अज्ञान व्यक्तीद्वारे केलेला व्यवहार हा व्यर्थ करार असतो. परंतु भागीदारांच्या संमतीने अस्तित्वात असलेल्या भागीदारांच्या नफ्यामध्ये त्यांना सहभागी केले जाते, व्यवसायाची देणी देण्यासाठी, कर्जे फेडण्यासाठी त्याला वैयक्तीकरित्या जबाबदार धरले जात नाही. परंतु भागीदारी संस्था व्यवसायाच्या मालमत्तेमधील त्यांच्या मालकीचे आणि व्यवसायाच्या नफ्यातील वाटा देण्यासाठी जबाबदार आहे. त्याच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर त्याला भागीदारीमध्ये अस्तित्व कायम ठेवायचे असल्यास तशी जाहीर सूचना देऊ शकतो.

### ६) केवळ नफ्यात सहभागी भागीदार –

जेव्हा भागीदार केवळ व्यवसायाच्या नफा वाटणीमध्ये सहभागी होतात आणि व्यवसायाच्या तोट्यात जबाबदार नसतात, त्यास 'केवळ नफ्यात सहभागी भागीदार' असे म्हणतात. हे भागीदारी व्यवसायाला भांडवल पुरवितात परंतु व्यवसायामध्ये सक्रिय भाग घेऊ शकत नाहीत. परंतु व्यवसायाची देणी देण्यासाठी त्याला जबाबदार धरले जाते.

### ७) उप-भागीदार -

जेव्हा एखादा भागीदार हा व्यवसायातून झालेल्या नफ्यातला वैयक्तिक हिस्सा एखाद्या त्रयस्थ व्यक्तीबरोबर विभागणी करण्यास तयार असतो अशा भागीदाराला उप-भागीदार असे संबोधतात. उप-भागीदार हा भागीदारी संस्थेचे प्रतिनिधित्व करू शकत नाही.

### ८) मर्यादित जबाबदारी असलेला भागीदार -

या प्रकारचा भागीदार **'मर्यादित भागीदारी'** मध्ये अस्तित्वात आहे. भागीदाराची जबाबदारी ही त्याने भागीदारीत गुंतविलेल्या रक्कमेइतकी मर्यादित असते. तो एक खास भागीदार आहे. तो व्यवसायाच्या कामकाजामध्ये सक्रियपणे भाग घेत नाही.

### ९) आभासी भागीदार -

आभासी भागीदार हा व्यवसाय संस्थेतून निवृत्त झालेला भागीदार असतो. परंतु व्यवसाय संस्थेमध्ये त्याचे भांडवल तसेच असते. तो व्यवसायाच्या कामकाजामध्ये सक्रिय सहभाग घेत नाही. परंतु, नफ्यात सहभागी असतो. तसेच तो व्यवसायाची देणी देण्यासाठी जबाबदार असतो. अशा भांडवलावर काही विशिष्ट प्रमाणात व्याज दिले जाते.

## ४.३.८ भागीदारी संस्थेचे प्रकार -

भागीदारीमध्ये प्रत्येक व्यक्ती व्यवसायासाठी काहीतरी योगदान देत असते. जसे की, नवनवीन कल्पना, भांडवल, इतर व्यवस्थापकीय हक्क, नफ्यातील सहभाग, वैयक्तीक जबाबदारी इत्यादींवर पुढील प्रकार अवलंबून आहेत.

**अ) सामान्य भागीदारी :** ऐच्छिक भागीदारी, विशिष्ट कालावधीची, विशिष्ट उपक्रमाची सामान्य भागीदारी

**ब) मर्यादित जबाबदारीची भागीदारी कायदा २००८.**

**भागीदारी संस्थेचे प्रकार**

- **अ) सामान्य भागीदारी** (भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये)
  - १) ऐच्छिक भागीदारी
  - २) विशिष्ट कालावधीची भागीदारी
  - ३) विशिष्ट उपक्रमाची भागीदारी
- **ब) मर्यादित जबाबदारीची भागीदारी** (मर्यादित जबाबदारीची भागीदारी कायदा २००८ अन्वये)

**अ) सामान्य भागीदारी -** सर्वसाधारण भागीदारीमध्ये प्रत्येक भागीदाराला व्यवसायाच्या व्यवस्थापनाबाबत समान हक्क व अधिकार असतात. तसेच प्रत्येक भागीदार कायदेशीर कामकाजाबाबत समूहाला जबाबदार असतो. सामान्य भागीदारी ही ''भारतीय भागीदारी कायदा १९३२'' नुसार अस्तित्वात येते.

- **सामान्य भागीदारीचे पुढीलप्रमाणे प्रकार आहेत :**

### १) ऐच्छिक भागीदारी -

भागीदारीच्या कालावधीसंदर्भात जेव्हा भागीदार करारामध्ये कोणतीही तरतूद करत नाहीत तेंव्हा त्या

भागीदारीस ऐच्छिक भागीदारी असे म्हणतात. अशा भागीदारी संस्थेचे विसर्जन करणे सोपे असते. कोणताही भागीदार कोणत्याही क्षणी इतर भागीदारांना ''भागीदारीतून बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त करून'' किंवा तशी सूचना देऊन बाहेर पडू शकतो.

**२) विशिष्ट कालावधीची भागीदारी –**

'ज्या भागीदारीचा कालावधी निश्चित असतो त्या भागीदारीस विशिष्ट कालावधीची भागीदारी असे म्हणतात'. उदा. सहा महिने, एक वर्ष इ. असा निर्धारित कालावधी संपल्यानंतर भागीदारी संस्थेचे अस्तित्व आपोआप संपुष्टात येते.

**३) विशिष्ट उपक्रमाची भागीदारी –**

'विशिष्ट प्रकारचे कार्य किंवा कृती करण्यासाठी जी भागीदारी संस्था अस्तित्वात येते तिला विशिष्ट उपक्रमाची भागीदारी असे म्हणतात.' उदा. धरण, रस्ते, पूल बांधणे, हंगामी उत्पादनांची विक्री करणे इ.

तो विशिष्ट उपक्रम, कार्य किंवा कृती पूर्ण होताच भागीदारीचा व्यवसाय संपुष्टात येतो.

**ब) मर्यादित जबाबदारीची भागीदारी –** मर्यादित जबाबदारी भागीदारी कायदा २००८ मधील तरतुदीनुसार (LLP Act-२००८) अस्तित्वात येते. या प्रकारानुसार दोन उपप्रकार पडतात.-

- **निर्देशित भागीदार –**

प्रत्येक मर्यादित जबाबदारीच्या भागीदारी मध्ये किमान दोन नेमलेले (निर्देशित) भागीदार असले पाहिजेत. तसेच त्या दोहोपैकी एक भागीदार हा भारतीय रहिवासी असला पाहिजे.

- **सामान्य भागीदार –** मर्यादित जबाबदारीच्या भागीदारी मध्ये इतर सर्व भागीदार हे 'सामान्य भागीदार' असतात

मर्यादित जबाबदारी कायद्यानुसार, भागीदारांना वैयक्तीक जबाबदारीबाबत काही सवलती मिळतात. या कायद्यांन्वये इतर भागीदारांनी केलेल्या चुकीच्या कारभाराबद्दल किंवा कर्जव्यवहाराबाबत वैयक्तिक भागीदाराला जबाबदार धरता येणार नाही.

## ४.४ एकत्र हिंदू कुटुंब व्यवसाय :

**४.४.१ प्रस्तावना –** जगात व्यवसाय संघटनांचे अनेक प्रकार अस्तित्वात आहेत. परंतु त्यापैकी एकत्र हिंदू कुटुंब व्यवसाय हा प्रकार एकमेव भारतामध्ये अस्तित्वात आहे. त्यालाच 'अविभक्त हिंदू कुटुंब पद्धती व्यवसाय' असेही म्हणतात. हा व्यवसाय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होतो.

### ४.४.२ हिंदू कायद्यानुसार विचारधारा :

**१) मिताक्षरा –** या विचारधारेनुसार कुटुंबातील फक्त पुरुषांनाच व्यवसायाचे सदस्यत्व मिळते. म्हणून मुलगा, नातू व पणतू हे कौटुंबिक मालमत्तेचे संयुक्त मालक बनतात. वडिलांच्या बरोबरीने मुलालासुद्धा वडिलोपार्जित संपत्तीमध्ये समान हक्क मिळतो. त्याला कौटुंबिक संपत्तीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार आहे. भारतामध्ये ही विचारधारा आसाम, बंगाल आणि ओरिसाचा काही भाग सोडून देशभर प्रचलित आहे.

**२. दयाभागा –** या विचारधारेनुसार हिंदू-अविभक्त कुटुंबातील पुरुष व स्त्रिया दोघानांही सहसभासद होता येते. उदा. पुरुषाच्या मृत्यूनंतर, त्यांची संपत्ती व व्यवसाय पत्नी किंवा वारसाकडे हस्तांतरीत होते.

### ४.४.३ व्याख्या :

जेव्हा एकत्र हिंदू-कुटुंब वारसाहक्काने - हिंदू कायद्याप्रमाणे व्यवसाय चालवितात तेव्हा त्यास अविभक्त हिंदू-कुटुंब व्यवसाय असे म्हणतात.

### ४.४.४ एकत्र हिंदू-कुटुंब व्यवसायाची वैशिष्ट्ये :

१. **अस्तित्व फक्त भारतातच -** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसाय फक्त भारतातच अस्तित्वात आहे. हिंदू वारसाहक्क कायदा १९५६ नुसार हा व्यवसाय चालविला जातो.

२. **स्थापना -** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायाची स्थापना करणे सुलभ असते. हिंदू कायद्यातील तरतुदीनुसार हा व्यवसाय चालतो. व्यवसायाचे सभासदत्व हे त्या कुटुंबात जन्म घेतल्याने मिळते तर कराराने नव्हे. एकत्र हिंदू कुटुंब पद्धतीतील ज्येष्ठ व्यक्ती ही कुटुंब प्रमुख असते. त्याला '**कर्ता**' असे संबोधिले जाते बाकीच्या सभासदांना '**सहकर्ते**' असे म्हणतात.

३. **सभासदत्व -** या व्यवसायामध्ये सभासद संख्येवर काणतेही बंधन नसते. त्या कुटुंबामध्ये जन्म घेतल्याने, एखाद्याला दत्तक घेतल्याने किंवा त्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीशी विवाह केल्याने व्यवसायाचे सभासदत्व प्राप्त होते.

४. **संयुक्त मालकी -** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धतीत व्यवसायाच्या मालमत्तेवर कर्ता आणि सहकर्ते यांची संयुक्त मालकी असते. हा व्यवसाय सलग तीन पिढ्यांच्याकडून संयुक्तपणे चालविला जातो. कर्ता हाच एकत्र मालमत्तेचा संरक्षणकर्ता असतो.

५. **चांगली पतप्रतिष्ठा -** हा व्यवसाय वर्षोनुवर्षे चालतो. बाजारपेठेत त्यांना चांगली पतप्रतिष्ठा असते. कर्ज देणाऱ्यास कर्ज परतफेडीची खात्री मिळते. कर्त्याची जबाबदारी अमर्यादित असल्याने बँका व इतर वित्तीय संस्था त्यांना कर्ज सहजपणे उपलब्ध करून देतात.

६. **व्यवस्थापन -** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायाचे व्यवस्थापन कर्ता करतो. कौटुंबिक व्यवसायामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार सहकर्त्यांना नसतात. तथापि व्यवसायातील कोणतेही निर्णय घेण्याअगोदर कर्ता कुटुंबातील इतर सदस्यांबरोबर चर्चा करू शकतो.

७. **नफ्यात सहभाग -** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायाची स्थापना कोणत्याही कराराने होत नाही. कर्ता आणि सहकर्ते यांच्यामध्ये नफा-तोट्याची विभागणी कोणत्या प्रमाणात करावी याविषयी हिंदू कायद्यात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे नफा-तोट्याचे प्रमाण कुटुंबात होणाऱ्या जन्म-मृत्यूवर अवलंबून असते.

### ४.४.५ एकत्र हिंदू-कुटुंब व्यवसायाचे गुण :

१. **सुलभ स्थापना -** एकत्र हिंदू कुटुंब पद्धतीची स्थापना करणे सुलभ असते. व्यवसायाची नोंदणी करणे सक्तीचे नाही. कोणताही करार सभासदांमध्ये होत नाही. शिवाय सभासद संख्येवर किमान व कमाल असे बंधन नाही. हिंदू कायद्यानुसार याची स्थापना होते.

२. **सहकर्त्यांचे हितरक्षण -** सहकर्त्याला व्यवसायातून विभक्त होण्याचा अधिकार असतो. कर्ता त्यांच्या हिस्स्यांची खूप काळजी घेतो.

३. **त्वरित व अचूक निर्णय -** कर्ता ही कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती असते. त्याला व्यवसायाचा अनुभव व ज्ञान असते. तो व्यवसायातील सर्व निर्णय घेतो. आपल्या अनुभवाच्या आधारे योग्य वेळेत, योग्य व अचूक निर्णय तो घेऊ शकतो.

४. **कामातूनच प्रशिक्षण –** अविभक्त हिंदू-कुटुंब पद्धतीतील सदस्यांना व्यवसायातील कौशल्याचे प्रशिक्षण आपोआप मिळते. ते कर्त्याच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण करतात व त्यातूनच त्यांना अनेक क्लुप्त्या मिळतात.

५. **सहकर्त्यांची जबाबदारी –** सहकर्त्यांची जबाबदारी ही एकत्र हिंदू-कुटुंब पद्धतीत व्यवसायातील त्यांच्या हिश्याइतकी मर्यादित असते. त्यामुळे अविभक्त हिंदू-कुटुंब पद्धतीत व्यवसायातील देणी फेडण्यासाठी सहकर्त्याच्या खाजगी मालमत्तेचा वापर केला जात नाही.

### ४.४.६ एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायातील दोष :

१. **कर्त्याची अमर्यादित जबाबदारी –** अमर्यादित जबाबदारीच्या धोक्याचा कर्त्याला नेहमीच सामना करावा लागतो. जर व्यवसायाची देणी फेडण्यासाठी व्यवसायाची मालमत्ता कमी पडत असेल तर सदरची देणी देण्यासाठी कर्त्याच्या खाजगी मालमत्तेचा वापर केला जातो.

२. **आर्थिक व व्यवस्थापकीय संसाधनांवर मर्यादा –** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायामध्ये निधीची कमतरता असते. एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायामध्ये पूर्वजनांच्या मालमत्तेचा भांडवल म्हणून उपयोग केला जातो. कर्त्याकडे व्यवस्थापकीय कौशल्य असेलच असे नाही. त्यामुळे विस्तारीकरणावर मर्यादा येते.

३. **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वाचा अभाव –** कायद्याच्या नजरेतून एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसाय व कुटुंबातील सदस्य एकसारखे मानले जातात. त्यामुळे व्यवसायाला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नसते.

४. **व्यवसायाचे विभाजन –** एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसायामध्ये सदस्यांची संख्या जास्त असते. त्यामुळे तेथे संघर्ष आणि वाद-विवाद होतात. कर्त्याच्या व्यवस्थापनावर सहकर्ते असमाधानी/नाराज असतात. परिणामी व्यवसायाचे विभाजन होण्याची शक्यता असते.

५. **श्रम व पारितोषिक यांचा प्रत्यक्ष संबंध नाही –** कर्ता हा व्यवसायाचा व्यवस्थापक असतो. व्यवसाय चालविण्यासाठी तो आपले ज्ञान व कौशल्य वापरत असतो. व्यवसायाला मिळालेला फायदा हा सर्व सहकर्त्यांमध्ये वाटला जातो. कार्यक्षम व अकार्यक्षम अशा सर्वच सदस्याना नफा मिळतो.

### ४.५ सहकारी संस्था :

**अमूल – (Amul - The Taste of India)**

- जेथे गरीब शेतकरी दिवस-रात्र प्रचंड कष्ट करीत होते. परंतु, स्थानिक व्यापाऱ्यांकडून त्यांची पिळवणूक होत होती व त्यांना अल्प मोबदला/लाभ दिला जात असे तेव्हा ६५ वर्षापूर्वी या व्यवसायाची स्थापना करण्यात आली.
- स्थानिक व्यापाऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या अयोग्य व्यापारी प्रथांच्या विरोधात रागाने शेतकरी एकत्र आले व त्रिभुवनदास पटेल यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन सरदारांना तक्रारी सोडविण्याची विनंती केली.

- शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार करून सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांना स्वत:चा उद्योग/व्यवसाय सुरू करण्याचा व त्यासाठी सातत्याने काम करण्याचा सल्ला दिला. शेतकऱ्यांनी हा सल्ला गांभीर्याने घेऊन स्वत:ची सहकारी संस्था सुरू केली.
- भारतीय धवल क्रांतीचे जनक डॉ. वर्गिस कुरिअन यांनी अमूल सहकारी संस्थेची स्थापना केली. भारतीय दुग्ध उत्पादनामध्ये अमूल ही अग्रगण्य संस्था आहे.
- सन १९४६ मध्ये गुजरात मधील आणंद येथे **'अमूल'** ची स्थापना करण्यात आली. मध्यस्थांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविणे हाच याचा मुख्य हेतू होता.
- शेतकऱ्यांची पिळवणूक थांबविण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल, त्रिभुवनदास पटेल व डॉ. वर्गिस कुरिअन यांनी योजलेले हे उपाय होय.
- आज शेतकऱ्यांना स्वत:चे जीवन जगण्यासाठी व उद्योजक बनण्यास अमूल एक ब्रँड/नाव आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शी असून तेथे कोणत्याही प्रकारची पिळवणूक केली जात नाही.
- **'अमूल'** ने सिद्ध केले आहे की, ते एक उत्पादन/वस्तू नसून सहकारी चळवळ आहे व शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य देणारी संस्था आहे. **'अमूल'** ने शेतकऱ्यांच्यामध्ये स्वप्न पाहण्याचे धाडस व जीवन जगण्याची आशा निर्माण केली आहे.
- **'अमूल'** ने **'अमूल'** हे 'अमूल्य असल्याचे सिद्ध केले आहे. तो देशाचा ठेवा म्हणून जतन केला पाहिजे.
- सन १९९९ मध्ये **'अमूल'**ला **''सर्वोत्कृष्ट''** या **''राजीव गांधी राष्ट्रीय गुणवत्ता''** पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. (आपल्या उत्पादनाचा दर्जा नेहमी सर्वोत्कृष्ट राखण्याबद्दल देण्यात येणारा पुरस्कार)
- आपली जाहिरात मोहिम दीर्घकाळ चालविण्याबद्दल जागतिक पातळीवरील **''गिनीज विश्व विक्रम''** या पुरस्काराने **'अमूल'**ला सन्मानित करण्यात आले आहे.

**४.५.१ प्रस्तावना –** भारत हा कृषीप्रधान देश असून जगातील सर्वात मोठ्या सहकारी चळवळीची पायाभरणी भारतात झालेली आहे. सहकारी चळवळ ही समाजातील दुर्बल घटकांनी त्यांच्या व सभासदांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी सुरू केली आहे. स्वातंत्र्यानंतर 'सहकार' हा पंचवार्षिक योजनांचा अविभाज्य भाग बनला.

भारतामध्ये 'सहकार' ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते कारण गरीब, अशिक्षित व अकुशल व्यक्तींची ही संघटना आहे. ब्रिटीशांच्याकडून १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविल्यानंतर भारताने विशेषत: कृषी क्षेत्रामध्ये सहकारी संस्थाच्या माध्यमातून प्रचंड विकास केला आहे. देशामध्ये सहकाराचे जाळे हे स्थानिक, प्रादेशिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवर विणलेले आहे.

**४.५.२ अर्थ –** सहकारी संस्था ही व्यक्तींची ऐच्छिक संघटना असून निश्चित अशी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थापन झालेली असते, (सेवा प्रेरित/सेवा प्रधान) ''प्रत्येकाने सर्वांसाठी आणि सर्वांनी प्रत्येकासाठी'' ही सहकारी संस्थाची तत्त्वप्रणाली आहे.

### ४.५.३ व्याख्या :

१) आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेने सहकारी संस्थेची केलेली व्याख्या ''सामान्यत: मर्यादित साधने असलेल्या व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्रित येऊन आपली समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, लोकशाही पद्धतीने व्यवसाय संघटनेचे नियंत्रण करण्यासाठी जी संस्था स्थापन केली जाते तिला सहकारी संघटन असे म्हटले जाते. या सहकारी संस्थेच्या भागभांडवलासंबंधी व्यक्तींचा समान हिस्सा असतो आणि संस्थेच्या नफ्या-तोट्यात ते वाजवी प्रमाणात सहभागी झालेले असतात.''

२) भारतीय सहकारी कायदा १९१२, ''सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.''

### ४.५.४ सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये :

१) **ऐच्छिक व खुले सभासदत्व –** सहकारी संस्था हे व्यक्तींचे संघटन आहे. कोणतीही व्यक्ती सहकारी संस्थेची सभासद होऊ शकते. सभासदत्व सर्वांना खुले असते. सभासदत्व देताना जात, धर्म, वंश, पंथ इ. गोष्टींचा विचार केला जात नाही.

२) **लोकशाही तत्त्व –** सहकारी संस्थेचे व्यवस्थापन हे लोकशाहीवर आधारित असते. सर्व निर्णय हे बहुमताने घेतले जातात. ''एक व्यक्ती – एक मत'' हा मतदानासाठीचा नियम असतो. सहकारी संस्था कायद्यानुसार सभासदांच्या सभांचे आयोजन केले जाते.

३. **व्यवस्थापन –** सहकारी संस्थेचा कारभार हा 'व्यवस्थापन समितीच्या' हाती असतो. सभासदांनी निवडून दिलेले हे कार्यकारी मंडळ (व्यवस्थापन समिती) सभासदाचे प्रतिनिधित्व करते. महत्त्वाचे निर्णय आणि दैनंदिन प्रशासन हे व्यवस्थापन समितीच्या मार्फत पाहिले जातात. त्यांच्याकडून संस्थेचे उपविधी/पोटनियम तयार केले जातात.

४) **नोंदणी –** सहकारी संस्थेची नोंदणी करणे सक्तीचे असते. प्रत्येक सहकारी संस्थेला भारतीय सहकारी कायदा १९१२ व सहकारी कायद्यामधील नियम व तरतुदींचे पालन करावे लागते. सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी किमान १० सभासदांची आवश्यकता असते. नोंदणीसाठी विविध कागदपत्रांची गरज असते.

५) **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व –** नोंदणी झाल्यावर प्रत्येक सहकारी संस्थेला कायदेशीर व्यक्ती म्हणून मान्यता मिळते. कायद्याने तिला स्वतंत्र अस्तित्व लाभते. त्यामुळे संस्थेला स्वत:च्या नावाने बँकेत खाते उघडणे, मालमत्ता धारण करणे व करार करण्यास मुभा मिळते. संस्थेचे भागधारक व व्यवस्थापन समिती सदस्य हे सहकारी संस्थेच्या व्यवहारांना जबाबदार नसतात. परंतु न्यायालयामध्ये त्यांना याचा जाब द्यावा लागतो.

६) **मर्यादित जबाबदारी –** सहकारी संस्थेच्या भागधारकांची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची असते. त्यांनी धारण केलेल्या भागांच्या देय रक्कमेइतकी त्यांची जबाबदारी मर्यादित असते. म्हणूनच सहकारी संस्थेची देणी फेडण्यासाठी सभासदांची खाजगी मालमत्ता वापरली जात नाही.

७) **सभासद संख्या –** सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी किमान १० सभासद एकत्र यावे लागतात. सहकारी संस्थेत कमाल किती सभासद असावेत यावर कायद्याने कोणतेही बंधन नसते.

८) **मतदानाचा समान हक्क –** भागधारक या नात्याने प्रत्येक सभासदाला मतदानाचा समान हक्क असतो. सहकारी संस्थेचे सभासदत्व सर्वांच्यासाठी खुले असते. एखाद्या भागधारकाने कितीही भाग धारण केले असले तरी त्याला इतर सभासदाप्रमाणे एकच मत देण्याचा अधिकार असतो.

९) **सेवा भाव –** सहकारी संस्था तिच्या सभासदांना अनेक प्रकारच्या सेवा-सुविधा पुरवितात. सभासदांना व समाजाला सेवा देणे हाच सहकारी संस्थेचा मुख्य हेतू असतो. सभासदांना अल्प दराने वस्तूंचा पुरवठा केला जातो. सहकारी बँका आपल्या सभासदांना, कर्ज आणि अधिविकर्ष सवलत ही अल्प व्याजदराने पूरवितात.



- **कृती –**

आपल्या शहरातील/गावातील सहकारी संस्थेला भेट द्या, त्यामधील कोणती वैशिष्ट्ये आढळली ते तपासा.

### ४.५.५ सहकारी संस्थांचे गुण :

१) **लोकशाही व्यवस्थापन –** सहकारी संस्थेच्या प्रत्येक सभासदाला समान मतदानाचा हक्क असतो. सहकारामध्ये 'एक व्यक्ती – एक मत' हे तत्त्व मतदानासाठी वापरले जाते. सभासद संख्या असंख्य असून ते विविध भागात विखुरलेले असतात. म्हणून संस्थेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी ते आपल्या प्रतिनिधींची निवड करतात. त्या प्रतिनिधींनाच ''व्यवस्थापन समिती सदस्य'' असे म्हणतात .

२) **खुले सभासदत्व –** सहकारी संस्थेचे सभासदत्व हे ऐच्छिक असून ते सर्वांच्यासाठी खुले असते. म्हणजेच कोणत्याही जाती-धर्माची, संप्रदायातील व्यक्ती सहकारी संस्थेचे भाग खरेदी करून सभासद होऊ शकते. सभासद होण्यास किंवा सभासदत्व रद्द करण्यास कोणीही सक्ती करू शकत नाही.

३) **व्यवसाय चालविण्याचा खर्च कमी –** सहकारी संस्था चालविण्यासाठी अतिशय कमी खर्च येतो. येथे कोणीही मध्यस्थ नसतो. संस्थेला जाहिरात करावी लागत नाही. त्यांना कोणताही पगार द्यावा लागत नाही. नोंदणी शुल्क, आयकर इ. बाबतीत सरकारकडून विशेष सवलती व सूट दिली जाते. त्यामुळेच व्यवसाय चालविण्याचा खर्च कमी येतो.

४) **मर्यादित जबाबदारी –** सहकारी संस्थेच्या सभासदांची जबाबदारी ही मर्यादित असते. त्यांनी धारण केलेल्या भागांवरील देय रक्कमे एवढी त्यांची जबाबदारी मर्यादित असते. त्यामुळे कर्जफेडीसाठी व्यवसायाची मालमत्ता अपुरी पडली तरी सभासदांची खाजगी मालमत्ता उपयोगात आणली जात नाही.

५) **कर सवलत –** सहकारी संस्था देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यामुळे सरकार, सहकारी संस्थाना अनेक सवलती देते. उदा. एका ठरावीक मर्यादेपर्यंत आयकरात सवलत. परिणामी संस्थेचा नफा वाढू शकतो.

६) **स्वयं-अर्थसाहायता व सामाजिक कल्याण –** सहकारी संस्था कायद्यातील सुधारित दुरूस्तीनुसार सहकारी संस्था आपल्या सभासदांना जास्तीत जास्त १५% वार्षिक दराने लाभांश देऊ शकतात. त्यामुळे उर्वरित आधिक्याचा स्वयं-अर्थसाहाय्य म्हणून उपयोग केला जातो. नफ्यातील कांही भाग सामाजिक कार्यासाठी, सहकारी संस्थेच्या विकासासाठी आणि धर्मादाय (दानधर्म) कार्यासाठी वापरला जातो.

### ४.५.६ सहकारी संस्थेचे दोष :

१) **मर्यादित भांडवल –** सहकारी संस्थेच्या भागांची दर्शनी किंमत ही फार कमी असते. सहकारी संस्थेचे सभासद हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील असतात. त्यामुळे ते जास्त भाग घेऊ शकत नाहीत. त्यामुळे संस्थेचे भांडवल मर्यादित असते. लाभांशाचा दर कमी असल्याने लोक गुंतवणुकीसाठी फारसे उत्सुक नसतात. या सर्व कारणांच्यामुळेच भांडवल उभारणीवर मर्यादा पडतात.

२) **अकार्यक्षम व्यवस्थापन –** सहकारी संस्थेचा कारभार हा व्यवस्थापन समितीच्या हाती असतो. व्यवस्थापन समिती सदस्य हे सभासदांचे प्रतिनिधी असतात. त्यांच्याकडे व्यवस्थापकीय कौशल्य असेलच असे नाही. मर्यादित भांडवल किंवा आर्थिक परिस्थितीमुळे व्यावसायिक व्यवस्थापकांची नेमणूक करणे त्याना शक्य नसते. व्यवस्थापन समितीचे सदस्यसुद्धा व्यावसायिक नसतात. त्यामुळेच सहकारी संस्थेचे व्यवस्थापन अकार्यक्षम ठरते.

३) **जनतेचा कमी विश्वास –** बहुतांशी अनेक सहकारी संस्था या राजकीय व्यक्तींच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या असतात. त्यामुळेच सहकारी संस्थांमध्ये मोठ्याप्रमाणावर राजकीय हस्तक्षेप असतो. परिणामी, सहकारी संस्थांवर जनता फारसा विश्वास ठेवत नाही.

४) **मर्यादित विस्तार –** सहकारी संस्थांच्या भांडवल उभारणीवर मर्यादा पडतात. तसेच व्यवस्थापनाच्या अकार्यक्षमतेमुळे आव्हानात्मक प्रकल्प हाती घेता येत नाहीत. त्यामुळे सहकारी संस्थांच्या विस्तारावर मर्यादा राहतात.

५) **प्रेरणेचा अभाव –** सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य हे मानधनावर संस्थेचा कारभार पाहतात. त्यामुळे व्यवस्थापनात काम करण्याचा त्यांचा उत्साह कालांतराने कमी होतो. तसेच इतर क्षेत्राशी तुलना करता व्यवस्थापकांनासुद्धा फार कमी पगार मिळतो. परिणामी सहकारी संस्थेच्या सेवकात व व्यवस्थापनात प्रेरणा व उत्साहाचा अभाव असतो.

### ४.५.७ सहकारी संस्थांचे प्रकार :

१. **ग्राहक सहकारी संस्था –** दैनंदिन गरजांच्या वस्तू माफक किंमतीमध्ये उपलब्ध करून घेण्यासाठी ग्राहक एकत्र येऊन ग्राहक सहकारी संस्था स्थापन करतात. या संस्था प्रत्यक्ष उत्पादक व घाऊक व्यापाऱ्यांच्याकडून वस्तूंची खरेदी करतात त्यामुळे मध्यस्थांचा नफा लुप्त पावतो.

या संस्थांच्यामुळे गरीब व मध्यमवर्गीय ग्राहकाची व्यापाऱ्यांच्याकडून होणारी अनाठायी पिळवणूक कमी होते. संस्थेला होणारा नफा हा ग्राहकांनी संस्थेबरोबर वर्षभर केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात वाटला जातो.

भारतामध्ये ग्राहक सहकारी संस्था किंवा सहकारी भांडारे हे प्रामुख्याने शहरी भागात काम करतात. सरकारच्या नियंत्रणाखाली काम करणारी ''सुपर बझार'' हे ग्राहक सहकारी संस्थांचे उदाहरण आहे.

२. **उत्पादकांची सहकारी सोसायटी –** स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी व उत्पादनात वाढ करण्यासाठी लहान उत्पादक व कारागीर यांनी एकत्रित स्थापन केलेल्या संस्थेला उत्पादकांची सहकारी सोसायटी असे म्हणतात. या संस्थेचे दोन उपप्रकार पुढील प्रमाणे–

**(अ) औद्योगिक सेवा सोसायटी –**

या प्रकारामध्ये उत्पादक स्वतंत्रपणे उत्पादन करतात व औद्योगिक उत्पादन सहकारी संस्थेला विकतात. सभासदाना कच्चा माल, औजारे, उपकरणे, यंत्रे संस्थेमार्फत पुरविली जातात. सभासदाच्या उत्पादनाचे वितरण संस्थेमार्फत केले जाते.

**(ब) उत्पादकांच्या संस्था –**

या प्रकारामध्ये उत्पादक सभासदाना संस्थेचे कर्मचारी मानले जाते व त्यांच्या कामाबद्दल त्यांना मजुरी दिली जाते. प्रत्येक सभासदाला कच्चा माल व उपकरणे संस्थेमार्फत पुरविली जातात.

सभासद हे सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या घरी वस्तूचे उत्पादन करतात. संस्थेमार्फत ते उत्पादन बाजारपेठेत विकले जाते आणि होणारा नफा सभासदांच्यामध्ये वाटला जातो.

३. **विपणन सहकारी संस्था –** ज्यांना आपले उत्पादन योग्य/वाढीव किंमतीला विकावे असे वाटते अशा स्वतंत्र शेतकरी उत्पादकांनी स्वेच्छेने स्थापन केलेली संस्था म्हणजे विपणन सहकारी संस्था होय. अनेक सभासदांचे उत्पादन एकत्र करून केंद्रीय पद्धतीने विकले जाते. त्यांनी केलेल्या उत्पादनाच्या प्रमाणात होणारा नफा विभागला जातो.

४. **शेती सहकारी संस्था –** मोठ्या प्रमाणावरील एकत्रित शेतीचे आर्थिक लाभ घेण्यासाठी लहान शेतकऱ्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेल्या संस्थेला शेती सहकारी संस्था असे म्हणतात. भारतामध्ये शेतकरी हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून त्यांची जमीन धारणा अल्प असते.

आधुनिक उपकरणे, बी-बीयाणे, खते इ. चा वापर करण्याची त्यांची वैयक्तिक क्षमता नसते, म्हणून जास्तीत जास्त कृषी उत्पादन वाढविण्यासाठी जमिनीचे एकत्रीकरण करून सामुदायिक शेती हा सर्वोत्तम पर्याय आहे.

५. **सहकारी गृहनिर्माण संस्था –** स्वत:ची घरांची गरज पूर्ण करण्यासाठी अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींनी स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था होय. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे विविध प्रकार आहेत. कांही संस्था जमीन खरेदी करून आपल्या सभासदांना स्वत:ची घरे बांधण्यासाठी जागा (Plots) उपलब्ध करून देतात.

वित्तीय संस्थांच्याकडून व सरकारी एजन्सीकडून कर्जाची सोयसुद्धा या संस्थांच्याकडून उपलब्ध करून दिली जाते. इतर संस्था गृहसंकुले बांधून आपल्या सभासदांना हप्त्याने पैसे देण्याच्या अटीवर घरांचे वाटप करतात.

६. **सहकारी पतसंस्था –** सभासदांच्यामध्ये बचतीची सवय निर्माण करण्यासाठी व व्यक्तींना आर्थिक मदत करण्यासाठी गरीब व्यक्ती या संस्थेची स्थापना करतात. सावकारांच्याकडून सभासदांची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी या संस्था मदत करतात.

## ४.६ संयुक्त भांडवली संस्था :

### ४.६.१ प्रस्तावना :

तुम्ही रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, टाटा स्टील लिमिटेड, स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, मारुती उद्योग लिमिटेड इ. बद्दल ऐकले असेलच. या संस्थांचे मालक कोण? या संस्था जगभरात पसरल्या आहेत. या कशा अस्तित्वात आल्या? यांचे व्यवस्थापन कोण करते? अशा प्रकारच्या संघटनेबाबत आता आपण शिकू.

औदयोगिक क्रांतीनंतर व्यवसायाच्या पारंपरिक प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाले. याच काळात व्यवसाय संघटनेचा नवीन प्रकार 'संयुक्त भांडवली संस्था' या नावाने अस्तित्वात आला. एकल व्यापारी संस्था किंवा भागीदारीपेक्षा यांना असणारी भांडवल अणि इतर संसाधनांची गरज जास्त असते.

### ४.६.२ अर्थ :

कंपनी ही व्यक्तींनी एकत्र येऊन स्थापन केलेली ऐच्छिक संस्था असून यामध्ये सर्व व्यक्ती भाग-भांडवलाच्या रूपात योगदान देतात. ते कायद्यानुसार चालणारा विशिष्ट व्यवसाय चालवतात.

संयुक्त भांडवली संस्थेचे एकूण भांडवल हे **'भाग भांडवल'** म्हणून ओळखले जाते. जे अनेक लहान भागात विभागलेले असते त्यास **'भाग'** म्हणून ओळखले जाते. प्रत्येक सभासद भाग धारण करतात. त्यांना भागधारक असे म्हंटले जाते. भारतात संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी 'कंपनी कायदा २०१३' नुसार होते.

### ४.६.३ व्याख्या :

१) 'कंपनी म्हणजे स्वेच्छेने स्थापन झालेली संघटना आहे. त्यामध्ये नफा मिळविला जातो, भांडवल छोट्या छोट्या भागात विभागलेले असते, हे भाग हस्तांतरणीय असतात आणि मालकी सदस्यांची असते.'

**– प्रा. एल. एच्. हॅने.**

२) 'कंपनी कायद्याच्या दृष्टीने केवळ एक कृत्रिम, अदृश्य, स्पर्श न करता येणारी विद्यमान व्यक्ती आहे तिची स्थापना कंपनी कायद्यानुसार समान हेतूने केली जाते व त्यामुळे तिला काही वैशिष्ट्ये प्राप्त होतात'.

**– चिफ जस्टीस मार्शल.**

३. भारतीय कंपनी कायदा, २०१३, कलम २(२०) नुसार, ''या कायदयाने नोंदविलेली किंवा पूर्वीच्या कायद्याने (कंपनी कायदा, १९५६) अस्तित्वात असलेली संस्था/प्रमंडळ म्हणजे कंपनी होय.''

### ४.६.४. संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये :

१. **ऐच्छिक संघटन –** संयुक्त भांडवली संस्था म्हणजे व्यक्तींचे ऐच्छिक संघटन होय. कोणत्याही जात, धर्म, पंथाची व्यक्ती कोणत्याही कंपनीचे भाग खरेदी करू शकते. आपल्या इच्छेनुसार सभासद आपल्या भागांची कधीही विक्री करू शकतात. मृत्यूनंतर कंपनीचे भाग त्याच्या वारसदारास हस्तांतरित होतात.

२. **नोंदणीकृत संस्था –** भारतीय कंपनी कायदा, २०१३ नुसार प्रत्येक संयुक्त भांडवली संस्थेला नोंदणी करणे सक्तीचे असते. नोंदणी केल्याशिवाय कोणतीही संयुक्त भांडवली संस्था अस्तित्वात येऊ शकत नाही. त्यानंतर कंपनीला कंपनी निबंधकाकडून (रजिट्रार) 'नोंदणीचे प्रमाणपत्र' मिळते. या प्रमाणपत्रालाच कंपनीच्या जन्माचा दाखला असेही म्हणतात. नोंदणीसाठी प्रवर्तकाने नोंदणी फी भरणे आवश्यक असते. त्याबरोबर खाजगी व सार्वजनिक कंपनी सुरु करण्यासाठी कंपनी सुरु करण्याचे प्रमाणपत्र आवश्यक असते.

३. **नोंदणीकृत कार्यालय –** 'घटनापत्रकातील' स्थल कलमानुसार कंपनीचा नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता असणे बंधनकारक आहे. कंपनीची महत्त्वाची सर्व कागदपत्रे नोंदणीकृत कार्यालयात ठेवली पाहिजेत. उदा. सभासद नोंदवही, वार्षिक विवरणपत्रे, इतिवृत्त पुस्तक, घटनापत्रक, माहितीपत्रक इ.

४. **कृत्रिम व्यक्ती –** कंपनी ही कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती आहे. तिला तिचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते. त्रयस्थांच्याबरोबर ती करार करू शकते. उदा. मालमत्तेची खरेदी व विक्री, बँकेत खाते उघडणे इ.

५. **स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व –** कंपनीची स्थापना कायदयानुसार झालेली असते. कंपनीला तिच्या सभासदांच्यापासून स्वतंत्र-कायदेशीर अस्तित्व लाभते.

६. **बोधचिन्ह –** संयुक्त भांडवली संस्था कायदयाने निर्मित कृत्रिम व्यक्ती असते परंतु तिला व्यक्तीसारखे भौतिक अस्तित्त्व नसते. म्हणूनच कंपनी बोधचिन्हाचा उपयोग स्वत:ची अधिकृत सही म्हणून करते. बोधचिन्ह हे कंपनीची ओळख योग्य प्रकारे दर्शविते.

कंपनीच्या बोधचिन्हावर कंपनीचे नाव लिहिलेले असते. बोधचिन्ह ही कंपनीची महत्त्वाची संपत्ती मानतात. त्यामुळे ते कंपनी चिटणीसाच्या ताब्यात सुरक्षित असते. कंपनीच्या सर्व महत्त्वाच्या कागदपत्रावर व करारांवर बोधचिन्ह छापण्यात येते. अशा कागदपत्रांवर किमान दोन संचालक व चिटणीसाची सही आवश्यक असते.

७. **मर्यादित जबाबदारी –** संयुक्त भांडवली संस्थेच्या भागधारकांची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची असते. त्यांनी धारण केलेल्या भागांच्या न दिलेल्या रक्कमेइतकी ती मर्यादित असते. जरी कंपनीची मालमत्ता कंपनीची देणी भागविण्याइतकी पुरेशी नसली तरीही कंपनीची देणी फेडण्यासाठी भागधारकांची खाजगी मालमत्ता वापरली जात नाही.

८. **भागांचे हस्तांतरण –** कंपनीचे एकूण भांडवल लहान लहान भागात विभागलेले असते. भागांची खरेदी हीच सभासदत्वाची अट असते. कंपनीचे सभासद होण्यासाठी भागांची खरेदी करणे आवश्यक आहे.

**'सार्वजनिक मर्यादित कंपनीच्या'** भागांचे हस्तांतर करता येते. तथापि खाजगी कंपनीच्या भागांचे मुक्तपणे हस्तांतर करता येत नाही.

९. **मालकी व व्यवस्थापन फारकत –** संयुक्त भांडवली संस्थेचे असंख्य सभासद असतात. कंपनीच्या दैनंदिन प्रशासनात ते भाग घेऊ शकत नाहीत. त्यामुळे आपले प्रतिनिधी म्हणून ते **'संचालकांची'** निवड करतात. संचालक हे सभासदाच्या वतीने व्यवसायाची कार्ये पार पाडतात. थोडक्यात सभासद हे कंपनीचे 'मालक' असतात. परंतु कंपनीचे व्यवस्थापन हे संचालक मंडळाच्या हाती असते.

संचालक काही व्यावसायिक व्यवस्थापकांना नियुक्त करतात. त्यांना पगार दिला जातो. संयुक्त भांडवली संस्थेत मालकी ही भागधारकांकडे असते व व्यवस्थापन हे संचालकांकडे असते.

१०. **चिरंतन अस्तित्व –** संयुक्त भांडवली संस्थेला स्थिर व सातत्यपूर्ण अस्तित्व लाभते. सभासदांच्या अस्तित्वावर कंपनीचे अस्तित्व अवलंबून नसते. सभासद वेडा झाल्याने, दिवाळखोर ठरल्याने किंवा मृत्यू पावल्याने कंपनीच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नाही.

११. **सभासदत्व –** कंपनी कायदा २०१३ नुसार खाजगी मर्यादित कंपनीमध्ये किमान दोन (२) व कमाल दोनशे (२००) इतके मर्यादित सभासद असतात. परंतु सार्वजनिक कंपनीसाठी किमान सात (७) सभासदांची आवश्यकता असते तर कमाल सभासद संख्येवर कोणतेही बंधन नसते.

### ४.६.५ संयुक्त भांडवली संस्थेचे गुण :

१. **मोठ्या प्रमाणावर भांडवल –** संयुक्त भांडवली संस्थेचे भाग जनतेसाठी विक्रीस खुले असतात. भागांची दर्शनी किंमत व लाभांशाचा दर तुलनेने जास्त असतो. कंपनीच्या माहितीपत्रकास मोठ्याप्रमाणात प्रसिद्धी देऊन असंख्य व्यक्तींशी संपर्क साधून व त्यांना सभासद करून मोठ्याप्रमाणावर भांडवल उभारणी केली जाते. तसेच जनतेकडून ठेवी स्वीकारल्या जातात व कर्जरोख्यांची विक्रीही केली जाते.

२. **व्यावसायिक व्यवस्थापन –** कंपनीचे व्यवस्थापन हे संचालकांच्या हाती असते. संचालक हे सभासदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. कंपनीच्या कारभारावर त्यांचे नियंत्रण असते. परंतु दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी व्यावसायिक व्यक्तींची गरज असते. कंपनीकडे आर्थिक स्रोत प्रचंड असल्यामुळे चांगला पगार देऊन ते तज्ज्ञ व्यावसायिक व्यवस्थापकांची नेमणूक करू शकतात. त्यामुळे कंपनीच्या दैनदिन कामकाजासाठी तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा व सेवेचा फायदा घेता येतो.

३. **विस्तारास मोठ्या प्रमाणात संधी –** संयुक्त भांडवली संस्था मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करते. आकर्षक पगार देऊन व्यावसायिक व्यवस्थापकांची नेमणूक केली जाते. योग्य निर्णय घेण्याचे त्यांना स्वातंत्र्य असते. भागधारकसुद्धा जास्त लाभांश मिळविण्यासाठी उत्सुक असतात. परिणामी कंपनी मोठे व आव्हानात्मक प्रकल्प हाती घेते. त्यामुळेच कंपनीच्या विस्तारास मोठ्या प्रमाणावर संधी असते.

४. **जनतेचा विश्वास –** 'कंपनी कायदा २०१३' मधील तरतुदीनुसार संयुक्त भांडवली संस्थेचे कामकाज चालते. कंपनीच्या कारभारात सरकारचा हस्तक्षेप कमी असतो. तसेच कायद्यानुसार कंपनीचे हिशेब सनदी लेखापालाकडून (CA) तपासून घेतले जातात त्यामुळे कंपनीच्या व्यवस्थापनावर जनतेचा विश्वास बसतो.

५. **करात सवलत –** देशाच्या आर्थिक विकासामध्ये संयुक्त भांडवली संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते. कंपनीला ठरावीक शासकीय कर द्यावे लागतात. अर्थव्यवस्थेतील कंपनीच्या योगदानामुळे काही करात सूट तर काही करात सवलत दिली जाते. उदा. ५ वर्षे कर माफ परिणामी आर्थिकदृष्ट्या मागास भागामध्ये कंपनी आपल्या उद्योग-शाखा सुरू करू शकते.

६. **तज्ज्ञांच्या सेवा –** व्यावसायिक कामे पाहण्यासाठी कंपनी तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करू शकते. उदा. कायदेशीर सल्लागार, आर्थिक सल्लागार, हिशोब तपासनीस, व्यवस्थापकीय तज्ज्ञ, इंजिनिअर्स, जाहिरात तज्ज्ञ, विक्री तज्ज्ञ इ. या व्यक्तीच्या ज्ञानाचा व मार्गदर्शनाचा फायदा कंपनीला मिळतो.

७. **चिरंतन अस्तित्व –** संयुक्त भांडवली संस्था ही कृत्रिम व्यक्ती आहे. त्यामुळे तिला स्वतंत्र असे कायदेशीर अस्तित्व लाभते. एखाद्या भागधारकाचा मृत्यू झाल्यास, तो वेडा ठरल्यास किंवा त्याची दिवाळखोरी जाहीर झाल्यास त्याचा कंपनीच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम होत नाही. म्हणूनच कंपनीला चिरंतन व दीर्घकाळ टिकणारे अस्तित्व मिळते.

८. **मर्यादित जबाबदारी –** सार्वजनिक कंपनीमध्ये भागधारकांची जबाबदारी त्यांनी खरेदी केलेल्या भागांच्या दर्शनी किंमतीच्या न भरलेल्या रकमेइतकी असते. कंपनीचे सभासद कंपनीची देणी देण्यासाठी जबाबदार नसतात. त्यामुळे त्यांची खाजगी मालमत्ता कंपनीची देणी देण्यासाठी वापरता येत नाही.

### ४.६.६. संयुक्त भांडवली संस्थेचे दोष :

१) **स्थापन करण्यास कठीण –** संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी करणे सक्तीचे असते, त्यासाठी अनेक कायदेशीर कागदपत्रांची गरज असते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोंदणी शुल्क भरावे लागते. व्यवसाय प्रारंभ दाखला/प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय सार्वजनिक कंपनी आपला व्यवसाय सुरू करू शकत नाही. कंपनीच्या नोंदणीची प्रक्रिया क्लिष्ट, खर्चिक व वेळखाऊ असते. म्हणूनच कंपनी स्थापन करण्यास कठीण असते.

२) **गोपनियतेचा अभाव –** कंपनीमध्ये असंख्य भागधारक व कर्ज रोखेधारक असतात. गुंतवणुकदारांच्या हितांची जोपासना करण्यासाठी प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये आपले वार्षिक हिशेब त्यांना जाहीर करावे लागतात. कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, कंपनीचे महत्त्वाचे दस्तऐवज तपासणीसाठी ठेवले जातात. त्यामुळे कंपनीच्या सांपत्तीक/आर्थिक परिस्थितीची माहिती स्पर्धकांना मिळते. परिणामी कंपनीच्या व्यवहाराबाबत गोपनीयतेचा अभाव दिसतो.

३) **वेळखाऊ निर्णय प्रक्रिया –** कंपनीचा मालक या नात्याने प्रत्येक सभासदाला व्यवस्थापनात भाग घेण्याचा अधिकार असतो. त्यामुळे सर्व महत्वपूर्ण निर्णय हे भागधारकांच्या सभेतच घेतले जातात. सभेचे आयोजन करणे ही प्रक्रिया दीर्घ व वेळखाऊ स्वरूपाची असते. त्यासाठी सभेची सूचना, कार्यक्रमपत्रिका, प्रतिनिधी

पत्र तयार करावी लागतात. वरील सर्व कागदपत्रे सभेपूर्वी २१ दिवस अगोदर पाठवावी लागतात. म्हणूनच निर्णय प्रक्रियेस विलंब लागतो.


४) **प्रत्यक्ष संबंधाचा अभाव –** संयुक्त भांडवली संस्थेमध्ये असंख्य सभासद असतात. वरिष्ठांनी/अधिकाऱ्यांनी कामाची दखल घ्यावी असे कर्मचाऱ्यांना वाटत असते. परंतु संयुक्त भांडवली संस्थेसारख्या मोठ्या व्यवसाय संघटनेमध्ये हे शक्य नसते. त्याचाच परिणाम म्हणजे कर्मचारी झोकून काम करीत नाहीत.

त्याचप्रमाणे कंपनीचे व्यवस्थापक व संचालक सुद्धा ग्राहकांबरोबर व्यक्तिगत संबंध प्रस्थापित करू शकत नाहीत. कित्येक वेळा ग्राहकांच्या आवडी व निवडींचा विचार केला जात नाही.

५) **व्यवसायाचा खर्च अधिक (मोठा व्यवस्थापन खर्च) –** संयुक्त भांडवली संस्था ही व्यावसायिक संघटना आहे. ही संस्था जाहिरात व प्रसिद्धीसाठी प्रचंड खर्च करण्यास तयार असते. व्यवस्थापकांना चांगला पगार व इतर लाभ मिळतात. त्यामुळे दैनंदिन खर्चासाठी अधिक पैशाची गरज असते. म्हणूनच संयुक्त भांडवली संस्थेमध्ये व्यवस्थापनाचा खर्च जास्त असतो.

६. **माहितीचा गैरवापर –** संयुक्त भांडवली संस्थेचे व्यवस्थापन संचालक पाहतात. काही संचालक कंपनीच्या महत्त्वाच्या अंतर्गत माहितीचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करतात. याचा परिणाम म्हणजे अचानकपणे कंपनीच्या भागांच्या किंमतीत चढ-उतार होतो. परिणामी जनतेचा संयुक्त भांडवली संस्थेवरील विश्वास कमी होतो.

### ४.६.७ संयुक्त भांडवली संस्थेचे प्रकार :



- **भागांनी मर्यादित कंपनी –** भागांनी मर्यादित कंपनीचे पुढील दोन प्रकार आहेत.

**अ) खाजगी मर्यादित कंपनी –** कंपनी कायदा २०१३ नुसार, "**खाजगी कंपनी**" म्हणजे अशी कंपनी की जी आपल्या नियमावलीद्वारे सभासदांचा भागहस्तांतराचा हक्क निर्बंधित करते. सभासदांची संख्या २०० पर्यंत मर्यादित करते आणि तिचे भाग अथवा कर्जरोखे घेण्यासाठी लोकांना जाहीरपणे आवाहन करण्यास प्रतिबंध करते.

- **या व्याख्येची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :**

१) सभासदांची संख्या किमान २ तर कमाल २०० इतकी मर्यादित असते.

२) भांडवल उभारण्यासाठी भागांची विक्री केली जात नाही.

३) कंपनीचे सभासद, संचालक किंवा त्यांचे नातेवाईक यांच्याव्यतिरिक्त इतरांकडून ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध करते.

४) कंपनीचे भाग अथवा कर्जरोखे घेण्यासाठी लोकांना जाहिरपणे आवाहन करण्यास प्रतिबंध करते.

५) सभासदांना आपले भाग इतरांना हस्तांतर करण्यावर निर्बंध घालते.

वर सांगितलेल्या सर्व अटींची पूर्तता खाजगी कंपनीने केली पाहिजे. यापैकी कोणत्याही एका अटीची पूर्तता झाली नाही तर त्या कंपनीस सार्वजनिक कंपनी असे म्हटले जाईल. खाजगी कंपनी ही मर्यादित कंपनी असल्यामुळे आपल्या नावाच्या शेवटी "**खाजगी मर्यादित**" हा शब्द जोडला पाहिजे. खाजगी मर्यादित कंपनी ही भागांनी मर्यादित कंपनी, हमीने मर्यादित कंपनी किंवा अमर्यादित कंपनी असू शकते.

**ब) सार्वजनिक कंपनी –** कंपनी कायदा २०१३ नुसार "**जी कंपनी खाजगी कंपनी नाही ती सार्वजनिक कंपनी होय**".

- **वैशिष्ट्ये :**

१) सभासदांची संख्या कमीत कमी सात असते.

२) भागांची विक्री करुन भांडवल उभे केले जाते.

३) सभासदांच्या भाग हस्तांतरणावर बंधने नसतात.

४) सार्वजनिक ठेवी स्वीकारण्यास कोणतेही बंधन नसते.

सार्वजनिक कंपनीच्या स्थापनेसाठी कमीत कमी ७ सभासद आवश्यक असतात. कमाल सभासद संख्येवर कोणतीही मर्यादा नसते. सार्वजनिक कंपनीमध्ये कमीत कमी ३ संचालक असतात. सार्वजनिक कंपनीच्या नावाच्या शेवटी 'मर्यादित' हा शब्द वापरला जातो.

- **कृती**



खालील कंपन्यांचे खाजगी कंपनी व सार्वजनिक कंपनीमध्ये वर्गीकरण करा. बँक ऑफ इंडिया, बजाज, बी.एस्.एन्.एल्., हिंदुस्थान मशिन टूल्स्, टाटा मोटर्स्.

## तौलनिक अभ्यास

| अ.क्र. | मुद्दे | खाजगी मर्यादित कंपनी | सार्वजनिक मर्यादित कंपनी |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | जी कंपनी आपल्या नियमावलीद्वारे भाग हस्तांतरास परवानगी देत नाही व ज्यात २०० इतकी सभासद संख्या मर्यादित असते, तिला खाजगी कंपनी असे म्हणतात. | जी कंपनी खाजगी नाही तिला सार्वजनिक कंपनी असे म्हणतात. |
| २. | सभासद संख्या | खाजगी कंपनीमध्ये कमीत कमी २ सभासद व जास्तीत जास्त २०० सभासद असतात. | सार्वजनिक कंपनीमध्ये कमीत कमी ७ सभासद असतात व कमाल सभासद संख्येवर कोणतेही बंधन नसते. |
| ३. | भांडवल | भांडवल उभारण्यासाठी भागांची विक्री केली जात नाही. | भागांची विक्री करुन भांडवल उभे केले जाते. |
| ४. | संचालक संख्या | खाजगी कंपनीमध्ये किमान २ संचालक असावे लागतात | सार्वजनिक कंपनीमध्ये किमान ३ संचालक असावे लागतात |
| ५. | भागांचे हस्तांतरण | खाजगी कंपनीच्या भागांचे मुक्तपणे हस्तांतर करता येत नाही. | सार्वजनिक कंपनीच्या भागांचे मुक्तपणे हस्तांतर करता येते. |
| ६. | नाव | खाजगी कंपनीत नावाच्या शेवटी 'खाजगी मर्यादित' असा शब्द असला पाहिजे. | सार्वजनिक कंपनीत नावाच्या शेवटी 'मर्यादित' असा शब्द असला पाहिजे. |
| ७. | माहितीपत्रक | खाजगी कंपनी 'माहितीपत्रक' प्रसिद्ध करू शकत नाही. | सार्वजनिक कंपनी 'माहितीपत्रक' प्रसिद्ध करू शकते. |

## तुलनात्मक अभ्यास

| अ.क्र. | मुद्दे | एकल व्यापारी व्यवसाय | भागीदारी संस्था | अविभक्त हिंदू कुटुंब व्यवसाय | सहकारी संस्था | प्रमंडळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अर्थ | मालकी व व्यवस्थापन एकाच व्यक्तीकडे. | व्यवसाय करणेसाठी किमान दोन व्यक्ती एकत्र याव्या लागतात. | वंशपरंपरागत व्यवसाय हिंदू कुटुंबातील सदस्य चालवितात. | आपल्या सभासदांना सेवा देण्यासाठी स्थापन केलेला ऐच्छिक संघटन प्रकार. | भागांचे हस्तांतर करता येणारी, सभासदांच्या मालकीची असणारी कृत्रिम व्यक्ती. |
| २. | सभासद संख्या | एक आणि एकच व्यक्ती | किमान दोन तर कमाल ५० भागीदार | सभासद संख्येवर कोणतेही बंधन नसते. | किमान १० तर कमाल संख्येवर बंधन नसते. | खाजगी कंपनी– किमान २ तर कमाल २०० सार्वजनिक कंपनी किमान–७ कमाल – अमर्यादित. |
| ३. | नोंदणी | नोंदणी करणे सक्तीचे नसते. | भारतात नोंदणी ऐच्छिक परंतु, महाराष्ट्रात सक्तीची. | नोंदणी करणे सक्तीचे नसते. | नोंदणी करणे सक्तीचे. | नोंदणी करणे सक्तीचे. |
| ४. | जबाबदारी | जबाबदारी ही अमर्यादित असते | जबाबदारी ही अमर्यादित व संयुक्त असते. | कर्त्याची जबाबदारी अमर्यादित तर इतरांची मर्यादित. | भागांच्या दर्शनी मूल्याइतकी मर्यादित. | भागांच्या दर्शनी मूल्याइतकी मर्यादित. |
| ५. | भांडवल | तुलनेने अल्प भांडवल | तुलनेने अधिक भांडवल | पूर्वजांची संपत्ती हेच भांडवल. | तुलनेने जास्त भांडवल. | प्रचंड प्रमाणात भांडवल उभारणी. |
| ६. | गोपनीयता | या व्यवसायात जास्तीत जास्त गोपनीयता राखता येते. | गोपनीयता भागीदारांच्या पुरती मर्यादित राहते. | कौटुंबिक पातळीवर गोपनीयता राखली जाते. | व्यावसायिक गुप्तता कमी | व्यावसायिक गुप्तता कमी |
| ७. | व्यवस्थापन | एकच व्यक्तीकडे व्यवसायाचे व्यवस्थापन असते. | सर्व भागीदारांना व्यवसाय व्यवस्थापनाचे समान अधिकार असतात. | कर्त्याकडे सर्व व्यवसायाचे अधिकार असतात. | संचालक मंडळाकडे व्यवस्थापनाचे अधिकार असतात. | संचालक मंडळ व्यवस्थापन पाहते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | स्थैर्य | या व्यवसायाला दिर्घकाळ टिकणारे स्थैर्य नसते. | या व्यवसायाला दिर्घकाळ टिकणारे स्थैर्य नसते. | पहिल्या दोन व्यवसायाच्या तुलनेत अधिक स्थैर्य लाभते. | स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वामुळे दीर्घकाळ स्थैर्य लाभते. | स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वामुळे दीर्घकाळ टिकणारे स्थैर्य लाभते. |
| ९. | सरकारी नियंत्रण | सरकारचा हस्तक्षेप कमी | सरकारी हस्तक्षेप कमी असतो. | सरकारचा हस्तक्षेप हा मर्यादित राहतो. | या व्यवसायावर पूर्णपणे सरकारी नियंत्रण असते. | या व्यवसायावर पूर्णपणे सरकारी नियंत्रण असते. |
| १०. | कायदा | स्वतंत्र असा कोणताही कायदा या व्यवसायासाठी नाही. | भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार व्यवसाय करावा लागतो. | हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व हिंदू कायदा लागू. | भारतीय सहकारी कायदा १९१२ व संबधित राज्याचे कायदे लागू. | भारतीय कंपनी कायदा २०१३ लागू. |
| ११. | स्थापना (प्रक्रिया) | सहज व सुलभ स्थापना. | भारतीय भागीदारी कायदा व भागीदारी करार. | तुलनेने स्थापना पद्धत सुलभ. | कमी खर्चीक पण वेळखाऊ स्थापना प्रक्रिया | स्थापना प्रक्रिया खर्चीक, वेळखाऊ व गुंतागुंतीची असते. |
| १२. | मतदानाचा हक्क | -- | -- | -- | एक व्यक्ती - एक मत हे तत्त्व लागू असते. | एक भाग - एक मत हे तत्त्व लागू असते. |

## सारांश

● खाजगी क्षेत्र –खाजगी क्षेत्र म्हणजे अर्थव्यवस्थेतील असे एक अंग की जे नफा मिळविण्यासाठी व्यक्तींकडून, व्यक्तीसमूहाकडून किंवा कंपनीकडून चालविले जाते व सरकारचे यावर नियंत्रण असते.

उदा. एकल व्यापारी संघटना, भागीदारी संस्था, एकत्र हिंदू-कुटुंब पद्धती व्यवसाय, संयुक्त भांडवली संस्था, सहकारी संस्था.

**१) एकल व्यापारी संघटना –** एकल व्यापारी व्यवसाय संघटनेमध्ये एकच व्यक्ती व्यवसायाचा मालक असते.

● **वैशिष्ट्ये –**

१) व्यक्तिगत मालकी

२) नफ्यात किंवा धोक्याच्या जबाबदारीत वाटेकरी नाही.

३) स्वयंरोजगार

४) स्थानिक बाजारपेठेत कार्य

५) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वाचा अभाव

६) कमीत कमी सरकारी नियमन

७) अमर्यादित जबाबदारी.

- **गुण –**

१) सुलभ स्थापना
२) त्वरित निर्णय
३) प्रचंड गोपनीयता
४) प्रत्यक्ष प्रेरणा
५) लवचीकता
६) कमी खर्च
७) कार्यक्षमता

- **दोष –**

१) मर्यादित भांडवल
२) मर्यादित व्यवस्थापकीय कौशल्य
३) अमर्यादित जबाबदारी
४) स्थैर्याचा अभाव
५) विशेषिकरणाचा अभाव
६) मोठ्या प्रकारच्या उद्योगांना उपयुक्त नाही.

**भागीदारी संस्था –** एकापेक्षा जास्त व्यक्तींची मालकी आणि व्यवस्थापन असलेली व्यवसाय संस्था म्हणजे भागीदारी संस्था होय.

- **वैशिष्ट्ये–**

१) करार
२) संयुक्त मालकी
३) संयुक्त व्यवस्थापन
४) कायदेशीर व्यवसाय
५) उत्तरदायित्व
६) भागीदारांची संख्या
७) प्रधान – अभिकर्ता संबंध
८) लाभ हस्तांतरणावर बंधन
९) नोंदणी
१०) नफा व तोट्याची विभागणी
११) भागीदारीची समाप्ती
१२) विसर्जन

- **गुण –**

१) सुलभ स्थापना
२) भांडवल
३) व्यवसायिन गुप्तता

४) सातत्यपूर्ण अस्तित्व
५) कार्यातील लवचीकता
६) निर्णय क्षमता
७) श्रम व मोबदला सहसंबंध
८) नावलौकिक
९) तज्ज्ञांचा सहभाग

- **दोष –**

१) सातत्यातील समस्या
२) कायदेशीर अस्तित्वाचा अभाव
३) विवाद
४) लाभ अहस्तांतरणीय
५) मर्यादित भागीदार
६) भागीदारांच्या प्रवेशामध्ये अडचण
७) अमर्यादित जबाबदारी
८) विहित अधिकारांचा धोका
९) मर्यादित भांडवल
१०) गोपनियतेची समस्या

- **भागीदारांचे प्रकार –**

१) सक्रिय भागीदार
२) निष्क्रिय भागीदार
३) नाममात्र भागीदार
४) गुप्त भागीदार
५) अज्ञान भागीदार
६) केवळ नफ्यातील सहभागी भागीदार
७) उप–भागीदार
८) मर्यादित जबाबदारी असलेला भागीदार
९) आभासी भागीदार

- **भागीदारी संस्थेचे प्रकार –**

**अ) सामान्य भागीदारी –** १) ऐच्छिक भागीदारी
२) विशिष्ट कालावधीची भागीदारी
३ ) विशिष्ट उपक्रमाची भागीदारी

**ब) मर्यादित जबाबदारीची भागीदारी**

### एकत्र हिंदू कुटुंब व्यवसाय –

एकत्र हिंदू कुटुंब वारसा हक्काने, हिंदू कायद्याप्रमाणे व्यवसाय चालविणे तेंव्हा त्यास अविभक्त हिंदू कुटुंब पद्धती व्यवसाय असे म्हणतात.

- **वैशिष्ट्ये –**

१) अस्तित्व फक्त भारतातच
२) स्थापना
३) सभासदत्व
४) संयुक्त मालकी
५) चांगली पतप्रतिष्ठा
६) व्यवस्थापन
७) नफ्यात सहभाग

- **गुण –**

१) सुलभ स्थापना
२) सहकर्त्यांचे हितरक्षण
३) त्वरित व अचूक निर्णय
४) कामातूनच प्रशिक्षण
५) सहकर्त्यांची जबाबदारी

- **दोष –**

१) कर्त्याची अमर्यादित जबाबदारी
२) आर्थिक व व्यवस्थापकीय साधनांवर मर्यादा
३) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्वाचा अभाव
४) व्यवसायाचे विभाजन
५) श्रम व पारितोषिक यांचा प्रत्यक्ष संबंध नाही.

- **सहकारी संस्था –**

'प्रत्येकाने सर्वांसाठी आणि सर्वांनी प्रत्येकासाठी' या तत्वाने एकत्र येऊन आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.

- **वैशिष्ट्ये –**

१) ऐच्छिक व खुले सभासदत्व
२) लोकशाही तत्त्वे
३) व्यवस्थापन
४) नोंदणी
५) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व.
६) मर्यादित जबाबदारी
७) सभासद संख्या

८) मतदानाचा समान हक्क
९) सेवाभाव

● **गुण –**

१) लोकशाही व्यवस्थापन
२) खुले सभासदत्व
३) व्यवसाय चालविण्याचा खर्च कमी
४) मर्यादित जबाबदारी
५) कर सवलत
६) स्वयं अर्थसाहाय्यता व सामाजिक कल्याण

● **दोष –**

१) मर्यादित भांडवल
२) अकार्यक्षम व्यवस्थापन
३) जनतेचा कमी विश्वास
४) मर्यादित विस्तार
५) प्रेरणेचा अभाव.

● **सहकारी संस्थेचे प्रकार –**

१) ग्राहक सहकारी संस्था
२) उत्पादकांची सहकारी संस्था (औद्योगिक)
३) विपणन सहकारी संस्था
४) शेती सहकारी संस्था
५) सहकारी गृहनिर्माण संस्था
६) सहकारी पतसंस्था.

● **संयुक्त भांडवली संस्था –**

कंपनी कायद्याने स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था म्हणजे संयुक्त भांडवली संस्था होय.

● **वैशिष्ट्ये –**

१) ऐच्छिक संघटना
२) नोंदणीकृत संस्था
३) नोंदणीकृत कार्यालय
४) कृत्रिम व्यक्ती
५) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व
६) बोधचिन्ह
७) मर्यादित जबाबदारी

८) भागांचे हस्तांतरण

९) मालकी व व्यवस्थापन फारकत

१०) चिरंतन अस्तित्व

११) सभासदत्व

- **गुण –**

१) मोठ्या प्रमाणावर भांडवल

२) व्यावसायिक व्यवस्थापन

३) विस्तारास मोठ्या प्रमाणावर संधी

४) जनतेचा विश्वास

५) करात सवलत

६) तज्ज्ञांच्या सेवा

७) चिरंतन अस्तित्व

८) मर्यादित जबाबदारी

- **दोष –**

१) स्थापना करण्यास कठीण

२) गोपनियतेचा अभाव

३) वेळखाऊ निर्णय प्रक्रिया

४) प्रत्यक्ष संबंधांचा अभाव

५) व्यवस्थापनाचा खर्च अधिक

६) माहितीचा गैरवापर/सट्टेबाजी

## व्यावसायिक संधी

**स्वयंरोजगाराच्या संधी :**

१. एकल व्यापारी संस्था

२. भागीदारी संस्था

३. अंतर्गत सजावटकार

४. समारंभ समन्वयक

५. ई–कॉमर्स

**व्यावसायिक संधी :**

१. वाहतूक संस्था

२. मोबाईल रिचार्ज दुकान

३. शिलाई व्यवसाय

४. वधू–वर सूचक सल्लागार

## संदर्भ सूची


- खन्ना, सोमा राज, सुरेंद्र थापा व सितारा धाकल. व्यवसाय अभ्यास. काठमांडूः तालेजू प्रकाशन.
- पंत, प्रेम रा.., इटि अल. व्यवसाय अभ्यास, काठमांडू : बुद्‌ध शैक्षिक प्रसारक व वितरक प्रायव्हेट लि. २०१०.
- https://www.youthkiawaaz.com/2016/09/amul-india-success-story/
- https://en.wikipedia.org/wiki/List_of_cooperatives




## स्वाध्याय

**प्र.१ ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. एकल व्यापारी व्यवसाय संस्थेमध्ये ------- व्यावसायिक गुप्तता असते.

अ) कमीत कमी ब) जास्तीत जास्त क) मर्यादित

२. अविभक्त हिंदू - कुटुंब पद्धती व्यवसायात संस्थेतील सदस्यांना -------- असे म्हणतात.

अ) सुतार ब) सहकर्ते क) कर्ता

३. अविभक्त हिंदू - कुटुंब पद्धती व्यवसायात संस्थेतील प्रमुखाला ---------असे म्हणतात.

अ) कर्ता ब) सहकर्ते क) संस्थापक

४. महाराष्ट्रामध्ये भागीदारी व्यवसाय संस्थेची नोंदणी करणे ------------ असते.

अ) सक्तीचे ब) ऐच्छिक क) सोपी

५. संयुक्त भांडवली संस्थेमधील सभासदांची जबाबदारी ---------- असते.

अ) मर्यादित ब) अमर्यादित क) निर्बंधित

६. संयुक्त भांडवली संस्था ही --------- ने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती आहे.

अ) कायद्याने ब) कराराने क) स्वेच्छेने

७. संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी करणे ----------- असते.

अ) सक्तीचे ब) मुक्त क) अनावश्यक

८. सहकारी संस्थेमधील सभासदाची जबाबदारी -------- असते.

अ) मर्यादित ब) निर्बंधित क) जास्तीत जास्त

९. भारतीय सहकारी संस्था कायदा -------- साली संमत करण्यात आला.

अ) १९१२ ब) १९१३ क) १९११

१०. ---------- हे कंपनीची सही / स्वाक्षरी म्हणून कार्य करते.

अ) बोधचिन्ह ब) सामायिक चिन्ह क) सामायिक प्रतिमा

ब) **योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ. खाजगी कंपनी | १. कर्ता |
| ब. सार्वजनिक कंपनी | २. स्थानिक बाजारपेठ |
| क बोधचिन्ह | ३. १९३२ |
| ड. भागीदारी कायदा | ४. जास्तीत जास्त २०० सभासद |
| इ. संयुक्त हिंदू कुटुंब व्यवसाय | ५. एकपात्री प्रयोग |
| | ६. कमीत कमी ७ सभासद |
| | ७. कमीत कमी १० सभासद |
| | ८. कंपनीची सही |
| | ९. जास्तीत जास्त १०० सभासद |
| | १०. व्यवस्थापक |

(क) **योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१. सहकारी संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन पाहण्यासाठी सभासदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी मंडळ.

२. व्यवसायाचा मालक हाच त्याच्या व्यवसायाचा चालक व निर्णय कर्ता असतो.

३. एक पात्री प्रयोगासारखा व्यवसाय संघटन प्रकार.

४. अविभक्त हिंदू कुटुंब पद्धती व्यवसाय संस्थेतील सदस्य.

५. जो भागीदार आपले नाव भागीदारी संस्थेला देतो.

६. या कंपनीमध्ये भागांचे मुक्तपणे हस्तांतर करता येते.

७. भागीदारीचा लेखी करार.

८. सहकारी संस्थेचे ध्येय.

९. सेवाप्रेरित व्यवसाय संघटना.

(ड) **चूक की बरोबर ते लिहा.**

१. एकल व्यापारी हा त्याच्या व्यवसायाचा निर्णयकर्ता असतो.

२. एकल व्यापारी हा स्थानिक बाजारपेठेत कार्य करतो.

३. लहान प्रमाणावरील व्यवसायासाठी एकल व्यापारी हा संघटन प्रकार उपयुक्त आहे.

४. एकत्र हिंदू कुटुंब पद्धती व्यवसायामध्ये कर्त्याची जबाबदारी अमर्यादित असते.

५. एकत्र हिंदू कुटुंब पद्धती व्यवसायामध्ये अमर्यादित सभासद संख्या असते.

६. संयुक्त भांडवली संस्था मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करू शकते.

७. कंपनीमध्ये मालकी व व्यवस्थापन यात फारकत केली जाते.

८. संयुक्त भांडवली संस्थेचे व्यवस्थापन संचालक मंडळ पाहते.

९. भागीदारी संस्थेमध्ये करार हा लेखी किंवा तोंडी असू शकतो.

१०. भागीदारी संस्थेमध्ये प्रत्येक भागीदाराची जबाबदारी ही मर्यादित असते.

११. सहकारी संस्थेचा मुख्य हेतू सभासदांना सेवा देणे हा असतो.

१२. सहकारी संस्थेचे सभासदत्व घेणे बंधनकारक असते.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) एकल व्यापारी व्यवसाय, अविभक्त हिंदू कुटुंब पद्धती, अशासकीय संघटना(NGO), भागीदारी संस्था

२) सक्रीय भागीदार, भागधारक, नाममात्र भागीदार, गुप्त भागीदार

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) खाजगी व्यवसाय क्षेत्राचे मालकी व व्यवस्थापन...........कडे असते.

२) ............ या व्यवसायात फक्त एकच व्यक्ती मालक असते.

३) ............ व्यवसाय संघटन प्रकारामध्ये जन्माने सभासदत्व प्राप्त होते.

४) व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजामध्ये भाग घेणारा भागीदार ...........

५) भागीदारीच्या कालावधी संदर्भात जेव्हा भागीदारीच्या करारामध्ये कोणतीही तरतूद केली जात नाही तेंव्हा त्या प्रकारास .........म्हणतात.

६) अविभक्त हिंदू-कुटुंब व्यवसायाची मालमत्ता सामूहिकपणे.............यांच्या मालकीची असते.

७) सहकारी संस्थेचे व्यवस्थापन ......... तत्त्वावर आधारलेले असते.

८) सहकारी संस्थेत मतदानासाठी.......... नियम असतो.

९) संयुक्त भांडवली संस्थेत मतदानासाठी .......... नियम असतो.

१०) सहकारी संस्थेच्या भागाची दर्शनी किंमत............ असते.

११) ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना .......... कडून केली जाते.

१२) संयुक्त भांडवली संस्थेची नोंदणी करणे......... कायद्याने सक्तीचे असते.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) कमीत कमी २ व जास्तीत जास्त २०० | |
| २) कमीत कमी १० व जास्तीत जास्त अमर्यादित | |
| ३) | कमीत कमी ७ व जास्तीत जास्त अमर्यादित |
| ४) एकच सभासद असणारा व्यवसाय संघटन प्रकार | |
| ५) किमान २ व कमाल ५० | |

(खाजगी कंपनी, एकल व्यापारी, सहकारी संस्था, भागीदारी व्यवसाय, सार्वजनिक कंपनी)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) एकल व्यापारी व्यवसाय म्हणजे काय?

२) भागीदारी संस्थेची व्याख्या सांगा.

३) संयुक्त भांडवली संस्थेचा अर्थ काय?

४) अविभक्त हिंदू कुटुंब व्यवसाय म्हणजे काय?

५) सहकारी संस्था म्हणजे काय?

६) अज्ञान भागीदार म्हणजे काय?

७) आभासी भागीदार म्हणजे काय?

८) फक्त नफ्यातील भागीदार म्हणजे काय?

९) सर्वसाधारण भागीदारी म्हणजे काय?

१०) खाजगी कंपनीचा अर्थ काय?

११) सार्वजनिक कंपनीचा अर्थ काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सार्वजनिक कंपनीच्या भागांचे मुक्तपणे **हस्तांतर करता येत नाही.**

२) खाजगी कंपनीमध्ये किमान **तीन** संचालक असतात.

३) संयुक्त भांडवल संस्थेची नोंदणी करणे **सक्तीचे नसते**.

४) एकल व्यापारी व्यवसाय संस्थेमध्ये गोपनियता **कमी** असते.

५) भागीदारी संस्थेमध्ये कमीत कमी **तीन** सभासद असतात.

६) अविभक्त हिंदू-कुटुंब व्यवसायातील ज्येष्ठ व्यक्तीला **सहकर्ते** असे म्हणतात.

७) भारतामध्ये **भारतीय भागीदारी कायदा, १९४०** अंमलात आणला जातो.

**प्र.२ रा संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.**

१) एकल व्यापारी व्यवसाय

२) भागीदारी संस्था

३) अविभक्त हिंदू-कुटुंब व्यवसाय

४) सहकारी संस्था

५) संयुक्त भांडवली संस्था

६) कर्ता

७) व्यवस्थापन समिती

८) नामधारी भागीदार

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१. श्री रघुनाथ गेली ३० वर्षे व्यापार करतात. त्यांचा व्यापार पिढीजात आहे किरण व नमन हे त्यांचे दोन मुलगे व त्यांच्या पत्नी सुद्धा त्यांना ह्या व्यापारात मदत करतात.

   १. हा कोणता व्यवसाय आहे?

   २. या व्यवसायात रघुनाथला काय म्हणतात?

   ३. किरण व नमन यांना काय म्हणतात?

२. श्री. सावंत सनदी लेखापाल व श्री. तांबे वास्तुविषारद हे दोघे ही पेशा चालवतात ते एकत्र येऊन 'एस्टी फर्मस्' नागपूला सुरू करतात.

   १. वरील व्यवसाय ओळखा.

   २. ही नोंदणीकृत संस्था आहे का?

   ३. श्री. सावंत यांचा पेशा काय आहे?

**प्र.४ था फरक स्पष्ट करा.**

१. खाजगी मर्यादित कंपनी व सार्वजनिक मर्यादित कंपनी.

२. एकल व्यापारी व्यवसाय व भागीदारी संस्था.

३. भागीदारी संस्था व अविभक्त हिंदू कुटुंब व्यवसाय.

४. सहकारी संस्था व संयुक्त भांडवली संस्था.

५.   अविभक्त हिंदू कुटुंब व्यवसाय व संयुक्त भांडवली संस्था.
६.   सहकारी संस्था व भागीदारी संस्था.

**प्र.५ वा  खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१)   एकल व्यापारी संस्थेची कोणतीही चार वैशिष्ट्ये.
२)   भागीदारांचे कोणतेही चार प्रकार सांगा.
३)   सहकारी संस्थेचे कोणतेही चार प्रकार सांगा.
४)   संयुक्त हिंदू कुटुंब व्यवसायाचे कोणतेही चार फायदे लिहा.
५)   संयुक्त भांडवली संस्थेचे कोणतेही चार दोष सांगा.

**प्र.६ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१)   एकल व्यापाऱ्याची जबाबदारी अमर्यादित असते.
२)   कर्ता हा अविभक्त कुटुंब व्यवसाय संघटनेचा सर्वेसर्वा असतो.
३)   आपल्या सभासदांना सेवा पुरविणे हा सहकारी संस्थेचा मुख्य हेतू असतो.
४)   संयुक्त भांडवली संस्था मोठया प्रमाणावर भांडवल उभारणी करू शकतात.
५)   अविभक्त हिंदू-कुटुंब व्यवसायामध्ये सहकर्त्यांची जबाबदारी मर्यादित असते.
६)   लहान प्रमाणावरील व्यवसायासाठी एकल व्यापारी संस्था प्रकार उपयुक्त असतो.
७)   सहकारी संस्था लोकशाही तत्त्वांचे पालन करते.
८)   संयुक्त भांडवली संस्थेमध्ये मालकी व व्यवस्थापन यात फरक केली जाते.
९)   खाजगी कंपनीमध्ये आपल्या भागांचे मुक्तपणे हस्तांतर करता येत नाही.
१०) भागीदारी संस्थेतील सर्व भागीदार संयुक्तपणे मालक असतात.
११) सक्रीय भागीदार, भागीदारी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात भाग घेतो.

**प्र.७ वा खालील प्रश्न सोडवा.**

१)   सहकारी संस्थेचे विविध प्रकार सांगा
२)   संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये सांगा.
३)   सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.

**प्र.८ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा**

१)   एकल व्यापारी व्यवसायाची वैशिष्ट्ये सांगा
२)   भागीदारी संस्थेचे प्रकार सांगा
३)   भागीदारांचे विविध प्रकार सांगा
४)   संयुक्त भांडवली संस्थेची वैशिष्ट्ये लिहा.
५)   सहकारी संस्थांचे गुण स्पष्ट करा.
६)   भागीदारी संस्थेचे दोष स्पष्ट करा.
७)   संयुक्त भांडवली संस्थेचे गुण स्पष्ट करा.
८)   भागीदारी संस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
९)   सहकारी संस्थांचे प्रकार स्पष्ट करा.
१०) संयुक्त भांडवली संस्थेचे दोष स्पष्ट करा.

# ५ व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग – २


**५.१ प्रस्तावना**
५.१.१ अर्थ
५.१.२ व्याख्या

**५.२ विभागीय आस्थापना**
५.२.१ वैशिष्ट्ये
५.२.२ गुण
५.२.३ दोष

**५.३ वैधानिक महामंडळ**
५.३.१ वैशिष्ट्ये
५.३.२ गुण
५.३.३ दोष

**५.४ सरकारी कंपनी**
५.४.१ वैशिष्ट्ये
५.४.२ गुण
५.४.३ दोष

**५.५ बहुराष्ट्रीय कंपनी**
५.५.१ वैशिष्ट्ये
५.५.२ गुण
५.५.३ दोष

- **फरक**
- **सारांश**
- **स्वाध्याय**


**स्थळ** – कनिष्ठ विद्यालयाचे आवार

**वेळ** – सकाळी ११ वाजता (शहरातील प्रसिद्ध कनिष्ठ विद्यालयाच्या आवारा मध्ये नूतन, सुहास, किरण आणि स्नेहल या चार मित्रांमधील संभाषण)

**नूतन** – नमस्कार मित्रांनो !

**स्नेहल, सुहास, किरण** – नमस्कार, नूतन

**नूतन** – मित्रांनो माझ्या बहिणीला भारतात सर्वात जास्त कर्मचारी असलेल्या '**भारतीय रेल्वे**' मध्ये नोकरी मिळाली.

**किरण** – अरे व्वा ! खूप छान बातमी आहे. ती रेल्वेची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे का?

**नूतन** – हो, ती परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

**स्नेहल** – अरे ! माझ्या वडिलांना त्यांच्या कंपनीमध्ये बढती मिळाली.

**सुहास** – तुझे वडील कोठे काम करतात?

**स्नेहल** – माझे वडील '**एअर इंडीया**' मध्ये काम करतात.

**सुहास** – अरे ! काय योगायोग आहे. सर्वांकडून छान बातम्या मिळत आहेत.
(दरम्यान सुहासला आपल्या भ्रमणध्वनीवर संदेश प्राप्त होतो.)
काय बातमी आहे !! (स्वत:शी पुटपुटत)

| | |
|---|---|
| **नूतन** | – काय झाले सुहास? तू खूप आनंदी दिसतोस. |
| **सुहास** | – माझ्या भावाला बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये वरिष्ठ वित्त व्यवस्थापक म्हणून नोकरी मिळाली. (सुहासच्या भावासाठी सर्वजण टाळया वाजवतात) |
| **किरण** | – मित्रांनो माझी आई BHEL मध्ये नोकरी करते. |
| **सुहास** | – (पुटपुटत) BHEL म्हणजे काय? |
| **किरण** | – अरे सुहास, BHEL म्हणजे भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड, ही एक सरकारी कंपनी आहे. |

प्रिय विद्यार्थ्यांनो, वरील संभाषणातून तुम्हाला सार्वजनिक क्षेत्रातील विविध संघटनांची नावे, प्रकार माहिती झाले असतील. चला तर मग आपण सार्वजनिक क्षेत्रातील विविध संघटनांचा अभ्यास करूया.

### ५.१ प्रस्तावना :

भारतात खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचे सहअस्तित्व आहे. खाजगी क्षेत्रातील व्यवसाय संघटनांची मालकी व व्यवस्थापन हे एका व्यक्तीकडे किंवा व्यक्तीसमूहाकडे असते, तर सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसाय संघटनांची मालकी ही सरकारकडे असते.

खाजगी क्षेत्रातील संघटनांचा हेतू जास्तीत जास्त नफा मिळवणे हा असतो तर सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचा हेतू प्रामुख्याने ग्राहकांना विश्वसनीय सेवा प्रदान करणे हा असतो.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम काही विशिष्ट क्षेत्रातच होते. जसे टपाल सेवा, तारायंत्र, हवाई वाहतूक, रेल्वे इ. स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक क्षेत्राचा 'औद्योगिक धोरण १९५६' चा भाग म्हणून समावेश झाला.

#### ५.१.१ अर्थ :

ज्या संस्थांची मालकी, वित्तपुरवठा, व्यवस्थापन आणि नियंत्रण हे सरकारचे किंवा सरकारी समूहाचे असते त्या संस्थांना सार्वजनिक क्षेत्रातील संस्था असे म्हणतात.

उदा. HPCL -Hindustan Petroleum Corporation Limited

BPCL - Bharat Petroleum Corporation Limited.

#### ५.१.२ व्याख्या :

**१) ब्रिटानिका शब्दकोशानुसार –**

''सार्वजनिक संस्था म्हणजे अशा संघटना की, ज्या केंद्र, राज्य किंवा स्थानिक सरकारच्या मालकीच्या असतात व ज्या जनतेला वस्तू किंवा सेवा रास्त किंमतीला पुरवितात व ज्यांचे कार्य कमी अधिक प्रमाणात स्वयंचलित पद्धतीने चालते''.

**२) प्रा. हॅन्सन यांच्या मते –**

''सार्वजनिक क्षेत्र हे सरकारची मालकी असणाऱ्या औद्योगिक, शेती, वित्त आणि वाणिज्य क्षेत्रातील कार्य करणाऱ्या संस्था होय.''

- **सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.**

 १) विभागीय आस्थापना

 २) वैधानिक महामंडळ

 ३) सरकारी कंपनी

## ५.२ विभागीय आस्थापना (Departmental Organisation) :

ज्या आस्थापनाची मालकी, व्यवस्थापन, नियंत्रण आणि वित्तपुरवठा सरकारद्वारे केला जातो त्यास विभागीय आस्थापना असे म्हणतात.

हा सार्वजनिक क्षेत्रातील संघटनेचा सर्वात जुना प्रकार आहे. सरकारचा एक अविभाज्य भाग म्हणून विभागीय आस्थापना सर्व कार्ये पार पाडतात.

खाते प्रमुख हा त्या खात्याचा मंत्री असतो. सर्व विभागीय आस्थापनांचे कार्य शासकीय अधिकाऱ्यांच्या द्वारे केले जाते. सर्व कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचारी असे संबोधले जाते.

टपाल खाते, रेल्वे खाते, संरक्षण खाते, उद्योग, आकाशवाणी, सार्वजनिक उपयोगिता सेवा इ. विभागीय आस्थापनांची उदाहरणे आहेत.

### ५.२.१ विभागीय आस्थापनांची वैशिष्ट्ये :

**१) सरकारद्वारे व्यवस्थापित :**

विभागीय आस्थापनांचे व्यवस्थापन सरकारच्या संबंधित खात्याद्वारे केले जाते. संबंधित खात्याचे मंत्री विभागीय आस्थापनेच्या कामकाजासंबंधी संसदेला जबाबदार असतात.

**२) अधिकार प्रदान :**

आस्थापनाच्या प्रत्येक विभागात वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे म्हणजेच अधोगामी अधिकार प्रदान केले जातात.

**३) शासनाकडून वित्तपुरवठा :**

वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करून विभागीय आस्थापनाला विधिमंडळाद्वारे वित्त पुरवठा केला जातो आणि त्यांचा सर्व महसूल हा थेट सरकारच्या तिजोरीत जमा केला जातो.

**४) सरकारी संचालन :**

अंदाजपत्रकीय कामे, हिशोबनीसाची कामे, लेखापरीक्षण इ.विविध कामे इतर सरकारी विभागांप्रमाणे केली जातात.

**५) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नाही :**

विभागीय आस्थापनेला सरकारपासून स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नसते. संबंधीत खात्या अंतर्गत त्यांचे कामकाज केले जाते.

**६) शासकीय कर्मचारी :**

विभागीय आस्थापना या सरकारचा अविभाज्य भाग असल्यामुळे सदर आस्थापनाच्या कर्मचारी वर्गाला इतर नागरी सेवा कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व बाबींसाठी समकक्ष समजण्यात येते.

### ५.२.२ विभागीय आस्थापनाचे गुण :

१) **प्रत्यक्ष नियंत्रण :**

विभागीय आस्थापनामध्ये उपक्रमांवर प्रत्यक्ष आणि संपूर्ण नियंत्रण सरकारचे असते.

२) **सरकारकडे थेट महसूल :**

विभागीय आस्थापनांचा महसूल सरकारी तिजोरीत थेट जमा केला जातो.

३) **खर्च कमी :**

विभागीय आस्थापनांचा कारभार सरकारद्वारे चालविला जात असल्यामुळे प्रशासकीय खर्च कमी येतो.

४) **निधीचा योग्य वापर :**

कठोर सरकारी नियंत्रण आणि देखरेख असल्यामुळे विभागीय आस्थापनांमध्ये निधीचा गैरवापर होण्याची शक्यता अत्यंत कमी असते

५) **पात्रताधारक कर्मचारी :**

पात्रताधारक कर्मचाऱ्यांमार्फत विभागीय आस्थापनाचे व्यवस्थापन आणि देखरेख केली जाते.

६) **गुप्तता राखली जाते :**

धोरणात्मक बाबींवर विभागीय आस्थापना जास्तीत जास्त गोपनीयता बाळगतात आणि अत्यावश्यक वस्तू व सेवांची काळजी घेतात.

### ५.२.३ विभागीय आस्थापनाचे दोष :

१) **कार्यवाहीमध्ये विलंब :**

विभागीय आस्थापना सरकारकडून नियंत्रीत केल्या जातात. तेथे अधिकारांचे नेहमीच केंद्रीकरण असते म्हणून अधिकारांच्या अत्याधिक केंद्रीकरणामुळे कार्यवाहीमध्ये विलंब होतो.

२) **लालफितशाही आणि नोकरशाही :**

विभागीय आस्थापनांना नेहमीच लालफितशाही आणि नोकरशाही या समस्या असतात त्यामुळे विश्वासार्हतेवर परिणाम होतो.

३) **कमी पुढाकार :**

विभागीय आस्थापनाच्या कार्यपद्धतींवर आणि धोरणांवर संसदेत नेहमी टीका होत असल्याने पुढाकार आणि कौशल्य यांना वाव नसतो.

४) **लवचीकतेचा अभाव :**

सरकारच्या जास्त नियंत्रणामुळे आणि देखरेखीमुळे विभागीय आस्थापनाच्या कार्यपद्धतीत नेहमी लवचीकतेचा अभाव दिसून येतो.

५) **निर्णय घेण्यास विलंब :**

प्रत्येक गोष्टीबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्र्यांची किंवा सर्वोच्च अधिकाऱ्यांच्या मंजुरीची आवश्यकता असते. कनिष्ठ स्तरावरील अधिकारी कोणतेही निर्णय घेऊ शकत नाही.

### ६) व्यावसायिकतेचा अभाव :

व्यावसायिकतेचा अभाव, सार्वजनिक टीकेची भीती, अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या आस्थापनांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करतात.



**कृती :**

- ❑ तुमच्या परिसरातील आकाशवाणी (AIR) केंद्राला भेट द्या आणि सविस्तर माहिती मिळवा.
- ❑ भारतीय रेल्वे खानपान पर्यटन निगम (IRCTC) च्या कार्यालयातून माहिती संकलीत करा.
- ❑ विभागीय आस्थापनांची अधिक उदाहरणे शोधा.

## ५.३ वैधानिक महामंडळ (Statutory Corporation) :

''वैधानिक महामंडळ ही स्वायत्त संस्था असून जी संसदेत किंवा विधी मंडळात स्वतंत्र कायदा करून हक्क, कार्ये आणि कर्तव्ये स्पष्ट करुन स्थापन झालेली असते. भांडवल हे राज्य व केंद्र सरकारने अधिग्रहण केलेले असते''.

उदा. – भारतीय रिझर्व्ह बँक(RBI), भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC) इ.

### ५.३.१ वैधानिक महामंडळाची वैशिष्ट्ये :

### १) सामुदायिक संघटना :

वैधानिक महामंडळ कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती आहे जिला स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते. सरकारने नेमून दिलेल्या संचालक मंडळाद्वारे यांचे व्यवस्थापन केले जाते. या महामंडळांना स्वत:च्या नावाने करार करता येतात आणि एक निश्चित व्यवसाय चालविता येतो.

### २) विधिमंडळास उत्तरदायी :

वैधानिक महामंडळ हे त्यांची निर्मिती केलेल्या संसदेला किंवा विधीमंडळाला उत्तरदायी असतात. या महामंडळाच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा संसदेला कोणताही अधिकार नाही. संसद फक्त योजना आणि महामंडळाच्या एकूण कामगिरीवर चर्चा करू शकतात.

### ३) स्वत:ची कर्मचारी प्रणाली :

वैधानिक महामंडळाची मालकी आणि व्यवस्थापन सरकारचे असले तरी कर्मचारी हे सरकारी कर्मचारी नसतात. विविध महामंडळातील कर्मचाऱ्यांना समान किंवा एकसारखे वेतन आणि लाभ सरकारकडून दिले जातात. त्यांची भरती, वेतन आणि व्यवस्था महामंडळाने ठरविलेल्या नियमांनुसार केले जाते.

### ४) आर्थिक स्वायत्तता :

वैधानिक महामंडळ हे आर्थिक स्वायत्तता किंवा स्वातंत्र्याचा लाभ घेते. वैधानिक महामंडळ हे अंदाजपत्रक, हिशोब, वित्त नियंत्रणाच्या अधीन नाही. सरकारची पूर्व परवानगी मिळाल्यावर हे महामंडळ देशातून किंवा देशाबाहेरून निधी उभा करू शकते.

### ५) राजकीय हस्तक्षेप नाही :

विशिष्ट कायदा आणि नियमांचे पालन करून वैधानिक महामंडळ अस्तित्वात येत असल्याने प्रशासनात, कामकाजात कोणताही राजकीय हस्तक्षेप नसतो. सर्व वैधानिक महामंडळे राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असतात.

### ५.३.२ वैधानिक महामंडळाचे गुण :

#### १) पुढाकार आणि लवचीकता :

वैधानिक महामंडळाचे व्यवस्थापन आणि कार्ये स्वतंत्रपणे सरकारी हस्तक्षेपाशिवाय स्वतः पुढाकार घेऊन आणि लवचीकतेने केली जातात.

#### २) प्रशासकीय स्वायत्तता :

वैधानिक महामंडळे व्यवस्थापन आणि व्यवहार स्वतंत्रपणे आणि लवचीकतेने करण्यास समर्थ असतात.

#### ३) त्वरित निर्णय :

वैधानिक महामंडळे लालफितीपासून काही प्रमाणात मुक्त असतात. कागदोपत्री काम, कमी औपचारिकता निर्णय घेण्यापूर्वी पूर्ण केल्या जातात.

#### ४) कार्यक्षम कर्मचारी :

कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भरती संबंधी वैधानिक महामंडळाचे स्वत:चे नियम आणि कायदे असतात. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी ते चांगल्या सुविधा आणि आकर्षक सेवाशर्ती प्रदान करतात.

#### ५) व्यावसायिक व्यवस्थापन :

वैधानिक महामंडळे कुशल, तज्ज्ञ, व्यावसायिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची, सरकारद्वारे नामनिर्देशीत व्यक्तींची, प्रतिनिधीची संचालक मंडळामध्ये नेमणूक करतात.

#### ६) सोपी भांडवल उभारणी :

वैधानिक महामंडळाची मालकी सरकारकडे असते, ते कमी व्याज दराने तरत्या बंधपत्राद्वारे (floating bonds) आवश्यक असणारे  भांडवल उभे करू शकतात. बंधपत्रे सुरक्षित असल्यामुळे अशाप्रकारची बंधपत्रे घेण्यासाठी गुंतवणूकदार स्वेच्छेने तयार असतात.

### ५.३.३ वैधानिक महामंडळाचे दोष :

#### १) कागदोपत्री स्वायत्तता :

वैधानिक महामंडळाची स्वायत्तता आणि लवचीकता फक्त नावापुरतीच आहे. व्यावहारिकदृष्ट्या मंत्री, सरकारी अधिकारी व राजकीय पक्ष वारंवार महामंडळाच्या कामकाजात हस्तक्षेप करतात.

#### २) पुढाकाराचा अभाव :

वैधानिक महामंडळांना कोणत्याही स्पर्धेला तोंड द्यावे लागत नाही आणि नफा कमविण्याच्या हेतूने कोणतेही कामकाज करावे लागत नाही. त्यामुळे कर्मचारी नफा वाढविण्यासाठी आणि तोटा कमी करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. वैधानिक महामंडळांची नुकसान भरपाई सरकारकडून केली जाते.

#### ३) गुंतागुंतीची संरचना :

वैधानिक महामंडळाची उद्दिष्टे आणि अधिकार कायद्याद्वारे निश्चित केले जातात आणि ते सुधारित तरतुदीनुसार दुरुस्त केले जातात. अधिनियमात सुधारणा करणे हे वेळखाऊ व अत्यंत क्लिष्ट असते.

### ४) लाभावरून संघर्ष :

वैधानिक महामंडळांचे व्यवस्थापन आणि कामकाज करण्यासाठी संचालक मंडळाची नेमणूक केली जाते. एकापेक्षा जास्त संचालक असल्याने त्यांच्यामध्ये लाभावरून संघर्ष होण्याची शक्यता असते. या कारणाने सुलभ कामकाजात अडथळा येतो.

### ५) अयोग्य व्यवहार :

प्रशासकीय मंडळ अयोग्य व्यवहारामध्ये अडकलेले असण्याची शक्यता असते. वैधानिक महामंडळातील प्रशासकीय मंडळ स्वत:ची अकार्यक्षमता भरुन काढण्यासाठी वस्तूंच्या अनावश्यक जास्त किमती आकारून अयोग्य व्यवहार करतात.



**कृती :**

- ❑ भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) मुख्यालय मुंबईला भेट द्या.
- ❑ तुम्हाला माहिती असलेल्या चार वैधानिक महामंडळांची नावे लिहा.
- ❑ आयुर्विमा महामंडळा संदर्भात माहिती शोधा.

## ५.४ सरकारी कंपनी : (Government Company)

''सरकारी कंपनीची स्थापना कंपनी कायदा २०१३ नुसार होते. ज्या कंपनीच्या वसूल भाग भांडवलापैकी कमीत कमी ५१% भांडवल केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य सरकार किंवा अंशत: केंद्र आणि एक किंवा अनेक राज्य सरकारने मिळून गुंतविलेले असते. अशा कंपनीस सरकारी कंपनी असे म्हणतात''.

उदा : १) National Thermal Power Corporation (NTPC)

2) Bharat Heavy Electricals Limited (BHEL)

3) Hindustan Machine Tools (HMT)

सरकारी कंपनीचे भाग भारताच्या राष्ट्रपतींच्या किंवा राज्यपाल यांच्या नावाने खरेदी केले जातात.

## महत्वाच्या संज्ञा :

### १) वार्षिक अहवाल :

सरकारी कंपनीचा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण अहवाल संसदेसमोर किंवा कायदे मंडळापुढे परीक्षणासाठी ठेवला जातो. राज्यातील कंपनीच्या बाबतीत राज्यविधी मंडळासमोर अहवाल सादर केला जातो.

### २) लेखा परीक्षकाची नियुक्ती :

सरकारी कंपनीच्या लेखापरीक्षकाची नियुक्ती ही 'भारत सरकारचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकां'च्या सल्ल्यानुसार केली जाते.

### ३) भाग अधिग्रहण :

सरकारी कंपनी पूर्णत: किंवा अंशत: सरकारच्या मालकीची असते. संपूर्ण सरकारी कंपनीमध्ये १००% भागभांडवल हे सरकारचे असते. अंशत: सरकारी मालकीच्या कंपनीमध्ये कमीत कमी ५१% भागभांडवल एक किंवा एकापेक्षा जास्त सरकारांचे मिळून असते. खाजगी संघटनासाठी गुंतवणूक ही ४९% पर्यंत मर्यादित असते.

### ४) व्यवस्थापन :

सरकारने आणि खाजगी गुंतवणूकदारांनी नामनिर्देशीत केलेल्या संचालक मंडळाच्या हातात सरकारी कंपनीचे व्यवस्थापन असते. या कंपन्यांमध्ये व्यावसायिक व्यवस्थापन असते व तेथे कुशल कर्मचारी नेमले जातात ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढते.

## ५.४.१ वैशिष्ट्ये :

### १) कंपनी कायद्यानुसार नोंदणी :

सरकारी कंपनीची स्थापना ही कंपनी कायदा २०१३ नुसार होते. आणि इतर कंपनीसारख्या या कंपनीस कायद्यातील तरतुदी लागू होतात. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार कंपनी कायद्यातील तरतुदी सरकारी कंपनीला लागू होत नाहीत किंवा काही दुरुस्त्यांसह लागू होतात.

### २) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व :

सरकारी कंपनीला सरकारपासून स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व आहे. सरकारी कंपनी स्वत:च्या नावाने करार करु शकते आणि दावा दाखल करू शकते.

### ३) जास्तीत जास्त सरकारचे संचालक :

अधिकतम भांडवल सरकारचे असल्यामुळे कंपनीच्या संचालक मंडळात जास्तीत जास्त संचालक संबंधीत सरकारकडून नियुक्त केले जातात.

### ४) स्वत:चे कर्मचारी :

प्रतिनियुक्तीवरील अधिकारी अथवा कर्मचारी सोडून इतर सर्व कर्मचारी आणि अधिकारी हे सरकारी कंपनीचे स्वत:चे असतात. या कर्मचाऱ्यांना नागरी सेवा नियम लागू होत नाहीत.

### ५) प्रक्रियात्मक नियंत्रणापासून मुक्त :

अंदाजपत्रक, लेखापरीक्षण आणि हिशोबतपासणी इ. कामे सरकारी उपक्रमांना लागू असतात. अशा कार्यापासून व नियंत्रणापासून सरकारी कंपनी मुक्त असते.

## ५.४.२ गुण :

### १) सुलभ स्थापना :

सरकारच्या प्रशासकीय निर्णयाद्वारे कंपनी कायद्यानुसार सरकारी कंपनीची सहज स्थापना केली जाते.

### २) अंतर्गत स्वायत्तता :

सरकारी कंपन्या प्रशासकीय तसेच आर्थिक स्वायत्ततेचा लाभ मिळवितात. ते त्यांचे व्यवहार स्वतंत्रपणे सांभाळू शकतात. तसेच त्यांचे दैनंदिन कामकाज राजकीय हस्तक्षेप, मंत्र्याचे नियंत्रण यापासून मुक्त असते.

### ३) बदलातील सुलभता :

संसदेची मंजुरी न घेता सरकारी कंपनीची उद्दिष्ट्ये, अधिकार, घटनापत्रकात दुरुस्ती करून बदलता येतात.

### ४) शिस्त :

सरकारी कंपन्यांमध्ये कंपनीचे कामकाज कंपनी कायद्याच्या अंतर्गत होत असल्यामुळे व्यवस्थापन हे कार्यक्षम, कुशल आणि शिस्तशीर असते.

### ५) व्यावसायिक व्यवस्थापन :

सरकारी कंपनीची स्वत:ची कर्मचारी विषयक धोरणे असल्यामुळे सरकारी कंपनी व्यावसायिक व्यवस्थापकांची नेमणूक करते.

### ६) सार्वजनिक उत्तरदायित्व :

सरकारी कंपनीच्या कामकाजासंबंधी संसदेत प्रश्न विचारता येत असल्याने त्यांचे सामाजिक उत्तरदायित्व अधिक असते.

## ५.४.३ दोष :

### १) स्वायत्तता केवळ नावापुरती :

सरकारी कंपनीची स्वायत्तता केवळ नावापुरतीच कागदावर अस्तित्वात आहे. वास्तविक राजकारणी, मंत्री, सरकारी अधिकारी सरकारी कंपनीच्या दैनंदिन कामामध्ये वेळोवेळी हस्तक्षेप करतात.

### २) प्रदर्शनाची भीती :

सरकारी कंपनीची वार्षिक हिशोबपत्रके संसदेत/विधीमंडळात परीक्षणासाठी ठेवली जातात. सरकारी कंपनीच्या कामकाजावर प्रसार माध्यमांकडून टीका केली जाते. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्चीकरण होऊन व्यवस्थापनात नावीन्यपूर्ण कामकाज होत नाही.

### ३) तज्ञ प्रतिनिर्धीचा अभाव :

सरकारी विभागांकडून सरकारी कंपनीचे मुख्य कर्मचारी नियुक्त केले जातात. या प्रतिनिर्धीमध्ये अनुभव, वचनबद्धतेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे कंपनीची कार्यक्षमता कमी होते.

### ४) व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव :

मंडळ जेव्हा निर्णय घेतात तेव्हा व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव दिसून येतो. या कंपन्या व्यवसायाच्या सामाजीक उद्दिष्टांशी एकनिष्ठ असतात.



**कृती :**

- ❑ NTPC- राष्ट्रीय ताप विद्युत निगम मर्यादित, MSRDC- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या सारख्या सरकारी कंपनीबद्दल माहिती मिळवा.

## ५.५ बहुराष्ट्रीय कंपनी (Multinational Company) :

''एकाच वेळी एकापेक्षा जास्त देशात कार्ये करणारी कंपनी ही बहुराष्ट्रीय कंपनी असते''. दुसऱ्या शब्दात ''एकापेक्षा जास्त देशात व्यावसायिक कार्ये करणाऱ्या कंपनीस बहुराष्ट्रीय कंपनी म्हणतात''.

बहुराष्ट्रीय कंपनीने स्वत:च्या देशाव्यतिरिक्त कमीत कमी एका इतर देशात सोयीसुविधा आणि इतर मालमत्ता निर्माण केलेल्या असतात. अशा कंपनीची कार्यालये आणि कारखाने विविध देशात असतात. त्यांचे एक मध्यवर्ती कार्यालय असते जेथून ते जागतिक व्यवस्थापन करतात. लहान देशांच्या अंदाजपत्रकापेक्षा बहुराष्ट्रीय कंपनीचे अंदाजपत्रक मोठे असू शकते.

- बहुराष्ट्रीय कंपनीला आंतरराष्ट्रीय कंपनी म्हणूनदेखील संबोधले जाते.

उदा. बाटा इंडिया, इन्फोसिस आणि टाटा मोटर्स

बाटा इंडिया इन्फोसिस टाटा मोटर्स

### ५.५.१ वैशिष्ट्ये :

#### १) प्रचंड मालमत्ता आणि उलाढाल :

बहुराष्ट्रीय कंपन्या जागतिक स्तरावर कार्यरत असल्याने त्यांची भौतिक आणि आर्थिक मालमत्ता जास्त असते. त्यामुळे त्यांची विक्री वाढते. मालमत्ता आणि विक्रीच्या बाबतीत बहुतेक बहुराष्ट्रीय कंपन्या अनेक देशांच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेपेक्षा मोठ्या आहेत.

#### २) आंतरराष्ट्रीय कार्ये :

बहुराष्ट्रीय कंपन्याचे अनेक देशांत उत्पादन आणि वितरण असते. यजमान देशातील शाखा, सहायक आणि संलग्न कंपन्यांच्या शाखाद्वारे कार्ये करतात.

#### ३) केंद्रीय नियंत्रण :

नियंत्रणाची एकता हे बहुराष्ट्रीय कंपनीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रगत देशातील मुख्य कार्यालयाद्वारे सर्व शाखांवर, उपशाखांवर नियंत्रण ठेवले जाते. कंपनी कारभाराच्या धोरणात्मक चौकटीत शाखांच्या व्यवस्थापनाचे कार्य केले जाते.

#### ४) आर्थिक शक्ती :

बहुराष्ट्रीय कंपन्या शक्तिशाली आर्थिक संस्था आहेत. यजमान देशातील कंपन्यांच्या विलीनीकरणाद्वारे ताबा मिळवून बहुराष्ट्रीय कंपन्या आर्थिकदृष्ट्या बलवान होतात.

#### ५) प्रगत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान :

बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन आणि वितरणासाठी प्रगत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतात. त्यांचे भांडवल, प्रगत तंत्रज्ञान त्यांच्या उत्पादन व विपणनासाठी वापरतात.

#### ६) व्यावसायिक व्यवस्थापन :

प्रचंड भांडवल, प्रगत तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय व्यापार चालविण्यासाठी प्रशिक्षीत व्यवस्थापक नेमले जातात.

### ५.५.२ गुण :

#### १) रोजगारनिर्मिती :

बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मोठया प्रमाणावर यजमान देशांमध्ये रोजगार निर्माण केला आहे. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आहे तेथे बहुराष्ट्रीय कंपन्या वरदान ठरल्या आहेत.

## २) विदेशी भांडवलाचा प्रवाह :

विकसनशील देशांच्या जलद विकासासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या आवश्यक विदेशी भांडवल आणतात. देशांतर्गत अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी विदेशी भांडवल आवश्यक आहे.

## ३) संसाधनांचा योग्य वापर :

बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या प्रगत तांत्रिक ज्ञानामुळे यजमान देशाच्या निष्क्रिय, भौतिक व मानवी संसाधनांचा योग्य वापर करतात. यामुळे यजमान देशांचे उत्पन्नाचे प्रमाण वाढते.

## ४) तांत्रिक विकास :

बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे यजमान देशांचा तांत्रिक विकास होतो. प्रत्यक्षात एका देशातून दुसऱ्या देशात तांत्रिक विकासाचे पारदर्शक वहन या बहुराष्ट्रीय कंपन्याद्वारे होते. बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे गरीब देशांनीदेखील तांत्रिक विकास केला आहे.

## ५) व्यवस्थापकीय विकास :

बहुराष्ट्रीय कंपन्या आधुनिक व्यवस्थापनाची तंत्रे वापरतात. बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये काम करणारे कर्मचारी मोठ्या प्रमाणात व्यवस्थापनात संशोधनाचे कार्य करतात. व्यवस्थापन सिद्धांत व नवनवीन पद्धती याद्वारे व्यवस्थापनात व्यावसायिकता आणण्यास मदत होते. यामुळे यजमान देशांमध्ये व्यवस्थापकीय विकास घडून येतो.

## ६) स्थानिक मक्तेदारी समाप्त :

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या स्थापनेमुळे यजमान देशांमध्ये स्पर्धा वाढली. त्यामुळे स्थानिक मक्तेदारांनी त्यांची उत्पादने दर्जेदार केली किंवा किंमती कमी केल्या. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी स्थानिक मक्तेदारी पद्धती समाप्त केली. वास्तविक बहुराष्ट्रीय कंपन्या देशांतर्गत कंपन्यांची कार्यक्षमता आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत करतात.

## ७) जीवनशैलीत सुधारणा :

उच्च गुणवत्तापूर्ण उत्पादने आणि सेवा देऊन बहुराष्ट्रीय कंपन्या यजमान देशातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत करतात.

## ८) आंतरराष्ट्रीय बंधुता आणि संस्कृतीचा प्रसार :

बहुराष्ट्रीय कंपनीने विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे एकत्रीकरण करून आंतरराष्ट्रीय बंधुता निर्माण केली आहे. तसेच यासाठी प्रोत्साहन देऊन जागतिक स्तरावर संस्कृतीचा प्रसार केला आहे. जागतिक शांतता आणि बंधुता प्रस्थापित करून समृद्धीचा मार्ग प्रशस्त केला आहे.

### ५.५.३ दोष :

## १) देशांतर्गत उद्योगांसाठी धोका :

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भांडवल प्रचंड असते. यामुळे देशांतर्गत उद्योगांना त्याचा धोका निर्माण होतो. देशांतर्गत उद्योग अजूनही विकासाच्या मार्गावर आहेत त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केलेल्या आव्हानांना देशांतर्गत उद्योग तोंड देऊ शकत नाहीत. त्यामुळे बरेच देशांतर्गत उद्योग बंद पडतात. अशाप्रकारे यज़मान देशाच्या आर्थिक वाढीस बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे हानी पोहोचते.

## २) नफा प्रत्यावर्तन :

नफा प्रत्यावर्तन म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या झालेला नफा आपल्या देशात पाठवितात. बहुराष्ट्रीय कंपन्या प्रचंड नफा

मिळवितात. नफ्यामुळे यजमान देशाच्या परकीय चलन साठ्यावर प्रतिकूल परिणाम होतो. याचा अर्थ यजमान देशाचे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर देशाबाहेर जाते.

### ३) हस्तक्षेप :

सुरुवातीला बहुराष्ट्रीय कंपन्यांनी यजमान देशाच्या सरकारला अनेक मार्गाने मदत केली आणि त्यानंतर हळूहळू यजमान देशाच्या राजकीय बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. त्यामुळे यजमान देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आले.

### ४) यजमान देशाच्या राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक नाही :

बहुराष्ट्रीय कंपन्या फायदा असलेल्या क्षेत्रात गुंतवणूक करतात आणि यजमान देशाच्या राष्ट्रीय उद्‌दिष्टांची उपेक्षा करतात. मागासलेल्या भागाच्या विकासाची त्यांना काळजी नसते. यजमान देशाच्या दारिद्र्य आणि बेरोजगारी यांसारख्या दीर्घकालीन समस्यांचे निराकरण बहुराष्ट्रीय कंपन्या करीत नाही.

### ५) बलाढ्य शक्तीचा गैरवापर :

बहुराष्ट्रीय कंपन्या प्रचंड भांडवल असलेल्या शक्तिशाली आर्थिक संस्था आहेत. भविष्यात मोठ्या प्रमाणात नफा मिळविण्याच्या आशेने सद्य परिस्थितीत त्या तोटा सहन करतात. यजमान देशातील प्रतिस्पर्ध्यांना संपविणे या वाईट हेतूने बहुराष्ट्रीय कंपनीने स्थानिक स्पर्धा संपवून मक्तेदारी निर्माण केली आहे.

### ६) नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर :

बहुराष्ट्रीय कंपन्या यजमान देशाच्या नैसर्गिक संसाधनांचा निष्काळजीपणे वापर करतात. त्यामुळे यजमान देशातील नवनिर्मितीचे नैसर्गिक स्त्रोत वेगाने कमी होत जातात. अशाप्रकारे बहुराष्ट्रीय कंपन्या यजमान देशाच्या आर्थिक विकासामध्ये कायमचे नुकसान करतात.

### ७) संस्कृतीचा स्वार्थी प्रचार :

बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या वस्तूंची विक्री करण्यासाठी परकीय संस्कृतीस प्रोत्साहन देतात. ते भारतातील लोकांना त्यांच्या स्वत:च्या संस्कृतीचा विसर पाडायला भाग पाडतात. उदा. रसायनयुक्त शीतपेय तयार करून लोकांच्या आरोग्याला बहुराष्ट्रीय कंपनीने धोका निर्माण केला आहे.

### ८) सामान्य लोकांचे शोषण :

बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या व्यवसायांबरोबर हात मिळवणी करून स्वत: शक्तिशाली मक्तेदार म्हणून उभ्या राहतात. यामुळे आर्थिक शक्ती केवळ काही मोजक्याच लोकांच्या हाती केंद्रीत होते, जो त्यांना त्यांचा जन्मसिद्ध हक्क वाटतो व त्या गरीब कामगार वर्गाच्या शोषणातून स्वत:ला श्रीमंत करतात.

**कृती :**



- तुमच्या सभोवतालच्या परिसरातील कंपनीला भेट देऊन ती कंपनी बहुराष्ट्रीय कंपनी आहे की नाही ते शोधा.
- जागतिक कार्ये करणाऱ्या भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या शोधा.
- बहुराष्ट्रीय कंपनीची उत्पादने किंवा बहुराष्ट्रीय कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास करा.

## फरक :

१) खाजगी क्षेत्रातील संघटना आणि सार्वजनिक क्षेत्रातील संघटना.

| अ.क्र. | फरकाचे मुद्दे | खाजगी क्षेत्रातील संघटना | सार्वजनिक क्षेत्रातील संघटना |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | ज्या संघटनेचे व्यवस्थापन, नियंत्रण व अर्थपुरवठा व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाकडे असतो त्यास खाजगी क्षेत्रातील संघटना असे म्हणतात. | ज्या संघटनेचे व्यवस्थापन, नियंत्रण व अर्थपुरवठा केंद्र किंवा एकापेक्षा जास्त राज्य सरकारकडे असतो त्यास सार्वजनिक क्षेत्रातील संघटना असे म्हणतात. |
| २. | घटक | खाजगी क्षेत्रातील संघटनेत व्यक्तिगत व्यापार, भागीदारी संस्था, अविभक्त हिंदू कुटुंब व्यवसाय, कंपन्या, सहकारी संस्था इ. चा समावेश होतो. | सार्वजनिक क्षेत्रातील संघटनेत विभागीय आस्थापना, वैधानिक महामंडळ, सरकारी कंपनी. इ. चा समावेश होतो. |
| ३. | मुख्य हेतू | नफा मिळवणे हा खाजगी क्षेत्राचा मुख्य हेतू असतो. | समाजाला आवश्यक सेवा पुरविणे हा सार्वजनिक क्षेत्राचा मुख्य हेतू असतो. |
| ४. | व्यवस्थापन | मालकांकडे किंवा त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे खाजगी क्षेत्राचे व्यवस्थापन असते. | सरकारी अधिकाऱ्यांकडे किंवा संचालक मंडळाकडे सार्वजनिक संस्थांचे व्यवस्थापन असते. |
| ५. | संस्थेचे आकारमान | खाजगी क्षेत्रातील संघटना कोणत्याही आकारमानाच्या असतात. उदा. व्यक्तिगत व्यापार लहान प्रमाणावर कार्ये करतात तर संयुक्त भांडवली संस्था मोठ्या प्रमाणावर कार्ये करतात. | सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांचे आकारमान मोठे असते आणि कार्ये मोठया प्रमाणावर केली जातात. |
| ६. | भांडवल पुरवठादार | मालक व खाजगी व्यक्तींनी स्वतःजवळची साधनसामुग्री भांडवल म्हणून गुंतविलेली असते. प्रसंगी वित्तिय संस्थाकडून भांडवल उभारतात. | सार्वजनिक क्षेत्रात बहुतांश भांडवल सरकारचे असते. |
| ७. | व्यवसाय कार्यक्षेत्र | खाजगी क्षेत्राचे कार्यक्षेत्र औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात दिसून येते. | सार्वजनिक क्षेत्राचे कार्यक्षेत्र सामान्यपणे उपयुक्त सेवा जसे रेल्वे, टपाल, औद्योगिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात दिसून येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | निर्णयक्षमता | खाजगी क्षेत्रात निर्णय त्वरित घेतले जातात. कारण खाजगी क्षेत्रात खूप कमी व्यक्ती, अधिकारी निर्णय प्रक्रियेत सहभागी असतात. | सार्वजनिक क्षेत्रात निर्णय प्रक्रिया नोकरशाही अडथळ्यांमुळे गुंतागुतीची असते. निर्णय विलंबाने घेतले जातात. |
| ९. | कार्यक्षमता | खाजगी क्षेत्रातील संघटना व्यावसायिक दृष्टीकोनातून चालविल्या जात असल्याने अधिक कार्यक्षम असतात. | सार्वजनिक क्षेत्रात स्पर्धात्मकतेचा अभाव असल्यामुळे कार्यक्षमता कमी असते. |

## २) विभागीय आस्थापना आणि वैधानिक महामंडळे

| अ.क्र. | फरकाचे मुद्दे | विभागीय आस्थापना | वैधानिक महामंडळे |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | ज्या आस्थापनाची मालकी, व्यवस्थापन आणि वित्त पुरवठा सरकारद्वारे केला जातो त्यास विभागीय आस्थापना असे म्हणतात. | ज्या मंडळाची स्थापना संसदेत किंवा विधी मंडळात स्वतंत्र कायदा करुन केली जाते त्यास वैधानिक मंडळ असे म्हणतात. |
| २. | भांडवल | विभागीय आस्थापनांसाठी सरकारच्या वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करून भांडवल उभारणी केली जाते. | वैधानिक महामंडळाला स्थापनेच्या वेळी सरकारकडून भांडवल पुरवठा केला जातो जास्तीचे भांडवल सरकारकडून गरजेनुसार उभे केले जाते. |
| ३. | व्यवस्थापन | संबंधीत खात्याच्या मंत्र्यांकडून विभागीय आस्थापनांचे व्यवस्थापन केले जाते. | सरकारने नामनिर्देशीत केलेल्या संचालक मंडळाकडून वैधानिक महामंडळाचे व्यवस्थापन केले जाते. |
| ४. | नियंत्रण | संबंधीत खात्याचे मंत्री विभागीय आस्थापनावर नियंत्रण ठेवतात. | संसदेने किंवा विधी मंडळाने संमत केलेल्या कायद्याद्वारे वैधानिक महामंडळावर नियंत्रण ठेवले जाते. |
| ५. | स्वायत्तता | विभागीय आस्थापनांना निर्णय क्षमतेत स्वायत्तता नसते. | वैधानिक महामंडळांना निर्णय क्षमतेत स्वायत्तता असते. |
| ६. | कायदेशीर अस्तित्व | विभागीय आस्थापनांना सरकारपासून वेगळे कायदेशीर अस्तित्व नसते. | वैधानिक महामंडळांना सरकारपासून वेगळे कायदेशीर अस्तित्व असते. |
| ७. | स्थापना | संबंधीत खात्याचे मंत्री विभागीय आस्थापनांची स्थापना करतात. | वैधानिक महामंडळांची स्थापना संसदेत किंवा विधीमंडळात स्वतंत्र कायदा संमत करून केली जाते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | कर्ज घेण्याची क्षमता | विभागीय आस्थापना जनतेकडून कर्जे उभारु शकत नाहीत. | वैधानिक महामंडळे जनतेला बंधपत्राची विक्री करून कर्जाऊ भांडवल उभारतात. |
| ९. | कर्मचारी | विभागीय आस्थापनात काम करणारे कर्मचारी शासकीय कर्मचारी असतात. नागरी सेवा नियमाप्रमाणे त्यांचे कामकाज चालते. | वैधानिक महामंडळाचे कर्मचारी स्वतंत्रपणे नियुक्त केले जातात. करारानुसार, सेवानियमानुसार काम चालते. |

### ३) वैधानिक महामंडळ आणि सरकारी कंपनी

| अ.क्र. | फरकाचे मुद्दे | वैधानिक महामंडळ | सरकारी कंपनी |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | ज्या मंडळाची स्थापना संसदेत किंवा विधीमंडळात स्वतंत्र विशेष कायदा संमत करून केली जाते त्यास वैधानिक महामंडळ असे म्हणतात. | ज्या कंपनीच्या वसूल भाग भांडवलापैकी कमीत कमी ५१% भांडवल केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा दोघांनी मिळून गुंतविलेले आहे अशा कंपनीस सरकारी कंपनी असे म्हणतात. |
| २. | भांडवल | वैधानिक महामंडळाला स्थापनेच्या वेळी सरकारकडून भांडवल पुरवठा केला जातो. जास्तीचे भांडवल गरजेनुसार सरकारकडून पुरविले जाते. | केंद्र सरकार, राज्य सरकार, सर्वसामान्य जनता आणि वित्तीय संस्था यांच्याकडून भांडवल उभारणी केली जाते. |
| ३. | व्यवस्थापन | सरकारने नामनिर्देशित केलेल्या संचालक मंडळाकडून वैधानिक महामंडळाचे व्यवस्थापन केले जाते. | सरकारने नियुक्त केलेल्या संचालक मंडळाकडून आणि भागधारकांकडून सरकारी कंपनीचे व्यवस्थापन केले जाते. |
| ४. | नियंत्रण | संसदेत किंवा विधी मंडळाने संमत केलेल्या कायद्याद्वारे वैधानिक महामंडळावर नियंत्रण ठेवले जाते. | सरकार, भागधारक आणि कंपनी कायद्यात केलेल्या तरतुदीनुसार सरकारी कंपनीचे नियंत्रण केले जाते. |
| ५. | स्थापना | वैधानिक महामंडळाची स्थापना संसदेत किंवा विधी मंडळात स्वतंत्र कायदा संमत करून केली जाते. | कंपनी कायदा २०१३ तील तरतुदीनुसार सरकारी कंपनीची स्थापना केली जाते. |
| ६. | कर्ज घेण्याची क्षमता | वैधानिक महामंडळे जनतेला बंधपत्राची विक्री करून कर्जाऊ भांडवल उभारतात | भागांचे वाटप करून आणि कर्जे घेऊन सरकारी कंपनी कर्जाऊ भांडवल उभारते. |

४) विभागीय आस्थापना आणि सरकारी कंपनी

| अ.क्र. | फरकाचे मुद्दे | विभागीय आस्थापना | सरकारी कंपनी |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | ज्या आस्थापनाची मालकी, व्यवस्थापन, नियंत्रण आणि वित्त पुरवठा सरकारद्वारे केला जातो त्यास विभागीय आस्थापना असे म्हणतात. | ज्या कंपनीच्या वसूल भाग भांडवलापैकी कमीत कमी ५१% भांडवल केंद्र सरकार किंवा राज्य सरकार किंवा दोघांनी मिळून गुंतविलेले आहे अशा कंपनीस सरकारी कंपनी असे म्हणतात. |
| २. | भांडवल | विभागीय आस्थापनांसाठी सरकार वार्षिक अंदाज पत्रकात तरतूद करून भांडवल उभारणी केली जाते. | केंद्र सरकार, राज्य सरकार, सर्वसामान्य जनता आणि वित्तीय संस्था यांच्याकडून भांडवल उभारणी केली जाते. |
| ३. | व्यवस्थापन | संबंधीत खात्याच्या मंत्र्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांकडून विभागीय आस्थापनांचे व्यवस्थापन केले जाते. | सरकारने नियुक्त केलेल्या संचालक मंडळाकडून आणि भागधारकांकडून व्यवस्थापन केले जाते. |
| ४. | नियंत्रण | संबंधीत खात्याचे मंत्री विभागीय आस्थापनावर नियंत्रण ठेवतात. | सरकार, भागधारक आणि कंपनी कायद्यात केलेल्या तरतुदीनुसार सरकारी कंपनीचे नियंत्रण केले जाते. |
| ५. | स्वायत्तता | विभागीय आस्थापनांना निर्णय क्षमतेत स्वायत्तता नसते. | सरकारी कंपनीला निर्णय क्षमतेत स्वायत्तता असते. |
| ६. | कायदेशीर अस्तित्व | विभागीय आस्थापनांना सरकारपासून वेगळे कायदेशीर अस्तित्व नसते. | सरकारी कंपनीला सरकार पासून स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व असते. |
| ७. | स्थापना | संबंधित मंत्रालयामार्फत विभागीय आस्थापनाची स्थापना करतात. | कंपनी कायदा २०१३ तील तरतुदीनुसार सरकारी कंपनीची स्थापना केली जाते. |
| ८. | कर्ज घेण्याची क्षमता | विभागीय आस्थापना जनते कडून कर्जे उभारू शकत नाही. | नाणे बाजार व भांडवल बाजारातून कर्जे घेऊन सरकारी कंपनी कर्जाऊ भांडवल उभारणी करते. |
| ९. | कर्मचारी | विभागीय आस्थापनात काम करणारे कर्मचारी शासकीय कर्मचारी असतात. नागरी सेवा नियमांनुसार त्यांचे कामकाज चालते. | सरकारी कंपनीमध्ये कर्मचारी स्वतंत्रपणे नियुक्त केले जातात आणि करारानुसर, सेवाशर्तीनुसार काम चालते. |

## सारांश

- **सार्वजनिक क्षेत्रातील संस्था :**

ज्या संस्थांची मालकी वित्त पुरवठा, व्यवस्थापन आणि नियंत्रण हे सरकारचे किंवा सरकारी समूहाचे असते. त्या संस्थांना सार्वजनिक क्षेत्रातील संस्था असे म्हणतात.

- **विभागीय आस्थापना:**

ज्या आस्थापनाची मालकी, व्यवस्थापन, नियंत्रण आणि वित्तपुरवठा सरकारद्वारे केला जातो त्यास विभागीय आस्थापना असे म्हणतात.

- **वैशिष्ट्ये :**

१) सरकारद्वारे व्यवस्थापित

२) अधिकार प्रदान

३) शासनाकडून वित्तपुरवठा

४) सरकारी संचालन

५) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व नाही

६) शासकीय कर्मचारी

- **गुण :**

१) प्रत्यक्ष नियंत्रण

२) सरकारकडे थेट महसूल

३) खर्च कमी

४) निधीचा योग्य वापर

५) पात्रताधारक कर्मचारी

६) गुप्तता राखली जाते.

- **दोष :**

१) कार्यवाहीमध्ये विलंब

२) लालफितशाही आणि नोकरशाही

३) कमी पुढाकार

४) लवचीकतेचा अभाव

५) निर्णय घेण्यास विलंब

६) व्यावसायिकतेचा अभाव

- **वैधानिक महामंडळ :**

वैधानिक महामंडळ ही स्वायत्त संस्था आहे जी संसदेत किंवा राज्य विधिमंडळात स्वतंत्र कायदा करून हक्क, कार्ये आणि कर्तव्ये स्पष्ट करून स्थापन झालेली असते.

- **वैशिष्ट्ये :**

    १) सामुदायिक संघटना

    २) विधीमंडळास उत्तरदायी

    ३) स्वत:ची कर्मचारी प्रणाली

    ४) आर्थिक स्वायत्तता

    ५) राजकीय हस्तक्षेप नाही

- **गुण :**

    १) पुढाकार आणि लवचीकता

    २) प्रशासकीय स्वायत्तता

    ३) त्वरित निर्णय

    ४) कार्यक्षम कर्मचारी

    ५) व्यावसायिक व्यवस्थापन

    ६) सोपी भांडवल उभारणी

- **दोष :**

    १) कागदोपत्री स्वायत्तता

    २) पुढाकाराचा अभाव

    ३) गुंतागुंतीची संरचना

    ४) लाभावरून संघर्ष

    ५) अयोग्य व्यवहार

- **सरकारी कंपनी :**

अशी कंपनी जिची नोंदणी कंपनी कायदा २०१३ नुसार होते. जिच्याकडे कमीत कमी ५१% वसूल भाग भांडवल हे केंद्र सरकार किंवा कोंणतेही राज्य सरकार किंवा अंशत: केंद्र सरकारचे आणि अंशत: एक किंवा अधिक राज्य सरकारचे असते अशी कंपनी सरकारी कंपनी म्हणून ओळखली जाते.

- **वैशिष्ट्ये :**

१) कंपनी कायद्यानुसार नोंदणी

२) स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व

३) जास्तीत जास्त सरकारचे संचालक

४) स्वत:चे कर्मचारी

५) प्रक्रियात्मक नियंत्रणापासून मुक्त

- **गुण :**

१) सुलभ स्थापना

२) अंतर्गत स्वायत्तता

३) बदलातील सुलभता

४) शिस्त
५) व्यावसायिक व्यवस्थापन
६) सार्वजनिक उत्तरदायित्व

- **दोष :**

१) स्वायत्तता केवळ नावापुरती
२) प्रदर्शनाची भीती
३) तज्ज्ञ प्रतिनिधींचा अभाव
४) व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव

- **बहुराष्ट्रीय कंपनी :**

एकाच वेळी, एकापेक्षा जास्त देशात कार्ये करणारी कंपनी ही बहुराष्ट्रीय कंपनी असते. दुसऱ्या शब्दात ही एकापेक्षा जास्त देशात व्यावसायिक कार्ये करणारी कंपनी असते.

- **वैशिष्ट्ये :**

१) प्रचंड मालमत्ता आणि उलाढाल
२) आंतरराष्ट्रीय कार्ये
३) केंद्रीय नियंत्रण
४) आर्थिक शक्ती
५) प्रगत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान
६) व्यवसायिक व्यवस्थापन

- **गुण :**

१) रोजगार निर्मिती
२) विदेशी भांडवल प्रवाह
३) संसाधनांचा योग्य वापर
४) तांत्रिक विकास
५) व्यवस्थापकीय विकास
६) स्थानिक मक्तेदारी समाप्त
७) जीवनशैलीत सुधारणा
८) आंतरराष्ट्रीय बंधुता आणि संस्कृतीचा प्रसार

- **दोष :**

१) देशांतर्गत उद्योगांसाठी धोका
२) नफा प्रत्यावर्तन
३) हस्तक्षेप
४) यजमान देशाच्या राष्ट्रीय हितसंबधाची जपणूक नाही
५) बलाढ्य शक्तीचा गैरवापर
६) नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर
७) संस्कृतीचा स्वार्थी प्रचार
८) सामान्य लोकांचे पद्धतशीरपणे शोषण

## करिअरच्या संधी

१) भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचारी (IAS)

२) संचालक, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय संचालक, सनदप्राप्त लेखापाल, CMA, कंपनी चिटणीस - शिक्षणानंतर भारतामध्ये बहुराष्ट्रीय कंपनी सुरू करता येईल. सरकारच्या पात्रता परीक्षा उत्तीर्ण होऊन विविध पदांवरील अधिकारी.

## संदर्भ सूची


१) www.owlgen.com

२) इ.११वी वाणिज्य संघटना आणि व्यवस्थापन आवृत्ती २०१२

३) www.Google.com

४) Wikipedia.com




## स्वाध्याय

**प्र.१ ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) विभागीय आस्थापनांना ............त तरतूद करून वित्तपुरवठा केला जातो.

अ) वार्षिक अंदाजपत्रक   ब) मासिक अंदाजपत्रक   क) त्रैमासिक अंदाजपत्रक

२) ..............हे संसदेचे किंवा राज्य विधी मंडळाच्या विशेष कायद्याने स्थापन झालेली स्वायत्त संस्था आहे.

अ) वैधानिक महामंडळ   ब) सरकारी कंपनी   क) बहुराष्ट्रीय कंपनी

३) वैधानिक महामंडळ ...................किंवा राज्य विधी मंडळाला उत्तरदायी असते.

अ) संसद   ब) जनता   क) कर्मचारी

४) सरकारी कंपनीमध्ये कमीत कमी ............ वसूल भांडवल हे सरकारने धारण केलेले असते.

अ) ५१%   ब) ४१%   क) ३१%

५) सरकारी कंपनीचे भाग ............च्या नावाने खरेदी केले जातात.

अ) भारताचे राष्ट्रपती   ब) मुख्यमंत्री   क) रक्षामंत्री

६) सरकारी कंपनीचे लेखापरीक्षक ................च्या सल्ल्यानुसार नियुक्त केले जातात.

अ) भारत सरकारचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक   ब) अंकेक्षक   क) सनदप्राप्त लेखापाल

७) सरकारी कंपनीला सरकारपासून स्वतंत्र ............... अस्तित्व आहे.

अ) नैसर्गिक   ब) कायदेशीर   क) मानवी

८) ...........कंपनीला सार्वजनिक उत्तरदायित्व असते.

अ) बहुराष्ट्रीय कंपनी   ब) खाजगी   क) सरकारी

९) बहुराष्ट्रीय कंपनी ............शक्ती आहेत.

अ) आर्थिक　　ब) राजकीय　　क) सामाजिक

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) BHEL | १) विशेष विधीमंडळ कायद्याने निर्मिती |
| ब) वैधानिक महामंडळ | २) सरकारचे ४९% वसूल भांडवल |
| क) विभागीय आस्थापना | ३) सेवा हेतू |
| ड) खाजगी क्षेत्र | ४) रेल्वे |
| इ) सार्वजनिक क्षेत्र | ५) नफा हेतू |
| | ६) सरकारचे ५१% वसूल भांडवल |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह संज्ञा लिहा.**

१) व्यक्तींची किंवा व्यक्तीसमूहाची मालकी असलेला संघटना प्रकार

२) सरकारची मालकी असलेला व्यवसाय संघटना प्रकार

३) असे क्षेत्र ज्यांचा हेतू, नफा महत्तमीकरण असतो

४) असे क्षेत्र ज्यांचा हेतू, ग्राहकांना विश्वासार्ह सेवा प्रदान करणे हा असतो.

५) अशी संस्था ज्यांची मालकी, व्यवस्थापन आणि नियंत्रण हे सरकारचे किंवा दोन सरकारांचे मिळून असते.

६) अशी संस्था ज्यांची मालकी, व्यवस्थापन आणि नियंत्रण आणि वित्तपुरवठा हा सरकारकडून केला जातो

७) व्यवसाय संघटनेचा सर्वात जुना प्रकार

८) अशी संघटना जी आपली सर्व कार्ये सरकारचा एक अविभाज्य भाग म्हणून करते.

९) अशी संघटना जिचा वित्तपुरवठा वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करून विधीमंडळाद्वारे केला जातो.

१०) अशी संघटना जिच्यावर प्रत्यक्ष आणि संपूर्ण नियंत्रण हे सरकारचे असते.

११) अशी स्वायत्त संस्था जिची स्थापना संसदेचे किंवा राज्य विधिमंडळाच्या विशेष कायद्याने झालेली असते. किंवा ज्यांच्याकडे स्वत:चे अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये असतात.

१२) अशी संस्था जी संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला उत्तरदायी असते.

१३) अशी संस्था जी अंदाजपत्रक, लेखाकर्म आणि नियंत्रणास अधीन नाही.

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१) खाजगी क्षेत्रातील संघटना या व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहाच्या मालकीची असतात.

२) सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांची मालकी सरकारची असते.

३) ग्राहकांना विश्वासार्ह सेवा प्रदान करणे हे खाजगी क्षेत्राचे उद्‌दिष्ट असते.

४) सार्वजनिक क्षेत्र हे औद्योगिक धोरण १९५६ चा भाग आहे.

५) सार्वजनिक क्षेत्रातील विभागीय आस्थापना हा व्यवसाय संस्थेचा सर्वात जुना प्रकार आहे.

६) विभागीय आस्थापनांची सर्व कार्ये सरकारपासून स्वतंत्र असतात.

७) मंत्रालयाचे मंत्री हे विभागीय आस्थापनाचे प्रमुख असतात.

८) लालफितशाही आणि नोकरशाही या समस्या नेहमीच विभागीय आस्थापनामध्ये दिसून येतात.

९) विभागीय आस्थापनामध्ये पुढाकाराला आणि कौशल्याला खूप वाव असतो.

१०) विभागीय आस्थापनामध्ये लवचीकता असते.

### इ) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) भारतीय टपाल, भारतीय रेल्वे, बँक ऑफ इंडिया, एअरइंडिया

२) आर्युविमा महामंडळ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड, ओ.एन्.जी.सी.

३) पेप्सी, कोका कोला, डाबर, प्रॉक्टर अ‍ॅण्ड गॅम्बल

४) टाटा मोटर्स, हिंदुस्थान अ‍ॅरोनेटिक्स लिमिटेड, स्टिल अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, गॅस अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड

### फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सरकारी कंपनीला सरकारपासून स्वतंत्र ........... अस्तित्व आहे.

२) ........... ची मालकी, व्यवस्थापन, नियंत्रण आणि वित्त पुरवठा सरकारकडून केला जातो.

३) सर्व सरकारी कंपन्या .......... कायदा, २०१३ नुसार नोंदविल्या जातात.

४) बहुराष्ट्रीय कंपन्या ............ शक्ती आहेत.

### ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सरकारी कंपनी म्हणजे काय?

२) विभागीय आस्थापना म्हणजे काय?

३) वैधनिक महामंडळ म्हणजे काय?

४) बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे काय?

५) खाजगी क्षेत्र म्हणजे काय?

६) सार्वजनिक क्षेत्र म्हणजे काय?

### ह) खालील वाक्यातील अधोरेखीत शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) वैधानिक महामंडळ हे स्वतंत्र कायद्याने निर्माण केलेली **नैसर्गिक व्यक्ती** आहे.

२) वैधानिक महामंडळ हे संसदेला किंवा विधीमंडळाला उत्तरदायी **नसतात**.

३) बहुराष्ट्रीय कंपनीचे अस्तित्व **एकाच** देशात असते.

४) विभागीय आस्थापना त्यांची सर्व कार्ये **सरकारपासून स्वतंत्रपणे** करतात.

५) **खाजगी** क्षेत्राचा हेतू हा ग्राहकांना विश्‍वसनीय सेवा पुरविणे हा असतो.

### प्र.२ रा संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.

१) खाजगी क्षेत्रातील संघटना

२) सार्वजनिक क्षेत्रातील संघटना

३) विभागीय आस्थापना

४) वैधानिक महामंडळे

५) सरकारी कंपनी

६) बहुराष्ट्रीय कंपनी

**प्र.३ रा खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) **क्ष कंपनीमधील भांडवल योगदान पुढीलप्रमाणे :**

मध्यप्रदेश सरकारचे ३५%, महाराष्ट्र सरकारचे ३५% आणि भारत सरकारचे ३०% आहे.

i) या कंपनीचा प्रकार कोणता ?

ii) या कंपनीचे कोणतेही एक वैशिष्ट्य सांगा.

iii) या प्रकारच्या कंपनीची उदाहरणे सांगा.

२) एक कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय सिंगापूर येथे आहे आणि तिच्या शाखा वाराणसी (भारत) आणि हंबनटोटा (श्रीलंका) येथे आहेत. ही कंपनी यजमान देशाला संबंधीत शाखांच्या कार्यालयामार्फत Cellular (मोबाईल) सेवा पुरविते.

i) या संघटनेचा प्रकार कोणता?

ii) कोणत्या देशात कंपनीची उत्पत्ती आहे?

iii) कंपनीचे शाखा कार्यालय असलेल्या कोणत्याही एका देशाचे नाव सांगा.

३) केंद्र सरकार संसदेत विशेष कायदा संमत करून व्यवसाय संघटनेची स्थापना करते. जिला प्रशासनात स्वायत्तता असते आणि हि संघटना संसदेला उत्तरदायी असते.

i) व्यवसायाचा कोणता संघटना प्रकार आहे?

ii) या संघटनेचे एक वैशिष्ट्य सांगा.

iii) या संघटना प्रकाराचे एक उदाहरण द्या.

**प्र.४ था फरक स्पष्ट करा.**

१) खाजगी क्षेत्रातील संघटना आणि सार्वजनिक क्षेत्रातील संघटना

२) विभागीय आस्थापना आणि वैधानिक महामंडळ

३) सरकारी कंपनी आणि बहुराष्ट्रीय कंपनी

४) विभागीय आस्थापना आणि बहुराष्ट्रीय कंपनी

५) सरकारी कंपनी आणि वैधानिक महामंडळ

६) विभागीय आस्थापना आणि सरकारी कंपनी

७) वैधानिक महामंडळ आणि बहुराष्ट्रीय कंपनी

**प्र.५ वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) विभागीय आस्थापनाची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) वैधानिक महामंडळाची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) बहुराष्ट्रीय कंपनीचे कोणतेही दोन दोष स्पष्ट करा.

४) सरकारी कंपनीचे कोणतेही चार गुण स्पष्ट करा.

**प्र.६ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) विभागीय आस्थापना सार्वजनिक सेवा पुरवितात.

२) विभागीय आस्थापनावर सरकारचे प्रत्यक्ष नियंत्रण असते.

३) वैधानिक महामंडळात राजकीय हस्तक्षेप नसतो.

४) वैधानिक महामंडळात व्यावसायिक व्यवस्थापन असते.

५) बहुराष्ट्रीय कंपनी स्थानिक मक्तेदारी संपविण्यास मदत करतात.

६) बहुराष्ट्रीय कंपनीला जागतिक अस्तित्व असते.

७) बहुराष्ट्रीय कंपनीकडे आर्थिक बलाढ्य शक्ती असते.

**प्र.७ वा खालील प्रश्न सोडवा.**

१) विभागीय आस्थापनांचे गुण सांगा.

२) विभागीय आस्थापनांचे दोष सांगा.

३) वैधानिक महामंडळाचे गुण स्पष्ट करा.

४) वैधानिक महामंडळाचे दोष सांगा.

५) सरकारी कंपनीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६) सरकारी कंपनीचे दोष स्पष्ट करा.

७) बहुराष्ट्रीय कंपनीची वैशिष्ट्ये सांगा.

८) बहुराष्ट्रीय कंपनीचे फायदे सांगा.

**प्र.८ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) विभागीय आस्थापना सविस्तर स्पष्ट करून वैशिष्ट्ये विशद करा.

२) विभागीय आस्थापनांचे गुण आणि दोष सविस्तर स्पष्ट करा.

३) वैधानिक महामंडळ सविस्तर स्पष्ट करून वैशिष्ट्ये विशद करा.

४) वैधानिक महामंडळाचे गुण आणि दोष सविस्तर स्पष्ट करा.

५) सरकारी कंपनी सविस्तर स्पष्ट करून वैशिष्ट्ये विशद करा.

६) सरकारी कंपनीचे गुण आणि दोष सविस्तर स्पष्ट करा.

७) बहुराष्ट्रीय कंपनी सविस्तर स्पष्ट करून वैशिष्ट्ये विशद करा.

८) बहुराष्ट्रीय कंपनीचे गुण आणि दोष सविस्तर स्पष्ट करा.

# ६ व्यवसाय सहाय्यक संस्था


६.१ **प्रस्तावना**

६.२ **सिडबी (SIDBI)**
- प्रस्तावना
- वैशिष्ट्ये

६.३ **नाबार्ड (NABARD)**
- प्रस्तावना
- वैशिष्ट्ये

६.४ **के. व्ही. आय. सी. (KVIC)**
- प्रस्तावना
- वैशिष्ट्ये

६.५ **महिला स्वयं सहायता गट (SHG)**
- प्रस्तावना
- वैशिष्ट्ये

६.६ **जागतिक बँक (World Bank)**
- प्रस्तावना
- वैशिष्ट्ये

- **सारांश**
- **स्वाध्याय**


श्रीमती रूपा आणि श्रीमती धूपा या घरकाम करणाऱ्या महिला असून त्या दोघी एकमेकींच्या समस्यांवर चर्चा करत आहेत.

**रूपा** : धूपा, तू कशी आहेस ?

**धूपा** : मी मजेत आहे. तू कशी आहेस ?

**रूपा** : मी सुद्‌धा मजेत आहे.

**धूपा** : रुपा, तुला शिलाई मशीन कशी काय मिळाली? मला माहीत आहे की आपले उत्पन्न मर्यादित आहे.

**रूपा** : मी माझ्या भागातील महिला बचत गटाची (SHG) सदस्य आहे. ज्यात माझ्यासारख्या अनेक महिला सदस्य आहेत. ज्या दर महिन्याला विशिष्ट रक्कम बचत म्हणून जमा करतात. आमच्या बचत गटाने आम्हाला शिलाई मशिन दिल्या आहेत. त्याचा उपयोग करून मला अधिक उत्पन्न मिळत आहे.

**धूपा** : खूप छान, स्वयं सहायता बचत गट (SHG) म्हणजे काय ?

**रूपा** : SHG म्हणजे स्वयं सहायता गट जे प्रामुख्याने महिलांकडून चालविले जातात.

**धूपा** : ठीक आहे. आता मी सुद्‌धा माझ्या भागात बचत गट (SHG) सुरू करण्यासाठी पुढाकार घेणार आहे. तुझ्या अमूल्य मार्गदर्शनाबद्‌दल धन्यवाद रूपा.

### ६.१. प्रस्तावना :

वित्त ही व्यवसायाची जीवनवाहिनी समजली जाते, कारण वित्त हाच सर्व आर्थिक क्रियांचा पाया असतो. कोणत्याही व्यवसायाचे यश प्रामुख्याने भांडवलाच्या कार्यक्षम व्यवस्थापनावरच अवलंबून असते. वित्त हा व्यवसायांसाठी

लागणाऱ्या पैशाचा स्रोत असतो. व्यवसायाची सुरुवात करण्यासाठी, व्यवसाय कार्यक्षमपणे चालविण्यासाठी आणि व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. व्यवसायासाठी भांडवल उभारणे कठीण जाते, कारण व्यवसाय चालविण्यामध्ये मोठी जोखीम असते.


या प्रकरणात व्यवसायास भांडवल पुरवठा करणाऱ्या विविध संस्थांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

### ६.२ भारतीय लघुउद्योग विकास बँक : SIDBI (Small Industries Development Bank of India) :

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची स्थापना २ एप्रिल, १९९० रोजी लघु उद्योग विकास बँक कायदा, १९८८ अंतर्गत करण्यात आली आहे. सुरुवातीला ही बँक पूर्णपणे भारतीय औद्योगिक विकास बँकेच्या मालकीची असलेली सहाय्यकारी बँक म्हणून सुरू करण्यात आली होती. सध्या या बँकेची मालकी सार्वजनिक क्षेत्रातील ३४ संस्थांकडे आहे. या बँकेचे लखनौ येथे मुख्य कार्यालय आहे. ही बँक अशाच स्वरूपाची कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य करते. भारतभर बँकेची १५ विभागीय कार्यालये आणि ८४ शाखा आहेत. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगास अर्थसहाय्य करणे हा भारतीय लघु औद्योगिक विकास बँकचा उद्देश आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करतात, म्हणून त्यांचे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान आहे. या उद्योगांच्या आर्थिक आणि आर्थिकेतर समस्या सोडविण्यासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँकेने रचनात्मक पुढाकार घेतला आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगास सक्षम बनवून त्यांनी जागतिक स्पर्धेत टिकून राहणे शक्य व्हावे म्हणून या बँकेकडून विशेष प्रयत्न केले जातात. तसेच आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते. या उद्योगांची आर्थिक स्थिती आणि विकास यातील अंतर शोधून, ते कमी करण्यासाठी SIDBI कडून प्रयत्न केले जातात.

या बँकेकडून उदयोन्मुख उद्योजकास विविध कौशल्ये शिकविण्यात पुढाकार घेतला जातो. तसेच तंत्रज्ञानात अद्ययावतपणा आणण्यासाठी पावले उचलली गेली आहेत. वस्तू वितरण साखळी विस्तारीत करण्यासाठीही कार्ये केली जातात.



- **भारतीय लघुउद्योग विकास बँकेची वैशिष्ट्ये :**

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

**१. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अर्थसहाय्य करणारी संस्था :**

भारतीय लघुउद्योग विकास बँक ही लघू, मध्यम आणि दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आली असून ही बँक सूक्ष्म, लघू आणि मध्यम क्षेत्रातील उद्योगांना अर्थसहाय्य करणारी प्रधान बँक आहे. तसेच ही बँक सूक्ष्म, लघू आणि मध्यम क्षेत्रांशी संबंधीत विविध संस्थाच्या कार्यामध्ये समन्वयक म्हणून देखील काम करते. ही बँक बँकींग आणि बिगर बँकिंग (NBFC) संस्थांना सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांचा वित्तपुरवठा वाढण्यासाठी पुनर्वित्त करते आणि सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना प्रत्यक्ष अर्थपुरवठा करते. तसेच भारतीय सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योगांची पारंपारिक साधनाद्वारे भांडवली गरज पूर्ण होत नसल्यास अर्थसहाय्य करते.

**२. शाश्वत विकास :**

भारतीय लघुउद्योग विकास बँक भारतातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या शाश्वत विकासासाठी कार्य करते. ही बँक राष्ट्राच्या पर्यावरणीय संपत्तीचे रक्षण करुन आर्थिक राष्ट्रीय संपत्ती निर्माण करण्यासाठी मदत करते. तसेच शाश्वत आणि सक्षम अर्थपुरवठा संस्कृतीला चालना देते आणि सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांत पर्यावरणीय नियंत्रणाचे फायदे याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेते. याबरोबरच ही बँक उर्जा, सक्षम तंत्रज्ञान व सुयोग्य उत्पादनातील गुंतवणुकीसाठीच्या योजनांवर भर देते तसेच प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने हरितगृहातील वायू उत्सर्जन कमी करण्यासाठीसुद्धा मदत करते.

**३. सल्लागार म्हणून कार्य :**

भारतीय लघूउद्योग विकास बँक ही सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांचा सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून कार्य करते. तसेच स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विस्तारासाठीसुद्धा ही बँक कार्य करते, स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वस्तू विपणनाच्या साखळीच्या विस्तारासाठी मदत करते. आणि या उद्योगाचे आधुनिकीकरण व तंत्रज्ञानातील अद्ययावतपणासाठी पुढाकार घेण्याचे कार्यसुद्धा ही बँक करते.

**४. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना सेवा पुरविणे :**

भारतीय लघुउद्योग विकास बँक विविध संस्थांद्वारे व्यवसायास विविध सेवा पुरविते. त्या संस्था पुढील प्रमाणे.

i.) **एस.व्ही.सी.एल – (SIDBI Venture Capital Ltd.)** ही संस्था जुलै १९९९ मध्ये स्थापन करण्यात आली असून पूर्णतः भारतीय लघुउद्योग विकास बँकेची मालकी असलेली सहायकारी संस्था आहे. जैवतंत्रज्ञान, औषध निर्माण, आभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान आणि जीव विज्ञान यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रास भांडवल पुरवठा करते.

ii.) **सी.जी.टी.एम.एस.ई.– (Credit Guarantee Fund Trust for micro & small Enterprises) :** CGTMSE : ही एक विश्वस्त संस्था असून पात्र बँका/वित्तीय संस्था मार्फत 'तृतीय पक्षा हमी आधारित' पत हमी योजनेमार्फत वित्तिय सुविधा पुरविते.

iii.) **एस.एम.ई.आर.ए.– (Small medium Enterprise Rating Agency of India Ltd.) :** ही संस्था सुद्धा लघुउद्योग विकास बँकेने स्थापना केली असून डन ॲण्ड बैडस्ट्रिट इनफॉरमेशन सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लि., CD & B आणि इतर सार्वजनिक, खाजगी व विदेशी बँकांकडून त्रयस्थ संस्थाकडून मूल्यमापन करून उद्योगास व्यापक, पारदर्शक आणि विश्वासार्हता या बद्दल दर्जा देण्याचे काम करते.

iv.) **इंडिया एस.एम.ई.टी.एस.एल– (India SME Technology Services Ltd.)** ही संस्था देशातील लघु आणि मध्यम उद्योगास जागतिक दर्जा मिळवून देण्यासाठी संधी उपलब्ध करून देते. तसेच उदयोन्मुख हरित तंत्रज्ञानावर आधारीत उद्योग स्थापन करण्यास सहकार्य करते.

v.) **आय.एस.ए.आर.सी – (India Asset SME Reconstruction Company) :** ही संस्था लघू आणि मध्यम उद्योगांची अनुत्पादित मालमत्ता ताब्यात घेते आणि अनुत्पादित मालमत्तांसंबधीत सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाच्या अडचणी सोडविण्या संदर्भात भर देते.

vi.) **एम.यू.डी.आर.ए.– (Micro Unit Development Refinance Agency) :** ही संस्था अर्थसहाय्य न मिळालेल्या सूक्ष्म उद्योगास अर्थसहाय्य करण्याचे काम करते.

### ५. राष्ट्रीय ध्येय प्राप्त करणे :

भारतीय लघू उद्योग विकास बँक सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगास अर्थसहाय्य करून दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मितीस सहकार्य करते. उद्योगांची स्पर्धाशक्ती वाढविणे, उद्योजकता विकासास चालना देणे आणि उद्योजकास कौशल्य वृद्धीसाठी प्रशिक्षण देण्याचे कार्य करते. याशिवाय महिला व आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींमध्ये उद्योजकता निर्मितीसाठी प्रयत्न करते. ही बँक निमशहरी भागातील उद्योगास अर्थपुरवठा करून तेथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देऊन शहरी भागाकडे होणारे स्थलांतर कमी करण्यास मदत करते.

### ६. विविध प्रकारे अर्थ सहाय्य :

भारतीय लघुउद्योग विकास बँक खालील विविध प्रकारांद्वारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देतेः

अ) **प्रत्यक्ष अर्थसहाय्य :** सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांस खेळते भांडवल, मुदत कर्ज, परकीय चलन कर्ज, समभाग खरेदी करून अर्थसहाय्य करणे आणि उर्जा बचत योजना इ. द्वारे अर्थसहाय्य करणे.

ब) **अप्रत्यक्ष अर्थसहाय्यः**ही बँक इतर बँका आणि राज्य पातळीवरील वित्तीय संस्थाना अर्थसहाय्य करून अप्रत्यक्षपणे उद्योगांना अर्थसहाय्य करते.

क) **सूक्ष्म अर्थसहाय्यः** ही बँक छोटे व्यावसायिक आणि लघुउद्योजकांस उद्योग स्थापन करण्यासाठी सूक्ष्म अर्थसहाय्य करते.

### ७. तंत्रज्ञानविषयक पुढाकार :

- **स्टार्ट अप मित्र :** ही योजना लघुउद्योग विकास बँकेच्या पुढाकाराने १७ मार्च, २०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत भागधारक, उदयोन्मुख उद्योजक, गुंतवणूकदार, उद्योग मंडळ, मार्गदर्शक, सल्लागार आणि बँका इ. एकाच व्यासपिठावर एकत्र आणले जाते व या योजनेअंतर्गत भांडवल आणि नवीन उद्योजकाच्या विकासासाठी मदत केली जाते. तसेच राज्य व केंद्र शासनासोबत 'ज्ञान भागीदार' (Knowledge Partner) म्हणून कार्य केले जाते.
- **उद्यमी मित्र :** सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगास पतपुरवठा व इतर सेवा उपलब्ध करून देण्यासाठीचे प्रवेशद्वार म्हणून भारतीय लघुउद्योग विकास बँकेने " **उद्यमी मित्र**" योजनेची सुरुवात केली. या योजनेद्वारे उद्योजक आपल्या पसंतीनुसार बँकेची निवड करून अर्ज करू शकतात. यामध्ये उद्योजक प्रत्यक्ष बँकेत न जाता कर्जासाठी अर्ज करू शकतात आणि सोयीची बँक निवडू शकतात. त्यांच्या कर्जाच्या अर्जाची स्थिती पाहू शकतात तसेच विविध प्रकारचे कर्ज मिळवितात. या योजने अंतर्गत सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक दस्ताऐवज upload करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तसेच उद्यमी मित्र योजनेद्वारे सूक्ष्म, लघू आणि मध्यम उदयोगांना (MSME) अर्थ पुरवठा मिळण्यासाठी मदत केली जाते.

## ८. अंमलबजावणी संस्था : (Nodal Agency)

SIDBI ला भारत सरकारने अंमलबजावणी संस्थेचे दायित्व दिले आहे. याद्वारे सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांसाठीच्या अनुदान योजनांची अंमलबजावणीसाठी मदत केली जाते. या योजनेचा उपयोग आधुनिकीकरण, अद्ययावतता व विस्तार यासाठी होतो.



**कृती :**

सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगाना (M.S.M.E.) भेट देऊन त्यांच्या भांडवल उभारणी प्रक्रियेची माहिती जाणून घेणे.



sidbi SWAVALAMBAN
BECHAIN SAPNO KO PANKH....
CONSUMER CONNECT INITIATIVE Powered by THE TIMES OF INDIA

**STEPS TO LIVE YOUR DREAMS**

**DREAM BIG**
Dream is the first step for becoming an entrepreneur. Follow your dream to pursue your aspirations

**CONCEPTUALISE AN IDEA**
Dream will lead to ideas and ideas are required to be conceptualised as a viable business proposition vis-a-vis pains and gaps in the market

**STUDY OTHER BUSINESSES**
Find out the key success factors of other businesses and whether it can be done in a better way

**IF YOU NEED FUNDS, LOOK FOR IT**
Look for various funding options. Know about government schemes like MUDRA loan, Stand-up India, CGTMSE etc

**TAKE THE PLUNGE**
Transform yourself into an entrepreneur and be a job creator. Be your own boss and control your income

**DISCOVER MARKET OPPORTUNITY**
Identify market opportunities based on location and pricing. Lend ears to opportunities and blend it with solution perspective

**MAY GOD HELP YOU WITH YOUR VENTURE!**
With all goals and objectives set, you are ready to embark on your venture!

IF YOU FEEL THAT THE ABOVE STORY HAS GOT YOU THINKING ABOUT WHAT YOU WANT TO BE, PLEASE SEND A WHATSAPP MESSAGE AT 022 67221495 AND TAKE YOUR VERY FIRST STEP TOWARDS BECOMING AN ENTREPRENEUR

Samridhi

**Eye opener**

World over, many have become successful entrepreneurs by adopting one of the following

**Innovative idea, product or service:** Many successful entrepreneurs tapped into the potential of an idea that was never explored before. While some invented a product or service, some encashed an idea that could serve the needs of consumers.

**Cheaper Alternative to an Existing Product:** Aspiring entrepreneurs spend several hours understanding the consumer dynamics. Value for money can be a key success factor and cheaper alternative of a product or service can attract new customers.

**Exploring a new consumer base:** It is just not about innovation, it is often understanding the consumer behaviour too. Several entrepreneurs succeed in the recent yeas by repurposing existing products and services to reach out to a new customer base.

**Devising a new business model:** The yearning to succeed in their endeavours has led many businessmen to create a mark of their own. They developed their ideas into workable business model. This was not only something new for the market, but turned out to be a profitable undertaking for these entrepreneurs.

Introducing Mr. Dhandebaaz, who will guide you through your journey of entrepreneurship

**Only business no bakwas!**

MEET MR. DHANDEBAAZ

Witty & Wise, Mr. Dhandebaaz will be your guide who will help you fulfil your dreams. Your plan takes its own time to flourish into a successful business model that can achieve its predetermined goals. While foraying into an unchartered domain, you may be plagued with a series of doubts and often your thoughts will be flooded with inexplicable fears. That time everybody seeks handholding and Mr. Dhandebaaz is here to serve the purpose. His wisecrack is not only insightful, but comes with an undertone of thoughtful and actionable ideas. He is here to help you with his immense knowledge of the market and in-depth understanding of business.

After your business objectives are set, Dhandebaaz will help you to embark on your trail to success. His counsel and tactful approach will help you take informed decisions about your business goals.

**BUSTING MYTHS**

**#1 BUSINESS IS RISKY; JOB IS SAFE**

People often consider jobs to be a very safe option. However, uncertainty looms large in job market as organisations are heavily dependent on the economy just like businesses. Gone are the days when employment was glorified for the sense of security that it instills. There is no guarantee that jobs are permanent, but business will give you ample prospects to multiply your income. When the offered products and services are better, it automatically attracts repeat and new customers, which can bring the desired stability in income. Business is a safer bet now.

**Survival to Success: Journey of Mari Anna**

MEET A HERO

When young Mari Anna landed in Mumbai from Tirunelveli in search of a job, he had only one challenge in life; how to survive! While doing varied odd jobs including washing dishes and helping cooks in restaurants, never did he thought that one day, his Idly-Wada will find a way to the dining halls of many high-rise homes in the city. He started with a morning adventure of selling idli and *chutney* on a borrowed bicycle between 3 am to 5 am. That was his first attempt at entrepreneurship, which changed his life forever. His business kept growing from a borrowed bicycle to a Thela. These days Mari runs his idli-dosa center from a rented shop in Navi Mumbai. Besides the two cooks and three waiters in the shop, there are four delivery boys. He delivers party orders in his own Maruti Suzuki Eco. "I don't know what entrepreneurship is. But all these things are not possible while being on a job. At max I would have been managing cash counter in a small restaurant", replies Mari to the question whether he is happy being an entrepreneur.

*Entrepreneurs are going Miles with MSME loans under SIDBI SMILE @ 8.12%**

*"SIDBI has provided Term Loan under SMILE at a very good rate and in a quick time. With SIDBI on my side, I am more focused on scaling up my business."*

*Akshat*
*Omega Printopack, Haridwar*

sidbi

8.12%

**Loans for MSMEs at attractive interest rates by SIDBI**

**Eligible Enterprises:** New/Existing enterprises in the manufacturing as well as service sector.

**Utility:** Undertaking expansion, to tap new emerging opportunities, modernization, technology upgradation, business expansion etc. The applicant must achieve minimum internal investment grade rating of SIDBI.

**Loan Size:** ₹25 Lakhs to ₹5 Crores.

**Rate of Interest:** Attractive Interest Rates starting from 8.12%*.

**Repayment Period:** Up to 120 months.

**Indicative rate for a 5 year term loan. Interest rates are subject to change.*

For details visit: www.sidbi.in

## ६.३. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक : (NABARD National Bank for Agriculture & Rural Development)

- **प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताच्या ग्रामीण भागातील बऱ्याचशा लोकांच्या दैनंदिन उपजीविकेचे साधन म्हणून शेती आणि अनुषंगिक कामे दिसून येतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेला संस्थात्मक पतपुरवठ्याद्वारे प्रोत्साहन देण्याच्या गरजेबाबत भारत सरकारला जाणीव आहे. भारतामध्ये श्री. बी. शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय रिझर्व्ह बँकेने भारतामधील कमी पतपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी CRAFICARD ही समिती स्थापन केली आहे.

(Committee to review the Arrangements for Institutional Credit for Agriculture & rural Development) (CRAFICARD)

शिवरामन समितीच्या शिफारशीनुसार १२ जुलै,१९८२ मध्ये संसदेच्या विशेष कायद्यानुसार राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास कायदा १९८१ नुसार सदर बँकेची स्थापना झाली.

ग्रामीण वित्तपुरवठ्यासाठी नाबार्ड ही शिखर संस्था म्हणून ओळखली जाते. शेतीचे संवर्धन व विकास, लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, हस्तकला, अन्य ग्रामीण हस्तकला व इतर पूरक व्यवसायांना विविध प्रकारच्या सोयी, पतपुरवठा करणे व त्याचे नियमन करणे या उद्देशाने नाबार्डची स्थापना झाली आहे.

- **वैशिष्ट्ये :**

१) **शिखर बँक :** ग्रामीण आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या सर्व प्रकारच्या वित्तीय संस्थांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठीची नाबार्ड ही शिखर बँक आहे. ती भारतामध्ये ग्रामीण वित्तपुरवठा संस्थांची ध्येयधोरणे ठरविणे आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे काम करते. भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यावर नाबार्ड देखरेख करते. केंद्र सरकारच्या आणि मध्यवर्ती बँकेच्या ग्रामीण पतपुरवठा धोरणाची अंमलबजावणी करते.

२. **पुनर्वित्ताची सुविधा :** ग्रामीण आर्थिक कार्यासाठी वित्तपुरवठा करणाऱ्या राज्य सहकारी बँका, भूविकास बँक आणि विभागीय ग्रामीण बँका आणि इतर मान्यता प्राप्त वित्तीय संस्थाना पुनर्वित्त सुविधा पुरविते. या संस्थांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा पतपुरवठा करते. नैसर्गिक आपत्ती उदा. दुष्काळ, नापिकी आणि पूर या कठीण काळात मात करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या व्यापारी व सहकारी बँकांना पुनर्वित्त सुविधा पुरविते.

३. **वित्तीय संस्थांना मदत :** सहकारी बँकांना आणि प्रादेशिक ग्रामीण बँकाना कृती विकास आराखडा बनविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. कृती विकास आराखडा योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख करते. सहकारी बँकांच्या व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS), दैनंदिन कामकाजाचे संगणकीकरण आणि मनुष्यबळाचा विकास यासाठी आर्थिक मदत करते.

४. **ग्रामीण विकासासाठी अर्थसाहाय्य :** ग्रामीण विकासासाठी आणि विविध प्रकारच्या शासकीय योजनांसाठी राज्य शासनाला अर्थसहाय्य करण्यासाठी पुढाकार घेते. समाजातील दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी पुनर्वित्त पुरवठा करते. कृषी क्षेत्रातील लघू आणि सूक्ष्म जलसिंचन कामात देखील महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी, विविध प्रकारचे बिगर कृषी कार्यक्रम वाढीसाठी, आणि बिगर कृषी क्षेत्रातील रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी वित्तपुरवठा करते.

५. **कृषीक्षेत्र वित्तपुरवठा संस्थाचे पर्यवेक्षण :** अधिकोषीय नियमन कायदा १९४९च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विभागीय ग्रामीण बँका व सहकारी बँका यांची तपासणी करणे तसेच राज्य सहकारी शेती आणि ग्रामीण विकास बँक आणि बिगर पतपुरवठा सहकारी शिखर संस्थांचीदेखील स्वेच्छेने तपासणी करण्याचे काम करते.

६. **रिझर्व्ह बँकेला शिफारशी करणे :** सहकारी बँकांना परवाने देणे, राज्य सहकारी बँक आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या नवीन शाखा उघडणे या संदर्भात रिझर्व्ह बँकेला शिफारशी करते.

७. **ग्रामीण उद्योगांना अर्थपुरवठा करणे :** लघुउद्योग, इतर कुटीरोद्योगांना पुनर्वित्त पुरवठा करण्यामध्ये नाबार्ड महत्त्वाची भूमिका बजावते. व्यापारी आणि सहकारी बँकाना ग्रामीण रोजगारासाठी प्रोत्साहन देण्यासाठी कर्जपुरवठा करते. ग्रामीण युवकांमध्ये उद्योजकीय संस्कृतीस चालना देण्यासाठी नाबार्ड 'कौशल्य व उद्योजकता विकास कार्यक्रम' आयोजित करते आणि ग्रामीण भागात नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देते.

८. **राष्ट्रीय विकासामध्ये भूमिका :** शेती उत्पादनांच्या साठवणूक सुविधेमध्ये सुधारणा करण्यासाठी, आधुनिक साठवणूक सुविधा वापरासाठी प्रेरित करण्यामध्ये नाबार्ड महत्त्वाची भूमिका बजावते. शेती उत्पादनाच्या निर्यातीसाठी देखील नाबार्ड चालना देते. हरित क्रांती, नील क्रांती आणि धवल क्रांतीच्या माध्यमातून शाश्वत विकास साधण्यामध्ये नाबार्ड महत्त्वाची भूमिका बजावते.



**कृती :**

नाबार्डच्या विकास कार्यक्रमाला भेट द्या.

## ६.४ खादी व ग्रामोद्योग आयोग : (KVIC - Khadi & Village Industries Commission)

- **प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपूर्व काळात खादी हे भारतात आत्मनिर्भरतेचे प्रतीक म्हणून ओळखले जात होते. भारतीय स्वातंत्र्याच्या काळात खादीने परदेशी कापडांच्या बहिष्कारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. खादी ग्रामीण कारागिरांना उपजिविका व आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करून देते. स्वातंत्र्योतर काळात भारत सरकारने पंचवार्षिक योजनांद्वारे खादी व ग्रामोद्योगांच्या वृद्धी व विकासासाठी पुढाकार घेतला. खादी आणि ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळ (All India Khadi and Village Industries Board) १९५३ मध्ये स्थापन करण्यात आले. सन १९५६ मध्ये खादी व ग्रामोद्योग आयोग कायदा, संसदेच्या विशेष कायद्याअंतर्गत बनविण्यात आला, म्हणजेच खादी व ग्रामोद्योग कायदा १९५६. एप्रिल १९५७ मध्ये खादी व ग्रामोद्योग आयोगाची स्थापना झाली आणि अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळाचे काम त्यांना हस्तांतरित करण्यात आले. सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत काम करणारे खादी व ग्रामोद्योग आयोग हे भारतातील खादी व ग्रामोद्योगांसाठी काम करणारे शिखर संघटन आहे. यांचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

खादी व ग्रामोद्योग आयोग खादीचे नियोजन, प्रोत्साहन व उत्पादनात अमूल्य योगदान देतो त्याचप्रमाणे भारतात ग्रामीण उद्योगांची स्थापना करण्यासाठीही सक्रियपणे कार्यरत आहे. ग्रामीण उद्योगांच्या विकासाच्या संभाव्यतेचा शोध घेणे, स्थानिक पातळीवर चालणाऱ्या ग्रामीण उपक्रमांना चालना देणे आणि विकासामध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे इ. कार्ये पार पाडतात. स्थानिक उपलब्ध कच्चा माल आणि मानवी कौशल्ये वापरण्यावर जोर देतात ज्यामुळे ग्रामीण भागात बिगरकृषी रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होते. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यासाठी मदत करतात. आयोग ग्रामीण विकासासाठी काम करणाऱ्या संस्थामध्ये समन्वयकाची भूमिका बजावतो.

खादी व ग्रामोद्योग आयोगाला सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयाकडून विविध कार्यक्रम आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निधी प्राप्त होतो. आयोग या निधीचा वापर प्रत्यक्षरित्या त्यांच्या राज्य कार्यालयाद्वारे किंवा अप्रत्यक्षपणे खादी आणि ग्रामोद्योग मंडळाद्वारे करतो. आयोग राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहे परंतु ग्रामीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये संबधीत राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळे कार्यरत आहेत.

- **खादी व ग्रामोद्योग आयोगाची उद्‌दीष्टे :**

खादी व ग्रामोद्योग आयोगाची स्थापना करण्याची व्यापक उद्‌दिष्टे खालील प्रमाणे आहेतः

- **सामाजिक उद्‌दिष्ट :** रोजगार पुरविणे
- **आर्थिक उद्‌दिष्ट :** विक्रीयोग्य वस्तू निर्माण करणे
- **व्यापक उद्‌दिष्ट :** गरिबांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे तसेच मजबूत ग्रामीण समुदायभाव निर्माण करणे.

खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजना व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे ही उद्‌दिष्टे साध्य केली जाऊ शकतात.

- **खादी व ग्रामोद्योग आयोगाची वैशिष्ट्ये :**

**१. ग्रामीण विकास :**

भारत हा कृषीप्रधान देश असून त्यातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. खादी व ग्रामोद्योग आयोग ही एक प्रमुख संस्था आहे जी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात, विशेषतः ग्रामीण भागाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करण्यास चालना देऊन ग्रामीण जनतेस उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने मदत करते. तसेच ग्रामीण भागात छोट्या, कुटीर व लघू ग्रामोद्योगांच्या विकासास चालना देते.

**२. रोजगार निर्मिती :**

भारतात मोठ्या प्रमाणात झालेल्या लोकसंख्या वाढीमुळे ग्रामीण भागामधील शेती क्षेत्र हे अतिरिक्त रोजगार निर्मिती करण्याची क्षमता गमावत चालले आहे. ग्रामीण भागातील जलदगतीने वाढणाऱ्या कामगारांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे आवश्यक आहे. खादी व ग्रामोद्योग हे श्रम प्रधान आहेत. खादी व ग्रामोद्योग आयोगाची स्थापना बिगरकृषी रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देण्याच्या व्यापक उद्देशानेच केली गेली. ग्रामीण कारागिरांच्या व समाजातील सामाजिक व आर्थिक दुर्बल घटकांच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्याचेही काम आयोग करते. खादी व ग्रामोद्योग आयोग अत्यल्प प्रतिव्यक्ती गुंतवणुकीसह ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीचे कार्य करीत आहे.

**३. उद्योजकता विकास :**

खादी व ग्रामोद्योग आयोगाचे प्रमुख कार्य उद्योजकता विकास हे होय. खादी व ग्रामोद्योग आयोग ग्रामीण जनसमुदायास अतिरिक्त उपजिविकेचा मार्ग प्रदान करण्यास मदत करतो. पारंपारिक कारागीर व बेरोजगार युवकांचे संघटन करून सूक्ष्म उद्योगांच्या स्थापनेद्वारे स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नाच्या क्षमता वाढविण्यास तसेच स्थलांतर रोखण्यात मदत होते. खादी व ग्रामोद्योग आयोग आंतरराष्ट्रीय बाजारात आपल्या उत्पादनांची लोकप्रियता वाढविण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनांमध्ये सक्रियपणे सहभाग नोंदवतो.

**४. आर्थिक सहाय्य :**

खादी व ग्रामोद्योग आयोगाने ग्रामीण औद्योगिकीकरण तसेच रोजगार निर्मितीला आर्थिक सहाय्य पुरवण्यासाठी अनेक योजना तयार केल्या आहेत. हे ग्रामीण औद्योगिकीकरणासाठी प्रकल्पांना आर्थिक सहाय्य करते आणि अनुदानाद्वारे आवश्यक पैसा पुरवते. दुर्बल घटक, आदिवासी भाग व मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी वाढीव

अनुदानाच्या तरतुदीही यामध्ये आहेत. या योजनांची अंमलबजावणी क्रियान्वयन खादी व ग्रामोद्योग आयोग, त्यांचे राज्य मंडळ व जिल्हा उद्योग केंद्र (DIC) या बँकांच्या सहभागाने केली जाते. खादी व ग्रामोद्योग आयोग हे खादी व ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी तसेच क्रियान्वयनासाठी संस्थांना व व्यक्तींना आर्थिक सहाय्यदेखील करते.

### ५. संशोधन व विकास :

जागतिकीकरणाच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी व बाजाराची गरज पूर्ण करण्यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोगाने खादी, डेनिम जीन्स सारख्या अनेक नवीन उत्पादनांच्या श्रेणी बाजारात आणल्या आहेत. खादी व ग्रामोद्योग आयोग उत्पादनांच्या प्रभावी विपणनासाठी विक्री कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सोय करतो. खादी उत्पादनांची सत्यता सुनिश्चित करण्यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोग गुणवत्तेची मानके निश्चित करण्याकडे अनेक पावले उचलत आहे. खादी व ग्रामोद्योग आयोगाने वेष्टन, विपणन, संचार, प्रचार, सामग्री, आणि इतर डिझाइन-संबंधित क्रियांमध्ये डिझाइन सहाय्य सेवा प्रदान करण्यासाठी नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ डिझाईन (NID) सोबत सामंजस्य करार केला आहे. खादी आणि ग्रामोद्योगात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन तंत्रज्ञान तसेच उपकरणांमध्ये संशोधनास उत्तेजन देण्याची आणि प्रोत्साहित करण्याची जबाबदारी खादी व ग्रामोद्योग आयोगावरच आहे. खादी आणि ग्रामोद्योगांच्या उत्पादनांमध्ये आणि प्रक्रियांमध्ये तांत्रिक सुधारणा करून उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोग महत्त्वाची भूमिका बजावतो. शाश्वत विकासासाठी अपारंपारिक ऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहन देतो.

### ६. विपणन व जाहिरात :

तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोग विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये प्रदर्शन, चर्चासत्र, व्याख्यान यांचे आयोजन करीत असतो. तसेच खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या उत्पादनांसंदर्भात माहिती प्रसारित करीत असते. खादी व ग्रामोद्योग आयोगाने जनतेमध्ये स्वारस्य, जागरूकता आणि आकर्षण निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विपणन विकास योजना सुरू केल्या आहेत. उत्पादने, वेष्टन आणि विपणन गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सरकार खादी आणि ग्रामीण उद्योग क्षेत्राला प्रोत्साहित करीत आहे जेणे करून त्यांचे उत्पन्न अधिक स्पर्धात्मक होऊ शकेल.

### ७. इतर कार्ये :

ग्रामीण भागातील खादी आणि इतर ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठीच्या कार्यक्रमांचे नियोजन, प्रचार, संघटन तसेच सुयोग्य अंमलबजावणीचे दायित्व खादी व ग्रामोद्योग आयोगाकडे आहे. त्यांच्या विकासासाठी खादी आणि ग्रामीण उद्योगक्षेत्रात गुंतलेल्या कारागिरांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते. खादी व ग्रामोद्योग आयोग हे खादी आणि ग्रामीण उद्योगांच्या समस्यांसंबंधी प्रत्यक्ष किंवा इतर प्रतिनिधींमार्फत अभ्यासांचे कार्यही करतो.



**कृती :**

जवळच्या KVIC ला भेट देऊन त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची माहिती गोळा करा.

## ६.५ महिला स्वयं-सहायता गट : (SHG - Women's Self Help Groups)

(महिला बचत गट)

- **स्वयं-सहायता गट म्हणजे काय?**



लहानपणापासूनच आपण खालील गोष्टी ऐकत आलो आहोत जसे की,

- स्वयंसहायता हीच खरी मदत असते.
- एकीचे बळ
- एकत्र असू तर उभे राहू, विभक्त झाल्यास कोलमडून जाऊ.

आपण सगळ्यांनी लहानपणी जाळ्यातल्या पक्ष्यांची गोष्ट ऐकली असेल.

जाळयातून एकेकटा पक्षी सुटू शकत नव्हता पण जेव्हा सगळे मिळून उडाले, तेव्हाच त्यांची सुटका झाली.

आपणांस, माहीत आहेच की एक काठी सहज तुटते पण त्याच काठ्यांची मोळी बांधली तर तुटणे अवघड असते.

महिला स्वयं-सहाय्यता गट आपल्याला एकीचे बळच दर्शावितो त्यातून आपल्याला स्वयं-सहाय्यता हीच खरी मदत असते याचा अनुभव येतो.

आपण जर गरजू लोकांना स्वयं-सहाय्यता गट स्थापण्यास उद्युक्त केले तर त्याचा खूपच उपयोग होईल.

(Source - A handbook on forming SHG's by NABARD)

**प्रस्तावना :**

बांग्लादेशी अर्थतज्ज्ञ डॉ. महंमद युनुस यांना सूक्ष्म अर्थसहायचा जनक असे संबोधले जाते. डॉ. युनुस यांनी बांग्लादेशा मध्ये ऑक्टोबर १९८३ मध्ये ग्रामीण बँकेची स्थापना दारिद्र्य निर्मूलनासाठी केली. पारंपारिक बँकांनी गरीब लोकांना कर्ज देण्यास असमर्थता दर्शविली. त्यातूनच ग्रामीण बँकेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण बँकांमार्फत गरीब लोकांना वित्तपुरवठा केला जाऊ लागल्यामुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल दिसू लागले. लघु-कर्जामुळे गरीब लोक फक्त टिकूनच राहिले नाहीत तर त्यांच्यामध्ये उद्योगाची उर्मी आणि गरिबीतून बाहेर येण्याची क्षमतासुद्धा विकसित झाली. ग्रामीण लघु-कर्ज प्रारूपाच्या यशस्वितेमुळे जगातील अनेक देश प्रभावित झाले. ग्रामीण बँक आणि डॉ. महंमद युनुस यांना २००६च्या नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले. भारतीय स्वयं-सहाय्यता गट प्रारूप हे बांग्लादेशाच्या प्रारूपाचे परावर्तित रूप असून गरिबी निर्मूलन आणि महिला सक्षमीकरणासंदर्भात काम करते. सर्व सहायता गट हे **"सर्वांना आधार"** आणि **"एकी हेचबळ"** या मूलभूत तत्त्वांवर कार्यरत असतात.

स्वयं-सहायता गट हा एकसारख्या व्यक्तींचा समूह असून एकत्र येऊन सामूहिक निधीची उभारणी करतात आणि सदस्यांच्या अडचणींच्यावेळी तारणाशिवाय वित्तपुरवठा करतात.

जेव्हा महिलांद्वारे स्वयं-सहायता गटांचे संचालन केले जाते त्यावेळेस त्याला महिला स्वयं-सहायता गट असे

संबोधतात. भारतामध्ये पहिला स्वयं-सहायता गट हा म्हैसूर पुनर्वास आणि विकास संस्था स्वरुपात १९८५ मध्ये स्थापित झाला. (Mysore Resettlement and Development Agency (MYRADA). भारतीय रिझर्व बँकने स्वयं-सहायता गटाच्या वित्त धोरणाला मान्यता दिली आहे. भारतामध्ये स्वयं-सहायता गट - बँक जोडणी कार्यक्रम NABARD द्वारे १९९२ पासून सुरू करण्यात आला.

स्वयं-सहायता गट ही ऐच्छिक संघटना आहे. गटाचा प्रत्येक सदस्य हा अल्प-बचत करत असतो. गटाकडे ठरावीक रक्कम जमा झाल्यावर गरजेनुसार सदस्यांना कमी व्याजदरावर वित्तपुरवठा केला जातो. भारतामध्ये अनेक सहायता गट हे सूक्ष्म वित्त-पुरवठ्यासाठी बँकेवर अवलंबून आहेत. स्वयं-सहायता गटाची नोंदणी आवश्यक नसते. गटाच्या कामकाजासाठी सुटसुटीत नियमावली असते. सर्व निर्णय सर्व सदस्य मिळून घेतात.

स्वयं-सहायता गटामुळे फक्त सदस्य महिलांना फायदा होत नसून, त्यामुळे कुटुंब आणि समाजाचादेखील फायदा होतो. असे स्वयं-सहायता गट महिलांना प्रशिक्षण देऊन सामाजिक-आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवून देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात हातभार लावतात. तसेच महिलांमध्ये बचतीची सवय विकसित करतात. जसजशा महिला सहभाग घेऊन, आघाडी घेऊन निर्णय घेतात त्यांचा जीवनस्तर उंचावत जातो आणि सामूहिक प्रयत्नांद्वारे सर्वांना फायदा मिळतो.



**कृती :**

- निलीमा मिश्रा यांच्याबद्दल अधिक माहिती गोळा करून सविस्तर चर्चा करा.
- परिवार गटाबद्दल माहिती गोळा करा.

## • महिला स्वयं-सहायता गटाची वैशिष्ट्ये :

**महिला स्वयं-सहायता गटाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :**

### १. स्थापना :

स्वयं-सहायता गट एकजिनसी व्यक्तींचा एक छोटा गट असतो. सामान्यतः हे गट अशासकीय संस्था, किंवा सरकारने नेमलेल्या समर्पित कार्यकर्त्यांच्या कार्यसंघाद्वारे स्थापन केले जातात. हे अनौपचारिक गट असून कोणत्याही संस्था अधिनियम, राज्य सहकारी कायदे किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये यांची नोंदणी करणे अनिवार्य नाही. हे गट सरकारी मान्यताप्राप्त असून यांना कोणत्याही औपचारिक नोंदणीची आवश्यकता नसते. स्वयंसहायता गटांना सुस्पष्ट नियम व उपनियम असतात. त्यांना नियमितपणे सभांचे आयोजन करावे लागते तसेच त्यांच्या नोंदीही ठेवाव्या लागतात. स्वयंसहायता गटांना व्यापक स्वरूपात आपले कार्य व व्याप्ती वाढवण्यासाठी स्वयंसहायता गट त्याची नोंदणी करु शकतात. अनेक स्वयं-सहायता गट हे सहकारी कायदे किंवा संस्था अधिनियमांतर्गत नोंदणीकृत आहेत. परंतु हे कायदे स्वयं-सहायता गटांच्या आवश्यकता पूर्ण करण्यास परिणामकारक ठरलेले दिसून येत नाहीत.

### २. सदस्यता :

सामान्यतः एकजिनसी स्वयंसहायता गट हे त्यांच्या सदस्यांच्या संबंधावर आधारित स्वयं-निवडीच्या प्रक्रियेद्वारे स्थापना केले जातात. नॅशनल अर्बन लाईव्हलिहूड मिशन (NULM) अनुसार गटस्थापनेकरिता किमान ५ सदस्यांची आवश्यकता असते. मोठ्या गटाचे व्यवस्थापन करणे कठीण असते व सदस्य सक्रियपणे सहभागी होऊ शकत नाहीत. एका कुटुंबातून फक्त एकच व्यक्ती सदस्य बनू शकते जेणेकरून अधिक कुटुंब सहभागी होऊ शकतील. सामान्यतः केवळ पुरुष किंवा केवळ महिलांचे गट असतात. मिश्र गटांना सामान्यतः प्राधान्य दिले जात नाही. महिला गट सामान्यतः

चांगले कार्य करताना दिसून येतात. जर गटांमधील सदस्य हे समान सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीचे असतील तर निश्चितपणे त्यांचा सहभाग परिणामकारक असलेला दिसून येऊ शकतो.

### ३. लोकशाही व्यवस्था :

स्वयंसहाय्यता गट हे सदस्यांनी, सदस्यांसाठी सदस्यांकडून चालवले गेलेले गट आहेत. हे असे गट आहेत जे विकासाच्या प्रक्रियेत लोकांचा वास्तविक सहभाग दर्शवितात. प्रत्येक सदस्य स्वयंसहाय्यता गटाच्या कामकाजात सक्रियपणे सहभाग घेतो. स्वयंसहायता गटाद्वारे एकत्र येऊन सभासद स्वतःच्या भविष्यासाठी स्वतः जबाबदार असतात. गटाच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी योग्य नेतृत्वाची निवड किंवा नियुक्ती केली जाते. गटांच्या बैठका नियमितपणे आयोजित करण्याची तसेच खाते व नोंदी ठेवण्याची जबाबदारी गट-प्रमुखावर असते. हे गट एकत्रित नेतृत्व आणि परस्पर चर्चा या तत्त्वावर चालतात.

### ४. बचतीची सवय :

स्वयंसहायता गट सदस्यांना नियमित अंतराने लहान प्रमाणावरील बचतीच्या सवयींना प्रोत्साहन देतो. समूहाच्या सदस्यांद्वारे केलेल्या बचतीद्वारे सामान्य निधीची उभारणी केली जाते, ज्याचा उपयोग सदस्यांना कर्ज देण्यासाठी केला जातो. स्वयंसहायता गट सदस्यांमध्ये उत्साह निर्माण करून बचतीची सवय लावण्यास मदत करतात.

### ५. परस्पर विश्वास :

भारतातील बहुतेक गावांमध्ये गरिबी, निरक्षरता, कौशल्यांची कमतरता, आरोग्य सेवा इत्यादी आव्हाने आहेत. या समस्येचे वैयक्तिकरित्या निराकरण करणे कठीण आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समूह प्रयत्नांची आवश्यकता आहे. स्वयंसहायता गट स्थापण्यामागील मूलभूत संकल्पना वैयक्तिक कमतरतांवर सामूहिक प्रयत्नांद्वारे मात करण्याचा प्रयत्न करणे ही आहे. स्वयंसहायता गट ग्रामीण भारतातील बदलांचे वाहन म्हणून काम करीत आहेत. स्वयंसहायता गट हे सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी ग्रामीण भागातील गरीब व वंचित घटकांना एकत्र आणण्याचे कार्य करतो. परस्पर विश्वासाच्या माध्यमातून हजारो गरीब आणि उपेक्षित आपले जीवन, कुटुंब आणि समाजाच्या जडणघडणाचे कार्य करत आहेत. विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी तळागाळापर्यंत करण्यासाठी सरकार स्वयंसहायता गटांना मान्यता देते.

### ६. उद्योजकता प्रोत्साहन :

ग्रामीण भागातील गरीब आणि उपेक्षित समाजात भांडवली आणि व्यवस्थापकीय कौशल्यांची कमतरता भासते. स्वयंसहायता गट त्यांना कमी व्याज दराने भांडवल देतात ज्यामुळे त्यांना लघुउद्योग सुरू करण्याची संधी मिळते. हे सूक्ष्म उद्योग ग्रामीण भागातील दुर्लक्षित मनुष्यबळाचा सुयोग्य वापर करून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करतात. वेळेवर केले जाणारे आर्थिक सहाय्य आणि व्यवस्थापकीय कौशल्ये यामुळे ग्रामीण भागातील प्रथम पिढीतील सूक्ष्म उद्योजकांना प्रोत्साहित करण्यास मदत होते. यामुळे गरीब कुटुंबांना अतिरिक्त उत्पन्न मिळविण्यातदेखील मदत होते. स्वयंसहायता गट ग्रामीण व्यक्तींमध्ये उत्पन्न आणि रोजगार निर्मिती क्षमता निर्माण करते. सूक्ष्म उद्योगांमुळे स्वयंरोजगारनिर्मिती होऊन दारिद्र्य निर्मूलनास मदत केली जाते. स्वयंसहायता गट आणि शासन यांच्या द्वारे ग्रामीण भागातील व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच विपणन व तांत्रिक सहाय्य देऊन सूक्ष्म उपक्रम सुरू करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेतात.

### ७. महिला सशक्तीकरण :

सरकारी आणि निम सरकारी यंत्रणेच्या सतत प्रयत्नांनंतरही भारतातील महिलांच्या आर्थिक विकासात फारसे यश मिळाले नाही. महिला सशक्तीकरण ही काळाची गरज आहे. संपूर्ण जगभरातील महिलांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी स्वयंसहायता गट एक उदयोन्मुख साधन आहे. महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वयंसहायता

गट प्रभावीपणे कार्यरत आहेत. महिला सशक्तीकरणासाठी स्वयंसेवी गटांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध आर्थिक आणि आर्थिकेतर सहाय्य प्रदान करते. स्वयंसहाय्यता गट महिलांना ज्ञान, वित्त व संधी देऊन सशक्त करते.

### ८. तारणाशिवाय कर्ज :

कोणताही मान्यताप्राप्त रोजगार नसल्यामुळे व तारणांची उपलब्धता नसल्यामुळे ग्रामीण गरीब व्यक्तींना कर्जाची गरज पूर्ण करण्यासाठी औपचारीक आर्थिक संस्था अयशस्वी ठरल्या आहेत. औपचारीक संस्थांच्या कर्जाची पूर्तता करण्यासाठीच्या असमर्थतेमुळे गरिबांना स्थानिक सावकारांकडून चढ्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. स्वयंरोजगारांच्या प्रकल्पांसाठी स्वयंसहायता गट गरीब व्यक्तींना छोट्या रक्कमेचे कर्ज देतात. याद्वारे ते स्वतःसाठी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी रोजगाराची संधी निर्माण करतात. परस्पर विश्वासाच्या तत्त्वावर कर्ज दिले जाते आणि कर्ज मिळवण्यासाठी अतिशय कमी किंवा कोणत्याही दस्ताऐवजांची आवश्यकता नसते. व्याजदर हे गटनिहाय भिन्न असतात. सामान्यतः स्वयंसहायता गटांमध्ये आकारण्यात येणारे व्याजदर बँकांच्या व्याजदरांपेक्षा किंचित कमी असतात. यामुळे गरीब व्यक्ती स्थानिक सावकाराच्या कचाट्यातून वाचते. तसेच गरीब व्यक्तींना बँकिंग कार्यप्रणालीमध्ये सक्रीयपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करण्यास मदत होते. घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड सुनिश्चित होते. कारण गटाचे सर्व सदस्य कर्ज घेतलेल्या सदस्यांकडून परतफेडीची रक्कम जमा करण्यासाठी जबाबदार असतात.



**कृती :**

- ग्रामीण भागातील कारागीरांना भेटा व त्यांच्यापुढील विविध प्रश्न शोधा.
- व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. भांडवल उभारणीचे विविध स्रोत शोधून त्याची यादी करा.

## ६.६ जागतिक बँक : (WORLD BANK)

- **प्रस्तावना :**

जागतिक बँक विकसनशील देशांना वित्त पुरवठा, सल्ला आणि संशोधन प्रदान करण्यासाठी समर्पित आंतरराष्ट्रीय संस्था आहे. पारंपरिकपणे ती एक बँक नाही. त्याऐवजी, त्यात International Bank for Reconstruction and Development (IBRD) and the International Development Association (IDA) या दोन संस्थांचा समावेश आहे. आज १८९ देश या बँकेचे सदस्य आहेत. बँक इतर तीन संस्थांशी मिळून काम करतेः

- The International Finance Corporation
- The Multilateral Guarantee Agency
- The International Centre for the Settlement of Investment Disputes.

वरील पाच संघटना एकत्रितपणे जागतिक बँक संघटना म्हणून ओळखल्या जातात.

The International Bank for Reconstruction and Development (IBRD) ही मध्यम उत्पन्न असणाऱ्या सरकारांना अर्थसहाय्य पुरवते. Interational Development Association (IDA) ही गरीब देशांच्या सरकारांना व्याजमुक्त कर्ज पुरवते. International Finance Corporation खाजगी क्षेत्राशी निगडित संस्थांकडे लक्ष केंद्रीत करते तसेच गुंतवणूक, वित्त पुरवठा व आर्थिक सल्लागार सेवा प्रदान करते. The Multilateral Investment Guarantee Agency (MIGA) ही एक संस्था विकसनशील देशांमध्ये परकीय थेट गुंतवणुकीस प्रोत्साहन देते.

The International Centre for Settlement of Investment Disputes (ICSID) आंतरराष्ट्रीय गुंतवणूक विवादांवर मध्यस्थता प्रदान करते.

## The World Bank Group




1944 या ब्रिटनवुडस् कॉन्फरन्समध्ये आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) सोबत जागतिक बँक स्थापन करण्यात आली. जागतिक बँकेचे मुख्यालय वॉशिंग्टन येथे आहे. जागतिक बँकेच्या स्थापनेमागील मुख्य हेतू हा जे देश व्यावसायिकरित्या कर्ज मिळविण्यात असमर्थ आहेत अशा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या देशांना तात्पुरती कर्जे देणे हा आहे. जागतिक बँक सदस्य देशांना आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य प्रदान करते. जागतिक बँक ही मध्यम व गरीब उत्पन्न देशांना विकासात्मक सहायदेखील देते. जागतिक बँक ही अशी संस्था आहे जी दारिद्र्य निर्मूलन व आर्थिक विकासासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील संस्थांना कर्ज, सल्ला तसेच प्रशिक्षण देण्याकरिता भागीदारी प्रदान करते. जागतिक बँक शिक्षण, आरोग्य व पायाभूत सुविधा सुधारण्यावर विशेष लक्ष केंद्रित करते. देशाचे आर्थिक क्षेत्र, शेती व नैसर्गिक स्रोत व्यवस्थापनाच्या आधुनिकीकरणासाठी निधीदेखील वापरते.

- **जागतिक बँकेची वैशिष्ट्ये :**
- जागतिक बँकेची महत्त्वाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत :

**१. संघटना आणि संरचना :**

बँकेच्या संघटनात्मक संरचनेत राज्यपाल मंडळ, कार्यकारी संचालक मंडळ, सल्लागार समिती, कर्ज समिती, अध्यक्ष व इतर कर्मचारी सदस्य यांचा समावेश होतो. बँकेचे सर्व अधिकार हे **'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स'** ला आहेत व हीच बँकेचे सर्वोच्च धोरण ठरवणारी संस्था आहे. प्रत्येक सदस्य देशाद्वारे पाच वर्षांसाठी नियुक्त केलेल्या मंडळामध्ये एक गव्हर्नर व एक पर्यायी गव्हर्नर यांचा समावेश असतो. कार्यकारी संचालक मंडळामध्ये २१ सदस्य असतात. त्यापैकी ६ सदस्य

अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, जपान व भारत या सहा मोठ्या भागधारक देशांनी नियुक्त केलेले असतात. उर्वरित १५ सदस्य उर्वरित देशांनी निवडले असतात.

## २. उद्दिष्टे :

- **जागतिक बँकेने २०३० पर्यंत जगासाठी दोन उद्दिष्टे ठरवली आहेत :**

  - ❑ दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रति दिवस १.९० डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांची टक्केवारी कमी करून ३% पर्यंत आणणे.

  - ❑ प्रत्येक देशातील तळाच्या ४०% उत्पन्न असणाऱ्या लोकसंख्येच्या उत्पन्न वाढीस प्रोत्साहन देऊन समृद्धीचा प्रचार करणे.

जागतिक बँक जगभरातील विकसनशील देशांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य पुरवण्याचा एक महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे. खऱ्या अर्थाने ही बँक नसून दारिद्र्य निर्मूलनासाठी व विकासाला समर्थन देण्यासाठी महत्त्वपूर्ण भागीदारी देणारी संस्था आहे. उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी जागतिक बँक समूहामध्ये त्यांच्या सदस्य देशांचे व्यवस्थापन असलेल्या पाच संस्था कार्यरत आहेत.

## ३. आर्थिक उत्पादने आणि सेवा :

जागतिक बँक कमी व्याजदराने कर्जे, शून्य ते कमी व्याजाने पत पुरवठा, तसेच विकसनशील देशांना अनुदान प्रदान करण्याचे काम करते. जागतिक बँक शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक प्रशासन, पायाभूत सुविधा, आर्थिक व खाजगी क्षेत्रातील विकास, शेती आणि पर्यावरण तसेच नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन अशा क्षेत्रांना सहाय्य करते. जागतिक बँक आपले काही प्रकल्प सरकार, इतर बहुपक्षीय संस्था, व्यावसायिक बँका, निर्यात पतसंस्था आणि खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकदार यांच्या संयुक्त सहवित्तपुरवठ्याने राबवते.

## ४. नावीन्यपूर्ण ज्ञान सामायिकरण :

जागतिक बँक विकसनशील देशांना धोरणात्मक सल्ला, संशोधन आणि विश्लेषण तसेच तांत्रिक सहकार्य देते. जागतिक बँकेचे विश्लेषणात्मक कार्य विकसनशील देशांना सहकार्य करते. त्यांच्या क्षमतावृद्धीस मदत करते. जागतिक बँक विकासाच्या मुद्द्यांवर परिषदांना प्रायोजकत्व प्रदान करते, परिषदांचे आयोजन करते तसेच परिषदांमध्ये सहभाग देखील नोंदवते. जागतिक बँक बऱ्याच विकासाभिमुख समस्यांवर काम करण्यासाठी भागीदारांसह सहयोग देखील करते. विकसनशील देशांना सर्वोत्तम जागतिक निपुणतेस प्रवेशद्वारे उघडून देण्यासाठी प्रयत्नदेखील करते.

## ५. नावीन्यपूर्णता व उद्योजकता :

स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेमध्ये नावीन्यपूर्णता आणि उद्योजकता व व्यवसायाच्या वाढीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. हे उच्च उत्पादनक्षमतेस मदत करते ज्यामुळे आर्थिक विकास संभवतो. दारिद्र्य निर्मूलनासाठी रोजगार निर्मितीस यामुळे मदत होते. नवीन व विकासाभिमुख कंपन्या रोजगार वाढीत योगदान देतात. नवीन उत्पादनांची ओळख, नवीन आदर्श व्यावसायिक प्रतिकृतींचा विकास तसेच नवीन बाजारपेठांची दारे उघडून स्पर्धात्मकता व उत्पादकता वाढविण्यात मदत केली जाते. नावीन्यामुळे व्यवसायांना विशेषीकरणासाठी, आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम मानके पूर्ण करण्यासाठी तसेच गुणवत्ता सुधारण्यासाठी सहकार्य मिळते. जागतिक बँकेने ओळखले की नावीन्यपूर्णता व उद्योजकता ह्याद्वारे खऱ्या अर्थाने जागतिक विकासाला चालना मिळू शकते. जागतिक बँक नावीन्यपूर्ण व उद्योजकताभिमुख प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करते. जागतिक बँक आंतरराष्ट्रीय अनुभव, ज्ञान, संशोधन आणि गुंतवणुकीद्वारे सदस्य देशांना नावीन्यपूर्णता आणि उद्योजकता विकासासाठी धोरणे, व्यूहरचना, नियम व संस्थागत सुविधा पुरवणारी महत्त्वपूर्ण संस्था ठरली आहे.

### ६. सामाजिक विकास :

सामाजिक विकास "**जनकेंद्रित**" आहे. जागतिक बँक शासन, समुदाय, सामाजिक संस्था, खाजगी क्षेत्रातील संस्था तसेच वंचित घटकांसह समाजाच्या विकासासाठी कार्य करते. सामाजिक विकासामुळे आर्थिक विकासाला प्रेरणा तर मिळतेच परंतु दर्जेदार जीवनशैली जगण्यासाठीही मदत होते. जागतिक बँकेच्या सामाजिक विकासाच्या कार्यामुळे गरिबांना व वंचितांना विकास प्रक्रियेत समाविष्ट होण्याची संधी मिळाली. जागतिक बँक वेळोवेळी दारिद्र्य तसेच सामाजिक प्रभाव विश्लेषणाद्वारे सामाजिक जोखीम विश्लेषण करत असते.

## सारांश

प्रत्येक व्यवसायात भांडवलाची नितांत आवश्यकता असते. कोणत्याही व्यवसायाचे यश प्रामुख्याने भांडवलाच्या योग्य वापरावर अवलंबून असते. व्यवसायात अनेक कारणांसाठी भांडवलाची आवश्यकता असते.

अर्थसहाय्य पुरविणाऱ्या संस्था पुढीलप्रमाणे

**१. सिडबी –** SIDBI Small Industries Development Bank of India
(भारतीय लघु उद्योग विकास बँक)

**२. नाबार्ड –** NABARD-National Bank for Agricultural & Rural Development
(राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक)

**३. केव्हीआयसी –** KVIC - Khadi & Village Industries Commission
(खादी आणि ग्रामोद्योग आयोग)

**४. एस्एचजी –** SHG - Women’s Self Help Groups
(महिला स्वयंसहायता गट/महिला बचत गट)

**५. वर्ल्ड बँक –** World Bank (जागतिक बँक)

### १. भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI) :

सिडबीची स्थापना २ एप्रिल, १९९० रोजी SIDBI Act 1988 नुसार झाली. सुरुवातीला ही आयडीबीआयची संपूर्ण मालकी असणारी सहाय्यकारी संस्था होती. सध्या SIDBI ची मालकी ३४ सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांकडे आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाच्या वित्तपुरवठा करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी SIDBI ची स्थापना झाली.

- **SIDBI ची वैशिष्ट्ये :**

१) सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना आर्थिक सहाय्य.

२) शाश्वत विकास.

३) सल्लागार म्हणून कार्य.

४) सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना सेवा पुरविणे.

५) राष्ट्रीय ध्येय साध्य करणे.

६) विविध प्रकारे अर्थ सहाय्य.

७) तंत्रज्ञानविषयक पुढाकार.

८) अंमलबजावणी करणारी संस्था.

### २) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामिण विकास बँक (NABARD) :

शिवरामन समितीच्या शिफारशीनुसार १२ जुलै, १९८२ मध्ये संसदेच्या कायद्यानुसार नाबार्ड ची स्थापना झाली. ग्रामीण भागात कर्जपुरवठा करणाऱ्या प्रमुख संस्थांपैकी एक नाबार्ड आहे. ग्रामीण भागात अर्थ पुरवठा करणारी सर्वोच्च बँक म्हणून कार्य करते.

- **नाबार्डची वैशिष्ट्ये :**

१) सर्वोच्च बँक.

२) पुनर्वित्ताची सुविधा.

३) वित्तीय संस्थांना मदत.

४) ग्रामीण विकासासाठी पतपुरवठा.

५) कृषी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण.

६) रिझर्व्ह बँकेला शिफारशी करणे.

७) ग्रामीण उद्योगांना अर्थपुरवठा करणे.

८) राष्ट्रीय विकासातील भूमिका

### ३) खादी आणि ग्रामोद्योग आयोग (KVIC):

खादी आणि ग्रामोद्योग आयोग कायदा १९५६ नुसार १९५७ मध्ये याची निर्मिती झाली ही भारतामधील काम करणारी सर्वोच्च संस्था आहे. **KVIC** चे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

**KVIC ची वैशिष्ट्ये :**

१) ग्रामीण विकास

२) रोजगार निर्मिती

३) उद्योजकता विकास

४) आर्थिक सहाय्य

५) संशोधन आणि विकास

६) विपणन आणि जाहिरात

७) इतर कार्ये

### ४) महिला स्वयं सहायता गट (SHG) :

बांगलादेशी सूक्ष्म अर्थाचे जनक अर्थतज्ज्ञ डॉ. महंमद युनुस, यांनी ऑक्टोबर १९८३ मध्ये बांगला देशामध्ये ग्रामीण बँकेची स्थापना केली. सभासदाना तारणाविरहीत कर्जे देऊन दारिद्र्य निर्मूलन करण्यास महिला स्वयं सहाय्यता मदत करतात.

- **महिला स्वयं सहायता गटाची वैशिष्ट्ये :**

१) स्थापना

२) सदस्यता

३) लोकशाही व्यवस्था

४) बचतीची सवय

५) परस्पर विश्वास

६) उद्योजकतेस प्रोत्साहन

७) महिला सशक्तीकरण

८) तारणविरहित कर्ज

### ५) जागतिक बँक (World Bank) :

जागतिक बँक ही विकसनशील देशांना वित्त पुरवठा, सल्ला आणि संशोधन प्रदान करणारी समर्पित आंतरराष्ट्रीय संघटना आहे. पारंपारिकपणे ही एक बँक नाही. तर International Bank for Reconstruction and Development (IBRD) आणि International Development Association (IDA) या संघटना जागतिक बँकेमध्ये समविष्ट आहेत.

- **जागतिक बँकेची वैशिष्ट्ये :**

१) संघटना आणि संरचना

२) उद्दिष्टे

३) आर्थिक उत्पादने आणि सेवा

४) नावीन्यपूर्ण ज्ञान सामायिकरण

५) नावीन्यपूर्णता व उद्योजकता

६) सामाजिक विकास

## करिअर संधी

१) स्वयं सहायता गटाची स्थापना करणे.

२) स्वतःच्या सूक्ष्म, लघू किंवा मध्यम उद्योगाची स्थापना करणे.

३) स्वयं सहायता गटाचे लेखे लिहीणे.

४) वित्तीय व्यवसायात नोकरीची संधी.

## संदर्भ सूची

1) www.sidbi.in
2) www.kvic.org.in
3) www.nabard.org
4) www.world bank.org
5) Datta Ruddor & KPM Sundharam Indian Economy.S.Chand
6) Handbook on formeing Self Help Groups (SHGs) - NABARD

## स्वाध्याय

**प्र.१ ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) भारतीय लघुउद्योग विकास बँकेची स्थापना ------------ मध्ये झाली.

अ) १९८९ ब) १९९० क) १९९१

२) भारतीय लघुउद्योग विकास बँक, भारतीय लघु उद्योग विकास बँक कायदा---------- नुसार स्थापन करण्यात आली.

अ) १९८८ ब) १९९२ क) १९९६

३) भारतात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी ------------ मुख्य आर्थिक संस्था म्हणून कार्य करते.

अ) NABARD ब) KVIC क) SIDBI

४) १२ जुलै, १९८२ रोजी ---------- अस्तित्वात आले.

अ) NABARD ब) KVIC क) SIDBI

५) कृषी आणि ग्रामीण विकासासाठी संस्थामक कार्याचे पुनरावलोकन करण्यासाठीच्या समितीची-------- यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली.

अ) कोठारी ब) शिवरामन क) रंगराजन

६) अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग आयोगाची स्थापना -------- यावर्षी झाली.

अ) १९५३ ब) १९४९ क) १९४८

७) KVIC ची स्थापना एप्रिल ----------- मध्ये झाली.

अ) १९५५ ब) १९५३ क) १९५७

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) सिडबी | १) १९४४ |
| ब) नाबार्ड | २) १९९० |
| क) जागतिक बँक | ३) १९८८ |
| ड) ग्रामीण बँक | ४) १९८३ |
| इ) KVIC | ५) १९८२ |
| | ६) १९५७ |
| | ७) १९३२ |
| | ८) १९५६ |
| | ९) १९१२ |
| | १०) १९६० |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) व्यवसायाची जीवनदायिनी/रक्तवाहिनी

२) भारतात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढीसाठी मुख्य आर्थिक संस्था म्हणून काय करणारी संस्था.

३) सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाचा सल्लागार आणि मार्गदर्शक.

४) जुलै १९९९ मध्ये स्थापन झालेली IDBI ची मालकी असलेली सहाय्यक उपक्रम निधी पुरविणारी संस्था.

५) SIDBI चा १७ मार्च, २०१६ रोजी सुरू झालेला तंत्रज्ञान आधारित उपक्रम.

६) कृषी अर्थसहाय्यातील सर्वोच्च संस्था.

७) बांगलादेशातील अर्थतज्ज्ञ, ज्यांना सूक्ष्म अर्थसहाय्याचा जनक म्हणतात.

८) विकसनशील देशांना अर्थसहाय्य, सल्ला आणि संशोधनासाठी स्थापन केलेली आंतरराष्टीय संस्था.

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१) भारतीय लघुउद्योग विकास बँकेची स्थापना २ एप्रिल, १९९० रोजी करण्यात आली.

२) भारतीय लघुउद्योग विकास बँकेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

३) भारतात सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाच्या शाश्वत विकासासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँक कार्य करीत नाही.

४) भारतीय लघुउद्योग विकास बँकेची स्टार्ट अप योजना १७ मार्च, २०१६ मध्ये कार्यन्वित झाली.

५) नाबार्डची स्थापना १२ जुलै, १९८२ मध्ये झाली

६) मोठ्या उद्योगांना वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही सर्वोच्च बँक म्हणून ओळखली जाते.

७) खादी आणि ग्रामोद्योग आयोग, खादी उद्योगाचे नियोजन, वाढ आणि विस्तारासाठी तसेच भारतामध्ये ग्रामीण उद्योगांची स्थापना करण्यासाठी कार्यक्षमपणे काम करतो.

८) ग्रामीण बँकेचे जनक म्हणून डॉ. महंमद युनुस यांना ओळखले जाते.

९) स्वयंसहाय्यता गट हा एकजिनसी व्यक्तींचा मोठा गट असतो.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ............. ही व्यवसायाची जीवनवाहिनी आहे.

२) सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे ................ शी निगडीत आहेत.

३) SIDBI ही .................. शी निगडीत आर्थिक व आर्थिकेतर अडचणी सोडविण्यासाठी रचनात्मक पुढाकार घेते.

४) SIDBI ........... ना लघु आणि दिर्घ मुदतीचे कर्ज पुरवठा करणारी संस्था आहे.

५) SIDBI स्टार्ट- अप मित्र ची सुरुवात...........ला झाली.

६) ............व्दारे MSME ना अर्थ पुरवठा मिळण्यासाठी मदत होते.

७) NABARD ची स्थापना ............. रोजी झाली.

८) खादी आणि ग्रामोद्योग आयोगाची स्थापना .............. रोजी झाली

९) वैधानिक संस्था असलेला 'खादी आणि ग्रामोद्योग आयोग' ची स्थापना ............. मधील विशेष कायद्याद्वारे करण्यात आली आहे.

१०) बांगलादेशामधील ग्रामीण बँकेची स्थापना ........... साली झाली.

११) सूक्ष्म- वित्ताचे जनक म्हणून ......... हे ओळखले जातात.

१२) जागतिक बँक ........ साली उदयास आली.

१३) ................येथे जागतिक बँकेचे मुख्यालय आहे.

१४) डॉ.महमद युनुस यांना संयुक्तरित्या ............ साली नोबेल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**फ) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) सिडबी (SIDBI) | |
| २) | नाबार्ड (NABARD) |
| ३) खादी आणि ग्रामोद्योग आयोग (KVIC) | |
| ४) | जागतिक बँक (WORLD BANK) |
| ५) ग्रामीण बँक | |

(१९५७, १९४४, २ एप्रिल १९९०, ऑक्टोबर १९८३, १२ जुलै १९८२)

**ग) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) सिडबी (SIDBI) म्हणजे काय?

२) नाबार्ड (NABARD) म्हणजे काय?

३) ग्रामीण बँक म्हणजे काय?

४) SHG (स्वयंसहाय्यता गट) म्हणजे काय?

५) जागतिक बँक म्हणजे काय?

६) MSME म्हणजे काय?

७) उद्‌यमी मित्र म्हणजे काय?

**ह) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) SIDBI ची स्थापना **फक्त दीर्घ** मुदतीचे कर्ज MSME ना देण्यासाठी झाली आहे.

२) NABARD ची ओळख **उद्योगधंद्यांना** अर्थपुरवठा करणारी शिखर संस्था म्हणून आहे.

३) खादी हे भारतामध्ये आत्मनिर्भरतेचे प्रतीक म्हणून **स्वातंत्र्योत्तर** काळात ओळखले जात होते.

४) स्वयं सहाय्यता गट हे **नफ्याच्या** तत्त्वावर आधारित असतात

५) जागतिक बँक **सर्वोच्च** व्याजदराने कर्जपुरवठा करते.

**प्र.२ रा संज्ञा किंवा संकल्पना स्पष्ट करा.**

१) उद्‌यमी मित्र

२) खादी ग्रामोद्योग आयोग

३) जागतिक बँक

४) स्वयं सहाय्यता गट

५) तारणविरहीत कर्ज

**प्र.३ रा  खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) लघुउद्योग सुरू करण्यासाठी आनंद याने व्यावसायिक शिक्षण (MBA) घेतले आहे. तो तंत्रज्ञान वापरात पारंगत आहे. त्याच्याकडे अनेक व्यावसायिक कल्पना आहेत. तो धनको/सावकाराच्या शोधात आहे.

i) या घटनेत कोण प्रवर्तक किंवा उद्योगपती आहे.

ii) आनंदला कोणत्या प्रकारचा उद्योग सुरू करायचा आहे?

iii) या उपक्रमासाठी सावकार किंवा गुंतवणूकदार शोधण्याचा कोणताही एक डिजिटल मार्ग सूचवा.

**प्र.४ था  खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) नाबार्डची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

२) KVIC चे कोणतीही चार उद्देश सांगा.

३) जागतिक बँकेची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

४) स्वयं सहाय्यता गटाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

५) SIDBI ची कोणतीही दोन वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र.५ वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) सिडबी, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना अर्थसहाय्य करणारी संस्था म्हणून कार्य करते.

२) सिडबी विविध प्रकारच्या आर्थिक आणि आर्थिकेतर सेवा आपल्या सहायक संस्थाद्वारे पुरविते.

३) कृषी अर्थ सहाय्यामध्ये नाबार्ड ला शिखर संस्था म्हणून ओळखले जाते.

४) उद्योजकता विकासात KVIC महत्त्वाची भूमिका बजावतो.

५) परस्पर विश्वास हा स्वयं सहायता गटाचा आत्मा आहे.

६) महिला सबलीकरणात स्वयं सहायता गट अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

७) सामाजिक विकासात जागतिक बँक महत्त्वाची भूमिका बजावते.

**प्र.६ वा खालील प्रश्न सोडवा.**

१) सिडबीद्वारे उपलब्ध होणारे विविध प्रकारचे अर्थसहाय्य सांगा.

२) शाश्वत विकासातील सिडबीची भूमिका सांगा

३) ग्रामीण उद्योगांना करण्यात येणाऱ्या अर्थसहायातील नाबार्ड ची भूमिका स्पष्ट करा.

४) KVIC ची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

५) रोजगार निर्मिती मध्ये KVIC ची भूमिका स्पष्ट करा.

६) स्वयं सहायता गटाची लोकशाही उभारणी सविस्तर स्पष्ट करा.

७) जागातिक बँकेची संघटनात्मक संरचना स्पष्ट करा.

**प्र.७ वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) सिडबीची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

२) नाबार्डची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

३) KVIC ची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

४) स्वयं सहायता गटाची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

५) जागतिक बँकेची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

# ७ व्यावसायिक पर्यावरण


७.१ प्रस्तावना

७.१.१ अर्थ

७.१.२ व्याख्या

७.२ व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व

७.३ व्यावसायिक पर्यावरणाचे पैलू / घटक

७.४ नवीन आर्थिक धोरण आणि व्यवसाय

७.५ नवीन आर्थिक धोरणाचे उद्योग व व्यवसायावरील परिणाम

- सारांश
- स्वाधाय


**राही** : काका खूप आनंदी दिसत आहात, काय गुपित आहे?

**दुकानदार** : होय, बरोबर आहे राही, तुला माहीतच आहे की यावर्षी दिवाळी आणि रमजान एकाच आठवडयात आल्याने व्यवसाय खूप छान चालू आहे.

**राही** : हो ना, हा खूपच छान योगायोग आहे. काका माझ्यासाठी हा टी शर्ट द्या ना.

**दुकानदार** : हा घे (राहीला टी शर्ट आणि पावती देतो.)

**राही** : (पावती पाहून आश्चर्यचकित होते) काका यापूर्वी मी कधीच संगणकीकृत जीएसटी करासह पावती घेतली नव्हती.

**दुकानदार** : तू बरोबर बोलतेस राही, पण व्यवसाय यशस्वी चालविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारावे लागते.

**राही** : बरोबर आहे. काका कृपया मला एक कॅरिबॅग द्या ना.

**दुकानदार** : माफ कर, पण तुला माहीत आहे का ? प्लॅस्टिक कॅरी बॅग वापरावर बंदी आहे आणि हा कायदा न पाळल्यास दंड ही होऊ शकतो.

**राही** : मला माफ करा काका. अच्छा

**दुकानदार** : अच्छा.

प्रत्येक व्यवसायावर सामाजिक, तंत्रज्ञानविषयक आणि कायदेशीर पर्यावरणाचा परिणाम होतो म्हणून प्रत्येक उद्योगाने व्यावसायिक पर्यावरणाच्या विविध पैलूंकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते.

## ७.१ प्रस्तावना :

मानवाप्रमाणेच व्यवसायसुद्धा स्वतंत्र निर्वात जागेत कार्य करू शकत नाही तर कोणताही व्यवसाय चालविणे, व्यवसायाचा विस्तार करणे हे व्यवसायाच्या सभोवताली असलेल्या घटकांवर अवलंबून असते. व्यवसाय आणि व्यवसायाच्या सभोवताली असलेल्या घटकांवर म्हणजेच व्यावसायिक पर्यावरणावर व्यवसायाचे यश अवलंबून असते.

यशस्वी व्यवसाय हा फक्त पर्यावरणाच्या विविध घटकांवरून ओळखला जात नाही, तर पर्यावरणातील घटकांचा त्यांच्यावर परिणाम होतो. व्यवसायाला विविध घटकांवर सतत नियंत्रण ठेवावे लागते, त्यावरच व्यवसायाची वृद्धी व भरभराट अवलंबून असते.

व्यावसायिक पर्यावरण हे व्यवसायातील धोक्याची पूर्वसूचना देणारे आणि व्यवसायास नवीन संधी उपलब्ध करुन देणारे जाळे असून प्रत्येक व्यावसायिकाने व्यावसायिक पर्यावरणातील धोके आणि संधी व त्यांचे महत्त्व ओळखून त्यांना आवश्यक प्रतिसाद दिला पाहिजे. कोणत्या वातावरणात व्यवसाय चालविला जातो यावर त्याचे यश अवलंबून असते.

### ७.१.१ अर्थ :

व्यावसायिक पर्यावरणात व्यवसायावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचा सामावेश होतो. उदा. व्यवसायाची शक्ती स्थाने, (प्रबलता) दुर्बलता, अंतर्गत संबंध, सरकारी धोरणे आणि नियम, अर्थव्यवस्थेचे स्वरूप, व आर्थिक स्थिती, सांस्कृतिक घटक, जनमानसाचा कल, नैसर्गिक घटक आणि जागतिक सामाजिक कल इ.चा सामावेश होतो.

सामान्यपणे व्यावसायिक पर्यावरण ही संज्ञा बाह्य पर्यावरणासाठी वापरली जाते ज्यामध्ये व्यवसायाची संधी व धोके यांचा समावेश होतो.

### ७.१.२ व्याख्या :

१. **बेयर्ड वो. व्हिलर** – "व्यवसाय पर्यावरण म्हणजे व्यवसायाबाहेरील सर्व घटक जे व्यवसाय संस्था आणि संस्थेच्या कामकाजावर परिणाम करतात."

२. **विलियन एफ. ग्ल्यूक** – "व्यावसायिक पर्यावरण ही अशी प्रक्रिया आहे जी आर्थिक, शासकीय, बाजारपेठ, पुरवठादार, तंत्रज्ञान, भौगोलिक आणि समाज रचने द्वारे व्यवसायाची संधी व धोक्यांची पुर्वसूचना इ. संबंधी व्यूहरचना पार पाडते."

३. **बॅरी एम.रिचमन आणि मेलविन कोपेन यांच्या मते** – "व्यावसायिक पर्यावरणात अशा व्यवसाया बाहेरील घटकांचा सामावेश होतो जे व्यवसायातील व्यक्ती आणि व्यवस्थापन यांच्या नियंत्रणा बाहेरील आहेत."

व्यावसायिक पर्यावरण व्यवसायास धोके निर्माण करते किंवा संभाव्य बाजारपेठ आणि इतर विविध घटकांसबंधी संधी उपलब्ध करून देते. वरील व्याख्यांवरून सारांशरूपाने असे म्हटले जाते की व्यवसायाच्या धोक्याची तीव्रता कमी करून व्यवसाय विस्तारासाठी संधी उपलब्ध करून देणारे सर्व अंतर्गत व बाह्य घटक म्हणजे व्यावसायिक पर्यावरण होय.

## ७.२ व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व :

व्यवसाय आणि पर्यावरण यातील दृढ परस्पर क्रियांमुळे संसाधनाचा प्रभावीपणे वापर करून व्यवसायाचे सामर्थ्य वाढविण्यास मदत होते. व्यावसायिक पर्यावरणाचे विविध पैलू अधिक स्पष्ट आणि अचूकपणे (योग्य) समजून घेता येतात. व्यवसायास पुढील कारणांसाठी हे महत्त्वपूर्ण ठरते.

### १. संधी आणि धोक्याची पूर्वसूचना समजते :

व्यवसाय आणि व्यावसायिक पर्यावरण यातील परस्पर क्रियामुळे व्यवसायाची संधी आणि धोक्याची पूर्वसूचना ओळखणे सोपे होते. ज्यामुळे व्यवसायातील आव्हानांवर यशस्वीपणे मात करण्यास मदत होते.

### २. व्यवसायाचे सामर्थ्य आणि कमजोरी ओळखणे :

तंत्रज्ञान आणि जागतिक विकासासाठी व वैयक्तिक सामर्थ्य आणि कमजोरी ओळखण्यास व्यावसायिक पर्यावरण मदत करते.

### ३. सतत शिक्षण मिळते :

व्यावसायिक पर्यावरणाच्या विश्लेषणामुळे व्यावसायिक आव्हानांवर मात करण्यासाठी आवश्यक कृती करणे व्यवस्थापकास सोपे जाते. तसेच व्यवसाय क्षेत्रातील संभाव्य बदलांवर मात करण्यासाठी आवश्यक ज्ञान, समज आणि कौशल्य अद्ययावत करण्यासाठी व्यवस्थापकास प्रेरणा मिळते.

### ४. व्यवसायाची प्रतिमा निर्माण करणे :

व्यवसायाच्या दैनंदिन कार्यातून पर्यावरण विषयक संवेदनशीलता दाखवून व्यवसायाची प्रतिमा उंचावण्यास समाज मदत करतो. यात ग्राहक, शासन, कर्मचारी इ.च्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठीच्या कार्याचा सामावेश होतो.

### ५. स्पर्धेत टिकून राहणे :

व्यावसायिक पर्यावरणाच्या अभ्यासामुळे स्पर्धकांच्या धोरणांचे अचूक विश्लेषण करून त्यानुसार व्यवसायाचे धोरण स्पष्ट करून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मदत होते.

### ६. व्यवसाय विस्तारास दिशा :


व्यावसायिक पर्यावरणाशी सुसंगत क्रिया केल्याने व्यवसाय विस्ताराच्या नवीन सीमा (कक्षा) वाढतात. ज्यामुळे व्यवसाय वृद्धी आणि विस्ताराचे उपक्रम ओळखून व्यवसायास सक्षम बनविणे शक्य होते.

## ७.३ व्यावसायिक पर्यावरणाचे पैलू /घटक :

पर्यावरणाच्या घटकांचे /पैलूंचे व्यवसायाशी असलेल्या संबंधावरून व्यावसायिक पर्यावरणाचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. १) अंतर्गत पर्यावरण २) बाह्य पर्यावरण

अंतर्गत पर्यावरणात कर्मचारी, भौतिक साधने, संघटना आणि इतर कार्यात्मक साधने इ. चा सामावेश होतो जे व्यवसायाकडून नियंत्रित करणे शक्य असतात तर बाहय पर्यावरणात आर्थिक, राजकीय, कायदेविषयक, सामाजिक, तंत्रज्ञान विषयक, नैसर्गिक आणि जागतिक पर्यावरण इ. चा समावेश होतो. जे व्यवसाया बाहेरील असून ते व्यवसायाच्या नियंत्रणाबाहेरचे घटक असतात.

**व्यावसायिक पर्यावरण**
**(पैलू/घटक व त्यांची वैशिष्ट्ये)**




आकृती ७.१

सामान्यपणे व्यावसायिक पर्यावरणात बाह्य पर्यावरणातील पुढील घटकांचा समावेश होतो जसे व्यवसायाबाहेरील घटक म्हणजे आर्थिक पर्यावरण, राजकीय पर्यावरण, कायदेशीर पर्यावरण, सामाजिक पर्यावरण, तांत्रिक पर्यावरण, नैसर्गिक पर्यावरण व जागतिक पर्यावरण.

- **अंतर्गत (नियंत्रीत) घटक :**

भागधारक, व्यवस्थापक, कामगार संघटना आणि कर्मचारी यांनी ठरविलेल्या धोरणांना अंतर्गत पर्यावरण म्हणून ओळखले जाते जे नियंत्रीत करणे शक्य असते. यावरून अंतर्गत पर्यावरणाचे पैलू पुढीलप्रमाणे.

१. **मूल्य पद्धती –** व्यवसायाचे प्रवर्तक आणि उच्च स्तर व्यवस्थापनाची मूल्ये व्यवसाय निवडीवर परिणाम करतात, व्यवसाय यशस्वी होण्यासाठी मूल्ये व पद्धती महत्त्वपूर्ण असतात.

२. **व्यवसायाचा दृष्टीकोन, ध्येय आणि दीर्घकालीन उदि्दष्टे –** व्यवसायात विकासाच्या दिशांचा प्राधान्यक्रम, व्यवसायाचे तत्त्वज्ञान आणि व्यवसायाची धोरणे इ. व्यवसायाचा दृष्टीकोन, ध्येय आणि दीर्घकालीन उद्दिष्ठांना मार्गदर्शन करते.

३. **व्यवस्थापन रचना आणि स्वरूप –** संचालक मंडळाची रचना, व्यवस्थापकांच्या व्यावसायिकरणावरील मर्यादा सुद्धा व्यवसायाच्या निर्णय प्रक्रियेवर परिणाम करतात.

४. **अंतर्गत सहसंबंध –** व्यवसायातील उच्च स्तर व्यवस्थापनाचा विविध स्तरावरील कर्मचाऱ्यास, भागधारक आणि संचालक मंडळास पाठिंबा इ. व्यवसायाच्या निर्णय प्रक्रिया व अंमलबजावणीवर परिणाम करतात. संचालक मंडळाचे सदस्य आणि कार्यकारी अधिकारी यांच्यातील संबंध सुद्धा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.


५. **मनुष्यबळ –** व्यवसायातील मनुष्यबळाचे कौशल्य, गुणवत्ता, नैतिकता, वचनबद्धता आणि दृष्टिकोन या गोष्टी व्यवसायाची शक्तीस्थाने आणि कमकुवतपणावर परिणाम करतात.

६. **इतर घटक –**

i) **भौतिक संपत्ती आणि सुविधा –** उत्पादन क्षमता, तंत्रज्ञान आणि कार्यक्षम वितरण व्यवस्था इ. व्यवसायाच्या स्पर्धा क्षमतेवर परिणाम करतात.

ii) **विपणनाची साधने –** उत्तम विपणन यंत्रणा आणि वितरण साखळी इ.चा सुद्धा व्यवसायावर प्रत्यक्ष परिणाम होतो.

iii) **वित्तीय घटक –** वित्तीय धोरणे, वित्तीय रचना आणि वित्तीय स्थिती इ.चा व्यवसायाची कार्यक्षमता, व्यूहरचना आणि निर्णय इ.वर परिणाम होतो.




आकृती क्र.७.२

- **बाह्य (अनियंत्रीत) घटक :**

### ७.३.१ नैसर्गिक पर्यावरण (Natural Environment) :

व्यवसायावर परिणाम करणाऱ्या भौगोलिक आणि पर्यावरणीय घटकांचा समुह म्हणजे नैसर्गिक पर्यावरण होय. नैसर्गिक पर्यावरणात नैसर्गिक संसाधने, हवामान, हवामानविषयक परिस्थिती, प्रादेशिक रचना आणि स्थान इ. चा समावेश होतो. जागतिक स्तरावर नैसर्गिक पर्यावरणाचा व्यवसायाच्या कार्यावर व्यापक परिणाम होतो.

**उदा.** हवामान, खनिजे, मृदा, भूप्रदेश, नदी आणि समुद्र इ. जे व्यवसायाच्या कामकाजावर महत्त्वपूर्ण परिणाम करतात.

उत्पादन ही व्यवसायातील अतिशय महत्त्वपूर्ण प्रक्रिया असून जी कच्चा माल, कुशल कामगार पाणी आणि इंधन इ. साठी नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून असते. तसेच दोन राष्ट्रातील व्यापार आणि वाणिज्य सुद्‌धा भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो.

नैसर्गिक घटकांमुळेच विशिष्ट भू-भाग विशिष्ट मालाच्या उत्पादनासाठी योग्य ठरतो. जसे कोळसा आणि धातू खाणकाम, इंधन उद्योग आणि महत्त्वपूर्ण कृषी उद्योग इ. सुद्‌धा निसर्गावरच अवलंबून असतात.

सद्य स्थितीत पर्यावरणाचे प्रदूषण आणि पर्यावरणातील असमतोल हा अतिशय गंभीर चिंतेचा विषय असल्याने शासनाचे धोरणच पर्यावरणीय शुद्‌धतेचे जतन करणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि नैसर्गिक साधन-संपत्तीचे जतन करणे यासारख्या उद्‌देशाने आखले जाते. परिणामी व्यवसायाच्या समस्या आणि जबाबदाऱ्या वाढल्या आहेत.



- **नैसर्गिक पर्यावरण :**

तुमच्या परिसरात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या कच्च्या मालाच्या साठ्याचा शोध घ्या. कोणते उद्योग आणि व्यवसायाची उभारणी त्या आधारावर झाली आहे?

### ७.३.२ सामाजिक पर्यावरण : (Social Environment)

कोणत्याही व्यवसायाच्या यशस्वी कामकाजासाठी सामाजिक दृष्टीकोन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. म्हणून आधुनिक व्यवसायास सर्वसामान्यपणे 'स्वतंत्र सामाजिक प्रणाली' आणि समाज प्रतिनिधीत्व करीत असलेल्या सामाजिक प्रणालीचा अविभाज्य घटक म्हणून ओळखले जाते. परिणामी समाज आणि व्यवसाय यांत परस्पर संबंध असतात. म्हणून व्यवसायाने सामाजिक पर्यावरणाशी जुळवून घेत व्यवसाय चालविला पाहिजे.

समाज रचना सुद्‌धा व्यवसायावर परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक असून ज्यात सामाजिक भूमिका आणि व्यवसाय संस्था तसेच सामाजिक संस्थांचा विकास इ. चा समावेश होतो. समाजरचना ही जनतेचा व्यवसाय, शिक्षण, उत्पन्नाची स्थिती, सामाजिक स्थिती (स्थान), राहणीमानासंबंधीचा दृष्टीकोन, काम आणि सामाजिक संबंध तसेच जनतेचा व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन इ. घटकांवर अवलंबून असते.

सामाजिक सदस्य परस्परांशी आणि समाजाबाहेरील व्यक्तींशी कशा प्रकारे वर्तन व संवाद करतात, यावरून प्रत्येक समाजाची संस्कृती विकसित होत असते. म्हणून संस्कृती हा सामाजिक पर्यावरणातील उल्लेखनीय घटक मानला जातो. ज्यात परंपरा, मूल्ये, नितीमत्ता, श्रद्‌धा, सामाजिक प्रवाह, दारिद्र्य, साक्षरता, सरासरी आर्युमान आणि इतर अपेक्षित वर्तनाचा समावेश होतो.

१. **सामाजिक पैलू –** साक्षरतेचे प्रमाण, शैक्षणिक प्रणाली, सांस्कृतिक वारसा, उदरनिर्वाहाच्या साधनांचा दर्जा आणि श्रमाची गतीशीलता इ. सामाजिक पैलूचे महत्वपूर्ण घटक मानले जातात.

२. **सामाजिक प्रवाह –** भारतीय समाजात सामाजिक प्रवाह हे अतिशय जलद गतीने बदलत आहेत. शहरी व निमशहरी नागरिक आरोग्याच्या बाबतीत अधिक जागृत होत असल्याने ते मोठ्या संख्येने व्यायामशाळेत जात असून सकस आहाराकडे अधिक लक्ष देत आहेत. परिणामी व्यायाम शाळा आणि सकस आहार विषयक व्यवसाय शहरी आणि निमशहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थापन केले जात आहेत.

३. **सामाजिक मूल्ये –** सामाजिक मूल्ये हे सामाजिक रूढीपरंपरा, नैतिकता, श्रद्धा इ. वर अवलंबून असतात. सामाजिक मूल्ये व्यवसायास ग्राहकांच्या गरजेनुसार मागणी पूर्ण करण्यास मदत करतात. उदा. सामाजिक रूढीपरंपरांमुळे ग्रामीण भागात घरगुती अंदाजपत्रक पद्धती स्वीकारणे शक्य असते.

४. **परंपरा –** दिवाळी, ईद, ख्रिसमस आणि इतर सण उत्सव साजरा करण्याची परंपरा सुद्धा व्यवसायावर परिणाम करते.



**कृती**

- **सामाजिक पर्यावरण :**

आई-वडील आणि इतर नातेवाईक यांच्याशी गेल्या पाच वर्षात झालेल्या उपभोग सवयीतील बदल आणि त्यांचा व्यवसायावरील झालेला परिणाम यासंबधी चर्चा करा.

### ७.३.३. राजकीय पर्यावरण : (Political Environment)

सर्वच व्यवसायावर शासन आणि शासकीय धोरणांचा परिणाम होतो. राष्ट्रीय विकासासाठी व्यवसायाचे स्वरूप आणि हाती घ्यावयाचे कार्यक्रम आणि प्रकल्प सुद्धा राजकीय पर्यावरणच निश्चित करते. राजकीय पर्यावरणात राष्ट्रातील स्थैर्य आणि शांतता, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा दृष्टीकोन इ. चा समावेश होतो. राजकीय स्थिरता ही राष्ट्राचे सामर्थ्य आणि व्यवसायाशी संबधित विविध गट व दीर्घकालीन प्रकल्पाच्या गुंतवणुकदारांचा आत्मविश्वास दर्शविते. राजकीय पक्षाची विचारसरणी आणि सरकारी अधिकाऱ्यांचा व्यवसाया संबधीचा दृष्टिकोन सुद्धा व्यवसायावर परिणाम करतो.

भारत लोकशाहीप्रधान राष्ट्र असल्याने भारताच्या राजकीय प्रणालीत विधीमंडळ, शासन आणि न्यायसंस्था या तीन महत्त्वपूर्ण संस्थाचा समावेश होतो.

#### १. विधीमंडळ :

राजकीय प्रणालीतील विधीमंडळ ही प्रभावशाली संस्था असून विधीमंडळास धोरण निश्चित करणे, कायदा संमत करणे, अंदाजपत्रकास मान्यता देणे आणि कार्यकारी नियंत्रण ठेवणे इ. अधिकार आहेत.

#### २. शासन :

शासन व्यवसायासंबधीची धोरणे ठरविते या धोरणांचा व्यवसायाच्या विकासावर परिणाम होतो.

#### ३. न्यायसंस्था :

राजकीय प्रणालीतील न्यायसंस्था ही तिसरी महत्त्वपूर्ण संस्था असून शासनाने करावयाच्या कामाची पद्धत निश्चित करते. तसेच शासन आणि नागरिक यांच्यातील नातेसंबध स्थिर ठेवण्याचे कार्य करते.

### ७.३.४. आर्थिक पर्यावरण : (Economic Environment)

व्यवसायाचे अस्तित्व आणि यश पूर्णपणे आर्थिक पर्यावरणावर अवलंबून असते. आर्थिक पर्यावरणाचे, राष्ट्राची आर्थिक स्थिती, आर्थिक धोरणे आणि आर्थिक प्रणाली हे प्रमुख घटक आहेत. तसेच नियोजन, पायाभूत आर्थिक तत्त्वज्ञान, मूलभूत सुविधा, राष्ट्रीय उत्पन्न, अर्थपुरवठा, बचतीचे प्रमाण आणि व्यापार चक्र इ. इतर घटक आहेत.

#### १) आर्थिक स्थिती :

व्यवसायाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा संच राष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असतो. तर राष्ट्राची आर्थिक स्थिती ही राष्ट्राचे स्थूल उत्पन्न (GDP), दरडोई उत्पन्न, भांडवलाची उपलब्धता, विदेश व्यापार वृद्धी आणि भांडवल बाजार इ. वर अवलंबून असते.

#### २) आर्थिक धोरणे :

शासनाने वेळोवेळी आखलेल्या धोरणांचा व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होतो. म्हणून शासन नेहमी विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेऊन विदेशी गुंतवणूक धोरण ठरविते.

सामान्यपणे औद्योगिक धोरण, आर्थिक धोरण, विदेशी गुंतवणूक धोरण, कृषी धोरण, शैक्षणिक धोरण, सार्वजनिक खर्च विषयक धोरण आणि आयात-निर्यात धोरण, इ. महत्त्वपूर्ण आर्थिक धोरणे आहेत. प्रत्येक व्यवसायाने शासनाच्या आर्थिक धोरणांनुसार कामकाज करणे व त्यात होणाऱ्या बदलांना प्रतिसाद देणे आवश्यक असते.

#### ३) आर्थिक प्रणाली : (अर्थव्यवस्था)

खाजगी व्यवसायाची व्याप्ती, विस्तारासंबंधीचे धोरण आणि आर्थिक उपक्रमाबाबतचे शासनाने केलेले कायदे हे प्रामुख्याने राष्ट्राच्या आर्थिक प्रणालीवर अवलंबून असतात. भांडवलशाही, समाजवादी आणि मिश्र या प्रमुख आर्थिक प्रणाली आहेत.

**अ) भांडवलशाही –** या अर्थव्यवस्थेस मुक्त अर्थव्यवस्था म्हणून ही ओळखले जाते. ही आर्थिक प्रणाली व्यक्तीवादावर अधिक भर देते व खाजगी मालकीवर विश्वास ठेवते. उदा. USA

**ब) समाजवादी अर्थव्यवस्था –**

या अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे घटक शासनाच्या मालकीचे असतात. तसेच या घटकांचे संघटन आणि व्यवस्थापन सुद्धा सरकारकडूनच केले जाते. या अर्थव्यवस्थेत संपत्तीचे नागरिकांत समान वाटप केले जाते.

**क) मिश्र अर्थव्यवस्था –**

या अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे घटक हे शासन आणि खाजगी व्यक्तींच्या संयुक्त मालकीचे असतात.

उदा. भारत.

### ७.३.५ तंत्रज्ञानविषयक पर्यावरण : (Technological Environment)

तंत्रज्ञानविषयक पर्यावरणात उत्पादनाच्या पद्धती आणि तंत्रांचा समावेश होतो. उत्पादनाच्या रचनेवर विविध तंत्रज्ञानविषयक पर्यावरणाचा परिणाम होतो. तंत्रज्ञानामुळेच नागरिक आणि व्यवसायाच्या भविष्यास आकार मिळतो. तंत्रज्ञान हे अधिक वेगाने बदलत असल्याने प्रत्येक व्यवसायाने तंत्रज्ञानात वेळोवेळी होणाऱ्या बदलाचा स्वीकार करण्यासाठी सतर्क राहणे आवश्यक आहे. उत्पादन व सेवा कार्यात नाविन्यता आणण्यासाठी नियमितपणे शास्त्रीय संशोधनासाठी उपक्रमशील राहणे ही आवश्यक आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. कारण

आजच्या काळात कोणताही व्यवसाय कालबाह्य तंत्रज्ञानावर टिकवून ठेवणे अशक्य असते.

उदा. डिजिटल इंडिया साठी शासनाने घेतलेला पुढाकार



**कृती**

- **तांत्रिक पर्यावरण :**

आपल्या परिसरातील टपाल कार्यालय, बँक आणि इतर कार्यालयास भेट देऊन माहिती तंत्रज्ञानामुळे झालेल्या बदलाची नोंद घ्या.

### ७.३.६ कायदेशीर पर्यावरण : (Legal Environment)

कोणताही व्यवसाय स्थापन करणे, चालवणे, संवर्धन करणे आणि विस्तार करणे हे देशाच्या कायदेशीर चौकटीतच करावे लागते. म्हणून व्यवसायावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि व्यवसायास दिशा देण्यासाठी अनेक कायदे संमत केले जातात. व्यवसाय करणाऱ्यास दैनंदिन कामकाजाचे निर्णय घेण्यासाठी या विविध कायद्यांचे ज्ञान असणे आवश्यक असते.

व्यवसायावर प्रभाव टाकणारे महत्त्वाचे कायदे खालीलप्रमाणे आहेत.

i) भारतीय करार कायदा, १८७२ – (२०१७)
ii) कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३ – (२०१०)
iii) औद्योगिक कलह कायदा, १९४७ – (२०१६)
iv) प्रमाणित वजने मापे कायदा, १९६९ – (२०१६)
v) ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ – (२०१८) (प्रस्तावित)
vi) औद्योगिक स्पर्धा कायदा, २००२

(कंसातील वर्ष दुरुस्ती किंवा प्रस्तावीत दुरुस्ती दर्शवितात)



**कृती**

- **कायदेविषयक पर्यावरण**

तुमच्या भागातील किरकोळ विक्रेत्यास भेट देऊन वस्तू आणि सेवा कर कायदा (GST) आणि प्लॅस्टिक कॅरी बॅग वापरावर आलेल्या बंदीमुळे झालेल्या बदलाची नोंद घ्या.

## ७.४ नवीन आर्थिक धोरण आणि व्यवसाय :

भारताचे स्वातंत्र्यानंतरचे औद्योगिक विकासाचे धोरण अपयशी ठरल्यानंतर भारत सरकारने २४ जुलै १९९१ रोजी नवीन आर्थिक धोरण स्वीकारले; ज्यात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रींचा समावेश होतो.

- **उदारीकरण : Liberalization**

औद्योगिक क्षेत्र जेव्हा अनेक समस्यांना तोंड देत होते तेव्हा भारत सरकारने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. व्यवसायाचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील अनावश्यक नियंत्रण व निर्बंध दूर करण्याच्या प्रक्रियेशी उदारीकरणाचा संबध आहे.

उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था खुली करण्यात आली तसेच जगाशी मोठ्या प्रमाणावर औद्योगिक संवाद सुरू करण्यात आला. यामुळे विदेशी व्यावसायिकांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश करणे सोपे झाले आणि स्पर्धाशक्ती व कार्यक्षमतेस प्राधान्य मिळाले.

- **उदारीकरणात पुढील बाबींचा समावेश होतो.**

१. औद्योगिक परवाना पद्धत रद्द करण्यात आली.
२. आयातीवरील निर्बंध आणि आयात करात कपात करण्यात आली.
३. अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली.
४. कर आकारणीत कपात करण्यात आली.
५. विदेशी विनिमयाची नियंत्रणे कमी करण्यात आली.
६. औद्योगिक आजारपणासंबधीच्या दृष्टिकोनात बदल करण्यात आला.
७. व्यवसाय उपक्रमाचे प्रमाण ठरविण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले.
८. विदेशी गुंतवणूकीस आकर्षित केले गेले.
९. वस्तू व सेवेच्या किमती निश्चित करण्याचे स्वातंत्र्य दिले.
१०. प्राथमिक दूरसंचार केंद्र चालविण्यात आले.

उदारीकरणामुळे विकासदर वाढविणे, स्पर्धात्मक किमतीत सहजतेने वस्तू उपलब्ध करणे, परकीय विनिमय साठा वाढविणे, भारतीय चलन मजबूत करणे आणि चांगले औद्योगिक संबंध निर्माण करणे यास मदत झाली.

- **खाजगीकरण** (Privatization) :

आर्थिक उपक्रमातील सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करणे म्हणजे खाजगीकरण होय. खाजगीकरणात सरकारी क्षेत्रे खाजगी क्षेत्रास विकली जातात किंवा चालविण्यासाठी दिली जातात.

- **खाजगीकरणाची गरज :**

१. अधिक कार्यक्षमता
२. राजकीय हस्तक्षेप कमी करणे
३. कामगारांच्या समस्या कमी करणे
४. उत्तरदायित्वाची खात्री
५. भांडवल बाजारास शिस्त

- **खाजगीकरणात खालील बाबींचा समावेश होतो :**

१. सार्वजनिक क्षेत्रातील आरक्षित उद्योगांची संख्या कमी करणे आणि निवडक (विशिष्ट) आरक्षित क्षेत्रात स्पर्धेस सुरूवात करणे.

२. व्यवसायातील संसाधने वाढविण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी निवडक 'सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील' निर्गुंतवणूक करणे.

३. एम.ओ.यू.(सामंजस्य करार) मार्फत कामगिरीमध्ये सुधारणा करणे. (Memorandum of Understanding)

खाजगीकरण हे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या पुर्नरचनेचे प्रभावी साधन आहे. कारण खाजगी क्षेत्र हे मुळातच दर्जेदार उत्पादन व सेवेसाठी अधिक स्वंयप्रेरित आणि विश्वसनीय आहे.

- **जागतिकीकरण : (Globalization)**

माहिती, कल्पना, तंत्रज्ञान, वस्तू आणि सेवा, भांडवल, वित्त आणि व्यक्ती इ. च्या मदतीने जागतिक स्तरावरील आर्थिक आणि सामाजिक एकात्मकता म्हणजे जागतिकीकरण होय.

दुसऱ्या शब्दांत भौगोलिक सीमेशिवाय असलेले तंत्र म्हणजे जागतिकीकरण. जागतिकीकरणात जागतिक अर्थव्यवस्थेच्या एकात्मिक सुधारणेसाठी सर्व राष्ट्र स्वतंत्रपणे नेतृत्व करतात.

- **जागतिकीकरणात खालील बाबींचा समावेश होतो.**

१. निर्यातीतील चुका, अडथळे दूर करणे.

२. आयात दरात कपात करणे.

३. आयातीवर कमीत कमी निर्बंध ठेवणे.

- **जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये :**

१. जगात कोठेही व्यवसाय स्थापन करणे व चालविण्याचे स्वातंत्र्य.

२. कोणत्याही देशाकडून वस्तू खरेदी आणि कोणत्याही देशात विक्री.

३. स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अंतर कमी करणे.

४. प्रत्यक्ष विदेशी सहभाग.

५. नवीन तंत्रज्ञान व कल्पनांची जागतिक देवाण-घेवाण

- **जागतिकरणाचे सकारात्मक परिणाम :**

१. व्यापारात जागतिक करार.

२. बाजार आणि आर्थिक धोरणांचा संपूर्ण जगभर प्रसार.

३. भौगोलिक सीमांची बंधने कमी होऊन ''जागतिक गाव'' निर्मिती.

४. ग्राहकांचा संबंध हा फक्त वस्तूचा दर्जा, किंमत, स्वरूप इ.शी संबधित राहिला.

५. जागतिकीकरणामुळे आर्थिकदृष्ट्या पर्यावरण निर्मिती

६. उत्पादन व सेवा क्षेत्राच्या खाजगीकरणाचा कल वाढला.

## ७.५ उद्योग आणि व्यवसायांवरील बदलत्या आर्थिक धोरणांचा परिणाम

१. व्यवसायाच्या स्पर्धा शक्तीत वाढ.

२. अधिक मागणी असलेले ग्राहक.

३. तंत्रज्ञान विषयक पर्यावरणात आमुलाग्र बदल.

४. बदलाची गरज.

५. विकसनशील मानव संसाधनाची गरज.

६. ग्राहकाभिमुख बाजारपेठ.

७. शासकीय अर्थसहाय्यात कपात.

८. व्यवसायात टिकून राहण्यासाठी कठीण परिश्रम करण्याची गरज.

९. विविध क्षेत्रातील कौशल्ये आवश्यक.

## सारांश

व्यावसायिक पर्यावरण, व्यवसायाबाहेरील शक्ती, घटक आणि संस्था जे व्यवसायाच्या नियंत्रणाबाहेरील आहेत परंतु व्यवसायाच्या कामकाजावर परिणाम करतात असे घटक सूचित करते.

**बायर्ड ओ. व्हिलर –**

व्यवसायावर आणि व्यवसायाच्या कामकाजावर परिणाम करणारे सर्व बाह्य घटक म्हणजे व्यावसायिक पर्यावरण

**व्यावसायिक पर्यावरणाचे महत्व :**

१. संधी आणि धोक्यांची पूर्वसूचना समजते

२. व्यवसायाचे सामर्थ्य आणि कमजोरी ओळखते

३. सतत शिक्षण मिळते

४. व्यवसायाची प्रतिमा निर्माण करणे

५. स्पर्धेत टिकून राहणे

६. व्यवसाय विस्तारास दिशा

**व्यावसायिक पर्यावरणाचे पैलू :**

- **नैसर्गिक पर्यावरण –** नैसर्गिक पर्यावरणात हवामान, खनिजे, मृदा, भूमी, नदी-समुद्र, नैसर्गिक संसाधने इ. घटकांचा समावेश होतो. जे व्यवसायाच्या कामकाजावर परिणाम करतात.

- **सामाजिक पर्यावरण –** सामाजिक पर्यावरणात समाज रचना आणि सामाजिक संस्कृतीचा समावेश होतो. समाज रचना ही व्यवसाय, शिक्षण, उत्पन्न स्तर, सामाजिक दर्जा, राहणीमानासंबधीचा दृष्टीकोन तसेच सामाजाचा व्यवसाया संबंधीचा दृष्टीकोन इ. वर अवलंबून असते.

तर सामाजिक संस्कृती ही सामाजिक रीती-रिवाज, मूल्ये, नैतिकता, विश्वास (श्रद्धा), दारिद्र्य, साक्षरता इ. घटकांवर अवलंबून असते.

- **राजकीय पर्यावरण –** राजकीय पर्यावरणात शासनाचा दृष्टीकोन, राष्ट्रातील स्थैर्य व शांतता, सत्ताधारी पक्षाची विचारसरणी इ. चा समावेश होतो.

विधीमंडळ, शासन आणि न्यायसंस्था हे राजकीय पर्यावरणाचे मुख्य घटक आहेत.

- **आर्थिक पर्यावरण –** आर्थिक पर्यावरणात आर्थिक स्थिती, आर्थिक धोरणे आणि अर्थव्यवस्था या घटकांचा समावेश होतो. याशिवाय पायाभूत सुविधा, राष्ट्रीय उत्पन्न, अर्थ पुरवठा, बचतीचे प्रमाण आणि व्यापार चक्र इ. घटकांचा समावेश होतो.

- **तांत्रिक पर्यावरण –** तांत्रिक पर्यावरणात उत्पादनांसाठी वापरलेले तंत्रज्ञान व पद्धती यांचा समावेश होतो.

- **कायदेविषयक पर्यावरण –** कायदेशीर पर्यावरणात शासनाने संमत केलेले विविध कायदे आणि न्यायालयीन निर्णय (आदेश) इ. चा समावेश होतो.

- **नवीन आर्थिक धोरण –**

- **उदारीकरण –** उदारीकरण ही व्यवसाय सुरळीतपणे चालविण्यासाठी व्यवसायावरील अनावश्यक नियंत्रण व बंधने काढून टाकण्याची प्रक्रिया आहे.

उदारीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था खुली होऊन जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे शक्य झाले.

• **खाजगीकरण –** खाजगीकरण ही औद्योगिक क्षेत्रातील खाजगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग कमी करण्याची प्रक्रिया आहे.

खाजगीकरण हे सार्वजनिक क्षेत्राची पूनर्रचना व सुधारणा करण्याचे प्रभावी साधन मानले जाते.

• **जागतिकीकरण –** जागतिकीकरण म्हणजे माहिती, कल्पना, तंत्रज्ञान, वस्तू, सेवा, भांडवल आणि व्यक्ती इ. च्या साहायाने अर्थव्यवस्था व समाज एकत्रीकरण होय.

• **शासनाच्या बदलत्या धोरणाचा उद्योग व व्यवसायावरील परिणाम –**

१. व्यवसायाच्या स्पर्धाशक्तीत वाढ

२. अधिक मागणी असलेले ग्राहक.

३. तंत्रज्ञानविषयक पर्यावरणात आमुलाग्र बदल

४. बदलाची गरज.

५. विकसनशील मानव संसाधनाची गरज

६. ग्राहकाभिमुख बाजारपेठ

७. शासकीय अर्थसहायात कपात

८. व्यवसायात टिकून राहण्यासाठी कठीण परिश्रम करण्याची गरज

९. विविध क्षेत्रातील कौशल्ये आवश्यक

• **व्यावसायिक संधी –** १) वित्तीय सल्लागार २) कायदेविषयक सल्लागार ३) कर सल्लागार ४) तंत्रज्ञ ५) कंम्प्युटर ऑपरेटर (डाटा, टॅली, प्रोग्रामिंग, ऑफिस, ऑटोमेशन) ६) आपत्ती व्यवस्थापन ७) फॅशन डिझायनर ८) जी. एस्. टी. तज्ज्ञ

## संदर्भ सूची

### References Books :


1) Text book 'Organization of Commerce and Management' of 12th Commerce - Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune-411044.

2) 'Essentials of Business Environment' K. Aswathppa - Himalaya Publishing House.

3) 'Business Environment and Entrepreneurship' - Institute of Company Secretaries of India.

4) 'Business Environment' Dr. Karam Pal

5) 'New Economic Reforms' - Prof. Anjila Gupta, IJRE, IT, and Social science, Volume 6 Issue 01 January 2016

6) 'Impact of changing Socio-Economic Environment on Business in India' - M.Gayathri, SSRG IJ of Economic and Management Studies - April 2017



## स्वाध्याय

**प्र.१ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. व्यावसायिक पर्यावरण-------- वर प्रचंड परिणाम करतात.

अ) व्यवसाय ब) शासन क) समाज

२. नवीन औद्योगिक धोरण -------- मध्ये अंमलात आले.

अ) १९४७ ब) १९५१ क) १९९१

३. सत्ताधारी शासन बदलणे हा ------ पर्यावरणाचा भाग आहे.

अ) राजकीय ब) तंत्रज्ञान विषयक क) आर्थिक

४. साक्षरतेचे प्रमाण हा --------- पर्यावरणाचा घटक आहे.

अ) सामाजिक ब) कायदेविषयक क) राजकीय

५. खाजगीकरणात ---- क्षेत्राची भूमिका कमी करण्याची अंमलबजावणी केली जाते.

अ) सार्वजनिक ब) खाजगी क) विदेशी

६. जागतिकीकरण हे -------- बाजारपेठेशी संबधीत असते.

अ) जागतिक ब) स्थानिक क) ग्रामीण

७. ----- म्हणजे राष्ट्राची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे.

अ) जागतिकीकरण ब) खाजगीकरण क) उदारीकरण

८. पर्यावरणासंबधीची जागरूकता ------- इशारा दर्शविते.

अ) धोक्याचा ब) सजगतेचा क) साधारण

**ब) १. योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) जागतिकीकरण | १. नफ्याचा हेतू |
| ब) खाजगीकरण | २. २००६ |
| क) उदारीकरण | ३. सीमा मुक्त अर्थव्यवस्था |
| ड) नवीन अर्थिक धोरण | ४. सेवा हेतू |
| ई) सामाजिक पर्यावरण | ५. अंतर्गत घटक |
| | ६. निर्गुंतवणूक |
| | ७. सामाजिक मूल्ये |
| | ८) १९९१ |
| | ९) परवाना पद्धत रद्द करणे |
| | १०) GATT |

२.

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) अंतर्गत पर्यावरण | १) कायद्याचे ज्ञान |
| ब) राजकीय पर्यावरण | २) करविषयक धोरण |
| क) कायदेशीर पर्यावरण | ३) तंत्रज्ञान |
| ड) आर्थिक पर्यावरण | ४) परंपरा |
| | ५) जागतिक व्यापार संघटना (W.T.O) |
| | ६) व्यवसायाद्‌वारे नियंत्रण |
| | ७) अधिक किंमत |
| | ८) राजकीय पक्षाची विचारसरणी |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१) व्यावसायिक पर्यावरणातील व्यवसायाच्या नियंत्रणाबाहेरील घटक

२) परंपरा, मूल्ये, सामाजिककल इ. घटकांचा समावेश असलेले पर्यावरण

३) सार्वजनिक क्षेत्राची मालकी खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया

४) सीमा विरहीत विश्‍व ज्यात वस्तू, सेवा, माहिती, भांडवल आणि मनुष्यबळ इ. चा मुक्त प्रवेश

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१) व्यवसायाच्या बाह्य पर्यावरणाचे घटक नियंत्रित करणे शक्य आहे.

२) व्यवसाय हे पर्यावरणाच्या विविध घटकांचे फळ आहे.

३) व्यवसाय आणि पर्यावरण हे अविभाज्य घटक आहेत.

४) भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिकरणाचा फायदा होत नाही.

५) नवीन आर्थिक धोरण उदारमतवादी आर्थिक धोरणास चालना देते.

६) खाजगीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेस फायदे होत नाहीत.

७) व्यवसायात व्यावसायिक पर्यावरणाच्या घटकाकडे लक्ष देण्याची गरज नसते.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१. सामान्यपणे व्यावसायिक पर्यावरण संकल्पना ........ शी संबधित आहे.

२. व्यवसायास, आव्हानावर यशस्वी मात करण्यासाठी ........ ची मदत होते.

३. भौगोलिक आणि पर्यावरणीय घटकांचा ............ पर्यावरणात समावेश होतो.

४. साक्षरता हा .............. पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग आहे.

५. राष्ट्रातील स्थैर्य आणि शांतता इ. चा ................ पर्यावरणात समावेश होतो.

६. भारतीय राजकीय प्रणालीत................ महत्त्वपूर्ण संस्था आहेत.

७. ........... म्हणजे शासनाचा सार्वजनिक क्षेत्रातील मर्यादित सहभाग होय.

८. अर्थव्यवस्था आणि समाज यांचे जागतिक स्तरावर एकात्मीकरण म्हणजे ........होय.

**फ) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

१. व्यावसायिक पर्यावरणाच्या घटकांचे किती प्रकारात वर्गीकरण केले जाते. **(दोन/तीन/चार)**

२. व्यावसायिक पर्यावरणाच्या कोणत्या घटकांवर नियंत्रण ठेवणे शक्य असते. **(अंतर्गत/बाहय)**

३. व्यवसायाचे आर्थिक धोरण कोण ठरवते. **(शासन/नागरिक/व्यावसायिक)**

४. मुक्त अर्थव्यवस्था म्हणून कोणती अर्थव्यवस्था ओळखली जाते. **(साम्यवादी/मिश्र/भांडवलशाही)**

**ग) खालील वाक्यातील अधोरेखीत शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१. व्यावसायिक पर्यावरणाच्या **बाह्य घटकांवर** नियंत्रण ठेवणे शक्य आहे.

२. व्यावसायिक पर्यावरणाचे **अंतर्गत घटक** नियंत्रणा बाहेरचे असतात.

३. नैसर्गिक संसाधने **राजकीय पर्यावरणाशी** संबधीत असतात.

४. जागतिक खेडे/गाव या संकल्पनेसाठी **खाजगीकरण** मदत करते.

**ई) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अंतर्गत पर्यावरणात कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो?

२. विधिमंडळास कोणकोणते अधिकार असतात?

३. राष्ट्राची आर्थिक स्थिती कोणत्या घटकावर अवलंबून असते?

४. साम्यवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी कोणाकडे असते?

५. उत्पादनासाठी वापरलेले तंत्र व पद्धतींचा कोणत्या पर्यावरणात समावेश होतो?

६. भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण केव्हा सुरू केले?

७. उद्योगातील राजकीय हस्तक्षेप कमी करण्यासाठी कशाचा फायदा होतो?

८. सीमा रहित जग कशामुळे शक्य होते?

**प्र.२रा संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१. व्यावसायिक पर्यावरण

२. उदारीकरण

३. खाजगीकरण

४. जागतिकीकरण

५. सामाजिक पर्यावरण

६. आर्थिक पर्यावरण

७. राजकीय पर्यावरण

८. अंतर्गत पर्यावरण

**प्र.३रा खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१. न्यायालयाने प्लॅस्टिक कॅरीबॅगवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

**कारण** : १) प्लॅस्टीक कॅरीबॅगमुळे सर्वसामान्यांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या पर्यावरणीय समस्या निर्माण करतात.

२) समाजसुद्धा आरोग्यदायी आयुष्यासंबधी अधिक जागृत झाला आहे.

म्हणून शासनाने ताग (ज्यूट) उद्योगास चालना देण्यासाठी आर्थिक अनुदान देण्याचा निर्णय घेतला.

१) पॉलिथिन पिशव्यांवर कोर्टाने का बंदी घातली आहे?

२) व्यावसायिक पर्यावरणाचा पैलू ओळखा.

३) जूट उद्योगाला चालना देण्यासाठी सरकार कसे प्रयत्न करते?

२. अँकर कंपनीने ट्यूब लाईट बनविण्याच्या विभागाचा संशोधन आणि विकासा वरील खर्चात उल्लेखनीय वाढ करून अशा तंत्रज्ञानाचा शोध लावला, ज्यामुळे पूर्वीच्या ट्यूबपेक्षा २० पटीने अधिक प्रकाश देऊन तुलनेने अधिक दर्जेदार ट्यूब बनविणे शक्य झाले. परिणामी अँकर कंपनीच्या नफ्यात वाढ होऊन विस्तारही झाला.

१) नवीन तंत्रज्ञानाविषयी कंपनीला कसे कळाले?

२) व्यावसायिक पर्यावरणाचा घटक ओळखा.

३) व्यवसायाच्या वातावरणाचा विचार केल्याचा काय परिणाम झाला?

३. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उत्पादकांनी भारतात उत्पादन करावे म्हणून भारत सरकारने पुढाकार घेऊन उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी मेक इन इंडिया योजना सुरू केली ही योजना रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकासासाठी देशातील पंचवीस क्षेत्रावर भर देते.

यासाठी पुढाकार घेऊन विविध क्षेत्रात आणि संकेतस्थळावर माहितीपत्रके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ही योजना उत्पादनाचा दर्जा सुधारणे व उत्पादनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करणे या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. तसेच या योजनेद्वारे विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

i) कौशल्य विकासासाठी भारत सरकारने सुरू केलेल्या उपक्रमाचे नाव लिहा.

ii) व्यावसायिक पर्यावरणाचा एक पैलू सांगा.

iii) पुढाकारातील कोणताही एक फायदा सांगा.

**प्र.४था फरक स्पष्ट करा.**

१. सामाजिक पर्यावरण आणि आर्थिक पर्यावरण

२. राजकीय पर्यावरण आणि कायदेशीर पर्यावरण

३. उदारीकरण आणि खाजगीकरण

४. जागतिकीकरण आणि उदारीकरण

५. खाजगीकरण आणि जागतिकीकरण

**प्र.५वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. सामाजिक पर्यावरणाचे कोणतेही चार घटक सांगा.

२. आर्थिक पर्यावरणाचे कोणतेही दोन घटक सांगा.

३. जागतिकीकरणाची कोणतीही चार वैशिष्ट्ये सांगा.

४. खाजगीकरणाची गरज कोणत्याही चार मुद्द्याद्वारे स्पष्ट करा.

**प्र.६वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) बाह्य पर्यावरणाच्या घटकावर व्यवसायाचे नियंत्रण नसते.

२) व्यवसायाने समाजातील बदलासंबधी जागरूक असावे लागते.

३) राजकीय स्थिरता, व्यवसायाशी संबंधित घटकात आत्मविश्वास वाढविते.

४) आर्थिक पर्यावरण व्यवसायावर प्रत्यक्ष परिणाम करते.

५) सामाजिक कल, प्रवाह व्यवसायास संधी उपलब्ध करून देतात.

६) यशस्वी व्यवसायासाठी कायदा व नियंत्रणाचे पुरेसे ज्ञान आवश्यक असते.

**प्र.७वा खालील प्रश्न सोडवा.**

१) व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व

२) सामाजिक पर्यावरण

३) आर्थिक पर्यावरण

४) राजकीय पर्यावरण

५) नवीन आर्थिक धोरणाचे उद्योग-व्यवसायावरील परिणाम.

**प्र.८वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) व्यावसायिक पर्यावरण म्हणजे काय? व्यावसायिक पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करा.

२) नवीन आर्थिक धोरण सविस्तरपणे स्पष्ट करा.

# ८ व्यवस्थापनाची ओळख


८.१ प्रस्तावना
- ८.१.१ अर्थ
- ८.१.२ व्याख्या

८.२ व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये

८.३ व्यवस्थापनाचे स्तर

८.४ व्यवस्थापन कला, शास्त्र व पेशा

- फरक
- सारांश
- स्वाध्याय


शाल्वीने व्यवसाय व्यवस्थापनाची पदव्युत्तर पदवी 'वित्त' या विषयामधून नुकतीच संपादन केली. (M.B.A. in Finance). तिचे वडील वडिलोपार्जित किराणा दुकान पारंपारिक पद्धतीने चालवितात तिची एका नामांकित कंपनीमध्ये निवड झाली. परंतु तिने नोकरी करण्याऐवजी कुटुंबाचा व्यवसाय चालविण्याचा निर्णय घेतला. जेव्हा तिने व्यवसायात लक्ष घालावयास सुरुवात केली तेव्हा तिच्या असे लक्षात आले की दुकानातील सद्य व्यवस्थापकीय धोरणे आणि प्रशासनात आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. तिला असे आढळून आले की दुकानामध्ये बरीच रिकामी (न वापरात आलेली जागा) आहे, मर्यादित प्रकारचे धान्य, अप्रशिक्षित कर्मचारी वर्ग, कर्मचाऱ्यांच्या कामांच्या तासांवर अपुरे नियंत्रण, दुकानातील वस्तूंची जुन्या पद्धतीने केलेली मांडणी, बिले तयार करण्याची पारंपरिक पद्धत इ. त्याचवेळी तिच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे अतिशय प्रामाणिक व निष्ठावंत असा कर्मचारी वर्ग असून तो व्यवसायाच्या नवनवीन पद्धती शिकण्यासाठी तयार आहे. व्यवसायाच्या प्रचलित पद्धतीत आवश्यक ते बदल करण्यासंबंधी तिने वडिलांबरोबर चर्चा करुन व्यवस्थापन व विपणनाच्या धोरणांचा वापर करून व्यवसायाचा चेहरामोहरा बदलून टाकला.

त्यांनी वस्तूंची मांडणी विविध विभागात केली. अत्याधुनिक पद्धतीचे फर्निचर वापरले, धान्याव्यतिरिक्त इतर प्रकारची उत्पादने वाढवून आकर्षक पद्धतीने मांडणी केली. त्यांनी सी.सी.टी.व्ही बसविला, बिलींगसाठी बारकोड पद्धती सुरू केली आणि त्यांच्या वापरासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी खरेदीवर सूट व इतर सवलती जाहीर केल्या, मोफत घरपोच माल पोहोचविणे इ. सुविधा जाहीर केल्या. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षमतेनुसार ५% ते १०% पर्यत अधिक मानधन देण्याचे आश्वासन दिले. यामुळे छोट्या, पारंपरिक किराणा दुकानाचे आधुनिक विभागीय दुकानांत रुपांतर झाले.

या बदलांमुळे व्यवसायाचा विस्तार होऊन नफ्याचे प्रमाण वाढले. तिच्या वडिलांना व कुटुंबातील सर्व सदस्यांना हा एक चमत्कारच वाटला आणि सर्वांनी तिच्या प्रयत्नांचे कौतुक केले. शाल्वीने तिच्या वडिलांना सांगितले की, हा चमत्कार नसून योग्य व्यवस्थापन तत्त्वांचा व धोरणांचा अवलंब केल्यामुळे हे सर्व शक्य झाले.

## ८.१ प्रस्तावना :

व्यवस्थापन हा अलीकडील काळातील परवलीचा शब्द बनलेला आहे. आपल्या दैनंदिन जीवनात हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरलेला आढळून येतो. आपल्या कुटुंबाचे सर्वसामान्य उद्दिष्ट म्हणजे कुटुंबातील

प्रत्येक सदस्याच्या गरजा आणि इच्छा यांची समाधानकारक पूर्तता होणे हे असते. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी महिन्याचा खर्च, बचत व सुरक्षितता यांचा समतोल राखणे याकडे कुटुंबप्रमुख सातत्याने लक्ष पुरवित असतो. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योग्य नियोजन व त्यांची अंमलबजावणी न केल्यास त्याचा परिणाम कुटुंबातील अन्य सदस्यांवर नकारात्मक झालेला दिसून येतो. वरील गोष्टींचा परिणामकारक समतोल ठेवण्यासाठी कुटुंबप्रमुख वेगवेगळ्या तंत्रांचा आणि पद्धतींचा कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने उपयोग करत असतो. विशेषतः या पद्धतीमध्ये अंदाजपत्रक, गरजांचे वर्गीकरण, संसाधनांची व्यवस्था, योग्य निर्णय आणि प्रत्येक महिन्याच्या शेवटी वरील सर्व बाबींचा आढावा कुटुंबातील सदस्यांबरोबर घेतला जातो. वरील प्रत्येक उद्दिष्ट संपादित करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजेच व्यवस्थापन होय. वरील सर्व पैलू व्यावसायिक संघटनेमध्ये आढळून येतात.

व्यवस्थापन ही प्राचीन काळापासून चालत आलेली क्रिया आहे. मानवाच्या उत्क्रांतीच्या अगदी सुरुवातीच्या अवस्थेपासून म्हणजेच मानव समूहामध्ये रहात असताना त्याने वेगवेगळ्या बाबींचा अवलंब केला. विशेषतः मशागत, मासेमारी, शिकार इ. बाबींमधून व्यवस्थापनाचे अस्तिव असल्याचे आढळून येते. थोडक्यात जेथे-जेथे सांघिक काम आहे तेथे व्यवस्थापनाची गरज असते. नागरिकरणाच्या सर्व टप्प्यांमध्ये व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित झालेले दिसून येते.

सर्व संघटन प्रकारामध्ये व्यवस्थापन एक अविभाज्य घटक आहे. मग ती व्यापारी संघटना असो, सरकारी संघटना असो, दवाखाने असो, महाविद्यालये असो वा मंडळ (क्लब) इ. व्यवस्थापन ही एक सर्जनशील ताकद असून जी संसाधनांचा सर्वोत्तम वापर करण्यास मदत करते.

### ८.१.१ अर्थ :

“Manage” हे इंग्लिश क्रियापद इटालियन शब्द "Maneggiare" या पासून आलेले आहे. याचा अर्थ हाताळणे विशेषतः साधने किंवा अश्व या अर्थाने रुढ असलेला पहावयास मिळतो. हा शब्द लॅटीन शब्द 'manus', ज्याचा अर्थ हात, आणि ‘agere’ ज्याचा अर्थ कृती, या दोन शब्दांपासून आलेला आहे. पारंपरिक संकल्पनेनुसार व्यवस्थापन हे एखादी क्रिया पूर्ण करण्यापुरते मर्यादित होते. परंतु आधुनिक काळात व्यवस्थापनाचा अर्थ आणि व्याप्ती मोठ्या प्रमाणात विस्तृत झालेली पहावयास मिळते. व्यवस्थापनेच्या विस्तृत संकल्पनेत पुढील पैलूंचा समावेश होतो. जसे की, विविध क्रिया हाताळणे, मानवी संसाधनांची व्यवस्था करणे आणि विविध प्रकारच्या परिस्थितीची हाताळणी करणे. व्यवस्थापन हे सार्वत्रिक आहे. प्रत्येक संघटनेला वेळोवेळी निर्णय घेणे, विविध संसाधनांची जुळवा-जुळव करणे उदा. मनुष्यबळ, पैसा, सामग्री आणि पद्धती, कामाचे मूल्यमापन करणे व उपक्रमांमध्ये समन्वय साधणे, नेतृत्व करणे, आवश्यक ती योग्य कृती करणे, या पार्श्वभूमीवर व्यवस्थापनाची व्याखा व अर्थ समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

- **व्यवस्थापनाच्या महत्त्वपूर्ण व्याख्या खालील प्रमाणे :**

१) **मेरी पार्कर फॉलेट –** ‘‘इतरांकडून काम करून घेण्याची कला म्हणजे व्यवस्थापन होय.’’

या पारंपारिक व्याख्येनुसार व्यवस्थापन हे लोकांकडून कामे पूर्ण करून घेण्यावर लक्ष केंद्रित करते. परंतु यामध्ये उत्पादन संसाधने, यंत्रसामुग्री इ. चा सखोलपणे विचार केलेला दिसून येत नाही.

२) **हेन्री फेयॉल :** ‘‘व्यवस्थापन म्हणजे अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय साधने आणि नियंत्रण ठेवणे होय.’’

या व्याख्येमध्ये फेयॉल यांनी; उद्दिष्ट व्यवस्थित साध्य करताना व्यवस्थापनाच्या विविध कार्यांवर भर

दिला आहे. दिलेले काम करताना कर्मचाऱ्यांनी काम कसे करावे याबाबात मार्गदर्शन करणे आणि सर्व क्रियांचा समन्वय साधणे हे महत्त्वाचे आहे.

**३) फेड्रीक विन्स्लॉ टेलर :** ''व्यवस्थापन म्हणजे नेमके काय केले पाहिजे हे अचूकपणे समजून घेणे आणि ते सर्वोत्तम पद्धतीने केले जात आहे की नाही ते पाहणे होय.'' या व्याख्येच्या अनुषंगाने व्यवस्थापन हे एक शास्त्र मानले गेले आहे. लेखकाच्या मतानुसार व्यवस्थापकाला संघटनेच्या उद्‌दिष्टांचे व्यवस्थित ज्ञान असणे आणि उपलब्ध साधनसामुग्रीचा सर्वोत्तम वापर करण्याचे ज्ञान असणे गरजेचे असते.

**४) जॉर्ज टेरी :**

''व्यवस्थापन ही एक प्रक्रिया असून त्यामध्ये नियोजन, संघटन, निर्देशन, नियंत्रण, उद्‌दिष्ट प्रस्थापित करणे आणि पूर्तता करण्यासाठी मनुष्यबळ आणि साधने यांचा समावेश होतो.''

या व्याख्येमध्ये व्यवस्थापनाच्या वेगवेगळया कार्यांचा एकसंघपणा विचारात घेतला आहे. उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून आपण ठरविलेले उद्‌दिष्ट साध्य करू शकतो. व्यवस्थापकाची भूमिका ही नियोजन करणे, संसाधनांचे संघटन करणे, त्यांचा वापर करणे आणि कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे ही आहे.



- **कृती –**

❑ मान्यताप्राप्त संकेतस्थळे तसेच संदर्भ पुस्तकांच्या मदतीने विविध व्यवस्थापन विचारवंतानी सांगितलेल्या व्यवस्थापनाच्या व्याख्या संकलित करा. उदा. पिटर ड्रकर.

❑ संकलित केलेल्या माहितीची तुमच्या संदर्भासाठी एक पुस्तिका (scrapbook) तयार करून जी तुम्ही स्वत:च्या अभ्यासासाठी संदर्भ म्हणून वापरू शकता. गरजेनुसार आपल्या शिक्षकाचे मार्गदर्शन घ्यावे.

**८.२ व्यवस्थापनेची वैशिष्ट्ये :** व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत :

**१) व्यवस्थापन हे उद्‌दिष्टप्रधान असते :**

व्यवस्थापन ही एक उद्‌देशपूर्ण कृती आहे; ज्याद्‌वारे विशिष्ठ उद्‌दिष्ट साध्य केले जाते. जेव्हा एखादे संघटन उद्‌दिष्ट साध्य करते त्यावेळी त्याला संघटनेचे यश म्हटले जाते. संघटनेचे हे यश त्यांनी केलेल्या संसाधनांच्या योग्य व्यवस्थापनावर अवलंबून असते. उदा.खेळ हा जिंकण्यासाठी खेळला जातो. व्यवसाय हा नफा मिळविण्यासाठी चालविला जातो. सरकार हे देशाचे प्रशासन व्यवस्थित चालावे यासाठी काम करीत असते इ. ही उद्‌दिष्टे उपक्रम सुरू करण्याअगोदर निश्चित केली जातात आणि व्यवस्थापन ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करीत असते. म्हणून व्यवस्थापन ही उद्‌दिष्ट प्रधान क्रिया आहे.

**२) व्यवस्थापन ही सामूहिक कृती आहे :**

व्यवस्थापन हे सर्व संसाधनांचा परिणामकारक आणि कार्यक्षमपणे समन्वय साधण्यासाठी केले जाते. संघटनेमधील उपक्रम हे व्यवस्थापकाच्या मार्गदर्शनाखाली संघ किंवा समूह पूर्ण करीत असतो, जे आपण व्यवस्थापनाच्या, 'व्यवस्थापन म्हणजे इतरांकडून काम करून घेणे होय' या व्याख्येमध्ये पाहिले आहे. तसेच सर्व निर्णय संघटनेमधील समूहाकडून म्हणजेच भागधारक किंवा संचालक मंडळाकडून सर्वांकरिता म्हणजेच कर्मचाऱ्यांकरिता घेतले जातात.

### ३) व्यवस्थापन अदृश्य स्वरूपात असते :

व्यवस्थापन हे संघटनेचे स्वतंत्र कार्य नाही. ते व्यवस्थापकाचे किंवा संघनेतृत्वाचे सांघिक प्रयत्न असतात. व्यवस्थापन हे सातत्याने नियोजन, संघटन, निर्णयप्रक्रिया, मार्गदर्शन आणि नियंत्रण यामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी काम करीत असते. हे प्रयत्न मूर्त स्वरूपांत दिसू शकत नाहीत तथापि सर्वोत्तम व्यवस्थापनाचे परिणाम हे संघटनेच्या वाढलेल्या नफ्यावरून, त्यांच्या सुरळीतपणावरून, संघटनेने साध्य केलेले उद्दिष्ट इ. मधून अनुभवास येते.

### ४) व्यवस्थापन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे :

सातत्य हा व्यवस्थापनाचा अविभाज्य घटक आहे. संघटनेच्या संपूर्ण कालखंडामध्ये व्यवस्थापन अत्यंत आवश्यक असते. व्यवस्थापन हे कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी आणि सुरळीतपणे चालविण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असते. ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जगण्यासाठी श्वास घेणे जसे आवश्यक आहे तसे संघटनेच्या अस्तित्वासाठी व्यवस्थापन आवश्यक असते.

### ५) व्यवस्थापन हे परिस्थितीनुरूप असते :

व्यवस्थापनामध्ये विशिष्ट परिस्थिती हाताळताना 'योग्य वेळ व अचूक निर्णय' या तंत्राचा समावेश होतो. म्हणूनच निश्चितपणे असे निर्णय काही तत्त्वे, तंत्रे व सिद्धांताच्या आधारावर असले पाहिजेत. निर्णय घेत असताना परिस्थितीनुरूप प्राधान्य आणि परिस्थिती यांचा विचार केलेला असला पाहिजे. एका परिस्थितीत वापरले गेलेले तंत्र दुसऱ्या परिस्थितीत वापरले जाईल असे नाही.

### ६) व्यवस्थापन हे सार्वत्रिक आहे :

व्यवस्थापनाचे वैशिष्ट म्हणजेच सार्वत्रिकता. व्यवस्थापनाची तत्त्वे व सिद्धांत ही सर्व ठिकाणी सर्व क्षेत्रात सारखीच उपयोगात येतात. उदा. संरक्षण, शासकीय प्रशासन, व्यवसाय, पेशा, शिक्षण, रुग्णालय, राजकारण, सामाजिक उपक्रम आणि कुटुंब चालवितानादेखील व्यवसायात ही तत्त्वे लवचीक स्वरूपाची असून व्यवसाय संघटनेच्या सर्व प्रकारांना सामावून घेण्यास मार्गदर्शक ठरतात. ज्यामध्ये मानवी संसाधनांच्या प्रयत्नांचा समन्वय साधला जातो.

### ७) व्यवस्थापन हे गतिशील आहे :

व्यवस्थापन हे गतिशील असते पण स्थिर नसते. व्यवस्थापनात मानवी प्रयत्न, वेगवेगळ्या परिस्थिती व वेगवेगळे उपक्रम किंवा क्रिया हाताळल्या जातात. तांत्रिक बदल, सामाजिक-आर्थिक बदल, पर्यावरणीय बदल आणि व्यवसाय पध्दतींत होणारे बदल यांना स्वीकारुन उद्दिष्टे साध्य केली जातात.

टंकलेखन(टाईपराईटर)च्या जागी संगणकाचा वापर, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आर्थिक व्यवहार, इलेक्ट्रॉनिक नास्तिकरण इ.उदाहरणांमधून व्यवस्थापन हे गतिशील आहे हे दिसून येते.


## ८.३ व्यवस्थापनाचे स्तर :

संघटन म्हणजे सामूहिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्रित आलेल्या लोकांचा समूह/गट होय. या प्रक्रियेमध्ये विविध प्रकारचे कर्मचारी हे त्यांच्या पदाप्रमाणे, गुणांप्रमाणे आणि कौशल्यानुसार एका विशिष्ट व्यक्तीच्या किंवा विशिष्ट व्यक्तीसमुहाच्या अंतर्गत काम करीत असतात. तथापि प्रत्येक व्यवसाय संघटनेचे आकारमान सारखेच असेल असे नाही. काही संघटना या लघुउद्योग स्वरूपाच्या, काही मध्यम आणि काही मोठ्या आकारमानाच्या असतात. संघटनेचे व्यवस्थापन करण्याची शैली ही प्रत्येक उद्योगाच्या आकारमानानुसार

वेगळी असू शकते. परंतु मानवी संसाधनांचे वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकरण करणे हे प्रत्येक संघटनेसाठी आवश्यक असते.

लहान प्रकारच्या संघटनेमध्ये उदा.पारंपरिक धान्य दुकान किंवा स्टेशनरी दुकानामध्ये वर्गीकरण करणे हे अतिशय सोपे असते. परंतु मोठ्या संघटन प्रकारामध्ये असे वर्गीकरण करणे गुंतागुतीच्या स्वरूपाचे असते. म्हणूनच त्याकरिता संघटनेमध्ये वेगवेगळे विभाग केले जातात. अशा विभागांना व्यवस्थापनाचे स्तर म्हणतात. असे स्तर हे संघटनेच्या आकारानुसार व गरजेनुसार केले जातात. साधारणपणे आपणांस तीन स्तरावरील व्यवस्थापन पहावयास मिळते.

- **व्यवस्थापनाचे स्तर :**




- **उच्च स्तर व्यवस्थापन :**

संघटनेमधील या सर्वोच्च अधिकार असलेल्या स्तरामध्ये संचालक मंडळ, अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक इ. चा समावेश होतो. उच्च स्तर व्यवस्थापन हे व्यवसायाचा दृष्टिकोन, ध्येय आणि दीर्घकालीन उद्दिष्टे तयार करते आणि ते साध्य करण्यासाठीची धोरणे निश्चित करते.

- **उच्च स्तरीय व्यवस्थापनाची कार्ये पुढील प्रमाणे :**

१) संघटनेची दीर्घकालीन उद्दिष्टे ठरविणे.

२) ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन करणे व धोरणे ठरवणे.

३) धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे झाली किंवा नाही ते पहाणे.

४) वेगवेगळे विभाग व पदे निर्माण करणे.

५) मध्यम स्तरावरील व्यवस्थापनासाठी विभाग प्रमुखांची नियुक्ती करणे व त्यांना वेगवेगळी कामे करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

६) वेगवेगळे विभाग व मानवी संसाधने यांच्या कामांचे मूल्यमापन करणे.

- **मध्यम स्तर व्यवस्थापन :**

मध्यम स्तर व्यवस्थापन हे उच्च स्तर व कनिष्ठ स्तर व्यवस्थापन या दोहोंमधील दुवा असून उच्च स्तरावरील व्यवस्थापनाच्या अधिकारात काम करते. उच्च स्तरावरील व्यवस्थापनाने जे नियोजन व ध्येय

धोरणे ठरवून दिलेली असतात, त्यांच्या अंमलबजावणीचे काम मध्यम स्तर व्यवस्थापन करत असतो. त्यामध्ये वेगवेगळ्या विभागांच्या प्रमुखांचा समावेश होतो. उदा. वित्त व्यवस्थापक, उत्पादन व्यवस्थापक, विक्री व्यवस्थापक, मानवी संसाधन व्यवस्थापक व विपणनव्यवस्थापक इ. मध्यम स्तरीय व्यवस्थापक हे उच्च स्तरीय व्यवस्थापनाने ठरवून दिलेली कार्ये कनिष्ठ व्यवस्थापनाच्या मदतीने पूर्ण करून घेत असतात.

- **मध्यम स्तरीय व्यवस्थापनाची कार्ये खालील प्रमाणे :**

१) उच्चस्तर व कनिष्ठ स्तर व्यवस्थापन यांच्यात सांगड घालणे.

२) उच्चस्तरीय व्यवस्थापनाने ठरवून दिलेली ध्येय धोरणे समजावून घेणे.

३) संघटनेची सर्वसमावेशक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विभागाच्या स्वरूपानुसार नियोजन आराखडा तयार करणे.

४) विभागातील कर्मचाऱ्यांना त्यांची जबाबदारी व कर्तव्ये ठरवून देणे.

५) विभागातील भविष्यकालीन काम पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.

६) कनिष्ठस्तर व्यवस्थापनातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.

७) उच्च स्तरीय व्यवस्थापनाला वेळोवेळी अहवाल सादर करणे व विभागीय कामांमध्ये समन्वय साधणे.

- **कनिष्ठ स्तर व्यवस्थापन :**

कनिष्ठ स्तरावरील व्यवस्थापन हे मध्यम स्तरावरील व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली काम करते. त्याला व्यवस्थापनाचा कार्यात्मक किंवा पर्यवेक्षणीय स्तर असेही म्हटले जाते. त्यामध्ये अधिक्षक, पर्यवेक्षक, मुकादम आणि कनिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्यांचा समावेश होतो.

- **कनिष्ठ स्तरीय व्यवस्थापनाची कार्ये खालील प्रमाणे :**

१) मध्यम स्तरीय व्यवस्थापनाकडून मिळालेल्या सूचना आणि विभागीय प्रमुखाकडून मिळालेल्या सूचना यांच्यानुसार कामे करणे.

२) हाताखालील कर्मचाऱ्यांना कामे ठरवून देणे.

३) हाताखालच्या कर्मचाऱ्यांना सूचना देणे.

४) आवश्यक त्या ठिकाणी सहायक कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

५) सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविणे आणि त्यांचे तंटे मिटविणे.

६) यंत्रे, उपकरणे व साधनसामुग्रीची दुरुस्ती व देखभाल करणे.

७) वेळोवेळी उत्पादनाची व सेवेची गुणवत्ता तपासणी करणे.

**कृती –**

**व्यवस्थापनाचे स्तर** **विषय – बिग बझार**



विद्यार्थ्यांचे तीन गट तयार करुन त्यांना व्यवस्थापनाच्या विविध स्तरांची भूमिका वठविण्यास सांगा. त्यामधील पहिला गट उच्च स्तर व्यवस्थापकांचा, दुसरा गट मध्यम स्तर व्यवस्थापकाचा आणि तिसरा गट कनिष्ठ स्तरामध्ये काम करणाऱ्यांचा असेल. त्यांना त्यांचे दृष्टिकोन आणि कल्पना व्यक्त करू द्या.

## ८.४ व्यवस्थापन कला, शास्त्र व पेशा :

व्यवस्थापन हे सार्वत्रिक आहे. ते सर्वत्र आढळून येते. प्रत्येक प्रकारच्या संघटनेचा तो अंगभूत घटक आहे. या पार्श्वभूमीवर असे म्हटले जाते की परिणामकारक व्यवस्थापनाशिवाय उद्दिष्ट साध्य करणे अतिशय कठीण आहे. व्यवस्थापनाचे अचूक स्वरूप सांगणे कठीण आहे. वापरातील बदलानुसार त्यामध्येही बदल होत असतो. व्यवस्थापन वेगवेगळ्या आयामांमध्ये वेगवेगळे भासते. म्हणूनच या वेगवेगळ्या आयामांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे. ते आयाम पुढील प्रमाणेः कला, शास्त्र व पेशा.

### ● व्यवस्थापन एक कला :

कला म्हणजे काय? कौशल्याचा वापर करून अपेक्षित परिणाम साधणे म्हणजे कला होय. कला म्हणजे व्यक्तीकडे असलेली नवनिर्मिती क्षमता व सर्जनशीलता-नावीन्यपूर्णतासुद्धा होय. कला ही जन्मजात किंवा नैसर्गिक असते. तथापी योग्य शिक्षण, सराव, यांच्या माध्यमातून कला विकसित करता येते. गायन, नृत्य, अभिनय, खेळ, चित्रकला, स्केटींग, सायकलींग, घोडेस्वारी, नाट्यदिग्दर्शन, सिनेदिग्दर्शन, संगीतकार, जादूगार इ. कलेच्या कक्षात येतात. थोडक्यात कला म्हणजे जन्मजात गुण किंवा कला कौशल्यांचे सादरीकरण. ज्यामध्ये विशिष्ट शैक्षणिक पात्रता धारण करण्याची गरज नसते. कलेचा परिणाम हा व्यक्तीपरत्वे भिन्न असू शकतो जरी संबंधित व्यक्ती एकच कला सादर करीत असेल तरी. म्हणूनच प्रत्येक महिला गायिका ही आशा भोसले सारखे गाणे सादर करु शकेल असे नाही किंवा प्रत्येक क्रिकेट खेळाडू सचिन तेंडुलकर सारखा खेळू शकेल असे नाही.

कला आणि व्यवस्थापन यामधील संबंध खालील मुद्द्यांच्या आधारे अभ्यासता येईल.

**१) व्यक्तिगत कौशल्ये :** प्रत्येक व्यवस्थापकाला वेगवेगळ्या परिस्थितींना हाताळावे लागते. साधनसामुग्री संबधित समस्या सोडवाव्या लागतात. मनुष्यबळाला हाताळावे लागते. हे करताना त्याला स्वत:ची कार्यशैली वापरावी लागते. ही कार्यशैली प्रत्येक व्यवस्थापकाची भिन्न-भिन्न असते आणि परिणामही. प्रत्येकाची कौशल्ये, कार्यक्षमता यामध्ये फरक असल्याने दिसणारे परिणाम सुद्धा वेगवेगळे असतात.

**२) सर्जनशीलता :** नावीन्यपूर्ण परिणाम प्राप्त करण्यासाठी आवश्यक सर्जनशीलता ही प्रत्येकाच्या कल्पकतेवर अवलंबून असते. व्यवस्थापक नवनवीन कार्यपध्दतींचा अवलंब करुन कामे करणे व उद्दिष्ट साध्य करणे यासाठी प्रयत्न करीत असतो. या करीता व्यवस्थापनातील सद्य परिस्थिती व व्यवसाय पर्यावरण यांचा विचार करुन व्यवस्थापक नवनवीन कल्पना विकसित करीत असतो.

**३) नियमित सराव :** कौशल्याचा कलेमध्ये विकास करण्यासाठी सरावामध्ये नियमितपणा असणे आवश्यक असते. व्यवस्थापक निरनिराळया तंत्रांचा आणि कौशल्यांचा वापर करुन आपली कार्ये परिपूर्णतेने करण्याचा प्रयत्न करीत असतो. निश्चितपणे हा सराव त्याला वेगवेगळया परिस्थितींना, व्यक्तींना व संघटनांना यशस्वीपणे तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त करून देतो.

**४) वैयक्तिक क्षमता :** कौशल्याप्रमाणेच कार्यक्षमता सुद्धा व्यक्तीपरत्वे भिन्न असते.व्यवस्थापक त्याच्याकडील क्षमतांचा वापर करीत असतो. या क्षमतेमुळे व्यवस्थापक कामामध्ये सुसूत्रता आणू शकतो, इतरांना योग्य मार्गदर्शन करू शकतो आणि अपेक्षित ध्येयपूर्ती प्राप्त करू शकतो. अशा प्रकारे व्यवस्थापकाकडे एखाद्या कलाकाराप्रमाणे कौशल्यपूर्णता व निर्मितीक्षमता असणे आवश्यक असते हे स्पष्ट होते.

- **व्यवस्थापन एक शास्त्र :**

''शास्त्र म्हणजे ज्ञानाची पद्धतशीरपणे केलेली मांडणी. हे ज्ञान पद्धतशीर निरिक्षण करून, प्रयोग करून आणि योग्य पडताळण्याजोगे सिद्धांत, तत्वे यावर आधारलेले असते.'' कोणतेही ज्ञान जे शास्त्रीय दृष्ट्या विकसित केलेले व ज्यामध्ये सार्वत्रिक स्वीकृत तत्त्वांचा समावेश होतो. त्याला शास्त्र असे म्हटले जाते. उदा. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र इ. व्यवस्थापकांस लोकांना गुणवत्ता व उत्पादनात सुधारणा करण्यासाठी प्रेरित करताना विविध तंत्रांचा व सिद्धांतांचा उपयोग करावा लागतो. त्यामध्ये नियोजन, अभिप्रेरणा, मार्गदर्शन, नियंत्रण इ. घटकांचा समावेश होतो. शास्त्राचे सार्वत्रिक परिणाम एकाच दिशेने पहावयास मिळतात.

शास्त्र आणि व्यवस्थापन यामधील संबंध खालील मुद्द्यांवरुन अभ्यासता येईल.

१) **ज्ञानाची पद्धतशीर मांडणी :** शास्त्र हे पद्धतशीर प्रयोग, विशिष्ट नियम व तत्वांवर आधारित असते. व्यवस्थापकीय तत्त्वे व कार्ये ही सुद्धा वेगवेगळ्या प्रयोगांवर आधारित असतात की ज्याचा अभ्यास वेगवेगळ्या व्यवस्थापक विचारवंतांनी मांडलेले सिद्धांत आणि दृष्टिकोनांद्वारे करता येतो.

२) **शास्त्रीय पद्धतीच्या निरीक्षणांचा वापर :** शास्त्रामध्ये शास्त्रीय पद्धतीने, निरीक्षणांच्या आधारावर निष्कर्ष मांडले जातात. व्यवस्थापनांमध्ये सुद्धा शास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून माहिती गोळा केली जाते, तपासली जाते, तिचे विश्लेषण केले जाते व निष्कर्ष काढले जातात. या निष्कर्षांच्या आधारे संघटनेमध्ये निर्णय घेतले जातात.

३) **कार्यकारण संबंध :** शास्त्र कारण आणि परिणामांच्या संबंधांवर आधारित असते. विशिष्ट सूत्र किंवा संयुग वापरल्यानंतर विज्ञानामध्ये ठरावीक परिणाम मिळतात. व्यवस्थापन सिद्धांतदेखील अशा संबंधांवर आधारित आहेत. उदा. कर्मचाऱ्यांना योग्य वेतन आणि आरोग्यदायी सुविधा पुरविल्यास ते कामामध्ये अधिक मेहनत घेतात व उत्तम परिणाम गाठण्यासाठी प्रोत्साहित होतात. याउलट जुनी यंत्रसामग्री पुरविल्यास त्याचा उत्पादनाच्या वेगावर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

४) **तत्त्वांची सार्वत्रिकता :** विज्ञानाची तत्त्वे कोणत्याही ठिकाणी समान परिस्थितीमध्ये वापरता येऊ शकतात. ज्याचा परिणाम सर्वत्र सारखाच दिसून येतो. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाची तत्त्वे सुद्धा सार्वत्रिक आहेत. जी कोणत्याही नियम व परिस्थितीत वापरता येऊ शकतात. या मुद्दयांवरून हे स्पष्ट होते की, व्यवस्थापनामध्ये शास्त्राची वैशिष्ट्ये आढळून येतात. म्हणून व्यवस्थापन एक शास्त्र आहे.

तथापि व्यवस्थापन हे गणित किंवा रसायन शास्त्रासारखे मूलभूत शास्त्र नाही, ज्यांचे परिणाम अचूक आणि संख्यात्मक असतात. व्यवस्थापन मानवी घटकांचे निरीक्षण विचारात घेते म्हणून ते सामाजिक शास्त्र आहे की, ज्यामध्ये गुणात्मक निरीक्षणे एकाच दिशेने येतात.

- **व्यवस्थापन एक पेशा :**

''पेशा म्हणजे विशिष्ट ज्ञान व प्रशिक्षणावर आधारित असा व्यवसाय की, ज्याचे नियमन प्रतिनिधिक मंडळाद्वारे केले जाते.''

उदा. शिक्षक, डॉक्टर, वकील, हिशेब तपासनीस हे सर्व पेशा या संकल्पनेत येतात. आधुनिक दृष्टीकोनानुसार व्यवस्थापनाला उभरता पेशा म्हणून दर्जा दिला जाऊ लागला आहे. जागतिकीकरणाच्या या टप्प्यामध्ये बऱ्याच नामवंत शैक्षणिक संस्थांनी व्यवस्थापनाचे पदव्युतर अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. उदा. भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा MBA अभ्यासक्रम (PUMBA) इ. संबंधीत अभ्यासक्रमांमध्ये संघटेनेच्या व्यवस्थापकीय गरजेचा विचार केलेला पहावयास मिळतो.

व्यवसाय संघटनांच्या व्यवस्थापकीय गरजा लक्षात घेऊन या अभ्यासक्रमांची बांधणी करण्यात आलेली आहे. अलीकडील काळात व्यवस्थापन हे करिअर म्हणून निवडले जात आहे. या अभ्यासक्रमामधून व्यवस्थापन पेशासंबंधी आवश्यक ते ज्ञान व प्रशिक्षण संपादन केले जाते.

पेशा आणि व्यवस्थापन यातील संबंध खालील मुद्द्यांच्या आधारे अभ्यासता येईल.

**१) औपचारिक शिक्षण :** पेशासाठी औपचारिक शिक्षणाची गरज असते. सद्यकालीन बरेचसे व्यवस्थापक म्हणून काम करणारे कर्मचारी व्यवस्थापन पदविका किंवा पदवी धारण केलेले असतात. ते व्यवस्थापन संस्थांमधून औपचारिक शिक्षण घेतात ज्यांचा त्यांना व्यावसायिक पद्धतीने काम करताना उपयोग होतो.

**२) आचारसंहिता :** आचारसंहिता म्हणजेच एखाद्या क्षेत्रात काम करीत असताना पाळावी लागणारी नियमावली. प्रत्येक पेशासाठी अशी आचारसंहिता असते, जी संबधित पेशा संबधीची नितीमूल्ये नियंत्रित करते. उदा. वकीलांना बार कौन्सिलने तयार केलेली आचारसंहिता पाळावी लागते, वास्तुविशारदांना कौन्सिलने तयार केलेली आचारसंहिता पाळावी लागते, हिशोबतपासनीस यांना आय.सी.ए.आय (ICAI) अनुसार काम करावे लागते. इ. तथापि व्यवस्थापकांसाठी मात्र अशी कोणतीही आचारसंहिता कोणत्याही संघटनेने तयार केलेली नाही. व्यवस्थापक प्रथा व परंपरेनुसार प्रचलित असलेल्या आचारसंहितेनुसार काम करत असतात.

**३) प्रावीण्य :** व्यावसायिक आपापल्या क्षेत्रात प्रवीण असतात. त्यांनी व्यावसायिक ज्ञान औपचारिक शिक्षणातून मिळवलेले असते. सरावानंतर त्यांना पेशामधील आवश्यक कौशल्य प्राप्त होते. व्यवस्थापकही व्यवस्थापनाच्या ज्ञानाचा व कौशल्याचा वापर करून त्यातील तज्ज्ञ बनतो.

**४) नोंदणी :** व्यावसायिकांना आपल्या संघटनेचे सभासद होणे आवश्यक असते. उदा. भारतातील सनदी लेखापालाला आय.सी.ए .आय कडे नोंदणी करावी लागते. त्याशिवाय ते सेवा देऊ शकत नाहीत. भारतीय चार्टर्ड अकौंटंट यांना संघटनेचे सभासदत्व घ्यावे लागते. व्यवस्थापकांची वेगळी संघटना नसल्यामुळे व्यवस्थापकांना नोदंणीची गरज नाही. तथापि व्यवस्थापक चेंबर ऑफ कॉमर्सचे सभासदत्व घेऊ शकतात. अशा सभासदत्वाचे त्यांना अनेक फायदे होऊ शकतात.

**५) प्रतिबंधित प्रवेश :** कोणत्याही पेशामध्ये प्रवेश हा निर्बंधित असतो. त्यासाठी औपचारिक शिक्षणाची गरज असते. उदा. डॉक्टर, वकील, हिशेब तपासनीस इ. तथापि अशी सक्ती व्यवस्थापक म्हणून काम करण्यासाठी केली जात नाही.

वरील मुद्द्यांचा विचार करता, व्यवस्थापन हा पेशा आहे किंवा नाही हे ठरविणे फार अवघड आहे. व्यवस्थापनासाठी औपचारिक शिक्षणाची गरज नसते, त्यासाठी नियमावली करणारी स्वतंत्र संघटना नाही आणि व्यवस्थापकांसाठी वेगळी आचारसंहिताही नाही. कोणीही ज्याला व्यवसाय करावयाचा आहे, तो औपचरिक शिक्षण न घेताही व्यवस्थापक म्हणून काम करू शकतो. म्हणूनच आजमितीस तरी व्यवस्थापनाला डॉक्टर, वकील, शिक्षक, हिशेब तपासनीस इ.सारखा पेशा म्हणून दर्जा किंवा ओळख प्राप्त झालेली नाही.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की व्यवस्थापन हे कला, शास्त्र आणि पेशा यांचे मिश्रण आहे. व्यवस्थापनाला फक्त कला किंवा फक्त शास्त्र किंवा फक्त पेशा म्हणून विचारात घेता येणार नाही.

व्यवस्थापकाला ठरविलेली उद्दिष्टे साध्य करताना स्वत:ची कौशल्ये, नावीन्यपूर्ण कल्पना, कुशल तंत्रे आणि कल्पकता याद्वारे परिस्थितीजन्य समस्या सोडवाव्या लागतात. त्यामुळे व्यवस्थापन ही कला आहे असे म्हणता येईल.

व्यवस्थापकाला संघटनेच्या प्रश्नांवर काम करीत असताना विविध सिद्धांतांवर आधारित विविध तत्त्वे

आणि तंत्रांचा वापर करावा लागतो. माहिती गोळा करून आणि त्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढावे लागतात. म्हणजेच व्यवस्थापन हे शास्त्र आहे असे म्हणता येईल.

सद्य काळात व्यवस्थापन कारकिर्द (करीअर)/ व्यवसाय म्हणून स्वीकारले जाऊ लागले आहे. त्यासंबधीचे शिक्षण आणि प्रशिक्षण घेऊन संघटनेमध्ये संबंधित व्यक्ती व्यवस्थापक म्हणून काम करू शकतात. प्रथा व परंपरेवर आधारित वर्तणूकीचे नियम व्यवसायात असतात. ज्याला आचारसंहिता असे म्हटले जाते. म्हणजेच व्यवस्थापन एक पेशा आहे.

वरील मुद्द्यांवरुन असा निष्कर्ष काढता येईल की व्यवस्थापन हे कला व शास्त्र या दोहोंचे मिश्रण आहे. सध्याच्या काळात व्यवस्थापनाला पेशा म्हणून स्वीकारले जाऊ लागले आहे.



**उपक्रम**

**गट चर्चा विषय :** व्यवस्थापन कला की शास्त्र?

- विद्यार्थ्यांचे दोन गट तयार करा. एका गटाला या विषयासंदर्भात अनुकूल व दुसऱ्या गटाला प्रतिकूल मत मांडू द्या.
- चर्चेच्या शेवटी निष्कर्ष काढण्यासाठी शिक्षकांची मदत घ्या.

| अ.न. | मुद्दा | उच्च स्तर | मध्यम स्तर | कनिष्ठ स्तर |
|---|---|---|---|---|
| १. | अर्थ | हा व्यवसायातील सर्वोच्च अधिकारस्थान असलेला स्तर आहे. उदा. संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष इ. | मध्यम स्तर व्यवस्थापन हे संघटनेतील मध्यम स्तरावर काम करते. उदा. विभाग प्रमुख किंवा कार्य व्यवस्थापक जसे की वित्त व्यवस्थापक,उत्पादन व्यवस्थापक इ. | कनिष्ठ स्तर व्यवस्थापन कनिष्ठ स्तरावर काम करते उदा. पर्यवेक्षक, गटनायक इ. |
| २. | कार्याचे स्वरूप | हा स्तर योजना व धोरणे ठरविण्याच्या कार्याशी सबंधित असतो. | उच्च स्तर व्यवस्थापनाने आखलेल्या धोरणांची कनिष्ठ स्तर व्यवस्थापनाच्या मदतीने अंमलबजावणी करत असतो. | नियोजनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीशी संबधित हा स्तर काम करतो. |
| ३. | कौशल्ये | या स्तरास तांत्रिक कौशल्या-पेक्षा संकल्पनात्मक किंवा निर्णयात्मक कौशल्याची आवश्यकता असते. | या स्तरास संकल्पनात्मक तसेच तांत्रिक कौशल्याची आवश्यकता असते. | या स्तरास तांत्रिक कौशल्याची अधिक आवश्यकता असते. |
| ४. | बढती धोरण | या स्तरास गुणवत्तेच्या आधारे बढती दिली जाते. | या स्तरास गुणवत्ता आणि सेवा ज्येष्ठता इ. च्या आधारानुसार बढती मिळते. | या स्तरास सेवाज्येष्ठतेच्या आधारावर प्रामुख्याने बढती दिली जाते. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | कालावधी | उच्च स्तर व्यवस्थापन दीर्घकालीन योजनांची आखणी करते. उदा. ०५ ते २० वर्षे | मध्यम स्तर व्यवस्थापन मध्यम कालावधीसाठी योजना आखते. उदा.०१ ते ०५ वर्षे | कनिष्ट स्तर व्यवस्थापन कमी कालावधीसाठीच्या योजनांची आखणी करते. उदा.१ वर्ष. |
| ६. | जबाबदारी | उच्च स्तर व्यवस्थापन हे भागधारक, शासन आणि समाज इ. ना जबाबदार असते. | हे उच्च स्तर व्यवस्थापनास कामाच्या पूर्तते संदर्भात जबाबदार असतात. | हे मध्यम आणि उच्च स्तर व्यवस्थापनास जबाबदार असतात. |
| ७. | आदेशाचे प्रवाहन | हा स्तर मध्यम स्तर व्यवस्थापनास आदेश व सूचना देतो. | कनिष्ठ स्तर व्यवस्थापनास आदेश व सूचना दिल्या जातात. तसेच कार्याचा अहवाल उच्च स्तर व्यवस्थापनास सादर केला जातो. | मध्यम स्तर व्यवस्थापनाचे आदेश व सूचनांप्रमाणे कामांची अंमलबजावणी केली जाते. तसेच कार्याचा अहवाल मध्यम स्तर व्यवस्थापनास सादर केला जातो. |

## सारांश

### ❑ अर्थ आणि व्याख्या :

- व्यवस्थापन ही एक अशी प्रक्रिया आहे की जी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये आवश्यक आहे.
- व्यवस्थापन हा शब्द दोन लॅटीन शब्द मॅनस म्हणजे हात व ॲग्रे म्हणजे कृती करणे या पासून आलेला आहे.
- व्यवस्थापन म्हणजे इतरांकडून काम करून घेण्याची कला. व्यवस्थापन म्हणजे उपलब्ध संसाधनांचा नियोजन, संघटन, मार्गदर्शन आणि नियंत्रण याद्वारे समन्वय साधून अपेक्षित उद्दिष्टे साध्य करणे होय.

### ❑ व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये :

१) व्यवस्थापन हे उद्दिष्टप्रधान असते.
२) व्यवस्थापन ही सामूहिक कृती आहे.
३) व्यवस्थापन अदृश्य स्वरूपात असते.
४) व्यवस्थापन ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे.
५) व्यवस्थापन परिस्थितीनुरूप असते.
६) व्यवस्थापन हे सार्वत्रिक आहे.
७) व्यवस्थापन हे गतिशील आहे.

### ❑ व्यवस्थापनाचे स्तर :

**व्यवस्थापनाचे तीन स्तर आहेत**

- **उच्च स्तर –** व्यवस्थापनाच्या या स्तरामध्ये व्यवसाय संघटनेची दीर्घकालीन उद्दिष्टे ठरविली जातात. तसेच

नियोजन व धोरणांचा आराखडा तयार करुन निर्णय घेतले जातात.

- **मध्यम स्तर –** उच्च स्तर व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली **मध्यम स्तर** कार्य करतात. हा स्तर संघटनेच्या नियोजन व धोरणांची अंमलबजावणी कनिष्ठ स्तराच्या मदतीने पूर्ण करण्याशी संबंधित असतो.
- **कनिष्ठ स्तर व्यवस्थापन :** हा पर्यवेक्षणात्मक स्तर असून त्यामध्ये अधिक्षक, पर्यवेक्षक, फोरमन आणि सहाय्यक कर्मचारी समाविष्ट असतात. अधिकाऱ्यांमार्फत या स्तराला सूचना मिळतात तसेच आवश्यकतेनुसार ते हाताखालील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतात.

### ❑ व्यवस्थापन कला, शास्त्र वा पेशा :

व्यवस्थापन ही एक कला आहे कारण त्यामध्ये व्यक्तिगत कौशल्ये, नाविन्यपूर्णता, निर्मितीक्षमता सातत्यपूर्ण सराव आणि वैयक्तिक क्षमतांचा समावेश असतो.

व्यवस्थापन एक शास्त्र आहे. कारण यामध्ये ज्ञानाची पद्धतशीरपणे केलेली मांडणी असते.
व्यवस्थापनाची तत्त्वे सार्वत्रिक असतात.

व्यवस्थापन हा पेशादेखील आहे. व्यवस्थापन व्यावसायिकांकडे व्यवसायातील विविध परिस्थिती हाताळण्यासाठी पुरेसे ज्ञान व क्षमता असतात. व्यवस्थापन विद्यालयांमधून औपचारिक शिक्षण व आचारसंहितेचे ज्ञान असलेले ते प्रशिक्षित व्यावसायिक असतात.

## करिअर संधी

**भविष्यकालीन (करिअर) संधी –**

वाणिज्य पदवीनंतर पुढील अभ्यासक्रम उपलब्ध :

एम.कॉम, एम.बी.ए, डी.बी.एम., पी.जी.डी.एम.इ.

**नोकरीच्या संधी –**

अ) वेगवेगळया क्षेत्रात जागतिक स्तरावर सर्व प्रकारच्या संघटन प्रकारांमध्ये व्यवस्थापकीय नोकरीच्या संधी :

१) वित्त २) मनुष्यबळ विकास ३) विपणन ४) माहिती तंत्रज्ञान ५) उत्पादन

६) रसदशास्त्र(लॉजिस्टिक्स) ७) आंतरराष्ट्रीय व्यापार ८) बँकींग क्षेत्र इ.

ब) स्वयं रोजगार



## स्वाध्याय

**प्र.१ला अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) व्यवस्थापन --------------- असते.

अ) गतिमान ब) स्थिर क) निवड करणारे

२) व्यवस्थापन निरीक्षणाच्या --------------- पद्धतीचा अवलंब करते.

अ) अशास्त्रीय ब) कृत्रिम क) शास्त्रीय

३) उच्च स्तर व्यवस्थापनाला विविध कार्यांचा समन्वय करण्यासाठी मदत करणारे व्यवस्थापन म्हणजे -------- स्तर व्यवस्थापन.

अ) मध्यम ब) कनिष्ठ क) उच्च

४) यंत्रसामुग्रीची देखभाल करणे हे --------स्तरीय व्यवस्थापनाचे कार्य आहे.

अ) उच्च ब)मध्यम क) कनिष्ठ

५) व्यवस्थापन ही -------- प्रधान कृती आहे.

अ) धोरण ब) नफा क) उद्‌दिष्ट

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| अ) व्यवस्थापन | १) सर्जनशीलतेची गरज |
| ब) व्यवस्थापन एक पेशा | २) दिसू शकते |
| क) उच्च स्तर व्यवस्थापन | ३) प्रशासन |
| ड) व्यवस्थापन एक कला | ४) अदृश्य |
| इ) कनिष्ठ स्तर व्यवस्थापन | ५) औपचारिक शिक्षण |
| | ६) धोरणे आखणे |
| | ७) धोरणांची अंमलबजावणी |
| | ८) निवडक |
| | ९) हाताखालच्या कर्मचाऱ्यांना काम पूर्ण करण्यासाठी दिशा देणे |
| | १०) कार्यकारण संबध |

**क) योग्य शब्द, शब्दसमूह, संज्ञा लिहा.**

१) इतरांकडून काम करून घेण्याची कला.

२) व्यवस्थापनातील दुसरा स्तर.

३) ज्ञानाची पद्‌धतशीर मांडणी.

४) व्यवस्थापनातील कार्यकारी संचालकांचा स्तर.

५) उच्च स्तर व कनिष्ठ स्तर यांना जोडणारा दुवा.

**ड) चूक की बरोबर ते लिहा.**

१) व्यवस्थापन ही प्राचीन काळापासून चालत आलेली क्रिया आहे.

२) व्यवस्थापन हे उद्‌दिष्टप्रधान नसते.

३) लहान प्रकारच्या संघटनेमध्ये व्यवस्थापनाची गरज भासते.

४) मध्यम स्तर व्यवस्थापन धोरणे आखण्याचे काम करते.

५) व्यवस्थापनाला विविध तत्त्वांचा व तंत्राचा वापर करावा लागतो.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) व्यवस्थापन एक कला, शास्त्र, वाणिज्य व पेशा.

२) गायक, अभिनेता, नृत्य करणारा, डॉक्टर

३) डॉक्टर, सनदी लेखापाल, वकील, गायक

४) कनिष्ठ स्तर, मध्यम स्तर, उच्च स्तर, उंच स्तर

५) संचालक, अध्यक्ष, खरेदी व्यवस्थापक, विशेष कार्यकारी अधिकारी

६) विभाग प्रमुख, वित्त व्यवस्थापक, उत्पादन व्यवस्थापक, पर्यवेक्षक

७) पर्यवेक्षक, गटनायक, वित्त व्यवस्थापक, कार्यकारी अधिक्षक

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) इंग्रजी शब्द मॅनेज हा ........... या इटालियन शब्दापासून आला आहे.

२) व्यवस्थापन म्हणजे अंदाज बांधणे, नियोजन करणे, संघटन करणे, आदेश देणे, समन्वय साधणे आणि .............. होय.

३) संघटन हा अशा व्यक्तींचा समूह आहे जे ..............प्राप्त करण्यासाठी एकत्र कार्य करतात.

४) उच्च स्तर व्यवस्थापन आणि कनिष्ठ स्तर व्यवस्थापन यामधील .......... हा दुवा आहे.

५) कनिष्ठ स्तर व्यवस्थापन .............. च्या मार्गदर्शनाखाली कार्य करते.

६) कला म्हणजे ...........चा वापर करून अपेक्षित परिणाम साध्य करणे होय.

७) ......... म्हणजे असे ज्ञान जे शास्त्रशुद्धपणे विकसित केले जाते आणि ज्यामधील तत्त्वे सार्वत्रिकरित्या स्वीकारली जातात.

८) शास्त्र हे पद्धतशीर प्रयोग, ठरावीक नियम आणि ........... आधारलेले असते.

९) शिक्षक, डॉक्टर, सनदी लेखापाल, वकील या संज्ञा ......... च्या अंतर्गत येतात.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) उच्च स्तर | |
| २) | कनिष्ठ स्तर |
| ३) मध्यम स्तर | |
| ४) | डॉक्टर |
| ५) गायक | |

(पर्याय – पेशा, कला, पर्यवेक्षक, वित्त व्यवस्थापक, विशेष कार्यकारी अधिकारी)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) व्यवस्थापन म्हणजे काय?

२) व्यवस्थापनाचे स्तर सांगा

३) उच्च स्तरीय व्यवस्थापन म्हणजे काय?

४) मध्यम स्तरीय व्यवस्थापन म्हणजे काय?

५) कनिष्ठ स्तरीय व्यवस्थापन म्हणजे काय?

६) कला म्हणजे काय?

७) शास्त्र म्हणजे काय?

८) पेशा म्हणजे काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखीत शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा**

१) व्यवस्थापन **फक्त कला** आहे.

२) व्यवस्थापनाचे **पाच स्तर** आहेत.

३) कनिष्ठ स्तर व्यवस्थापन **उच्च स्तर व्यवस्थापनाच्या** हाताखाली काम करते.

४) मध्यम स्तर व्यवस्थापन **कनिष्ठ स्तर व्यवस्थापनाच्या** हाताखाली काम करते.

५) व्यवस्थापन हे **शुद्ध शास्त्र** आहे.

६) कोणत्याही पेशामधील प्रवेश हा **निर्बंधित नसतो.**

७) पेशा स्वीकारणाऱ्यांसाठी **अनौपचारिक** शिक्षण आवश्यक असते.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) मध्यम स्तर व्यवस्थापन, उच्च स्तर व्यवस्थापन, कनिष्ठ स्तर व्यवस्थापन.

२) विभाग प्रमुख, विशेष कार्यकारी अधिकारी, पर्यवेक्षक, व्यवस्थापकीय संचालक

३) कार्यालयीन कारकून, भागधारक, व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ.

**प्र.२रा संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) उच्च स्तरीय व्यवस्थापन

२) मध्यम स्तरीय व्यवस्थापन

३) कनिष्ठ स्तरीय व्यवस्थापन

**प्र.३रा खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) प्रणव हे त्यांच्या कंपनीत काम करीत असताना आपल्या हाताखालील विविध व्यक्तींना कोणते व काय काम करावे याचे आदेश देत असतात. त्यांच्या कंपनीमध्ये प्रतापसारख्या अनेक व्यक्ती, प्रवीण यांनी सांगितलेली विविध प्रकारची कार्ये शांतपणे करीत असतात. सदर कंपनीमध्ये प्रवीण प्रतापसारख्या कर्मचाऱ्यांकडून कामे पूर्ण करुन घेऊन प्रणव यांना कार्यपूर्तीचा अहवाल सादर करतात.

   १) कंपनीमधील व्यवस्थापनाचे किती स्तर आहेत.

   २) प्रणवचा कंपनीच्या व्यवस्थापनातील स्तर ओळखा.

   ३) कंपनीतील प्रतापचा व्यवस्थापन स्तर ओळखा.

**प्र.४था खालील फरक स्पष्ट करा.**

१) उच्च स्तर व्यवस्थापन व मध्यम स्तर व्यवस्थापन

२) मध्यम स्तर व्यवस्थापन व कनिष्ठ स्तर व्यवस्थापन

३) उच्च स्तर व्यवस्थापन व कनिष्ठ स्तर व्यवस्थापन

**प्र.५वा खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) व्यवस्थापनाची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा

२) उच्च स्तर व्यवस्थापनाची कोणतीही चार कार्ये स्पष्ट करा.

३) मध्यम स्तर व्यवस्थापनाची कोणतीही चार कार्ये स्पष्ट करा.

४) कनिष्ट स्तर व्यवस्थापनाची कोणतीही चार कार्ये स्पष्ट करा.

५) व्यवस्थापन एक कला म्हणून कोणतेही दोन मुद्दे स्पष्ट करा.

६) व्यवस्थापन एक शास्त्र म्हणून कोणतेही दोन मुद्दे स्पष्ट करा

७) व्यवस्थापन एक पेशा म्हणून कोणतेही दोन मुद्दे स्पष्ट करा.

**प्र.६वा खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) व्यावसायिक अथवा अव्यावसायिक कार्यासाठी व्यवस्थापनाची गरज असते.

२) व्यवस्थापनाचे स्तर संघटनेच्या आकारावर अवलंबून असतात.

३) व्यवस्थापन ही सामूहिक कृती आहे.

४) व्यवस्थापन एक कला आहे.

५) व्यवस्थापकांना नोंदणीची आवश्यकता नसते.

६) व्यवस्थापन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

७) नियोजन करणे हे उच्च स्तर व्यवस्थापनाचे कार्य आहे.

**प्र.७वा खालील प्रश्न सोडवा.**

१) व्यवस्थापनाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) व्यवस्थापन एक शास्त्र कसे आहे ते स्पष्ट करा.

३) व्यवस्थापन व कला यातील संबंध स्पष्ट करा.

४) व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट करा.

५) व्यवस्थापन व पेशा यातील सारखेपणा स्पष्ट करा.

६) कनिष्ठस्तरीय व्यवस्थापनाची कार्ये स्पष्ट करा.

**प्र.८वा खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) व्यवस्थापन म्हणजे काय? व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) व्यवस्थापन कला, शास्त्र वा पेशा याची चर्चा करा.

**संदर्भ :**


1. https://en.m.wikipedia.org
2. Dr. T. N. Chhabra, 'Principles & Practice of Management', DHANPAT RAI & CO (P) LTD., (INDIA), 2005
3) Dr. T. N. Chhabra, 'Principles & Practice of Management' DHANPAT RAI & CO (P) LTD., (INDIA), 2005
4) https://en.m.wikibooks.org
5) https://en.m.wikibooks.org
6) wikipedia

# उत्तर सूची

## १. वाणिज्य व व्यवसायाची ओळख :

**प्र.१ अ)** १) पेशा स्वीकारणारा २) उत्पादक उद्योग ३) व्यापार
४) पेशा स्वीकारणाऱ्या व्यक्ती ५) दुय्यम ६) वाहतूक
७) व्यवसाय ८) नफा ९) समाज
१०) समय

**ब)** अ-४, ब-३, क-५, ड-१,

**क)** १) व्यवसाय २) आर्थिक कृती ३) व्यापार
४) व्यापाराची अनुषांगिक साधने. ५) बांधकाम उद्योग ६) उद्योग
७) वाणिज्य ८) वाहतूक ९) गोदाम
१०) पेशा

**ड)** **चूक** – ४, ८, १० **बरोबर** – १, २, ३, ५, ६, ७, ९

**इ)** १) उत्पादन उद्योग २) घाऊक व्यापार ३) उत्पादन ४) यंत्रसामुग्री

**फ)** १) पैसा २) वाणिज्य ३) आर्थिक ४) व्यवसायाचा
५) फी ६) मालक ७) नफा ८) रूप उपयोगिता
९) घाऊक व्यापार १०) किरकोळ व्यापारी

**ग)** १) विदेशी २) आयात व्यापार ३) निर्यात व्यापार
४) घाऊक व्यापारी

**ई)** १) आर्थिक २) वस्तूचा ३) हस्तांतर करता येत नाही
४) व्यवसायासाठी ५) वाहतुकीमुळे
६) उद्योग ७) नफा मिळवणे

## २. व्यापार :

**प्र.१ अ)** १) ब) घाऊक व्यापारी २) अ) जास्त ३) ब) मोठ्या ४) ब) शेवटचा
५) अ) उत्पादक ६) क) भारतात आयात ७) क)जहाज हुंडी ८) ब) टोपलीवाले
९) ब) बाजारातील व्यापारी १०) ब) विशिष्ट प्रकारचा माल विकणारे किरकोळ दुकाने.
११) ब) सुपर बाजार

**ब)** १) अ-५, ब-३, क-४ , ड-२, इ-१
२) अ-३, ब-१, क-२, ड-७

**क)** १) फिरते व्यापारी, २) किरकोळ व्यापारी, ३) साखळी पद्धतीचे दुकान,
४) एकच किंमत असणारी दुकाने, ५) रस्त्यावरील व्यापारी,
६) मागणीपत्र.

**ड)** **बरोबर** – १, ६, ७, ९ **चूक** – २, ३, ४, ५, ८

**इ)** १. सामान्य दुकाने, २. बाजारातील दुकाने, ३. मॉल

**फ)** १. वस्तू विनिमय, २. ग्राहक, ३. किरकोळ व्यापारी, ४. उत्पादक,

५. किंमत, ६. उधारीने विक्री, ७. ग्राहक, ८. सूपर बाजार,
९. साखळी पद्धतीचे दुकाने, १०. एकच किंमत दुकाने, ११. अमेरिकन, १२. विदेशी.

ग) १. मोठ्या, २. आत, ३. एकच किंमत दुकानात, ४. स्थानिक, ५. मोठ्या,
६. अधिक, ७. एकच, ८. एकच

ई) १. आंतरराष्ट्रीय २.आयात ३. जास्त ४. किरकोळ ५. आंतरराष्ट्रीय

ज) १. उत्पादक, घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, ग्राहक
२. स्थानिक बाजार, राज्य स्तरीय बाजार, राष्ट्रीय बाजार, आंतरराष्ट्रीय बाजार.
३. प्राथमिक अवस्था, आयातपूर्वीची अवस्था, आयात अवस्था, आयातीनंतरची अवस्था.

## ३. लघुउद्योग व व्यवसाय :

प्र.१. अ) १) बेकारी २) मनुष्यबळ ३) जादा ४) व्यवसाय ५) मनुष्यबळ ६) प्रथम ७) ४०%
ब) (अ)-३, (ब)-१, (क)- ६, (ड)-२, (इ )-८

क) १. लघुउदयोग २. लघुउद्योग

ड) १. बरोबर २. चूक ३. चूक ४. बरोबर

इ) १. सुट्टे भाग २. रेशीम उद्योग

फ) १) लघुउद्योग २) दुसऱ्या ३) कमी ४) मनुष्यबळ ५) कमी ६) औद्योगिक

ग) (१) लघु उत्पादन क्षेत्र (२) सूक्ष्म उत्पादन क्षेत्र (३) मध्यम उत्पादन क्षेत्र
(४) सूक्ष्म सेवा क्षेत्र (५) लघु सेवा क्षेत्र

ई) १. बेकारी २.श्रमप्रधान ३. पारंपरिक ४. कमी ५. व्यवसायाची निवड

ज) ब- अ - ड - क

## ४. व्यवसाय संघटनांचे प्रकार – भाग १ :

प्र.१. अ) १) जास्तीत जास्त २) सहकर्ते ३) कर्ता ४) सक्तीचे ५) मर्यादित ६) कायद्याने
७) सक्तीचे ८) मर्यादित ९) १९१२ १०) बोधचिन्ह

ब) (१-ड) (२-फ) (३-ह) (४- क) (५-अ)

क) १. व्यवस्थापन समिती २. एकल व्यापारी व्यवसाय ३. एकल व्यापारी व्यवसाय ४. सहकर्ते
५. नामधारी भागीदार ६. सार्वजनिक कंपनी ७. भागीदारीचा करार ८. सेवा तत्त्व
९. सहकारी संस्था.

ड ) १) बरोबर २) बरोबर ३) बरोबर ४) बरोबर ५) बरोबर ६) बरोबर ७) बरोबर ८) बरोबर ९) बरोबर
१०) चूक ११) बरोबर १२) चूक

इ) १) अशासकीय संघटना २) भागधारक

फ) १) खाजगी क्षेत्र २) एकल व्यापारी ३) एकत्र कुटुंब व्यवसाय
४) सक्रिय भागधारक ५) ऐच्छिक भागीदारी ६) कर्ता आणि सहकर्ता

७) लोकशाही ८) एक व्यक्ती - एक मत ९) एक भाग एक मत
१०) कमी ११) ग्राहक १२) कंपनी

**ग)** १) खाजगी कंपनी २) सहकारी संस्था ३) सार्वजनिक कंपनी
४) एकल व्यापारी ५) भागीदारी संस्था

**ई)** १) हस्तांतर करता येते २) दोन ३) सक्तीचे असते ४) जास्त
५) दोन ६) कर्ता ७) भारतीय भागीदारी कायदा १९३२

## ५ व्यवसाय संघटनांचे प्रकार भाग - २ :

**प्र.१ अ)** १) वार्षिक अंदाजपत्रक, २) वैधानिक महामंडळ, ३) संसद,
४) ५१%, ५) भारताचे राष्ट्रपती,
६) भारत सरकारचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, ७) कायदेशीर,
८) सरकारी, ९) आर्थिक.

**ब)** अ-६, ब-१, क-४, ड-५, इ-३

**क)** १) खाजगी क्षेत्रातील संघटना २) सार्वजनिक क्षेत्रातील संघटना ३) खाजगी क्षेत्र,
४) सार्वजनिक क्षेत्र ५) सार्वजनिक क्षेत्रातील संघटना ६) विभागीय आस्थापना
७) विभागीय आस्थापना ८) विभागीय आस्थापना ९) विभागीय आस्थापना
१०) विभागीय आस्थापना ११) वैधानिक महामंडळ १२) वैधानिक महामंडळ
१३) वैधानिक महामंडळ

**ड)** १) **बरोबर** : १, २, ४, ५, ७, ८, **२) चूक** : ३, ६, ९, १०,

**इ)** १) बँक ऑफ इंडीया २) रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया ३) डाबर ४) टाटा मोटर्स

**ह)** १) कृत्रिम व्यक्ती २) असतात ३) अनेक
४) सरकारचा एक भाग म्हणून ५) सार्वजनिक

## ६. व्यवसाय सहाय्यक संस्था :

**प्र.१. अ)** १) १९९०, २) १९८८, ३) सिडबी (SIDBI), ४) नाबार्ड (NABARD)),
५) शिवरामन, ६) १९५३, ७) १९५७

**ब)** अ) १९९०, ब) १९८२, क) १९४४, ड) १९८३, इ) १९५७,

**क)** १. वित्त, २. सिडबी (SIDBI), ३. सिडबी (SIDBI),
४. SVCL, ५. स्टार्ट-अप् मित्र, ६. नाबार्ड (NABARD),
७. डॉ. महम्मद युनुस, ८. जागतिक बँक

**ड)** बरोबर - १, ४, ५, ७, ८, ९ चूक - २, ३, ६

**इ)** १. वित्त, २. सिडबी (SIDBI), ३. MSME (सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग),
४. MSME'S (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग), ५. १७ मार्च २०१६, ६. उद्यमी मित्र
७. १२ जुलै १९८२, ८. १९५७, ९. संसदेच्या, १०. ऑक्टोबर १९८३,
११. डॉ.महमद युनुस १२. १९४४, १३. वॉशिंग्टन डी.सी, १४. २००६

**फ)** १) २ एप्रिल, १९९० २) १२ जुलै, १९८२ ३) १९५७ ४) १९४४ ५) ऑक्टोबर १९८३

**ह)** १) अल्प, मध्यम व दीर्घ २) ग्रामीण ३) स्वातंत्र्यपूर्व ४) सहकार ५) कमी

## ७. व्यावसायिक पर्यावरण :

**प्र.१ अ)** १) व्यवसाय २) १९९१ ३) राजकीय ४) सामाजिक ५) सार्वजनिक
६) जागतिक ७) जागतिकीकरण ८) धोक्याचा

**ब)** १. अ-३, ब-६, क-९, ड-८, इ-७

२. अ-६, ब-८, क-१, ड-२

**क)** १) अंतर्गत पर्यावरण २) सामाजिक पर्यावरण ३) खाजगीकरण ४) जागतिकीकरण

**ड)** १) बरोबर २) बरोबर ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर ६) चूक ७) चूक

**इ)** १) बाह्य पर्यावरण २) व्यावसायिक पर्यावरण ३) नैसर्गिक पर्यावरण ४) सामाजिक

५) राजकीय ६) तीन ७) खाजगीकरण ८) जागतिकीकरण

**फ)** १) दोन २) अंतर्गत ३) शासन ४) भांडवलशाही

**ई)** १) अंतर्गत घटक २) बाह्य घटक ३) नैसर्गिक पर्यावरणाशी ४) जागतिकीकरण

## ८. व्यवस्थापनाची ओळख :

**प्र.१ अ)** १) अ) गतिमान, २) क) शास्त्रीय, ३) अ) मध्यम, ४) क) कनिष्ठ,
५) क) उद्दिष्ट,

**ब)** १) अ-४ २) ब-५ ३) क-६ ४) ड-१ ५) इ-९

**क)** १) व्यवस्थापन २) मध्यम स्तर व्यवस्थापन ३) शास्त्र ४) उच्च स्तर व्यवस्थापन
५) मध्यम स्तर व्यवस्थापन

**ड)** **बरोबर** – १,३,५ **चूक** – २, ४

**इ)** १) वाणिज्य २) डॉक्टर ३) गायक ४) उच्च स्तर
५) खरेदी व्यवस्थापक ६) पर्यवेक्षक ७) वित्त व्यवस्थापक

**फ)** १) maneggiare २) नियंत्रण ३) सामूहिक उदिदृष्ट ४) मध्यम स्तर व्यवस्थापन
५) मध्यम स्तर व्यवस्थापन ६) कौशल्ये ७) शास्त्र ८) तत्त्वे ९) पेशा

**ग)** १) विशेष कार्यकारी अधिकारी २) पर्यवेक्षक ३) वित्त व्यवस्थापक ४) पेशा ५)कला

**ज)** १) उच्च स्तर व्यवस्थापन, मध्यम स्तर व्यवस्थापन, कनिष्ठ स्तर व्यवस्थापन
२) विशेष कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक, विभागप्रमुख, पर्यवेक्षक,
३) भागधारक, संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक, कार्यालयीन कारकून


**ई)** १) कला, शास्त्र व पेशा २) तीन स्तर ३) मध्यम स्तर व्यवस्थापनाच्या
४) उच्च स्तर व्यवस्थापनाच्या ५) सामाजिक शास्त्र ६) निर्बंधीत असतो ७) औपचारिक











































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

₹१११.००